
कलचुरि नृपति आणि त्यांचा काल



वा. वि. मिराशी

शा. सा. प. व्याख्यानमाला १९५५-५६

कलचुरि नृपति आणि त्यांचा काल

वासुदेव विष्णु मिराशी

सूचना व प्रकाशन संचालनालयातर्फे शासन
साहित्य परिषद् मध्यप्रदेशकरिता प्रकाशित
१९५६

किंमत दोन रुपये

मुद्रक – वि. ना. वाडेगांवकर
उद्यम कमर्शिअल प्रेस
धर्मपेठ, नागपूर १

कै. रायबहादूर डॉ. हीरालाल,

मध्यप्रदेशांतील पहिले पुरातत्त्वज्ञ

आणि

अनेक कलचुरि लेखांचे संपादक,

यांच्या पूज्य स्मृतीस

सादर समर्पण

प्रकाशकाचे दोन शब्द

स्वातंत्र्यप्राप्तिनंतर शिक्षणप्रसाराबरोबरच प्रादेशिक भाषांचा विकास करण्याचें व उच्च दर्जाचें साहित्य निर्माण करण्याचें कार्य मध्य-प्रदेश सरकारने हातीं घेतलें. या कार्यास मूर्तस्वरूप देण्याच्या उद्देशाने या राज्यांत ६ मार्च १९५४ रोजीं मध्यप्रदेश शासन साहित्य परिषदेची स्थापना करण्यांत आली. या परिषदेचे अध्यक्ष पं. रविशंकर शुक्ल असून शिक्षणसचिव श्री. रमाप्रसन्न नायक सचिव आहेत. उच्च प्रकारचें अभिजात वाङमय निर्माण व्हावें म्हणून दरवर्षी हिंदी मराठींतील उत्कृष्ट ग्रंथ, काव्यें, नाटकें, अनुवादित ग्रंथ इत्यादींना पुरस्कार देण्यांत येतात. तसेंच अव्वल दर्जाच्या साहित्यिकांना व उत्तम वक्त्यांना व्याख्यानें देण्यासाठी निमंत्रित करण्यांत येतें. गेल्या दोन वर्षांतील परिषदेच्या कार्याचा आढावा घेतल्यास परिषदेचें उद्दिष्ट सफल झालें आहे असें दिसून येईल. १९५४–५५ मध्ये परिषदेने हिंदी मराठीच्या १९ उत्कृष्ट ग्रंथांना पारितोषिकें दिलीं. याव्यतिरिक्त तरुण लेखकांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने विद्यार्थी–निबंध–स्पर्धांचें आयोजन करून हिंदी मराठीच्या १० उत्कृष्ट निबंधांना बक्षिसें दिलीं. इतर भाषांतील उत्कृष्ट ग्रंथांचा हिंदी मराठींत अनुवाद करण्याचें कार्यहि परिषदेच्या योजनांत अंतर्भूत केलें असून आतापर्यंत चार ग्रंथांचें अनुवादकार्य संपूर्ण झालें आहे. परिषदेने १९५५–५६ सालीं हिंदी मराठीच्या १३ उत्कृष्ट पुस्तकांना बक्षिसें दिलीं. परिषदेच्या व्याख्यानमालेच्या अंतर्गत हिंदी मराठी मिळून आठ भाषणांचें आयोजन करण्यांत आलें. या व्याख्यानमालेंत प्राचार्य वासुदेव विष्णु मिराशी यांनी 'कलचुरि नृपति आणि त्यांचा काल' या विषयावर दिनांक ६ ते ९ फेब्रुवारी १९५६ पर्यंत चार व्याख्यानें दिलीं.

एक विद्वान् इतिहाससंशोधक म्हणून प्राचार्य मिराशी यांचा लौकिक आहे. त्यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्याच्या देवगड तालुक्यांतील कुवळें गावीं दिनांक १३ मार्च १८९३ रोजीं झाला. शालेय व महाविद्यालयीन जीवनांत उच्च प्रकारचें यश संपादून त्यांनी एम्. ए. ला संस्कृत हा विषय घेतला व त्या परीक्षेंत डेक्कन कॉलेज (पुणें) येथून ते सर्वप्रथम आले. त्यानंतर त्यांनी महाविद्यालयांत संस्कृत अध्यापनाचें कार्य सुरू केलें. १९४१ सालीं भारत सरकारने त्यांच्या प्रगाढ विद्वत्तेचा व संशोधनकार्याचा गौरव करून त्यांना 'महामहोपाध्याय' ही पदवी दिली. १९५० मध्ये ते अमरावतीच्या विदर्भ महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून

सेवानिवृत्त झाले. सेवानिवृत्त झाल्यानंतरहि त्यांचा संस्कृत व प्राकृत वाङ्मय, कोरीव लेख, नाणीं इत्यादिकांचा व्यासंग कायम आहे. आतापर्यंत त्यांनी संशोधनात्मक सुमारे २०० लेख लिहिले आहेत. 'कालिदास' (मराठी व हिंदी), 'संशोधनमुक्तावली, सर पहिला', भारत सरकारच्या पुरातत्त्व विभागाने प्रसिद्ध केलेले 'कलचुरि-चेदिसंवताचे उत्कीर्ण लेख' इत्यादि त्यांचीं पुस्तकें प्रकाशित झालीं असून अनेक तज्ज्ञांनी त्यांची मुक्तकंठाने प्रशंसा केली आहे. सध्या ते नागपूर विश्वविद्यालयाच्या फॅकल्टी आफ आर्टस्चे डीन (अध्यक्ष) असून अनेक मंडळांचे सदस्य आहेत. मध्यप्रदेश शासन साहित्य परिषदेने १६ सप्टेंबर १९५६ रोजीं त्यांच्या विद्वत्तेचा व संशोधनकार्याचा गौरवपूर्ण उल्लेख करून राष्ट्रपति राजेंद्रप्रसाद यांच्या हस्तें एक ताम्रपत्र देऊन त्यांचा सत्कार केला.

तीस वर्षांपेक्षाहि दीर्घ कालपर्यंत भारताचा प्राचीन इतिहास संशोधण्याचें एकमेव व्रत प्राचार्य मिराशींनी अखंड चालविलें आहे. 'कलचुरि नृपति आणि त्यांचा काल' या प्रस्तुत व्याख्यानमालेंत त्यांनी माहिष्मती, सरयूपार, त्रिपुरी व रत्नपुर येथील कलचुरि नृपतींचा राजकीय इतिहास आणि तत्कालीन धार्मिक आर्थिक व सामाजिक परिस्थितीचें विवेचन केलेलें आहे. तसेंच त्या काळांतील संस्कृत, प्राकृत व अपभ्रंश वाङ्मयाचा संक्षिप्त वृत्तांत दिलेला आहे. या पुस्तकांत कलचुरिकालीन स्थापत्याचे व शिल्पाचे नमुने व कलचुरींच्या नाण्यांचीं छायाचित्रें दिलीं आहेत. तसेंच कलचुरि राजांचे सामंत, शैव आचार्य व त्याकाळचे कवि इत्यादींची माहिती असल्यामुळे त्यांत विषयांची विविधताहि आहे.

या व्याख्यानमालेमुळे विद्यार्थ्यांच्या व सामान्य वाचकांच्या मनांत कलचुरींच्या इतिहासाविषयी कुतूहल जागृत होईल अशी आशा सूचना व प्रकाशन संचालनालयाला वाटते. याव्यतिरिक्त आणखी १३ पुस्तकांच्या प्रकाशनाचें कार्य शासन साहित्य परिषदेने या संचालनालयाकडे सोंपविलें आहे.

प्रस्तावना

मध्यप्रदेश शासन साहित्य परिषदेने मला कलचुरिकालाविषयीं चार व्याख्यानें देण्याविषयीं नोव्हेंबर १९५५ च्या अखेरीस विनंती केली. तदनुसार त्या व्याख्यानांकरिता मीं 'कलचुरि नृपति आणि त्यांचा काल' हा विषय घेतला. तीं व्याख्यानें मीं नागपुर महाविद्यालयाच्या स्वातंत्र्यभवनांत दिनांक ६ ते ९ फेब्रुवारी १९५६ या दिवशीं दिलीं. त्यांचें पुस्तक आता प्रसिद्ध होत आहे.

मी कलचुरि कोरीव लेखांचा अभ्यास सुरू केल्यास आज तीस वर्षें झालीं. सन १९३५ मध्ये भारत सरकारने कॉर्पस् इन्स्क्रिप्शनम् इंडिकॅरम् (भारतीय–उत्कीर्ण–लेख–संग्रह) या ग्रंथमालेचा कलचुरि–चेदिसंवताच्या लेखांचा चौथा भाग संपादन करण्याचें काम मजवर सोंपविलें होतें. तें काम वीस वर्षांनंतर सन १९५५ मध्ये पुरें झालें. त्या कामाच्या निमित्ताने मला कलचुरि वंशाच्या अनेक प्रकाशित व अप्रकाशित कोरीव लेखांचा व आनुषंगिक वाङ्मयाचा अभ्यास करण्याचा योग आला. या अभ्यासांत मला जें संशोधन करतां आलें त्यावर मी मधून मधून इंग्रजी संशोधन–पत्रिकांत लेख लिहीत असे. मराठी वाचकांस संशोधनाची मांहिती व्हावी म्हणून महत्त्वाच्या व मनोरंजक विषयांवर मीं मराठी मासिकांतहि कांही लेख प्रसिद्ध केले आहेत. तथापि कलचुरि नृपतींच्या कालाचा सर्वांगीण इतिहास देशी भाषांत प्रसिद्ध होणें अवश्य होतें. तें काम प्रस्तुत पुस्तकाच्या रूपाने पुरें करण्याची संधि मला दिल्याबद्दल मी मध्यप्रदेश शासन साहित्य परिषदेचा अत्यंत ऋणी आहें.

प्रस्तुत पुस्तकांत माहिष्मती, त्रिपुरी, सरयूपार व रत्नपुर येथील कलचुरि नृपतींचा राजकीय इतिहास आणि तत्कालीन धार्मिक, सामाजिक व आर्थिक परिस्थितीचा आणि संस्कृत, प्राकृत व अपभ्रंश वाङ्मयाचा संक्षिप्त वृत्तांत दिला आहे. जिज्ञासु वाचकांस मूळ कोरीव लेख व ग्रंथ पाहतां यावे म्हणून महत्त्वाच्या ठिकाणीं जरूर ते संदर्भ दिले आहेत. शेवटीं कलचुरिकालीन स्थापत्याचे व शिल्पांचे नमुने व कलचुरींच्या नाण्यांचीं छायाचित्रें दिलीं आहेत. सारांश, सामान्य वाचकांस कलचुरींच्या कालाविषयीं आवश्यक ती सर्व महत्त्वाची माहिती एकत्र मिळावी असा प्रयत्न केला आहे.

माझ्या व्याख्यानांस उपस्थित असलेल्या कांही विद्वान् गृहस्थांनी सूचना केली की या पुस्तकाबरोबर कलचुरींचे कांही कोरीव लेख छापल्यास विश्वविद्यालयांच्या विद्यार्थ्यांची मोठी सोय होईल. हे कोरीव लेख अनेक संशोधन-मासिकांत विखुरलेले आहेत व त्यांचे अंक आता दुर्मिळ झाले आहेत. कलचुरि लेखांचें माझें पुस्तक आता प्रसिद्ध झालें आहे, पण त्याची किंमत विद्यार्थ्यांच्या

आटोक्याबाहेर आहे. तेव्हा या व्याख्यानाबरोबर कांही निवडक लेख छापल्यास विद्यार्थ्यांना ऐतिहासिक माहितीबरोबर तत्कालीन संस्कृत काव्याचीहि माहिती होईल. ही सूचना मलाहि पटली. म्हणून कलचुरींच्या एकंदर सुमारें १०० लेखांपैकी निवडक दहा अत्युत्कृष्ट व महत्त्वाचे लेख मी एका परिशिष्टांत दिले आहेत. प्रत्येक लेखाच्या आरंभीं त्याचें प्राप्तिस्थान, विषय, काल, स्थलांचा शोध इत्यादिकांवर लहानसें टिप्पण जोडलें आहे. या लेखांच्या योगें विद्यार्थ्यांच्या मनांत कलचुरि लेखांविषयी कुतूहल जागृत होईल अशी आशा आहे. हे लेख कलचुरि राजे, त्यांचे सामंत, शैव आचार्य इत्यादिकांचे असल्यामुळें त्यांत विषयांची विविधताहि आहे. कलचुरि राजांच्या लेखांत कलचुरींच्या चारहि शाखांच्या वंशावळी व राजांचीं वर्णनें आलीं आहेत. यानंतरच्या पांचव्या परिशिष्टांत चित्रांवर व सहाव्या परिशिष्टांत कलचुरींच्या नाण्यांवर टीपा देऊन त्यांविषयी जरूर ती सर्व माहिती दिली आहे. सारांश, 'कलचुरि नृपति व त्यांचा काल' या विषयावरील व्याख्यानांचें पुस्तक उपयुक्त व मनोरंजक व्हावें असा प्रयत्न केला आहे. भारत सरकारचे डायरेक्टर जनरल ऑफ् आर्किऑलॉजी यांनी आपल्या प्रकाशनांतून क्रमांक १, ३, ४, ५, ६ व ९ हीं चित्रें प्रस्तुत पुस्तकांत घालण्यास परवानगी दिली याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे. इतर चित्रें नागपुर संग्रहालयाच्या अधिकाऱ्यांच्या कृपेने घालतां आलीं, यास्तव त्यांचेहि मनःपूर्वक आभार मानतों. मध्यप्रदेशांतील पहिले विख्यात पुरातत्त्वज्ञ कै. रायबहादूर डॉ. हीरालाल यांचें कोरीव लेखांचें संपादनकार्य पाहून मला तसलें कार्य करण्याची इच्छा झाली. म्हणून त्यांच्या पूज्य स्मृतीस हें पुस्तक सादर समर्पण केलें आहे.

मध्यप्रदेशाच्या प्राचीन इतिहासांत वाकाटक व कलचुरि हे दोन राजवंश प्रथितयश होऊन गेले. त्यांची राजकीय, धार्मिक, वाङ्मयीन व कलाविषयक कामगिरी अत्यंत स्पृहणीय अशी होती. तथापि कालाच्या ओघांत तिच्यावर विस्मृतीचा पडदा पडला होता आणि या दोन्ही राजवंशांचीं नांवेंहि लोकांच्या स्मरणांतून गेलीं होती. गेल्या दीडशें वर्षांतील संशोधकांच्या अविरत परिश्रमाने हा विस्मृतीचा पडदा आता अंशतः दूर झाला आहे. मध्यप्रदेश शासन साहित्य परिषदेच्या कृपेने कलचुरि नृपतींच्या कालाचें ओझरतें दर्शन मला मराठी श्रोत्यांना व वाचकांना करवितां आलें याबद्दल मी त्या परिषदेच्या चालकांचा ऋणी आहे. विशेषतः परिषदेचे अध्यक्ष व मध्यप्रदेशाचे मुख्य मंत्री पं. रविशंकरजी शुक्ल व व सन्मान्य सदस्य पं. द्वारकाप्रसादजी मिश्र यांनी या बाबतींत जी गुणग्राहकता दाखविली तिजबद्दल मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानतों.

नागपूर
दि. २६ ऑक्टोबर १९५६.

वा. वि. मिराशी

अनुक्रमणिका

संज्ञा–देश, पत्तला, मंडल इत्यादि–राजसत्ता–राजा हा नरदेव–राजसत्तेवर नियंत्रण–धार्मिक कल्पनांचें प्राबल्य–धर्मशास्त्रांचा अंकुश–राजगुरु, मंत्री व अमात्य–महाराज्ञी–तिला स्वतंत्र अधिकार होता काय ? – राजाधिकारी–मंत्रिमंडळ–सहामंत्री–महात्मात्य – सर्वाधिकारी – प्रतीहारी – प्रशासन खातें – राजन्, सामंत, विषयपति, भोगिक, उपरिक इत्यादि–जमाबंदी खातें–महाप्रमाता–महाक्षपटलिक–विविध प्रकारचे कर–उद्रंग, उपरिकर, पट्टकिलादाय, दुःसाध्यादाय–मंडपिकेंतील विक्रेय वस्तूंवर कर–न्यायखातें–दाण्डिक–धर्मखातें–महाधर्माधिकरणिक, महापुरोहित–महादानिक–युद्ध व संरक्षण खातें–चतुरंग दल–हस्तिसैन्याचें महत्त्व–महापीलुपति, महाप्रमत्तवार, महाश्वसाधनिक, बलाधिकृत, गौल्मिक, दूतक, दण्डपाशिक, चोरोद्धरणिक, चाट, भट–परराष्ट्रीय खातें–महासान्धिविग्रहिक–इतर अधिकारी – महाभाण्डागारिक, महाकोट्टपाल इत्यादि – नेमणुका वंशपरंपरेने केल्या जात काय ? –पंचकुलें–गांवांतील सहा अधिकारी–महत्तर–महत्तम–गमागमिक.

सामाजिक परिस्थिति ५०–५६

वर्णाश्रमव्यवस्था–हिंदु समाजाचा व्यापक दृष्टिकोन–परकी जमातींचा हिंदु समाजांत प्रवेश–ब्राह्मण–त्यांचे भेद–भिन्नशास्त्रीय ब्राह्मणांचीं मूलस्थानें–श्रौत व गृह्य कर्मे–दर्शनांचा अभ्यास–ज्योतिषी–मंत्री– अनुलोम विवाह – क्षत्रिय–तत्कालीन राजांचें क्षत्रियत्व – इतर अधिकारांवर क्षत्रियजातीयांची नियुक्ति–वैश्य–समाजांत मान–त्यांचीं दानकृत्यें–कायस्थ–सूत्रधार, मोची इत्यादि अन्य जाति–स्त्रियांचें समाजांतील स्थान–सतीची चाल–एकत्र कुटुंब पद्धति.

आर्थिक परिस्थिति ५६–६०

श्रेणी–प्राचीन कालच्या बँका–गण–महामात्रगण–इतर गण – वागूलिक, पायटि – देशि – मंडपिका – कर – विक्रीकर–बाजारांतील जिन्नस–वजनें व मापें–निवर्तन–हल–वाप–वसतिदण्ड व प्रयाणदण्ड–तत्कालीन नगरांची समृद्धि–त्रिपुरी–रत्नपुर–राज्यांतील शांतता, सुव्यवस्था व संरक्षण.

ग्रंथनामांचे संक्षेप

तळटीपांत बहुतेक ठिकाणीं ग्रंथांचीं नांवें पूर्ण दिलीं आहेत; पण अनेक ठिकाणीं येणाऱ्या ग्रंथनामांचे व इतर संक्षेप खाली लिहिल्याप्रमाणे योजावे लागले आहेत--

अॅ. भां. ओ. री. इ.--अॅनाल्स् ऑफ दि भांडारकर ओरिएंटल रीसर्च इन्स्टिटयूट्.

इ. --इत्यादि.

इ. क. चे. ई. --इन्स्क्रिप्शन्स् ऑफ् दि कलचुरि-चेदि ईरा (कलचुरि-चेदि संवताचे कोरीव लेख).

ए. इं. --एपिग्राफिया इंडिका.

का. मी. --राजशेखर, काव्यमीमांसा (गायकवाड्स् ओरिएंटल् सीरीज्, बडोदें, १९१६).

क्र. --'इन्स्क्रिप्शन्स् ऑफ दि कलचुरि-चेदि ईरा' या ग्रंथांतील कोरीव लेखांचे क्रमांक (परिशिष्ट दुसरें यांत दिलेले).

श्लो. --श्लोक.

सू. मु. --जल्हण, सूक्तिमुक्तावलि (गायकवाड्स् ओरिएंटल् सीरीज्, १९३८).

१ राजकीय इतिहास

भारताच्या प्राचीन इतिहासामध्ये कलचुरि नृपतींचें स्थान अनेक दृष्टींनी वैशिष्टयपूर्ण आहे. सन ५५० पासून सन १७४० पर्यंत म्हणजे जवळ जवळ बाराशे वर्षें कलचुरि नृपति उत्तर किंवा दक्षिण भारतांतील कोणत्या ना कोणत्या प्रदेशावर राज्य करीत होते. भारताच्या इतिहासांत इतकी दीर्घकाळ टिकलेली दुसरी एकहि राजवट माहीत नाही. पण दीर्घकालीन सत्ता एवढेंच या राजवंशाचें वैशिष्टय नाही. या वंशांत अनेक थोर नृपति होऊन गेले. त्यांनी विस्तृत साम्राज्यें स्थापिलीं, इतकेंच नाही तर विद्या, धर्म व कला यांना उदार आश्रय देऊन आपली कीर्ति दिगंतीं पसरविली. त्यांचीं स्वतःचीं आणि त्यांनी आश्रय दिलेल्या संस्कृत व प्राकृत कवींचीं कांही काव्यें व सुभाषितें सुदैवाने अद्यापि अस्तित्वांत आहेत. त्यांवरून तत्कालीन संस्कृत व प्राकृत विद्येची उन्नति अजमावतां येते. या वंशांतील बहुतेक राजे शैव किंवा पाशुपत पंथाचे अनुयायी होते. त्यांच्या लोकोत्तर औदार्यामुळे या पंथांचा सार्वत्रिक प्रसार झाला व जनतेच्या धार्मिक मताला एक विशिष्ट वळण लागलें. त्यांनी बांधलेलीं गगनचुंबीं देवालयें आता बहुधा नामशेष झालीं आहेत, पण त्यांचे जे अवशेष सध्या उपलब्ध झाले आहेत त्यांवरून तत्कालीन स्थापत्य व शिल्पकलेची श्रेष्ठता प्रत्ययास येते. भारताच्या प्राचीन इतिहासांत आपल्या कर्तबगारीने चिरस्मरणीय झालेल्या या थोर राजवंशाविषयी माहिती आपणास या व पुढील तीन व्याख्यानांत करून घ्यावयाची आहे.

राजवंशाचीं विविध नांवें

कोरीव लेखांत या राजवंशाचें नांव अनेक तऱ्हांनी लिहिलेलें आढळतें. आपल्या अत्यंत प्राचीन लेखांत हे राजे आपलें नांव 'कटच्चुरि' असें देतात. यांचे प्रतिस्पर्धी बदामीचे चालुक्य यांच्या कांही लेखांत यांचें नांव कलत्सूरि असें येतें, पण तें त्यांच्या नांवाचें संस्कृतीकरण करण्याच्या प्रयत्नामुळे झालें असावें.

उत्तरकालीन सर्व लेखांत मात्र यांचें कलचुरि असेंच नांव आढळतें. इ. स. च्या पांचव्या सहाव्या शतकानंतर भारतीय राजे पुराणकालीन सुप्रसिद्ध राजवंशांशीं आपला संबंध जोडण्यांत धन्यता मानूं लागले. कोणी आपण नल राजाचे वंशज आहों असें अभिमानाने सांगू लागले, तर दुसरे पांडव वंशाशीं आपला संबंध जोडण्याचा प्रयत्न करूं लागले. कलचुरि राजेहि याला अपवाद नव्हते. त्यांनी आपला संबंध पुराणप्रसिद्ध कार्तवीर्य हैहयाशीं जोडला. या हैहय ऊर्फ सहस्रार्जुनाने आपल्या सहस्र बाहूंचा बांध घालून नर्मदेचें पाणी अडविलें व त्यामुळे त्या नदीच्या तीरीं शिवपूजा करीत बसलेल्या रावणाने भगवान् शंकराला वाहिलेलीं फुलें पाण्याच्या ओघांत वाहून गेलीं. तेव्हा रावणाला क्रोध येऊन त्याने कार्तवीर्य सहस्रार्जुनाशीं युद्ध केलें; पण त्यांत पराजय पावल्यामुळें कैलासालाहि हलवणाऱ्या त्या बलाढ्य रावणाला सहस्रार्जुनाच्या बंदीखान्यांत कांही काळ घालवावा लागला, या पौराणिक गोष्टीचें रसभरित वर्णन कलचुरींच्या अनेक दानपत्रांच्या आरंभीं आढळतें.[१] आपण या हैहय–सहस्रार्जुनाचे वंशज आहों असें कलचुरि राजे अभिमानाने सांगत असल्यामुळें त्यांचा हैहयवंशी म्हणून कोरीव लेखांत उल्लेख येतो. स्वतः कलचुरींच्या ख्रिस्तोत्तर सहाव्या सातव्या शतकांतील अत्यंत प्राचीन लेखांत हा उल्लेख येत नाही, पण त्या शतकाच्या अखेरीस दिलेल्या इतर राजवंशांच्या कांही दानपत्रांत त्यांचा असा निर्देश केलेला आढळतो. त्यावरून सातव्या शतकाच्या मध्याच्या सुमारास त्यांनी हा संबंध जोडला असावा. नंतरच्या एका शिलालेखांत वृत्ताच्या सोयीकरिता हैहय याचें 'अहिहय' असें रूपान्तर झालेलें आढळतें.[२] व त्याला अनुलक्षून हा वंश अहि किंवा सर्प व हय किंवा घोडा यांच्या संयोगापासून उत्पन्न झाला अशी लौकिक समजूत प्रचलित झाली असावी.

पुराणांत यदु, नंतर त्याचा पुत्र सहस्रजित्, व त्यानंतर हैहय अशी वंशावळ येत असल्यामुळे कलचुरि नृपति तत्कालीन समजुतीप्रमाणे यदूचे वंशज होते खरे, पण त्यांना कोठेहि यादव म्हटलेलें आढळत नाही. याचें कारण हें की रूढीमुळे यादव हें नांव यदूचा दुसरा मुलगा क्रोष्टृ याच्या वंशजांनाच प्राचीन काळापासून लावण्यांत आलें आहे. पण त्रिपुरीचे कलचुरि आपणांस सोमवंशी मानत असत यांत संशय नाही. त्यांच्या कांही दानपत्रांत सोम किंवा चंद्र, नंतर बुध–पुरूरवस्–

१ पाहा––देवः श्रीकार्तवीर्यः क्षितिपतिरभवद्भूषणं भूतधात्र्या
हेलोत्क्षिप्ताद्रिबिभ्यत्तुहिनगिरिसुताश्लेषसन्तोषितेशम् ।
दोर्दण्डाकाण्डसेतुप्रतिगमितमहापूररेवाप्रवाह–
व्याधूतत्र्यक्षपूजागुरुजनितरुषं रावणं यो बबन्ध ।। क्र. ४८, श्लो. ३.

२ क्र. १०८, श्लो. ४.

भरत–हैहय अशी वंशावळ आली आहे. याच्या उलट रत्नपुरच्या कलचुरींच्या अनेक ताम्रपटांत सूर्य, नंतर त्याचा पुत्र मनु, त्याच्या वंशांत कार्तवीर्य अशी वंशावळ दिलेली आढळते.[३] त्यावरून ते आपला संबंध सूर्यवंशाशीं लावत होते असें दिसतें. सूर्यवंश व सोमवंश हे भारतांतील प्रथितयश राजवंश असल्यामुळे कलचुरींनी त्यांच्याशीं आपला संबंध जोडण्याचा प्रयत्न करावा यांत कांही आश्चर्य नाही, पण ते मूळचे भारतीय नसून परकी होते असें अनुमान डॉ. देवदत्तपंत भांडारकरांनी काढलें आहे तें मात्र बरोबर दिसत नाही.

कलचुरि नृपति परकी होते काय ?

परमार, प्रतीहार, चाहमान व चालुक्य या चार राजवंशांची उत्पत्ति अग्नीपासून झाली असें चंद भाटाच्या 'पृथ्वीराज-रासो' या ग्रंथांत वर्णिलें आहे. त्यावरून हिंदु धर्माच्या संरक्षणार्थ व स्वदेशाच्या स्वातंत्र्यार्थ प्राणपणाने लढणारे हे शूर राजवंश मूळचे परकी असून नंतर त्यांना यज्ञसंस्काराने हिंदुधर्मांत समाविष्ट करून घेण्यांत आलें अशी कल्पना डॉ. देवदत्तपंत भांडारकर यांनी मांडली होती. पण तिला पुरेसा आधार नाही. प्राचीन काळीं भारतावर आक्रमण करणाऱ्या शक, कुशाण, हूण इत्यादि परकी टोळ्यांना हिंदुधर्माने आत्मसात् केलें यांत संशय नाही. पण परमारादिकांच्या बाबतींतहि तसेंच घडलें होतें याला प्रमाण नाही. या चार राजवंशांपैकी फक्त परमारांच्या कोरीव लेखांत त्यांच्या मूळ पुरुषाची उत्पत्ति अर्बुद पर्वतावर वसिष्ठ ऋषीच्या होमाग्नीपासून झाल्याचें वर्णन आहे. इतर राजवंश सूर्य किंवा चंद्र यांच्यापासून आपली उत्पत्ति झाल्याचें सांगतात. तसें आपणहि सूर्यचंद्राप्रमाणें सर्व भारतीयांस पूज्य असलेल्या अग्नीशीं आपल्या कुलाचा संबंध जोडावा असें परमारांस वाटल्यास नवल नाही. अशा प्रकारच्या इच्छेपासून ही अग्निकुलाची कविकल्पना निघालेली दिसते. तिचा पहिला उल्लेख पद्मगुप्ताच्या 'नवसाहसांकचरित' या संस्कृत काव्यांत आढळतो. ही गोष्टहि या बाबतींत लक्षांत घेण्यासारखी आहे. असो.

परमारादि चार तथाकथित अग्निकुलांप्रमाणे हैहय वंशहि मूळचा परकी होता असें डॉ. भांडारकरांचें मत होतें त्याला तर काडीचाहि आधार नाही. आपल्या मताचें प्रमाण म्हणून डॉ. भांडारकरांनी 'हरिवंश' व 'विष्णुपुराण' यांतील एका विधानाचा उल्लेख केला आहे, पण तें प्रमाण परीक्षणाच्या कसोटीस उतरत नाही. उपरिनिर्दिष्ट दोन ग्रंथांत हैहयाने शक, यवन, पारद व खश यांच्या साहाय्याने भारतीय नृपति बाहु याचें राज्य काबीज केलें असें वर्णन आलें आहे.

---

३ क्र. ७६, श्लो. २.

शकयवनादि वंश परकी होते, तेव्हा त्याच्या बरोबरचे हैहय हेहि परकी असावे असें डॉ. भांडारकरांचें अनुमान आहे, पण तें भ्रामक आहे. ऐतिहासिक कालांत अनेक भारतीय राजांनी स्वतःच्या महत्त्वाकांक्षेच्या पूर्तीकरिता बलाढ्य परकी लोकांचें साहाय्य घेतलें होतें, पण त्यावरून ते स्वतः परकी होते असें कोणीहि मानीत नाही. तेव्हां केवळ परकी लोकांचें साहाय्य घेतलें या कारणास्तव हैहयांस परकी मानणें उचित होणार नाही. शिवाय या कथेंत ऐतिहासिक भाग किती आहे हेंहि पाहिलें पाहिजे. तालजंघ ऊर्फ हैहय व बाहु हे अत्यंत प्राचीन अशा वेदकालांत होऊन गेले. त्या काळांत शक, यवनादि जाति अस्तित्वांतच नव्हत्या. त्यांनी हैहयाला साहाय्य करणें तर दूरच राहिलें! केवळ पुराणांतील वर्णनावरून हें खरें मानावयाचें तर हैहय हा यदुवंशांत जन्मला होता हें पुराणांचेंच विधान खोटें कां मानावें? तसें तें मानल्यास अर्धजरतीयन्यायाचा दोष पदरीं येईल.

कलचुरि–संवत्

कलचुरि परकी होते हें डॉ. भांडारकरांना वाटण्याचें एक कारण त्यांच्या संवताचा आरंभ ख्रिस्तोत्तर तृतीय शतकाच्या मध्यास झाला हें असण्याचा संभव आहे. ख्रिस्तपूर्व व ख्रिस्तोत्तर दोन तीन शतकांत भारतावर परकी टोळयांच्या स्वाऱ्या झाल्या व त्यापैकी कांहींनी आपले स्वतंत्र संवत् स्थापले. शक–कुशाणांनी सन ७८ मध्यें आपला संवत् चालू केला व तो पुढे कित्येक शतकें 'शकसंवत्' या नावाने दक्षिण भारतांत प्रचलित होता हें सर्वश्रुत आहे. तो स्थापणारे शक–कुशाण हे जसे परकीय होते, तसे सन २४९ मध्यें आरंभ होणारा कलचुरि संवत् स्थापणारे कलचुरि किंवा हैहय हेहि परकी असावे असें हें अनुमान आहे, पण तें बरोबर नाही. कारण हा संवत् कलचुरींनी स्थापला नसून तो मूळचा आभीरांचा होता. पुढें कलचुरींनी त्याचा दीर्घकाल उपयोग केल्यामुळें त्याला 'कलचुरिसंवत्' हें नांव प्राप्त झालें. कोरीव लेखांत या नांवाचा पहिला उल्लेख ख्रिस्तोतर बाराव्या शतकांत आढळतो हें मी इतरत्र[४] दाखविलें आहे. तेव्हा कलचुरि हे मूळचे परकी नसून भारतीयच होते यांत संशय नाही.

---

४ इ. क. चे. ई., प्रस्तावना, पृ. २२–२६. आरंभींच्या ख्रिस्तोत्तर आठव्या शतकापर्यंत महाराष्ट्र, गुजराथ व कोंकण या प्रदेशांत सांपडलेल्या कोरीव लेखांतील कलचुरि संवताच्या वर्तमान वर्षांत २४८–२४९ व गत वर्षांत २४९–२५० मिळविले म्हणजे ख्रिस्ती शकाचें वर्ष येतें. नंतरच्या लेखांतील वर्षांत याकरितां अनुक्रमें २४७–२४८ व २४८–२४९ मिळवावे लागतात. कलचुरि वर्षाचा आरंभ कार्त्तिक शुक्ल प्रतिपदेस होत असे. आरंभींच्या लेखांतील महिने सामान्यतः अमान्त आणि नंतरच्या लेखांतील पूर्णिमान्त असत.

माहिष्मतीचे कलचुरि

कलचुरि नृपतींनी हैहयवंशाशी आपला संबंध जोडला याचें मुख्य कारण ते माहिष्मती नगरींत उदयास आले हें होय. ही नगरी हैहयवंशी माहिष्मान् नामक राजाने वसविली होती म्हणून तिला माहिष्मती असें नांव प्राप्त झालें.[५] ही नगरी कोणती याविषयी विद्वानांत मतभेद आहे. कालिदासाने नर्मदा नदीचें 'माहिष्मती-वप्रनितम्बकांचीम्' असें वर्णन केलें आहे.[६] राजशेखरहि 'यन्मेखला भवति मेकलशैलकन्या' असें माहिष्मतीचें वर्णन करतो.[७] त्यावरून माहिष्मती नगरीला नर्मदा नदीने सर्व बाजूनी वेष्टिलें होतें असें दिसतें. हें दृश्य आपल्या प्रदेशांतील सुप्रसिद्ध तीर्थ ओंकारमांधाता या ठिकाणीं दृष्टीस पडतें. त्यावरून ओंकारमांधाता हीच माहिष्मती होय असें कांही विद्वानांचें मत आहे. याच्या उलट माहिष्मती म्हणजे पूर्वीच्या इंदूर संस्थानांतील महेश्वर होय असें दुसरे विद्वान म्हणतात. महेश्वर हें फार प्राचीन शहर आहे हें अलीकडील उत्खननावरून सिद्ध झालें आहे. तसेंच तेथील दोन मध्ययुगीन शिलालेख आता प्रसिद्ध झाले आहेत, त्यांवरून महेश्वराचें प्राचीन नांव माहिष्मती होतें अशी समजूत निदान चारशें वर्षांइतकी जुनी आहे असें दिसतें.[८] शिवाय अलीकडे त्या नगराच्या नांवाचीं प्राचीन नाणीं तेथें सांपडलीं आहेत. तेव्हा तें गांवच प्राचीन माहिष्मती असण्याचा अधिक संभव आहे. असो.

आद्य कलचुरि नृपतींची राजधानी माहिष्मती होती हें अनेक उल्लेखांवरून दाखवितां येतें. राजशेखराच्या 'बालरामायणां'तील

यन्मेखला भवति मेकलशैलकन्या
वीतेन्धनो वसति यत्र च चित्रभानुः ।
तामेष पाति कृतवीर्ययशोवतंसां
माहिष्मतीं कलचुरेः कुलराजधानीम् ॥

या श्लोकांत माहिष्मतीला 'कलचुरिनृपतींची कुलराजधानी' असें म्हटलें आहे. मुरारि कवीच्या 'अनर्घराघवां'त 'इयं कलचुरिकुलनरेन्द्रसाधारणाग्रमहिषी माहिष्मती नाम चेदिमण्डलमुण्डमाला नगरी'[९] असें म्हटलें आहे.

---

५ हरिवंश, १, ३३, ५.

६ रघुवंश, ६, ४३.

७ बालरामायण, ३, १५.

८ पोतदार स्मारक ग्रंथ, इंग्रजी विभाग, पृ. ३१७ इ.

९ अनर्घराघव, अंक ७.

कलचुरींनी पुढे आपल्या साम्राज्याचा विस्तार उत्तर व दक्षिण भारतांत केल्यावर त्यांच्या कालंजर, त्रिपुरी, प्रयाग, काशी, रत्नपुर, रायपुर, खल्वाटिका इत्यादि अनेक राजधान्या झाल्या; तथापि ते मूळचे माहिष्मतीचे ही समजूत लुप्त झाली नाही हें 'माहिष्मती ही सर्व कलचुरिनृपतींची पट्टराणी होय' अशा वर्णनाने मुरारिकवीने सूचित केलें आहे. कांही हैहयवंशी राजे पुढे दक्षिणेंतील चालुक्यांचे मांडलिक झाले. ते 'माहिष्मतीपुरवरेश्वर' असें बिरुद धारण करीत असत. त्यावरूनहि त्यांनी आपले पूर्वज प्राचीन काळीं माहिष्मतीस राज्य करीत होते याची स्मृति ठेवली होती हें उघड आहे.

कलचुरिवंशसंस्थापक कृष्णराज

माहिष्मतीस उदयास आलेल्या कलचुरि कुलाचा मूळ पुरुष कृष्णराज हा होय. याने सुमारे सन ५५० ते ५७५ या कालांत राज्य केलें. याचे कोरीव लेख अद्यापि सांपडले नाहीत, पण याचीं नाणीं उत्तरेंत राजपुताना व माळवा प्रदेशांत, पश्चिमेंत मुंबई व साष्टी बेटांत, दक्षिणेंत सातारा व नाशिक जिल्ह्यांत व पूर्वेस अमरावती व बैतुल जिल्ह्यांत सांपडलीं आहेत.[१०] त्याच्या मांडलिकाचा एक ताम्रपट रामटेकजवळ नगरधन येथे मिळाला आहे.[११] त्यांवरून त्याचें साम्राज्य–उत्तरेस माळवा व गुजराथ, पश्चिमेस कोंकण, दक्षिणेस सातारा व नाशिक जिल्हे व पूर्वेस नागपूर व बैतुल जिल्हे–या विस्तृत प्रदेशावर पसरलें होतें असें दिसतें. हीं नाणीं चांदीचीं असून त्यांच्या पुढील बाजूवर राजाचा मुखवटा व मागील बाजूवर मध्यभागीं नंदी व सभोंवार 'परममाहेश्वरमातापितृपादानुध्यातश्रीकृष्णराज' असा लेख असतो. या नाण्यांना 'कृष्णराजरूपक' असें म्हणत. तीं निदान ख्रिस्तोत्तर आठव्या शतकाच्या प्रथम पादापर्यंत म्हणजे कृष्णराजाच्या काळानंतर सुमारे दीडशें वर्षें प्रचारांत होतीं असें कोरीव लेखांतील उल्लेखांवरून दिसतें.[१२]

ख्रिस्तोत्तर सहाव्या शतकाच्या मध्यभागीं मध्य व दक्षिण भारतांतील राजकीय परिस्थिति कृष्णराजाच्या उदयास अनकूल होती. सन ५२५ च्या सुमारास विदर्भांतील बलाढ्य वाकाटक वंशाचा अस्त होऊन त्याच्या साम्राज्यांत लहान लहान राज्यें उत्पन्न होऊं लागलीं. पूर्वेस गंग व विष्णुकुंडी राजानीं आपला अंमल स्थापला. दक्षिण कोसलांत पांडववंशी राजे प्रबळ झाले. पश्चिमेस त्रैकूटक राजे कोंकण, गुजराथ व उत्तर महाराष्ट्र यांवर राज्य करीत होते तेहि या काळांत

१० इ. क. चे. ई., प्रस्तावना, पृ. १८० इ.

११ क्र. १२०.

१२ क्र. ३१, ओ. ३८.

हतप्रभ होऊं लागले होते. ही संधि साधून कृष्णराजाने आपल्या राज्याचा विस्तार गुजराथ, कोंकण, उत्तर महाराष्ट्र व विदर्भ या प्रदेशांमध्ये केला. तो 'परममाहेश्वर' म्हणजे भगवान् शंकराचा एकनिष्ठ उपासक होता. त्याने सन ५५० ते ५७५ या काळांत राज्य केलें असावें.

शंकरगण

कृष्णराजानंतर त्याचा पुत्र शंकरगण हा गादीवर आला. याचा एक ताम्रपट नाशिक जिल्ह्यांतील आभोण गांवीं सांपडला आहे. तो उज्जयिनीहून दिला होता.[१३] शिवाय त्याच्या मांडलिकाचा एक अपूर्ण ताम्रपट गुजराथेंत मिळाला आहे.[१४] या दोन लेखांवरून शंकरगणाने आपल्या पित्याकडून मिळालेलें साम्राज्य टिकविलें होतें असें दिसतें. हाहि आपल्या पित्याप्रमाणेंच शिवोपासक होता. शंकरगणाने सुमारें सन ५७५ ते ६०० या कालांत राज्य केलें असावें.

बुद्धराज

शंकरगणानंतर त्याचा पुत्र बुद्धराज हा सन ६०० च्या सुमारास गादीवर आला. त्यानंतर लौकरच दक्षिणेंतील वातापीच्या (सध्याच्या बदामीच्या) चालुक्यवंशी मंगलेशाने त्याच्या साम्राज्याच्या दक्षिण भागावर स्वारी करून त्याचा पराभव केला. या लढाईंत मंगलेशाला खूप लूट मिळाली असें त्याच्या कोरीव लेखांतील वर्णनावरून दिसतें. ही घटना सन ६०१ मध्ये घडली असावी.

या विजयानंतर उत्तरेंत चाल करून भागीरथीच्या तीरीं आपला विजयस्तंभ उभारावा अशी महत्त्वाकांक्षा मंगलेशाच्या मनांत होती, पण त्याचा पुतण्या द्वितीय पुलकेशी यानें बंड केल्यामुळे त्याला ती पुरी करतां आली नाही. इतकेंच नव्हे तर त्या धुमाकुळींत त्याचा स्वतःचा नाश होऊन वातापीची गादी पुलकेशीस प्राप्त झाली. चालुक्यांच्या या गृहकलहामुळे बुद्धराजाला थोडी उसंत मिळाली. या अवधींत त्याने आपल्या राज्याचा नीट बंदोबस्त केला. त्याचे दोन ताम्रपट सन ६१० मध्ये विदिशा (सध्याच्या भिलशाजवळचें बेसनगर) व आनंदपुर (गुजराथेंतील वडनगर) येथून दिले होते.[१५] त्यांत दान दिलेलीं गावें अनुक्रमें नाशिक व भडोच जिल्ह्यांतील होतीं. त्यावरून मंगलेशाकडून पराभव पावल्यावरहि बुद्धराज सन ६१० पर्यंत उत्तरेंत माळव्यापासून दक्षिणेंत महाराष्ट्रापर्यंत पसरलेल्या विस्तृत प्रदेशाचा स्वामी होता यांत संशय नाही.

---

१३ क्र. ६.

१४ क्र. ७.

१५ क्र. ८ व ९.

पण पुलकेशी वातापीच्या गादीवर आल्यावर ही परिस्थिति बदलली. हा चालुक्यनृपति मोठा महत्त्वाकांक्षी होता. त्याने आपल्या राज्याजवळच्या गंग व आलूप या राजांना जिंकून आपल्या राज्याची दक्षिण सरहद्द बिनधोक केली. नंतर त्याने कोंकणच्या मौर्य राजांची राजधानी पुरी (पूर्वीच्या जंजिरा संस्थानांतील राजपुरी) हिच्यावर हल्ला करून ती काबीज केली. हे मौर्य नृपति कलचुरींचे मांडलिक होते, पण बुद्धराजाला त्यांचा पराभव टाळतां आला नाही. पुढे तर पुलकेशीने खुद्द बुद्धराजाच्या अमलाखालील महाराष्ट्रावर चाल केली आणि तो प्रदेश काबीज केला. यासंबंधी त्याच्या ऐहोळे येथील लेखांत खालील श्लोक आला आहे [१६]—

विधिवदुपचिताभिः शक्तिभिः शक्रकल्पः
तिसृभिरपि गुणौघैः स्वैश्च माहाकुलाद्यैः ।
अगमदधिपतित्वं यो महाराष्ट्रकाणां
नवनवतिसहस्रग्रामभाजां त्रयाणाम् ॥

या श्लोकामध्ये पुलकेशी आपल्या प्रभुशक्ति, मन्त्रशक्ति व उत्साहशक्ति या तीन्ही शक्तींच्या योगें नव्याण्णव हजार गांव ज्यांमध्ये आहेत अशा तीन महाराष्ट्रांचा स्वामी झाला असें वर्णिलें आहे. हे तीन महाराष्ट्र म्हणजे कुन्तल किंवा दक्षिण महाराष्ट्र, नाशिक, खानदेश वगैरेंचा उत्तरमहाराष्ट्र व विदर्भ हे होत. या श्लोकांत पुलकेशीच्या प्रतिस्पर्ध्याचें नांव आलें नाही. पण तो कलचुरि बुद्धराजच असला पाहिजे. कारण या काळांत त्याचेंच राज्य या प्रदेशावर होतें. या पराभवानंतर लाट किंवा दक्षिण गुजराथ, मालव (माळवा) व गुर्जर यांच्या अधिपतींनीहि कलचुरींचें स्वामित्व झुगारून देऊन पुलकेशीचें मांडलिकत्व पत्करलें. बुद्धराजाचा हा पराभव सन ६२० च्या सुमारास झाला असावा.

या पराभवानंतर कलचुरींना कांही काळ अज्ञातावस्थेंत घालवावा लागला. यानंतर सुमारे दीडशें पावणेदोनशें वर्षांपर्यंत त्यांचे लेख मिळत नाहींत. ते अज्ञातावस्थेंत होते, एवढेच नाही तर त्यांनी एकदा आपलें पूर्वीचें वैभव मिळविण्याचा प्रयत्न केला असतांहि त्यांना अपयश आलें आणि त्यानंतर त्यांना चालुक्यांचें स्वामित्व कबूल करावें लागलें असेंहि वर्णन कोरीव लेखांत आढळतें. पुढे त्यांचे पूर्व व पश्चिम चालुक्य नृपतींशी शरीरसंबंध झाले. त्यांचा उल्लेख चालुक्यांच्या कोरीव लेखांत येतो.

---

१६ ए. इं., पु. ८, पृ. ६.

कलचुरि राजवटींत पाशुपत पंथाचें वर्चस्व

सन ५५० पासून ६२० पर्यंत म्हणजे सुमारे पाऊणशें वर्षें कलचुरींचें गुजराथ, कोंकण व विदर्भासह महाराष्ट्र या प्रदेशांवर स्वामित्व होतें. त्यानंतर मात्र हे प्रदेश त्यांच्या अमलाखाली कधीहि आले नाहींत. हे आद्य कलचुरि नृपति शिवोपासक होते. त्यांच्या दरबारीं पाशुपत पंथाचें वर्चस्व होतें. एका कलचुरि राज्ञीचा 'पाशुपतराज्ञी' असा निर्देश कोरीव लेखांत आला आहे. बहुधा त्यांच्या उदार आश्रयाने मुंबई जवळचीं घारापुरीचीं (एलिफंटा) लेणीं कोरलीं गेलीं असावीं.[१७] भारतांतील अत्युत्कृष्ट लेण्यांमध्यें त्यांची गणना होते. या लेण्यांमुळें त्यांची कीर्ति सदैव अजरामर राहील यांत संशय नाही.

त्रिपुरीचे कलचुरि

सन ६२० च्या सुमारास बुद्धराजाचा पराभव होऊन कलचुरि साम्राज्य संपुष्टांत आलें. त्यानंतरचा कलचुरींचा सुमारें अडीचशें वर्षांचा इतिहास पंधरा–वीस वर्षांपूर्वींपर्यंत सर्वस्वी अज्ञात होता. प्रस्तुत व्याख्यात्याच्या अलीकडील संशोधनावरून या काळावरील पडदा अंशतः दूर झाला आहे. तथापि अधिक ऐतिहासिक साधनें प्राप्त झाल्याशिवाय या काळाची पूर्ण माहिती होणार नाही.

त्रिपुरीराज्यसंस्थापक वामराजदेव

ख्रिस्तोत्तर सातव्या शतकाच्या अखेरीस कलचुरिवंशांत वामराजदेव नामक महत्त्वाकांक्षी राजा उत्पन्न झाला. त्यावेळीं दक्षिणेंत चालुक्यांची सत्ता प्रबळ होती त्यामुळे त्या दिशेस आपलें राज्य पसरवणें अशक्य आहे असें त्याला आढळून आलें असावें. याच्या उलट मध्य भारतांत हर्षाच्या निधनानंतर सर्वत्र गोंधळ माजून राहिला होता. वामराजदेवाने या संधीचा फायदा घेण्याचा निश्चय करून कालंजर या दुर्भेद्य किल्ल्यावर आक्रमण केलें आणि तेथे आपलें ठाणें बसविलें. तेथून त्याने बुंदेलखंड व वघेलखंड यांवर आपली सत्ता पसरविली, इतकेंच नाही तर गंगानदी पार करून अयोमुख (सध्याचे प्रतापगड व रायबरेली जिल्हे) हा प्रदेशहि पादाक्रांत केला. नंतर त्याने श्वेतपद (गंडकी नदीपलीकडील गोरखपुरचा प्रदेश) जिंकून तेथे आपल्या लक्ष्मणराज नामक धाकटचा भावाची स्थापना केली. या लक्ष्मण-राजाचे वंशज त्या प्रदेशावर कित्येक पिढ्या राज्य करीत होते. त्यांना 'सरयूपारचे कलचुरि' असें म्हणतात.

---

१७ या संबंधी विस्तृत विवेचन तिसऱ्या व्याख्यानांत पाहा.

त्याच्या राज्याचा विस्तार

याप्रमाणे वामराजदेवाचें राज्य उत्तरेंत गोमती नदीपासून दक्षिणेंत नर्मदेपर्यंत पसरलें होतें. त्याने तत्कालीन पद्धतीस अनुसरून 'परमभट्टारक', 'महाराजाधिराज', 'परमेश्वर' या सम्राट्पदनिदर्शक पदव्या धारण केल्या. त्याची एक राजधानी कालंजरच्या दुर्भेद्य किल्ल्यांत होती. दक्षिणेंतील नंतरचे कलचुरि नृपति 'कालंजरपुरवराधीश्वर' असें ब्रिरुद मोठ्या अभिमानाने धारण करीत. त्यावरून कलचुरींची राजधानी कांही काळ कालंजर येथे होती यांत संशय नाही. राजशेखरानेहि 'कालंजरपतिश्चक्रे भीमटः पंचनाटकीम्। प्राप प्रबन्धराजत्वं येषु स्वप्नदशाननम् ॥' या सुभाषितांत कालंजरपति भीमटाचा उल्लेख केला आहे. यासारखीं नांवें सरयूपारच्या कलचुरींच्या वंशावळींत येत असल्यामुळें हा राजा कलचुरिवंशी असावा. या काळचा दुसराहि एक मातृराज नामक कलचुरि नृपति राजशेखराच्या सुभाषितावरून ज्ञात झाला आहे. त्याने 'उदात्तराघव' नामक संस्कृत नाटक रचलें होतें. त्याविषयी पुढे एका व्याख्यानांत माहिती देऊं.

त्याच्या राजधान्या

वामदेवराजाने कालंजर येथे आपली राजधानी स्थापिली ती लष्करी दृष्टीने होय. मध्यभारतांतील कालंजर व चित्रकूट हे किल्ले लष्करी दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे गणले जात. ते ज्याच्या ताब्यांत असत त्यास उत्तर भारतांत आपलें वर्चस्व स्थापणें सोपें जात असे. त्यामुळे पुढे दक्षिणेंतील राष्ट्रकूट राजांनीहि तेथे आपले लष्करी तळ ठेवले होते असें कोरीव लेखांतील उल्लेखांवरून दिसतें. वामराजदेवाने कालंजर येथे लष्करी राजधानी केली असली तरी त्याला नर्मदा नदीचें पवित्र तीर सोडावयाचें नव्हतें. म्हणून त्याने आपली दुसरी राजधानी त्रिपुरी (जबलपूरपासून सहा मैलांवरचें तेवर) येथें केली. त्रिपुरी हें नगर फार प्राचीन होतें. त्याचा उल्लेख महाभारतांत आला आहे. युधिष्ठिराच्या राजसूय यज्ञाकरितां त्याच्या बंधूंनीं दिग्विजय करून करभार आणला. त्याच्या वर्णनामध्ये सहदेवाने त्रिपुरीच्या राजाचा पराभव केल्याचा उल्लेख आहे. या नगराच्या नांवाने पाडलेलीं कांही तांब्याचीं नाणीं ख्रिस्तपूर्व तिसऱ्या किंवा दुसऱ्या शतकांतलीं सापडलीं आहेत. त्यांवरूनहि त्याची प्राचीनता सिद्ध होते. परिव्राजक नृपति संक्षोभ याच्या सन ५१८ च्या ताम्रपटांत डभाला किंवा डाहल देशांतील 'त्रिपुरी' विषयाचा किंवा जिल्ह्याचा निर्देश आहे.[१८] त्यानंतर मात्र त्रिपुरीस कोणाचा अंमल होता हें माहीत नाही.

---

१८ ए. इं., पु. ८, पृ.२८४ इ.

वामराजदेवाच्या काळापासून कलचुरींना 'चेदि देशाचे राजे' किंवा 'चैद्य' असें नांव मिळालें. प्राचीनकाळीं चेदि देशांत यमुनेच्या दक्षिणचा व चंबळा नदीच्या आग्नेय दिशेचा नर्मदा नदीपर्यंतचा प्रदेश अंतर्भूत होत असे. पुढे बघेलखंडाला हें नांव प्राप्त झालें. कलचुरि नृपतींच्या राज्यांतील बराचसा भाग या प्रदेशांतील असल्यामळे त्यांना 'चेदिनृपति' असें म्हणत असत.

वामराजदेव हा त्रिपुरीच्या कलचुरि राज्याचा संस्थापक होय. म्हणून त्याचें नांव त्याच्या वंशजांच्या सर्व ताम्रपटांत मोठ्या आदरानें दिलेलें आढळतें. कर्ण, यश:कर्ण, गयाकर्ण, जयसिंह व विजयसिंह या पांच कलचुरि राजांच्या ताम्रपटांत 'परमभट्टारक–महाराजाधिराज–परमेश्वर–परममाहेश्वर–वामदेव–पादानुध्यात' असें विशेषण त्यांच्या नांवापूर्वी लावलें आहे. याचा खरा अर्थ पुष्कळ काळपर्यंत ध्यानांत आला नव्हता. कोणी वामदेव हें शिवाचें नांव मानीत तर कोणी तें शैवाचार्याचें नांव होतें असें म्हणत. पण या दोन्ही मतांत वामदेवाला लावलेल्या बिरुदांची व विशेषणांची योग्य उपपत्ति लावतां येत नसे.[१९] तेव्हा वामदेव हें 'वामराजदेव' याचें संक्षिप्त रूप आहे असें मानणें जरूर आहे. वामराजदेव असें पूर्ण नांव उपर्युक्त सर्व उपाधींसह मी प्रसिद्ध केलेल्या सागरच्या अत्यंत प्राचीन शिलालेखांत आलें आहे, त्यावरून वरील उपपत्ति योग्य दिसेल.[२०]

प्रथम शंकरगण

चेदि देशांत सांपडलेले अत्यंत प्राचीन कोरीव लेख प्रथम शंकरगणाचे आहेत. हे सर्व सागर व कटनी–मुरवाडा या प्रदेशांतील आहेत.[२१] हा शंकरगण स्वत:चें

---

१९ काश्मीरच्या जयानक कवीच्या 'पृथ्वीराजविजय' काव्यांत साहसिक नामक कलिचुरि (कलचुरि) राजाने वामदेव नामक तपस्व्याला आपली राजलक्ष्मी गुरुदक्षिणा म्हणून दिल्याचें वर्णन आहे. हा साहसिक म्हणजे कलचुरि नृपति गांगेयदेव होय; त्याने आपलें राज्य वामदेवाला दिल्यामुळे त्याचे वंशज स्वत:चें 'वामदेवपादानुध्यात' असें वर्णन करूं लागले असें डॉ. दिनेशचंद्र सरकार म्हणतात. पण ही उपपत्ति परीक्षणान्तीं टिकत नाही; कारण (१) साहसिक हें गांगेयदेवाचें नांव नव्हतें; (२) त्या काव्यांतील वर्णनावरून हा साहसिक कालीवनांत राहत होता. पुढे त्याने त्रिपुरीस राज्य स्थापलें असें दिसतें. तेव्हा हा राजा गांगेयदेव होऊं शकत नाही. गांगेयदेवाच्या अगोदर कित्येक पिढ्या त्रिपुरीस कलचुरींची राजधानी होती. या काव्यांतील साहसिक राजाचें वर्णन सर्वस्वी काल्पनिक दिसतें.

२० क्र. ३५, ओ. १.

२१ क्र. ३५ व ३६; ॲ. भां. ओ. री. इ., पु. ३५, पृ. २० इ.

'वामराजदेव–पादानुध्यात' असें वर्णन करतो, तथापि तो वामराजदेवानंतर लागलीच गादीवर आला असेल असें नाही. या दोघांमध्ये दोन–तीन पिढचा होऊन गेल्या असणें असंभवनीय नाही; कारण मागे सांगितल्याप्रमाणे याप्रकारचें विशेषण अनेक कलचुरि राजांना लावलेलें आढळतें. याच्या लेखांच्या अक्षरवटिकेवरून हा आठव्या शतकाच्या मध्याच्या सुमारास होऊन गेला असावा. वामराजदेवाप्रमाणे यानेहि परमभट्टारकादि सम्राट्पदनिदर्शक पदव्या धारण केल्या होत्या.

प्रथम लक्ष्मणराज

यानंतरचा कोरीव लेख प्रथम लक्ष्मणराजाचा, कलचुरि संवत् ५९३ (सन ८४१–८४२) या वर्षाचा, आहे.[२२] प्रथम शंकरगण व प्रथम लक्ष्मणराज यांच्या काळांत जवळ जवळ शंभर वर्षांचें अंतर आहे. या अवधींत उत्तर भारतांतील राजकीय परिस्थितींत बरीच उलथापालथ झाली होती. आठव्या शतकाच्या उत्तरार्धांत उत्तर भारतांत राजपुतान्याचे प्रतीहार व बंगालचे पाल यांमध्ये सम्राट्-पदाकरितां चुरस लागून राहिली होती. पण दक्षिण भारताचे बलाढ्य राष्ट्रकूट नृपति ध्रुव व तृतीय गोविंद यांनी या दोघांचाहि पराभव केला होता. तृतीय गोविंदाने तर हिमालयाच्या पायथ्यापर्यंतच्या प्रदेशावर आक्रमण करून पालनृपति धर्मपाल व प्रतीहारनृपति द्वितीय नागभट या दोघांनाहि खडे चारले होते. नंतर तो नर्मदा नदीपर्यंत परत फिरला आणि मालव, (दक्षिण) कोसल, कलिंग, वेंगी, डाहल व ओड्रक हे देश जिंकून त्याने त्यांवर आपल्या सेवकांना अधिपति नेमलें, असें संजान ताम्रपटांत म्हटलें आहे. डाहल देशावर कलचुरि राज्य करीत होते. त्यांना या प्रसंगीं राष्ट्रकूटांचें स्वामित्व कबूल करावें लागलें असें दिसतें आणि म्हणूनच कारीतलाई येथे सांपडलेल्या कलचुरि वर्ष ५९३ च्या खंडित शिलालेखांत तृतीय गोविंदाचा पुत्र पहिला अमोघवर्ष याची स्तुति आली असून तत्कालीन कलचुरि नृपति प्रथम लक्ष्मणराजदेव याचें नांव गौण रूपाने त्या लेखाच्या समासामध्ये (मार्जिनमध्ये) लिहिलें आहे. यापुढे कलचुरि व राष्ट्रकूट या घराण्यांत उत्तरोत्तर स्नेहभाव वृद्धिंगत होऊन त्यांचे शरीरसंबंध झाले. कित्येक पिढ्यांत कलचुरि राजकन्यांचा विवाह राष्ट्रकूट राजकुमारांशी झाला.[२३] कलचुरि नृपतींनी राष्ट्रकूटांच्या उत्तर व दक्षिण भारतांतील स्वाऱ्यांत मनोभावाने मदत केली व कांही प्रसंगीं तर राज्यक्रांतिहि घडवून आणून आपणांस इष्ट अशा नातेवाइकास गादीवर बसविलें. नवव्या व दहाव्या शतकांतील अनेक राजकीय घटनांत या दोन राजवंशांचें परस्परांस साहाय्य झालेलें दिसून येतें.

२२ क्र. ३७.

२३ परिशिष्ट ३ पाहा.

प्रथम कोकल्ल

प्रथम लक्ष्मणराजाने सुमारें सन ८२५ ते ८५० या काळांत राज्य केलें. त्यानंतर प्रथम कोकल्ल हा गादीवर आला. हा मोठा महत्त्वाकांक्षी राजा होता. याने उत्तरेंत कनोजच्या प्रथम भोजास साहाय्य करून त्याला त्याच्या गादीवर पक्कें केलें. दक्षिणेंत राष्ट्रकूट नृपति द्वितीय कृष्ण हा तर कोकल्लाचा जामात होता. त्याचें वेंगीच्या चालुक्याशीं युद्ध दीर्घकाळ चालू होतें. कोकल्लाने आपला मुलगा द्वितीय शंकरगण यास मोठ्या सैन्यासह पाठवून राष्ट्रकूटांना विजय मिळविण्यांत बहुमोल मदत केली. सरयूपारचा कलचुरि राजा शंकरगण व चित्रकूटचा गुहिलनृपति हर्ष यांसहि कोकल्लाने साहाय्य केल्याचा कोरीव लेखांत उल्लेख आहे. त्याने चंदेल्ल राजकन्या नट्टादेवी हिच्याशीं विवाह करून मध्य भारतांतील चंदेल्ल राजवंशाशीं मैत्रीचे संबंध प्रस्थापित केले होते. अशा रीतीने उत्तर व दक्षिण भारतांत कोकल्लाने आपलें वर्चस्व बसविलें होतें. त्याने सुमारें सन ८५० ते ८९० पर्यंत राज्य केलें असावें.

यानंतर द्वितीय शंकरगण व त्याच्या मागून त्याचा पुत्र बालहर्ष हे गादीवर बसले. शंकरगणाच्या कारकीर्दींत दक्षिण कोसलांतील प्रदेश जिंकून तेथे कलचुरींच्या शाखेची स्थापना करण्यांत आली. पण ती अल्प काल टिकली. याशिवाय या दोन राजांच्या कारकीर्दीविषयीं आपणांस फारशी माहिती नाही.

प्रथम युवराजदेव

पण यानंतरच्या प्रथम युवराजदेवाविषयी मात्र बरीच माहिती उपलब्ध झाली आहे. तत्कालीन भारतीय राजांत याने आपल्या शौर्याने व राजनीतीने प्रमुख पद मिळविलें होतें. याच्या शत्रूंच्याहि लेखांत ‘विख्यातक्षितिपालमौलिरचनाविन्यस्तपादाम्बुजः’ (ज्याने आपलें पदकमल विख्यात नृपतींच्या शिरावर स्थापिलें आहे) असें याचें वर्णन आलें आहे. याने गौडाधिपतीचा, मालवनृपतीचा, तसेंच दक्षिणकोसलाधिपतीचाहि पराभव केला होता. राष्ट्रकूट नृपति तृतीय इंद्र याने एका कलचुरि राजकन्येशी विवाह केला होता. त्याच्या कनोजवरील स्वारींत युवराजदेवाने त्याला मदत केली. राष्ट्रकूट व कलचुरि यांच्या एकवटलेल्या सामर्थ्यापुढे प्रतीहारनृपति महीपाल याचा टिकाव लागेना. त्याला आपली राजधानी टाकून पळ काढावा लागला. तेव्हापासून प्रतीहारांच्या साम्राज्यास उतरती कळा लागली. सुप्रसिद्ध संस्कृत कवि राजशेखर हा प्रतीहारनृपति महेन्द्रपाल व महीपाल यांच्या आश्रयास कनोज येथे होता. तो या स्वारीनंतर त्रिपुरीस आला. तेथे त्याने आपली ‘विद्धशालभंजिका’ नामक नाटिका व ‘काव्यमीमांसा’ हा संस्कृत साहित्यशास्त्रावरील बहुमोल ग्रंथ लिहिला.

पयोष्णीचें युद्ध

दक्षिणेंत तृतीय कृष्णानंतर त्याचा पुत्र चतुर्थ गोविंद हा मान्यखेट येथे राष्ट्रकूटांच्या गादीवर बसला. हा ख्यालीखुशालींत मग्न असे. यामुळे तो आपल्या मांडलिकांत व प्रजेंतहि अप्रिय झाला होता. त्याचें व त्याचा चुलता बद्दिग उर्फ तृतीय अमोघवर्ष याचें भांडण होऊन अमोघवर्ष त्रिपुरीस युवराजदेवाच्या आश्रयास आला. अमोघवर्ष हा युवराजदेवाचा जामात होता. त्याचा पक्ष घेऊन युवराजदेवाने राष्ट्रकूटांच्या राज्यांत क्रांति घडवून आणली आणि तेथे आपलें वर्चस्व स्थापण्याचा प्रयत्न केला. त्याने बद्दिगाबरोबर मोठ्या सेनेसह आपल्या सेनापतीला पाठविलें. वाटेंत चतुर्थ गोविंदाच्या पक्षाच्या अनेक सामंतांनी त्या सेनेला अचलपुरापासून दहा मैलांवर पयोष्णीच्या, सध्याच्या पूर्णा नदीच्या, तीरीं अडविलें. अचलपुरास राज्य करणारा राष्ट्रकूट सामंत कर्कर हा गोविंदाच्या पक्षांत प्रमुख होता. पयोष्णीच्या काठीं या दोन सैन्यांमध्ये तुमुल युद्ध होऊन कलचुरि सैन्यास विजय मिळाला. नंतर तें सैन्य मान्यखेट राजधानीवर चालून गेलें. तोंपर्यंत दक्षिणेंतहि चतुर्थ गोविंदाच्या विरुद्ध बंडाळी उत्पन्न झाली होती. तिचा पुढारी चालुक्य सामंत द्वितीय अरिकेसरी हा होता. त्याने गोविंदाच्या पक्षाच्या लोकांचा पाडाव करून मान्यखेटावर चाल केली आणि तेथे चतुर्थ गोविंदाला कंठस्नान घातलें. उत्तरेंतून कलचुरि सैन्याबरोबर बद्दिग–अमोघवर्ष आल्यावर त्याला त्याने गादीवर बसविलें व त्याच्या नांवाची द्वाही सर्वत्र फिरविली.

कलचुरि सैन्याला पयोष्णीच्या युद्धांत विजय मिळाल्याची वार्ता त्रिपुरीस समजतांच सर्वत्र आनंदीआनंद झाला. कारण त्या विजयामुळें युवराजदेवाची चक्रवर्ती होण्याची महत्त्वाकांक्षा पूर्ण झाली होती. या उत्सवप्रसंगीं राजशेखराचें 'विद्धशालभञ्जिका' हें संस्कृत नाटक प्रथम रंगभूमीवर आलें. या नाटकांतील संविधानक काल्पनिक असलें तरी त्याची पार्श्वभूमि ऐतिहासिक आहे हें मी इतरत्र[२४] सविस्तर दाखविलें आहे. या नाटकांत पयोष्णीच्या युद्धाविषयीं बरीच माहिती मिळते.

बद्दिग–अमोघवर्ष मान्यखेटच्या गादीवर बसला तेव्हा बराच वृद्ध झाला होता. शिवाय तो शांत व साधुवृत्तीचा गृहस्थ होता. म्हणून आपल्या तृतीय कृष्ण नामक पुत्राच्या स्वाधीन राष्ट्रकूट साम्राज्याचा कारभार सोंपवून तो त्रिपुरीस परत आला आणि तेथेच त्याने आपलें उर्वरित आयुष्य घालविलें. इकडे त्याचा पुत्र तृतीय कृष्ण हा मोठा पराक्रमी व महत्त्वाकांक्षी निघाला. त्याने दक्षिणेंतल्या

२४ संशोधनमुक्तावलि, सर पहिला, पृ. १८८–१९५.

चोल, पांड्य, चेर, इत्यादि राजांना पराभूत करून त्यांस व सिंहलद्वीपाच्या राजालाहि करभार देण्यास भाग पाडलें. तृतीय कृष्णाच्या या दिग्विजयामुळे युवराजदेवाच्या चक्रवर्तित्वाचें स्वप्न विरून गेलें असावें. त्याच्या कारकीर्दीच्या शेवटीं शेजारच्या चंदेल्ल नृपति यशोवर्म्याने त्याचा पराभव केला.

शैवपंथास राजाश्रय

युवराजदेवाची कारकीर्द त्याने शैवपंथास दिलेल्या उदार आश्रयामुळेंहि सुविख्यात झाली आहे. त्याने चालुक्यकुलोत्पन्न अवनिवर्म्याची कन्या नोहला हिच्याशीं विवाह केला होता. ती त्याची प्रियपत्नी व पट्टराणी झाली. ही अत्यंत शिवभक्त होती. बहुधा हिच्या सांगण्यावरूनच युवराजदेवाने मध्यभारतांतील मत्तमयूर मठाच्या प्रभावशिव नामक शैव आचार्यास आदरपूर्वक आपल्या राज्यांत बोलावून त्याच्याकरितां रेवा नगराजवळील गुर्गी या गांवीं एक मोठा मठ व देवालय बांधून दिलें व त्यांत राहणाऱ्या शैव आचार्यांच्या योगक्षेमाकरिता अनेक गांव दान दिले. याच्या काळीं भेडाघाटजवळील टेकडीवर योगिनींचें वर्तुळाकार देवालय बांधण्यांत येऊन त्यांत अनेक योगिनींच्या मूर्तींची प्रतिष्ठापना करण्यांत आली. या टेकडीच्या गोल आकारावरून तिच्याजवळ बांधलेल्या शैव मठास 'गोलकी मठ' असें नांव पडलें. पुढे त्याच्या शाखा दक्षिण भारतांत सर्वत्र पसरल्या. मलकापुरम् या आन्ध्र प्रदेशांतील गावीं सांपडलेल्या शिलालेखांत म्हटलें आहे की युवराजदेवाने गोलकी मठाला तीन लक्ष ग्रामांची भिक्षा घातली. युवराजदेव ज्या डाहल देशावर राज्य करीत होता त्यांतील ग्रामांची संख्या पुराणपरंपरेनुसार नऊ लाख होती. तेव्हा मलकापुरम्च्या लेखांतील विधान खरें असल्यास युवराजदेवाने आपल्या राज्याच्या उत्पन्नाचा तिसरा हिस्सा या शैवमठास दान दिला होता असें मानावें लागेल. या विधानाला उपोद्बलक प्रमाण अद्यापि सापडलें नाही. तथापि युवराजदेवाने या शैव आचार्यास अनेक गावें दान दिलीं होतीं यांत संशय नाही. त्यांपैकी कांहींचा उल्लेख गुर्गी येथील शिलालेखांत येतो. युवराजदेवाची राणी नोहला हिने ईश्वरशिव नामक दुसऱ्या एका शैवाचार्यास आपल्या राज्यांत बोलावून त्याला वैद्यनाथ व नोहलेश्वर या शिवालयांना जोडलेल्या मठांचा अधिपति केलें आणि अनेक गाव दान दिले. युवराजदेवाचा मंत्री भाकमिश्र हा मोठा विद्वान् व धार्मिक प्रवृत्तीचा ब्राह्मण होता. त्याचा अमात्य गोल्लाक हा अत्यंत विष्णुभक्त होता. त्याने बांधवगडमध्ये मत्स्य, कूर्म, वराह, परशुराम, हलधर यांच्या मोठमोठ्या मूर्ति कोरविल्या होत्या.

द्वितीय लक्ष्मणराज

प्रथम युवराजदेवानंतर त्याचा पुत्र द्वितीय लक्ष्मणराज हा गादीवर आला.

हाहि आपल्या पित्याप्रमाणे महाप्रतापी होता. याने वंग, पांड्य, लाट, गुर्जर व काश्मीर या देशांच्या राजांना जिंकलें होतें असें वर्णन कोरीव लेखांत आढळतें. आपल्या पित्याप्रमाणे यानेहि दक्षिण कोसलावर (सध्याच्या छत्तीसगडावर) स्वारी केली, इतकेंच नाही तर पुढे ओरिसापर्यंत चाल करून त्याने त्या देशाच्या राजाचा पराभव केला आणि त्याच्याकडून कालियनागाची रत्नजडित सोन्याची मूर्ति हस्तगत केली, आणि ती पुढे सौराष्ट्रांतील सोमनाथाला अर्पण केली.

युवराजदेवाप्रमाणे लक्ष्मणराजहि अत्यंत शिवभक्त होता. त्याने मत्तमयूर-मठाच्या हृदयशिव नामक शैवाचार्यास बोलावून त्याला बिलहरी येथील वैद्यनाथाच्या देवालयाचा व मठाचा अधिपति केलें. दुसऱ्या प्रशान्तशिव नामक शैवाचार्याने गुर्गी येथे भगवान् शंकराचें देवालय व चंद्रेहे येथे शोण नदीच्या कांठी व काशींतहि तपश्चर्येसाठी मठ बांधले. लक्ष्मणराजाचा मंत्री सोमेश्वर हा अत्यंत विद्वान् व वेदविद्यानिपुण असा ब्राह्मण होता. त्याने कारीतलाई येथे विष्णूच्या वराहावताराचें 'सोमस्वामी' नांवाचें उत्तुंग देवालय बांधून जवळच सोमस्वामिपुर नामक अग्रहार वसविला. या देवालयासाठीं लक्ष्मणराज, त्याची राणी राहडा आणि पुत्र तृतीय शंकरगण यांनी कांही ग्रामांचें दान केलें.

तृतीय शंकरगण

लक्ष्मणराजानंतर त्याचा पुत्र तृतीय शंकरगण गादीवर बसला. यानेहि कनोजच्या प्रतीहाराशीं तसेंच महोत्सवपुराच्या (महोबाच्या) चंदेल्लांशीं युद्ध केलें. चंदेल्लांशीं झालेल्या युद्धांत त्यांचा सामन्त चालुक्यवंशी नरसिंह याने याला ठार मारलें असें दिसतें. कारण एका शिलालेखांत त्याने कलचुरि नृपतीच्या स्त्रियांना वैधव्यदीक्षा दिल्याचा उल्लेख आहे. इतर पुराव्यावरून हा राजा तृतीय शंकरगणच असावा असें वाटतें.

कलचुरि नृपति बहुधा शिवोपासक असत, पण हा तृतीय शंकरगण विष्णू-पासक होता. त्याला कारीतलाई येथील शिलालेखांत 'परम वैष्णव' म्हटलें आहे. त्याचा एक खंडित शिलालेख मी नुकताच प्रसिद्ध केला आहे.[२५] त्यांतहि आरंभीं विष्णुस्तुतिपर श्लोक आहे.

द्वितीय युवराजदेव

या शंकरगणानंतर त्याचा भाऊ द्वितीय युवराजदेव गादीवर आला. याच्या कारकीर्दींत परमारनृपति वाक्पति मुंजाने कलचुरींच्या राज्यावर आक्रमण करून

२५ अॅ. भां. ओ. रि. इ., पु. ३५, पृ. २३ इ.

युवराजदेवाचा पराभव केला व त्याची राजधानी त्रिपुरी काबीज केली. पण पुढे लौकरच दक्षिणेंतील चालुक्य नृपति तैलप याच्याशीं लढण्याचा प्रसंग आल्यामुळे कलचुरीशीं तह करून त्याला आपल्या राजधानीस परतावें लागलें.

या काळांत कलचुरींच्या सामर्थ्याला उतरती कळा लागली होती असें दिसतें. कारण या सुमारास गजनीचे सुलतान सबक्तगीन व महमुद यांच्या स्वाऱ्यांना थोपवून धरण्याकरिता पंजाबच्या जयपाल व आनंदपाल या राजांनी ज्या उत्तर-भारतीय नृपतींस आपल्या साहाय्यास आवाहन केलें होतें त्यांमध्ये कलचुरींचा उल्लेख आढळत नाही.

द्वितीय कोकल्ल

द्वितीय युवराजदेवानंतर द्वितीय कोकल्ल गादीवर आला. याने कनोजच्या प्रतीहारवंशी राज्यपालाचा, गौड देशाच्या महीपालाचा व कुन्तलाधिपति चालुक्य नृपति पंचम विक्रमादित्याचा पराजय केला. मुसलमानी इतिहासकार मथुरेजवळ महावन या ठिकाणीं ज्याने गजनीच्या महमुदाशीं सामना दिला, व ज्याच्या ताब्यांत अनेक किल्ले व सैन्यांत असंख्य हत्ती होते अशा एका कुलचंद नामक राजाचा उल्लेख करतात. हा कुलचंद म्हणजे कोकल्ल चैद्य असावा असें अनुमान प्रो. होडीवाला यांनी केलें आहे.[२६] तें असंभवनीय वाटत नाही.

गांगेयदेव–विक्रमादित्य

या द्वितीय कोकल्लानंतर त्याचा मुलगा गांगेयदेव सन १०१५ च्या सुमारास गादीवर आला. हा महाप्रतापी व मोठा महत्त्वाकांक्षी होता. याने थोडयाच अवधींत आपल्या वंशाला पुनः उज्ज्वल कीर्ति प्राप्त करून दिली. आरंभीं याने चंदेल्लांचें पुढारीपण स्वीकारलें होतें. महमुदापुढे भित्रेपणाने मान वाकविणाऱ्या कनोजच्या प्रतीहारवंशी राज्यपालाविरुद्ध जे मध्यभारतांतील राजे उठले त्यांचें पुढारीपण चंदेल्ल नृपति विद्याधर याच्याकडे होतें. परमार नृपति भोज व कलचुरि नृपति गांगेयदेव हे या प्रसंगीं चंदेल्लांच्या निशाणाखाली एकवटले होते. पण पुढे गांगेयदेवाने आपलें सामर्थ्य वाढवून चंदेल्लांचें धुरीणत्व झुगारून दिलें. त्याने परमार भोज व चोल राजेंद्र यांच्याशीं सख्य केलें आणि तिघांनी तीन दिशांनी कुन्तलनृपति जयसिंह याच्या राज्यावर चाल केली. गांगेयापुढें कुन्तल राजाला आपलें कुन्तलत्व टाकून द्यावें लागलें, म्हणजे शस्त्र खाली ठेवावें लागलें, असें कलचुरि लेखांत म्हटलें आहे. याच्या उलट, जयसिंहाने मालव राजाच्या

---

२६ स्टडीज इन् इंडो–मुस्लिम हिस्टरी, पृ. १४६.

आधिपत्याखालील राजसंघाचा पाठलाग करून त्यास पिटाळून लावलें असें चालुक्य आपल्या लेखांत म्हणतात. तेव्हा विजयश्रीने कोणत्या पक्षास माळ घातली तें ठरविणें कठीण आहे.

कलचुरि व परमार यांचेंहि सख्य फार काळ टिकलें नाही. धाराधिपति भोजाने गांगेयाचा भंग करून आपली इच्छा पूर्ण केली असें 'पारिजातमंजरी' या संस्कृत नाटकाच्या प्रस्तावनेंत म्हटलें आहे.[२७] कलचुरि व परमार या शेजारच्या दोन राजवंशांतील वैमनस्य अनेक पिढ्या टिकलें आणि त्यायोगें दोघांचेंहि अपरिमित नुकसान झालें.

यानंतर गांगेयाने दक्षिण कोसलच्या कलचुरि शाखेंतील कमलराजाच्या साहाय्याने उत्कलावर (ओरिसावर) स्वारी केली आणि पूर्व किनाऱ्यावर आपला विजयस्तंभ उभा केला. नंतर या विजयाची निदर्शक 'त्रिकलिंगाधिपति' अशी पदवी त्याने धारण केली. त्याच्या नंतर त्रिपुरी येथे राज्य करणाऱ्या सर्व कलचुरि राजांनी आपल्या लेखांत या पदवीचा अभिमानपूर्वक निर्देश केला आहे.

उत्तरेंत राज्यविस्तार

महमुदाच्या स्वाऱ्यांमुळे कनोजच्या प्रतीहारांची सत्ता संपुष्टांत आली होती. मध्य-भारतांतील चंदेल्लहि त्या काळांत हतप्रभ झाले होते. ही संधि साधून गांगेयाने गंगा-यमुना नद्यांचा अन्तर्वति प्रदेश आपल्या राज्यास जोडला व प्रयाग येथे आपली दुसरी राजधानी केली. पुढे त्याने बनारस नगरहि आपल्या ताब्यांत घेतलें. गांगेयाचा अंमल बनारसला असतांना अहमद नियालतिगिन नामक पंजाबच्या सुभेदाराने त्या शहरावर अकस्मात् हल्ला करून दोन प्रहर पर्यंत तें लुटलें, पण नंतर लागलीच निघून गेल्यामुळे तो आपल्या राज्यांत सुखरूप पोचला असें तारीख-इ-बैहकी या मुसलमानी बखरींत लिहिलें आहे. त्यावरून हा हल्ला अचानकपणे झाला होता असें दिसतें.

गांगेयाने 'महाराजाधिराज' व 'परमेश्वर' ह्या सम्राट्-पदनिदर्शक पदव्या धारण केल्या. त्याची कीर्तिहि दूरवर पसरली. महमुदाचा आश्रित अलबेरूनी याने आपल्या ग्रंथांत ज्या थोड्या भारतीय राजांचा नामनिर्देश केला आहे त्यांमध्ये

२७ वल्गद्वाणजयक्षमो विजयते निःशेषगोत्राणकृत्कृष्णः कृष्ण इवार्जुनोऽर्जुन इव श्रीभोजदेवो नृपः । विस्फूर्जद्विषमेषुवेधविधुरां राधां विधत्ते स्म यस्तूर्णं पूर्णमनोरथश्चिरमभूद्गाङ्गेयभङ्गोत्सवे ।।

डाहलाधिपति गंग म्हणजे गांगेय हा आहे. त्याची राजधानी तिऔरी आहे असेंहि त्याने म्हटलें आहे. हें नाव 'त्रिपुरी' चें अपभ्रष्ट रूप आहे हें सांगणें नकोच.

गांगेयाच्या कारकीर्दीच्या शेवटीं त्याचा पुत्र कर्ण याने मगधावर स्वारी केली. त्याने गया नगरापर्यंत आक्रमण केलें. त्यावेळीं तें नगर पालनृपति नयपाल याच्या राज्यांत मोडत होतें. गयेच्या कित्येक बौद्ध मठांची या प्रसंगीं लूट होऊन चार भिक्षु व एक उपासक मारले गेले. शेवटी अतिश दीपंकर या सुप्रसिद्ध बौद्ध भिक्षूच्या मध्यस्थीने संधि होऊन या स्वारीचा शेवट झाला. याच सुमारास गांगेयाचें देहावसान झालें. त्या कारणामुळेहि कर्णाला परत फिरावें लागलें असेल.

गांगेय हा शिवभक्त होता. प्रयागच्या अक्षय्यवटाजवळ निवास करण्याची त्याला फार आवड असे. त्या ठिकाणींच त्याला मृत्यु आला. त्याच्या बरोबर त्याच्या शंभर राण्या सती गेल्या असें कोरीव लेखांत म्हटलें आहे. तें खरें असल्यास तें दृश्य अत्यंत हृदयद्रावक झालें असलें पाहिजे.

धर्म व कला यांस राजाश्रय

कलचुरि वंशांतील अत्यंत बलाढ्य अशा राजांमध्ये गांगेयाची गणना होते. त्याच्या शत्रूंच्याहि लेखांत त्याचें 'जितविश्व' (जगज्जेता) असें वर्णन केलें आहे. त्याने 'विक्रमादित्य' ही पदवी धारण केली होती. तो गादीवर आला त्या वेळीं कलचुरि वंशाला अवकळा आली होती, पण त्याने आपल्या पराक्रमाने त्याला मानाचें स्थान मिळवून दिलें. तो स्वतः शिवभक्त असल्याने मुसलमानांपासून काशी व प्रयाग या हिंदूंना अत्यंत पवित्र वाटणाऱ्या शिवधामांचें रक्षण करण्याकरिता त्याने तीं आपल्या ताब्यांत घेतलीं. त्याच्या निधनकाळीं उत्तर प्रदेशाचा बराच प्रदेश त्याच्या अमलाखालीं आला होता. त्याचा कलाकोविदांनाहि उदार आश्रय होता. त्याने काशीमध्ये मेरुपद्धतीचें एक उत्तुंग शिवालय बांधलें होतें. मेरु हें षट्कोनी व बारा मजल्याचें (कांहींच्या मतें सोळा मजल्याचें) देवालय असे. त्याला चार दरवाजे व चार शिखरें असत असें शिल्पशास्त्रावरील ग्रंथांत म्हटलें आहे. गांगेयाने आपल्या नांवाचीं सोन्याचीं नाणीं पाडलीं. त्यांच्या पुढील बाजूवर तीन ओळींत राजनाम असून मागील बाजूवर बसलेल्या चतुर्भुज लक्ष्मीची आकृति आहे. या नाण्यांचें अनुकरण पुढे अनेक भारतीय राजांनी केलें. दूरच्या काश्मीरांतहि या सारखीं नाणीं नंतर प्रचारांत आलीं.

महाप्रतापी कर्ण

गांगेयानंतर सन १०४१ मध्ये त्याचा पुत्र कर्ण गादीवर आला. हा आपल्या पित्याहून सवाई पराक्रमी निघाला. आपल्या कारकीर्दीच्या पहिल्या सात वर्षांतच

त्याने अनेक विजय मिळविले. त्याने प्रथम वंग किंवा पूर्वबंगालवर चाल केली व तेथील गोविंदचंद्र नामक राजाला किंवा त्याच्या उत्तराधिकाऱ्याला पदच्युत करून तें राज्य वज्रवर्मा याला दिलें. पुढे त्याने त्याच्या जातवर्मा नामक मुलाला आपली कन्या वीरश्री देऊन तो संबंध पक्का केला. नंतर त्याने दक्षिणेकडे वळून पल्लव, चोल व कुन्तल (उत्तर चालुक्य) राजांना पराभूत केलें. त्याकाळीं कुन्तल देशावर चालुक्य वंशी प्रथम सोमेश्वर उर्फ आहवमल्ल याचें राज्य होतें. बिल्हणाने आपल्या 'विक्रमांकदेवचरितां' त या सोमेश्वराने डाहलाधिपति कर्णाचा उच्छेद केला असें म्हटलें आहे. तेव्हा या युद्धांत विजयश्रीने कोणास माळ घातली हें सांगणें कठीण आहे. नंतर कर्णाने गुर्जराधिपतीचा पराभव केला. कर्णाच्या आक्रमणाची वार्ता ऐकतांच गुर्जररमणींच्या गालांवर कज्जलयुक्त अश्रु गळत असत आणि त्यांच्या भालावरील सौभाग्यनिदर्शक तिलक नाहीसा होई असें काव्यमय वर्णन कोरीव लेखांत आलें आहे.[२८] 'प्राकृतपैंगलां'तील एका अपभ्रंश श्लोकांतहि गुर्जर नृपतीवरील कर्णाच्या विजयाचा उल्लेख आहे. पण पुढे कर्णाने गुर्जरनृपति भीम याच्याशीं राजनैतिक सख्य केलेलें दिसतें.

कर्णाचे दिग्विजय

याप्रमाणे आपल्या कारकीर्दीच्या पहिल्या सात वर्षांतच कर्णाने आपल्या सामर्थ्याची चुणुक अनेक राजांना दाखविली होती. तथापि त्यामुळे त्याच्या राज्याचा विस्तार वाढला नव्हता. पण यापुढील दोन तीन वर्षांत त्याला या बाबतींत जास्त यश प्राप्त झालें. या सुमारास धाराधिपति भोज हा निधन पावला. त्या संधीचा फायदा घेण्याकरिता कर्णाने गुर्जरनृपति भीम याशीं संधान बांधलें. त्या दोघांनी दोन दिशांनी माळव्यावर आक्रमण केलें, आणि त्याची राजधानी धारा काबीज करून जयसिंह नामक भोजाच्या उत्तराधिकाऱ्याला पदच्युत केलें. पुढे, कर्णाने सर्वच मालव देश आपल्या राज्यास जोडल्यामुळे त्याचें भीमाशीं वैमनस्य उत्पन्न होऊन भीमाने कर्णाच्या राजधानीपर्यंत चाल केली. तेव्हा कर्णाने लुटीचा बराचसा भाग व भोजाची सुवर्णमंडपिका देऊन भीमाची समजूत घातली असें मेरुतुंगाच्या 'प्रबंधचिंतामणि'ग्रंथांत म्हटलें आहे.

यानंतर कर्णाने चंदेल्लांच्या राज्यावर आक्रमण करून देववर्मा राजाला ठार मारलें आणि त्याचें राज्य गिळंकृत केलें. या घटनेचा उल्लेख बिल्हणाने

२८ क्र. ५१, श्लो. २७.

यस्मिन्समासीदति गूर्जरीणां गण्डस्थले साञ्जनबाष्पलेशाः ।
भालादवैधव्यविधानवर्णाः पर्यन्तभाजां स्खलिता इवासन् ।।

'कर्ण हा कालञ्जरगिरिपति चंदेल्लनृपतीला काळासारखा होता' या शब्दांनी केला आहे.[२९]

नंतर त्याने मगध व गौड या देशांचा अधिपति तृतीय विग्रहपाल याच्या राज्यावर स्वारी केली. या राजाने कर्णाला मोठी खंडणी देऊन आपलें सिंहासन व जीव वांचविले असें हेमचंद्राने म्हटलें आहे. याच्या उलट संध्याकरनंदीने आपल्या 'रामचरितां' त विग्रहपालाने कर्णाचा पराभव केला असें विधान केलें आहे. बंगालच्या वीरभूम जिल्ह्यांत पाइकोडे (प्राचीन प्राचीकोट) येथे कर्णाने देवीची मूर्ति कोरलेला एक स्तंभ उभारला होता त्याचे अवशेष सांपडले असल्याने कर्णाला या स्वारींत विजय मिळाला होता यांत संशय नाही.[३०] यानंतर कर्णाने आपली कन्या यौवनश्री हिचा विवाह विग्रहपालाशीं करून त्याशीं कायमचें सख्य केलें.

कर्णाचा द्वितीय राज्याभिषेक

याप्रमाणे सन १०५२ च्या सुमारास कर्ण ऐश्वर्याच्या शिखरावर पोचला होता. त्याने परमार व चंदेल्ल यांचीं राज्यें आपल्या राज्यास जोडलीं होतीं. उत्तरेस त्याच्या साम्राज्याची सीमा कीर (कांगडा) देशापर्यंत वाढली होती. पूर्वेस पाल व वर्मन् राजाशीं त्याचा शरीरसंबंध झाल्यामुळे ते त्याचे कायमचे मित्र झाले होते. पश्चिमेस गुजराथच्या भीम राजाशीं त्याचे संबंध सलोख्याचे होते. दक्षिणेंतील चोल व चालुक्य राजांचाहि त्याने पराभव केला होता. अशा रीतीने त्याला उत्तर भारताचें चक्रवर्ति पद प्राप्त झालें होतें. तें जाहीर करण्याकरिता त्याने सन १०५२ मध्ये स्वतःस दुसऱ्यांदा राज्याभिषेक करून घेतला. त्याच्या वप्पुल्ल नामक सेनापतीच्या रेवा येथें सांपडलेल्या शिलालेखांतील शासनवर्ष त्याच्या या द्वितीय राज्याभिषेकापासून मोजलें आहे.[३१]

चंचल विजयश्री

याप्रमाणे कर्णाला विजयामागून विजय मिळत गेल्यामुळे त्याला 'हिंदू नेपोलियन्' अशी पदवी दिली जाते आणि खरोखरीच नेपोलियन्प्रमाणे त्यालाहि आपल्या कारकीर्दीच्या अखेरीस विजयश्री चंचल असल्याचा प्रत्यय आला. कारण त्याने जिंकलेले प्रदेश एकामागून एक त्याच्या हातांतून निसटून गेले. पदच्युत

---

२९ पाहा 'कालः कालंजरगिरिपतेः', विक्रमांकदेवचरित, सर्ग १८, श्लो. ९३.

३० क्र. ४९.

३१ क्र. ५३, ओ. २०, 'संवत्सर ८१२ श्रीमत्कर्णप्रकाशव्यवहरणया नवमसंवत्सरे माघ सुदि १० गुरौ।' हा कालनिर्देश पाहा.

झालेला मालवनृपति जयसिंह दक्षिणच्या प्रथम सोमेश्वर–आहवमल्ल याच्याकडे मदतीची याचना करण्यास मान्यखेटला गेला. परमार व चालुक्य यांचें हाडवैर कित्येक पिढ्या चालू होतें. या वंशांतील तैलपाने सुविख्यात परमार नृपति मुंज यास पकडून बंदींत टाकलें होतें व पुढे त्याचा अत्यंत क्रूरपणे शिरश्छेदहि केला होता. स्वत: सोमेश्वराने धारानगरीवर पूर्वी स्वारी करून भोजास पिटाळून लावलें होतें. तथापि जयसिंह आपल्या आश्रयास आलेला पाहून सोमेश्वराने त्याला साहाय्य करण्याचें ठरविलें. कारण तसें केलें नाही तर कर्ण जास्तच प्रबळ होऊन आपल्या राज्यास धोका उत्पन्न करील अशी त्यास भीति होती. त्याने आपला शूर पुत्र विक्रमादित्य यास मोठी सेना देऊन कर्णाचें पारिपत्य करण्यास पाठविलें. या युद्धांत कर्णाला प्रथम कांही विजय मिळाले असावे; कारण एका अपभ्रंश श्लोकांत कर्णाने महापराक्रमी विक्रमाचा युद्धांत पराभव केल्याचा उल्लेख आहे. पण शेवटीं विक्रमादित्याची सरशी होऊन जयसिहाला माळव्याची गादी मिळाली. ही घटना सन १०५५ च्या पूर्वी घडली असावी. कारण त्या वर्षी आषाढ महिन्यांत जयसिंहाने एक ताम्रपट दिलेला उपलब्ध झाला आहे.[३२]

चंदेल्लांचा प्रदेशहि कर्णाच्या ताब्यांतून लौकरच मुक्त झाला. महोबा येथील एका शिलालेखांत म्हटलें आहे की ज्याप्रमाणे भगवान् विष्णूने क्षीरसमुद्राचें मन्थन करून लक्ष्मी मिळविली त्याप्रमाणे चंदेल्ल कीर्तिवर्म्याने लक्ष्मीकर्णाचा पराभव करून राज्यलक्ष्मी हस्तगत केली. चंदेल्लांच्या या विजयाच्या प्रसंगीं 'प्रबोधचंद्रोदय' नामक संस्कृत नाटक प्रथम रंगभूमीवर आलें. त्याच्या प्रस्तावनेंत अनेक ठिकाणीं कीर्तिवर्म्याच्या गोपाल नामक ब्राह्मण सेनापतीने कर्णावर मिळविलेल्या विजयाचा उल्लेख आहे. एका संदर्भात कर्ण हा सर्व राजवंशांना रुद्र किंवा कालाग्निसारखा वाटत असे, असें वर्णन आलें आहे.[३३] अजयगडच्या शिलालेखांत कीर्तिवर्मा हा कर्णरूपी समुद्र पिऊन टाकणारा अगस्त्य होता असें म्हटलें आहे.[३४] या अनेक उल्लेखांवरून कर्णाचा तत्कालीन राजेलोकांना कसा दरारा वाटत असे व त्याने गिळलेलें चंदेल्ल राज्य परत मिळविण्यास कीर्तिवर्मा, त्याचे सामंत व सेनापति यांस किती प्रयास पडले याची स्पष्ट कल्पना होते. कीर्तिवर्म्याने आपलें राज्य केव्हा परत मिळविलें तें निश्चितपणें सांगता येत नाही.[३५] ही घटना सन १०६०

३२ ए. इं., पु. ३, पृ. ४८ इ.

३३ प्रबोधचंद्रोदय, पृ. १९.

३४ ए. इं., पु. १, पृ. २१६.

३५ कीर्तिवर्म्याच्या उपलब्ध लेखांतील पहिला लेख वि. सं. ११३२ चा आहे. इं. हि. क्वॉ., पु. ३०, पृ. १८३ इ. पाहा.

च्या सुमारास घडली असावी असा तर्क व्हिन्सेंट स्मिथ्ने केला आहे. तें खरें मानल्यास चंदेल्लांचा प्रदेश कर्णाच्या ताब्यांत सात आठ वर्षे राहिला असावा.

परमारांच्या राज्यावर पुनः आक्रमण

कर्णाला परमारांचा मालव देश जिकण्यांत यश आलें नव्हतें हें आपण मागे पाहिलें आहे. त्याच्या कारकीर्दीच्या अखेरीस याकरिता त्याने आणखी एकदा प्रयत्न केला. मध्यंतरीच्या काळांत दक्षिणेंतील राजकीय परिस्थितींत पुष्कळच बदल झाला होता. चालुक्य सम्राट् प्रथम सोमेश्वर—आहवमल्ल हा यावेळीं निधन पावला होता आणि त्याची गादी त्याचा वडील मुलगा द्वितीय सोमेश्वर यास मिळाली होती. त्याला आपल्या महापराक्रमी विक्रमादित्य नामक लहान भावाची भीति वाटत होती. म्हणून त्याने कर्णाशीं संधान बांधून त्याला मालव देशावर स्वारी करण्यांत मदत करण्याचें ठरविलें. पश्चिम गंग नृपति उदयादित्य हा आपला सामंत एडेयंग याच्यासह या प्रसंगीं कर्णाला येऊन मिळाला. हे तीन राजे मालव देशावर चालून गेले तेव्हा त्यांच्या सेनासागरांत मालव भूमि बुडून गेली. मालव नृपति जयसिंह हा त्या युद्धांत मारला जाऊन सर्वत्र हाहाकार उडाला. या प्रसंगाचें वर्णन करतांना कोरीव लेखांत त्याला प्रलयकालाची किंवा सूर्य अस्तास गेल्यावर सर्वत्र घनदाट अंधकार पसरतो त्याची उपमा दिली आहे. त्यावरून मालव देशांत सर्वत्र निराशेचें वातावरण कसें पसरलें होतें याची कल्पना करतां येते. ही घटना द्वितीय सोमेश्वर गादीवर आल्यावर लौकरच सुमारें सन १०७० मध्यें घडली असावी.

यानंतर परमारांच्या राज्याची कशी विभागणी झाली हें इतिहासांत नमूद नाही. बहुधा कर्णाने माळवा प्रांत आपल्या राज्यास जोडून नर्मदेच्या खालचा प्रदेश सोमेश्वरास दिला असावा. पण ही परिस्थिति फार काळ टिकली नाही. भोजाचा बंधु उदयादित्य याने लौकरच मालव देशाला कर्णाच्या मगरमिठींतून सोडविलें. त्याला कोरीव लेखांत प्रलयकालीं पृथ्वीला समुद्रांतून वर काढणाऱ्या वराह अवताराची आणि घनदाट अंधकाराचा नाश करून आपल्या किरणांनी लोकांची मनें उल्हसित करणाऱ्या सूर्याची उपमा दिली आहे.[३६] उदयपुर प्रशस्तींत उदयादित्याने डाहलाधीशाचा अर्थात् कर्णाचा संहार केला असें म्हटलें आहे. ही घटना सन १०७३ च्या सुमारास घडून आली असावी.

---

३६ नागपुर प्रशस्तींतील उदयादित्याचें वर्णन पाहा. ए. इं., पु. २, पृ. १८२ इ.
येनोद्धृत्य महार्णवोपममिलत्कर्णाटकर्णप्रभृ—
त्युर्वीपालकदर्थितां भुवमिमां श्रीमद्वराहायितम् ।।

याप्रमाणे उत्तर भारतांत आपलें एकच्छत्री राज्य स्थापण्याचे कर्णाचे सर्व प्रयत्न निष्फळ झाले. तेव्हा निराश होऊन त्याने आपला पुत्र यश:कर्ण यास स्वत:च राज्याभिषेक केला. कदाचित् त्याच्या विरुद्ध उठलेल्या चंदेल्ल, परमार व चौलुक्य नृपतींनी त्याला तसें करण्यास भाग पाडलें असावें. [३७]

कर्ण हा कलचुरि वंशांतील सर्वश्रेष्ठ राजा होय. त्या काळीं त्याच्या तोडीचा सेनापति भारतांत नव्हता. आपल्या कारकीर्दीच्या पूर्वार्धांत त्याला सर्वत्र विजय मिळत गेले. मुसलमानांच्या आक्रमणाला तोंड देण्यासाठी भारतांत बलाढ्य केंद्रसत्तेची आवश्यकता आहे याची खात्री झाल्यामुळे त्याने उत्तर भारतांत आपलें एकच्छत्री साम्राज्य स्थापण्याचा प्रयत्न केला. दैव त्याला अनुकूल नसल्यामुळे तो सिद्धीस गेला नाही. तथापि त्यामुळे त्याची थोरवी कमी होत नाही.

कर्णाच्या पदव्या

कर्णाने 'परमभट्टारक', 'महाराजाधिराज' व 'परमेश्वर' या सम्राट्पद-निदर्शक पदव्यांखेरीज 'त्रिकलिंगाधिपति' व 'अश्वपतिगजपतिनरपतिराज-त्रयाधिपति' अशा आणखी दोन पदव्या धारण केल्या. यांपैकी पहिलीने त्याचें कलिंग, दक्षिण कोसल व ओड्र (ओरिसा) या देशांवरचें स्वामित्व सूचित होतें. कनोजच्या प्रतीहारांना अश्वपति म्हणत; कारण त्यांची घोडदळाबद्दल ख्याति होती. कलिंग देशचे राजे गजपति म्हणून विख्यात होते; कारण कलिंगदेशांत उत्तम हत्ती होत. चालुक्यांना नरपति अशी संज्ञा असे. कर्णाने या सर्वांचा पराजय केला असल्यामुळे त्याने 'अश्वपतिगजपतिनरपतिराजत्रयाधिपति' अशी लांब-लचक पदवी घेतली होती. ती त्याच्या बाबतींत सार्थ होती; पण ती त्याच्या नंतरच्या निर्बल राजांनीहि चालू ठेवली व त्यांचें अनुकरण करून गाहडवाल, सेन व चंदेल्ल राजांनी ती धारण केली तेव्हा तिच्यांत कांही अर्थ राहिला नाही. कर्णाच्या दरबारीं एकशें छत्तीस राजे उपस्थित असत असें 'रासमालेंत' म्हटलें आहे. त्याचा पराक्रम पाहुन मुरल, कुंग, वंग, कलिंग आणि कीर या देशांचे राजे चळचळां कांपत असत, व चोल, कुंग, हूण, गौड, गुर्जर, आणि कीर हे त्याची सेवा करण्याकरिता त्याच्या राजसभेंत हजर असत असें कोरीव लेखांत म्हटलें आहे. त्याच्या तुफानी स्वाऱ्यांमुळे व पराभूत शत्रूशीं कठोरपणें वागण्याच्या त्याच्या नीतिमुळे त्याला प्रलयाची व कालाग्नीची उपमा दिली जात असे. या सर्वांवरून त्याचा तत्कालीन राजेलोकांना वाटणारा दरारा स्पष्ट रीतीने व्यक्त होतो.

३७ क्र. ५६, श्लो. १६.

धर्म, विद्या व कला यांस उदार आश्रय

कर्ण जसा युद्धांत तसा शांततेच्या काळांतहि अग्रेसर होता. त्याचा विद्या व कला यांना उदार आश्रय होता. त्याने बनारस येथे कर्णमेरु नांवाचें बारा (किंवा सोळा) मजल्याचें उत्तुंग शिवालय बांधलें होतें. त्याचे अवशेष अद्यापि त्या नगरांत राजघाटाजवळ दिसतात. प्रयागमध्ये गंगेच्या कांठी त्याने कर्णतीर्थ नांवाचा घाट बांधला होता. त्याचा उल्लेख त्याच्या एका लेखांत आला आहे. काशीजवळ ब्राह्मणांचा कर्णावती नामक अग्रहार त्याने वसविला होता. कर्ण स्वतः वैदिकधर्मानुयायी व शिवोपासक होता तरी त्याने इतर धर्मांचा किंवा पंथांचा कधीहि छळ केला नाही. त्याची राजधानी बनारसला होती. तिच्या जवळच सारनाथ येथे बौद्ध संघ अत्यंत भरभराटींत होता असें कोरीव लेखांवरून दिसतें.[३८]

कर्णाचा विद्वानांना उदार आश्रय असे. त्याने ब्राह्मणांना इतके गांव दान दिले होते कीं त्यांच्या ताम्रपटांच्या खोदण्यामुळें सर्व जग निनादून जात असे, असें त्याच्या कोरीव लेखांत वर्णन आहे. त्यांत अतिशयोक्ति असली तरी त्यावरून त्याची दानशीलता व्यक्त होते त्यांत संशय नाही. सुप्रसिद्ध विल्हण कवि बनारस येथे त्याच्या दरबारीं कांही काळ राहिला होता व तेथे असतां त्याने गंगाधर नामक कवीचा काव्यनिर्मितींत पराजय केला होता असें त्याच्या 'विक्रमांकदेवचरितां'त म्हटलें आहे. इतरहि वल्लण, नाचिराज, कर्पूर व विद्यापति या कवींचीं कर्णस्तुतिपर सुभाषितें सुभाषितसंग्रहांत आढळतात.[३९] अद्यापि डहारिया कर्णाच्या (डाहलाधीश कर्णराजाच्या) दातृत्वाच्या आख्यायिका बनारसला प्रचलित आहेत. त्यांतील एक विलक्षण आख्यायिका कांही वर्षांपूर्वी ग्रीअरसनने प्रसिद्ध केली होती. तिचा पुढे विचार करूं. कर्णाचा प्राकृत कवींनाहि आश्रय होता. 'प्राकृतपैंगल' या ग्रंथामध्ये प्राकृत कवींनी कर्णाच्या स्तुतिपर रचलेलीं सुभाषितें आढळतात. 'करकंडचरिड' नामक अपभ्रंश काव्याचा कर्ता कनकामर ह्याने आपल्या काव्याच्या शेवटीं म्हटलें आहे की मी आपल्या काव्याने कर्ण नृपतीचें मनोरंजन करीत असे.

कर्णाने आवल्लदेवी नामक हूण राजकन्येशीं विवाह केला होता. तिच्यापासून झालेला पुत्र यशःकर्ण हा त्याच्यानंतर गादीवर बसला. कर्णाला वीरश्री व यौवनश्री नांवाच्या दोन कन्या होत्या. वीरश्रीचा विवाह पूर्व बंगालच्या जातवर्म्याशीं आणि यौवनश्रीचा उत्तर बंगालच्या विग्रहपालाशीं झाला होता. कर्णाने

---

३८ क्र. ५२.

३९ व्याख्यान ४ पाहा.

सन १०४१ पासून जवळ जवळ १०७३ पर्यंत म्हणजे सुमारें बत्तीस वर्षें राज्य केलें.

यशःकर्ण

कर्णानंतर गादीवर आलेल्या यशःकर्णानें राज्यारोहणानंतर लौकरच आंध्र देशावर स्वारी करून द्राक्षारामपर्यंत आक्रमण केलें आणि वेंगीचा चालुक्य नृपति सप्तम विजयादित्य याचा पराभव केला. या स्वारींत त्याला रत्नपुरच्या जाजल्ल-देवाचें साहाय्य झालें असावें, कारण जाजल्लदेव आपल्या रत्नपुरच्या शिलालेखांत चेदिनृपतीने आपल्याशीं परम सख्य केलें होतें अशी बढाई मारतो.

यानंतर लौकरच यशःकर्णाच्या ताब्यांतून कनोज व त्याच्या लगतचा प्रदेश गाहडवालवंशी चंद्रदेव याने जिंकून घेतला. नंतर कांही वर्षांनी यशःकर्णाला बनारसहि सोडून द्यावें लागलें असें दिसतें. कारण सन १०९० मध्ये बनारस गाहडवालांच्या ताब्यांत होतें हें त्यांच्या त्या वर्षीं दिलेल्या चंद्रावती ताम्रपटावरून स्पष्ट दिसतें. यानंतर गाहडवालांचे कित्येक ताम्रपट बनारसहून दिले आहेत. मध्यंतरीं यशःकर्णाने एकदा उत्तरेंतील प्रदेश जिंकण्याचा प्रयत्न केला होता. त्याने चंपारण्यापर्यंत आक्रमण करून तें नगर उध्वस्त केलें असें त्याच्या ताम्रपटांत वर्णिलें आहे, पण त्यामुळे त्याच्या राज्याची सीमा उत्तरेंत वाढल्याचें दिसत नाही.

परमारनृपतीची त्रिपुरीवर स्वारी

यानंतर यशःकर्णाला पुनः त्रिपुरीला आपली राजधानी करावी लागली. तेथे असताना त्याचा तीनदां पराभव झाला. प्रथम परमारनृपति लक्ष्मणदेव याने त्रिपुरीवर आक्रमण करून कलचुरींचा पुरा मोड केला आणि नर्मदेच्या काठीं तळ दिला असें नागपूर प्रशस्तींत म्हटलें आहे. चंदेल्ल सल्लक्षणवर्मा व कुन्तलाधिपति चालुक्य सहावा विक्रमादित्य यांनीहि यशःकर्णाचा पराजय केला असे कोरीव लेखांत उल्लेख आढळतात.

यशःकर्णाच्या अंगीं त्याच्या आजाचें आणि पित्याचें शौर्य व राजनीतिकुशलता नव्हती. त्यामुळे त्याच्या कारकीर्दींत कलचुरींची सर्वत्र पिछेहाट होऊन त्यांचें राज्य बघेलखंडांत मर्यादित झालें.

गयाकर्ण

यशःकर्णानंतर त्याचा पुत्र गयाकर्ण हा सन ११२३ च्या सुमारास गादीवर आला. त्याच्या कारकीर्दींत कैमूर पर्वतराजीच्या उत्तरेचा प्रदेश चंदेल्लांनी

आक्रमिला असावा; कारण तेथे चंदेल्ल नृपति मदनवर्मा याच्या नाण्यांचा संचय सांपडला आहे; शिवाय चंदेल्लांच्या कोरीव लेखांत मदनवर्म्याने चेदिराजाचा पराजय केला होता असा स्पष्ट उल्लेख आहे.

आतापर्यंत रत्नपुरची कलचुरि शाखा त्रिपुरीच्या मुख्य शाखेशीं मांडलिकत्वाच्या नात्याने वागत असे. रत्नपुरच्या अनेक राजांनी त्रिपुरीच्या कलचुरि सम्राटांच्या युद्धांत भाग घेऊन त्यांस जय मिळवून दिला होता. पण मुख्य शाखेचें तेज कमी होऊ लागलेलें दिसतांच रत्नपुरच्या राजांनी आपलें स्वातंत्र्य पुकारलें. तशांत अनंतवर्मा–चोडगंग याने दक्षिण कोसलवर केलेली स्वारी परत फिरविण्यांत यश मिळाल्यामुळे रत्नपुरच्या द्वितीय रत्नदेवास जास्तच आत्मविश्वास आला. तो त्रिपुरीच्या कलचुरींशीं आढचतेने वागूं लागला असावा. तेव्हा गयाकर्णाने त्याच्यावर मोठें सैन्य पाठविलें, पण रत्नदेवाने त्याचा धुव्वा उडवला.

राज्ञी अल्हणदेवी

गयाकर्णाने गुहिलनृपति विजयसिंह याची कन्या अल्हणदेवी हिच्याशीं विवाह केला होता. ही परमारनृपति उदयादित्याची मुलगी श्यामलदेवी हिची कन्या होती. कलचुरि व परमार यांचें कित्येक पिढ्या चाललेलें वैर या संबंधानें शमलेलें दिसतें. राजपुतान्यांत पाशुपत पंथाचें वर्चस्व होतें. अल्हणदेवीहि याच पंथाची अनुयायिनी होती. तिने भेडाघाटला जें वैद्यनाथाचें मंदिर बांधलें तें तिने लाट देशांतून (गुजराथेंतून) रुद्रराशि नामक पाशुपतपंथी आचार्यास मुद्दाम बोलावून त्याच्या ताब्यांत दिलें. गयाकर्ण स्वतः शैवपंथाचा अनुयायी असून त्याचा राजगुरु शक्तिशिव नामक शैवाचार्य होता.

नरसिंह व जयसिंह

गयाकर्णाला नरसिंह व जयसिंह असे पुत्र झाले. ते त्याच्यानंतर क्रमाने गादीवर बसले. त्यांपैकी जयसिंह हा जास्त उत्साही व महत्त्वाकांक्षी होता. त्याच्या राज्याभिषेकाचें वृत्त ऐकून गुर्जर, तुरुष्क, व कुन्तल नृपतींच्या पोटांत धडकी भरल्याचें कोरीव लेखांत वर्णिलें आहे, पण त्याने या राजांचा खरोखरीच पाडाव केला होता काय हें समजत नाही. त्याच्या दक्षिणकोसलावरील स्वारीचा मात्र शेवरीनारायणाच्या शिलालेखांत उल्लेख आहे. या स्वारींत त्याचा पराजय झाला असावा. ही घटना सन ११६५ च्या सुमारास घडली असें दिसतें. चंदेल्ल परमर्दी यानेंहि जयसिंहाचा पराभव केला असावा; कारण परमर्दीच्या पराक्रमाचें गाणें ऐकल्याबरोबर त्रिपुरीपतीला मूर्च्छा येते असें चंदेल्लांच्या एका कोरीव लेखांत म्हटलें आहे. जयसिंहाला केल्हणदेवी व गोसलदेवी अशा दोन राण्या होत्या.

गोसलदेवीने वसविलेलें गोसलपुर अद्यापि जबलपुराजवळ विद्यमान आहे. नरसिंहाचा राजगुरु कीर्तिशिव आणि जयसिंहाचा विमलशिव नामक शैवाचार्य होता.

विजयसिंह

जयसिंहानंतर त्याचा पुत्र विजयसिंह हा गादीवर आला. त्याच्या कारकीर्दींत त्याचा मांडलिक कर्करेडीचा कौरववंशी सलक्षण याने बंड करून त्याची सत्ता झुगारून देण्याचा प्रयत्न केला, पण त्याच्या मलयसिंह नामक मंत्र्याने त्याचा बींमोड केला. याचा उल्लेख मलयसिंहाच्या रेवा येथील सन ११९३ च्या शिलालेखांत आढळतो. सन १२१० च्या सुमारास चंदेल्लनृपति त्रैलोक्यवर्मा याने कलचुरींच्या राज्यावर आक्रमण करून रेवा नगराजवळचा प्रदेश बळकावला. यापूर्वीं यादवनृपति सिंहण यानेहि विजयसिंहाचा पराभव केला होता असें दिसतें.

विजयसिंह हा त्रिपुरीशाखेचा शेवटचा ज्ञात राजा होय. कांही लेखांत महाकुमार अजयसिंह याचें नांव येतें, पण तो गादीवर बसला होता काय माहीत नाही. यापूर्वीच चंदेल्लांनी बघेलखंडाचा उत्तरभाग व्यापला होता. यानंतरचे त्यांचे लेख सागर व दमो जिल्ह्यांत सांपडले आहेत. त्यावरून तो प्रदेशहि त्यांच्या ताब्यांत गेला होता असें दिसतें. खुद्द जबलपूर जिल्ह्यांत मात्र चंदेल्लांचे लेख सांपडले नाहीत. त्यावरून तेथे कलचुरींचा अंमल यानंतरहि कांही काळ असावा. पण या काळांत त्यांना चंदेल्लांचें स्वामित्व मान्य करावें लागलें असावें.

मध्यंतरीं मुसलमानी सत्तेचा बघेलखंडांत प्रवेश हळूहळू होत होता. नासिरुद्दीन महम्मद याने मालिक जुलाची यास चेदि देशाचा सुभेदार नेमलें होतें. या जुलाचीचा अधिकारी जल्लाल खोजा याचा दमो जिल्ह्यांत बटिहागड येथे सन १३२८ चा शिलालेख सांपडला आहे. त्यावरून चौदाव्या शतकाच्या आरंभीं हा प्रदेश मुसलमानांच्या ताब्यांत पूर्णपणे गेला होता असें दिसतें.

सरयूपारचे कलचुरि

मागे सांगितल्याप्रमाणे आठव्या शतकांत कलचुरि नृपति वामराजदेव याने कालंजर दुर्ग ताब्यांत घेऊन तेथे आपला जम बसविल्यावर अयोमुख (सध्याचे उत्तर प्रदेशाचे राय बरेली व प्रतापगड जिल्हे) या प्रदेशावर आक्रमण केलें. पुढे त्याने तो प्रदेश आपल्या लक्ष्मणराज नामक लहान भावास दिला. त्याने तेथून सरयू (सध्याची घोगरा) नदीच्या उत्तरेचा प्रदेश जिंकून तेथे आपलें राज्य स्थापलें. या वंशास 'सरयूपारचे कलचुरि' असें म्हणतात.

या शाखेचे फक्त दोन लेख आतापर्यंत सांपडले आहेत.[४०] त्यांपैकी एक गौतमबुद्धाचें जेथे देहावसान झालें त्या कुशनगरामधील (सध्याच्या कसियामधील) बौद्ध अवशेषांमध्ये सांपडलेला शिलालेख असून दुसरा तेथून चाळीस मैलांवर कहला गावीं सांपडलेला ताम्रपट आहे. या दोन्हींत वर्णिलेला राजवंश एकच दिसतो. त्याची वंशावळ खाली दिली आहे—

प्रथम शंकरगण
|
नन्नराज
|
प्रथम लक्ष्मण
(श्वेतपदाचा विजेता)
|
प्रथम शिवराज
|
प्रथम भीमट
|
द्वितीय लक्ष्मण
ऊर्फ राजपुत्र
|
द्वितीय शिवराज
|
द्वितीय शंकरगण
(राज्ञी भूदा)
|
तृतीय लक्ष्मण
ऊर्फ प्रथम गुणसागर
(राज्ञी कांचनदेवी) | (राज्ञी मदनदेवी)

- उल्लभ ऊर्फ द्वितीय भीमट
- प्रथम भामान
  (राज्ञी देहट्टदेवी)
  |
  तृतीय शंकरगण
  उर्फ मुग्धतुंग
  (राज्ञी विद्या)

---

४० क्र. ७३ व ७४.

तृतीय शंकरगण
ऊर्फ मुग्धतुंग
(राज्ञी विद्या)
|
द्वितीय गुणसागर
(राज्ञी राजवा)
|
तृतीय शिवराज
ऊर्फ द्वितीय भामान
(राज्ञी सूगल्लदेवी)
|
चतुर्थ शंकरगण
(राज्ञी यशोलेखा)
|
तृतीय भीमट ऊर्फ
तृतीय गुणसागर
(राज्ञी लावण्यवती)
|
व्यास ऊर्फ मर्यादासागर
|
सोढदेव

या वंशावळींतील शेवटच्या सोढदेवाचा पिता व्यास सन १०३१ मध्ये गादीवर आला असें कहला ताम्रपटांत म्हटलें आहे. तेव्हा त्याचा तेरावा पूर्वज प्रथम लक्ष्मणराज हा सन ७०० च्या सुमारास गादीवर आला असावा. याच काळांत वामराजदेव कालंजर येथे राज्य करीत होता हें आपण मागे पाहिलें आहे. तेव्हा त्रिपुरी व सरयूपारच्या कलचुरींतील मागे उल्लेखिलेला संबंध असंभवनीय नाही हें ध्यानांत येईल.

सरयूपारांच्या लेखांत ऐतिहासिक घटनांचे फारसे उल्लेख आढळत नाहीत. या राजांपैकी तृतीय लक्ष्मणराज ऊर्फ प्रथम गुणसागर याने गुर्जर प्रतीहारनृपति प्रथम भोज यास गौडराजाचा पराभव करण्यांत साहाय्य केलें होतें व त्या कारणाने त्याला भोजाकडून कांही प्रदेश मिळाला होता, असें कोरीव लेखांत म्हटलें आहे. त्याचा पिता शंकरगण याला त्रिपुरीच्या प्रथम कोकल्ल देवाचा आश्रय होता.

या राजांच्या पदव्या

या राजांपैकी सोढदेव व त्याचा पिता व्यास यांनी 'परमभट्टारक', 'महाराजाधिराज' आणि 'परमेश्वर' या सम्राट्पदनिदर्शक पदव्या धारण केल्या होत्या. हे राजे राज्य करीत होते त्या काळांत जवळच बनारसला गांगेयदेव व कर्ण हे त्रिपुरी शाखेचे महाप्रतापी नृपति वैभवाच्या अत्युच्च शिखराला पोंचले होते. त्यांनीहि याच पदव्या धारण केल्या होत्या. त्यांचा दरारा उत्तर भारतांतील सर्व राजांना वाटत होता. पण त्यांच्यापुढे या सरयूपारच्या नृपतींनी आपली मान वांकविलेली दिसत नाही. त्रिपुरीच्या कलचुरींच्या आधिपत्याचा निदर्शक असा चेदि–कलचुरि संवत्हि त्यांनी आपल्या लेखांत उल्लेखिला नाही. त्यांच्या ताम्रपटांतील वर्षे विक्रम संवताचीं आहेत. तेव्हा ते सर्वस्वीं स्वतंत्र होते यांत संशय नाही. तथापि एकाच वंशाच्या या दोन शाखांमध्ये स्नेहभाव होता आणि त्या संकटकाळीं एकमेकांच्या साहाय्यास धावून जात असें कोरीव लेखांतील उल्लेखांवरून दिसतें.

सोढदेवाने आपला कहला ताम्रपट सन १०७९ मध्ये दिला होता. त्यानंतर लौकरच गाहडवालांनी यशःकर्णाचें बनारसमधून उच्चाटन केलें. त्यामुळे या सरयूपार शाखेचा एक मोठा आधार नाहीसा झाला. त्यानंतर गाहडवालांनी सरयूपार देशावर आक्रमण करून या कलचुरींचें राज्य खालसा केलें असावें. गंडकीच्या पलीकडे दहाव्या अकराव्या शतकांत एक राष्ट्रकूट घराणें राज्य करीत होतें. त्यानेहि या कार्यांत गाहडवालांना मदत केली असावी. यशःकर्णाने चंपारण्यावर स्वारी करून तें उध्वस्त केलें असें कोरीव लेखांत म्हटलें आहे. या स्वारीचा उद्देश या मगधांतील राष्ट्रकूटांचें पारिपत्य करण्याचा असणें असंभवनीय नाही. खिस्तोत्तर अकराव्या शतकाच्या शेवटीं या शाखेचा अस्त झाला.

रत्नपुरचे कलचुरि

खिस्तोत्तर नवव्या शतकाच्या अखेरीस त्रिपुरीच्या कलचुरींनी दक्षिण कोसलांत आपली शाखा स्थापण्याचा प्रयत्न केला. प्रथम कोकल्लाचा पुत्र द्वितीय शंकरगण ऊर्फ मुग्धतुंग–प्रसिद्धधवल याने कोसलनृपतीपासून पालिदेश जिंकल्याचा निर्देश कोरीव लेखांत येतो. हा पालिदेश म्हणजे बिलासपुर जिल्ह्यांतील पालि नामक गांवासभोंवारचा प्रदेश असावा. पालि येथे एक सुंदर नक्षीकाम केलेलें शिवालय आहे. त्याच्या गर्भगृहाच्या चौकटीवरील लेखावरून तेथे नवव्या शतकाच्या अखेरीस बाणवंशी प्रथम विक्रमादित्याचा (सन ८७० ते ८९५) अंमल होता

असें दिसतें.[४१] याच्याकडून किंवा याच्या उत्तराधिकाऱ्याकडून हा प्रदेश त्रिपुरीच्या शंकरगणाने जिंकून घेतला असावा.

तुम्माण राजधानी

शंकरगणाने या प्रदेशावर आपल्या लहान भावाची नेमणूक केली. त्याचें नांव कोरीव लेखांत आलें नाही, पण त्याची राजधानी तुम्माण होती असें दिसतें. तुम्माण हें बिलासपूर जिल्ह्यांतील सध्याचें तुमाण होय. तेथे बरेच प्राचीन अवशेष अद्यापि आढळतात. येथे कलचुरींच्या दोन तीन पिढ्या झाल्या असाव्या, पण त्यांचे लेख अद्यापि सांपडले नसल्याने त्यांचा इतिहास पूर्णपणे अज्ञात आहे. त्यानंतर सुवर्णपुर (सध्याचे सोनपुर) येथील सोमवंशी राजांनी या शाखेचें उच्चाटन केलें असें दिसतें. प्रथम युवराजदेव व त्याचा पुत्र द्वितीय लक्ष्मणराज यांनी दक्षिण कोसलावर स्वाऱ्या करून तेथील राजांचा पराजय केला असे कोरीव लेखांत उल्लेख आढळतात. या स्वाऱ्यांचें कारण सोमवंशी राजांचे पारिपत्य करणें हेंच असण्याचा संभव आहे.

या स्वाऱ्यांत त्रिपुरीच्या राजांना विजय मिळाला असला तरी दक्षिण कोसलांत कलचुरि शाखेची प्रतिष्ठापना झालेली दिसत नाही. पण पुढे द्वितीय कोकल्लदेवाच्या कारकीर्दीत (सन ९९० ते १०१५ मध्यें) कलिंगराज नामक कलचुरि राजपुत्राने आपल्या बाहुबलाने दक्षिण कोसल देश जिंकून आपल्या पूर्वजांनी जेथून राज्य केलें होतें त्या तुम्माण नगरांतच आपली राजधानी स्थापिली. परमारनृपति सिंधुराज याने कोसलराजाचा पराभव केला होता असें पद्मगुप्ताच्या 'नवसाहसांकचरितांत' म्हटलें आहे. यानंतर कांही काळाने सिंधुराजाने एका प्रणयप्रसंगाच्या निमित्ताने दक्षिणेंत दुसरी स्वारी केली. तिचेंहि वर्णन त्या काव्यांत आलें आहे. त्या काव्याची कथा येणेप्रमाणे[४२]—

नवसाहसांकचरितांतील ऐतिहासिक कथानक

परमारनृपति सिंधुराज विन्ध्यपर्वतावर शिकार करीत असतां शशिप्रभा नामक नागकन्येला पाहून मोहित होतो. तिचेंहि त्याच्यावर प्रेम बसतें. नर्मदा

---

४१ इंडियन हिस्टरी कांग्रेस, तिसरें अधिवेशन (कलकत्ता, १९३९) याच्या अहवालांतील माझा 'महाकोसलांतील एक प्राचीन राजवंश' हा लेख (पृ. ३१९–३२८) पाहा.

४२ या काव्यांतील ऐतिहासिक घटनांवरील माझा लेख इं. अँ., पु. ६२, पृ. १०१–१०७ मध्ये पाहा.

नदीकडून सिंधुराजास कळतें की तिचा पिता शंखपाल हा नागराजा भोगवती येथे राज्य करीत असून त्याने 'जो कोणी आपला शत्रु असुरनृपति वज्रांकुश याचा पराभव करून त्याच्या उद्यानांतील सुवर्ण कमळें आणून देईल त्याला शशिप्रभा दिली जाईल' असा पण केला होता. वज्रांकुशाची राजधानी रत्नवती ही नर्मदेच्या दक्षिणेस ५० गव्यूतींवर (२०० मैलांवर) आहे, आणि तेथे जातांना वंकु ऋषीचा आश्रम लागेल अशीहि माहिती नर्मदेकडून सिंधुराजाला मिळते. सिंधुराज त्याप्रमाणे रत्नवतीवर स्वारी करतो. वाटेंत तो शिखंडकेतु नामक विद्याधराला मर्कटयोनींतून मुक्त करतो. तेव्हा शिखंडकेतु आपलें विद्याधर सैन्य घेऊन सिंधुराजाच्या मदतीस येतो. नंतर ते सर्व रत्नवतीला वेढा घालतात. तेथील युद्धांत सिंधुराज वज्रांकुशाला ठार मारतो व त्याच्या उद्यानांतील सुवर्ण कमळें भोगवतीच्या नागराजाला देऊन शशिप्रभेशीं विवाह करतो.

वरील सारांशावरून या काव्याला सिंधुराजाच्या वज्रांकुशावरील स्वारीची ऐतिहासिक पार्श्वभूमि आहे असें दिसून येईल. ही स्वारी सिंधुराजाच्या कारकीर्दीच्या अखेरीस झाली असावी; कारण ती झाली त्यापूर्वी सिंधुराजाने कुन्तल, कच्छ, लाट, अपरान्त, कोसल यांच्या राजांचा तसेंच हूण राजाचाहि पराजय केला होता असें 'नवसाहसांकचरितां'त म्हटलें आहे. त्या काव्यांतील वर्णनावरून वज्रांकुशाचें राज्य नर्मदेच्या दक्षिणेस होतें असें दिसतें. राजशेखराप्रमाणे पद्मगुप्ताने आपल्या ग्रंथांत स्वकालीन व्यक्तींचीं नांवें किंचित् बदलून योजिलेलीं दिसतात. तेव्हा वज्रांकुश हा रत्नपुरच्या कलचुरींच्या ताम्रपटांत उल्लेखिलेला कोमोमंडलाधिपति वज्जूक किंवा वजुवर्मन् हा असावा. हा वज्जूक याच काळांत होऊन गेला असें दिसतें, कारण त्याची मुलगी नोनल्ला कलिंगराजाचा नातु प्रथम रत्नदेव याला दिली होती. त्याची राजधानी रत्नवती ही प्राचीन मणिपुर असेल. सध्याचें रत्नपुर जेथे वसलें आहे तेथेंच पूर्वी मणिपुर नामक प्राचीन गांव होतें अशी आख्यायिका आहे. रत्नवतीला जातांना सिंधुराजाला वाटेंत वंकुऋषीचा आश्रम लागला असें 'नवसाहसांकचरितां'त वर्णिलें आहे. कलचुरि ताम्रपटांवरून तुम्माण येथे वङ्केश्वराचें सुप्रसिद्ध प्राचीन देवालय होतें असें दिसतें. या देवालयाच्या नांवावरून कवीला या आश्रमाची कल्पना सुचली असावी. ज्या नागराजाच्या शशिप्रभा नामक कन्येशीं शेवटीं सिंधुराजाचा विवाह झाला तो भोगवती येथे राज्य करीत होता असें पद्मगुप्ताने वर्णिलें आहे. हा नागराजा बस्तर जिल्ह्यांतील नागवंशांतील होता असें दिसतें; कारण हे राजे 'भोगवतीपुरवरेश्वर' (भोगवती नामक उत्तम नगराचे अधिपति) असें बिरुद धारण करीत. या युद्धांत सिंधुराजाला साहाय्य करणारा विद्याधर शिखंडकेतु हा कोंकणचा राजा शिलाहारवंशी

केशिदेव दिसतो. शिलाहार राजे आपला वंश विद्याधरनृपति जीमूतवाहन याच्यापासून उत्पन्न झाला असें मानीत असत.

वरील विवेचनावरून पद्मगुप्ताच्या 'नवसाहसांकचरितां'त परमारनृपति सिंधुराज याच्या छत्तीसगडांतील स्वारीचें वर्णन आहे हें दिसून येईल. सिंधुराजाचा या स्वारींतील उद्देश बस्तर जिल्ह्यांतील नागराजाशीं संबंध जोडून दक्षिणेंतील चोल राजाला शह देणें हा असावा. त्या जिल्ह्यांतील चक्रकोट येथे प्राचीन काळीं अनेक युद्धें झालीं होतीं. त्यावरून त्या प्रदेशाचें महत्त्व दिसून येईल. या स्वारींत वज्जूकाबरोबर तुम्माणच्या कलचुरि कलिंगराजाचाहि पराभव झाला असावा. परंतु त्यानंतर लौकरच त्याने आपली सत्ता दृढ केली असें दिसतें.

कमलराज

कलिंगराजाचा पुत्र कमलराज हा सुमारें सन १०२० मध्यें गादीवर आला. याच्या कारकीर्दींत त्रिपुरीच्या गांगेयदेवाने उत्कल (ओरिसा) देशावर स्वारी केली. या स्वारीकरितां त्याला दक्षिण कोसलांतून जावें लागलें. त्या वेळीं त्याने कमलराजाला आपल्या साहाय्यास बोलावलें. कमलराजाने आपल्या प्रभूकरिता उत्कलराजाचा पराभव करून अनेक हत्ती, घोडे व संपत्ति यांची लूट मिळवून दिली असें कलचुरि ताम्रपटांत म्हटलें आहे.[४३] हा उत्कलनृपति 'कर'वंशी द्वितीय शुभाकर असावा. उत्कलांतून परत येताना कमलराजाबरोबर साहिल्ल नामक शूर पुरुष कोसलांत आला. त्याने व त्याच्या वंशजांनी आपल्या स्वामीकरितां छत्तीसगडांत अनेक देश जिंकून दिले.

प्रथम रत्नराज

कमलराजानंतर प्रथम रत्नराज हा गादीवर आला. याने कोमोमंडलाच्या वज्जूक किंवा वजुवर्मन् या अधिपतीच्या नोनल्ला नामक कन्येशीं विवाह केला. या विवाहाने रत्नराजाचा अंमल छत्तीसगडांत दृढ झालेला दिसतो; कारण त्याचा उल्लेख नंतरच्या बहुतेक ताम्रपटांत येतो. रत्नदेवाने आपल्या नांवाने रत्नपुर नामक नगर स्थापून तेथे आपली राजधानी केली. हें रत्नपुर बिलासपुर जिल्ह्यांतील सध्याचें रतनपुर होय. रत्नदेवाने तुम्माण नगरालाहि वंकेश्वर, रत्नेश्वर इत्यादि देवालयें, अनेक बागा इत्यादिकांनी सुशोभित केलें.

प्रथम पृथ्वीदेव

सन १०६५ च्या सुमारास रत्नदेवाचा पुत्र प्रथम पृथ्वीदेव हा गादीवर

---

४३ क्र. ७६, श्लो. ९.

आला. हा आपणास 'सकलकोसलाधिपति' म्हणवितो; तथापि याच्या अमलाखाली संबलपुरादि कोसलाचा पूर्व भाग आला होता असें दिसत नाही. याच्या कारकीर्दींत छत्तीसगडांतील बराचसा भाग मात्र पूर्वोक्त साहिल्लाच्या वंशजांनी जिंकून कलचुरि राज्याला जोडलेला दिसतो.

शूर जाजल्लदेव

पृथ्वीदेवाला राजल्ला नामक राणीपासून प्रथम जाजल्लदेव नामक पुत्र झाला. याची गणना या वंशांतील प्रमुख राजांमध्ये केली पाहिजे. याने वैरागड, लंजिका (सध्याचें लांजी), भाणार (भंडारा), तलहारि इत्यादि प्रदेश जिंकून त्यांवर खंडणी लादली. याशिवाय त्याने दंडकपुर (दक्षिण बंगाल्यांतील मिदनापुर), आन्ध्र, किमिडी (गंजाम जिल्हा) इत्यादि दूरदूरच्या प्रदेशांवर स्वाऱ्या करून विजय मिळविले. याने बस्तर जिल्ह्यांतील सोमेश्वर राजाच्या राज्यावरहि स्वारी केली व युद्धांत त्याला मंत्री, राण्या इत्यादिकांसह बंदिवान केलें, परंतु शेवटीं त्या सर्वांना आपल्या मातेच्या सांगण्यावरून मुक्त केलें. रत्नपुर शिलालेखाचा कवि म्हणतो 'ब्रूत स ईदृशः क्षितिपतिर्दृष्टः क्षितौ वा श्रुतः ।'(असा राजा सर्व पृथ्वीवर तुम्ही पाहिला किंवा ऐकला आहे काय सांगा). जाजल्लदेवाने सुवर्णपुरच्या भुजबल राजालाहि जिंकलें होतें व उत्कल देशच्या राजाला पदच्युत केलें होतें.

जाजल्लदेवाची कीर्ति लौकरच दूरवर पसरली. उत्तर भारतांतील कनोजचे गाहडवाल, जेजाभुक्तीचे चंदेल्ल, किंबहुना त्रिपुरीचे कलचुरिहि त्याच्या मैत्रीची इच्छा करूं लागले. तेव्हा त्याने त्रिपुरीच्या मुख्य कलचुरि शाखेचें स्वामित्व झुगारून देऊन आपलें स्वातंत्र्य जाहीर केलें व तन्निदर्शक स्वतःच्या नांवें सोन्याचीं व तांब्याचीं नाणीं पाडलीं. त्याच्या सोन्याच्या नाण्यांच्या पुढील बाजूवर मोठ्या अक्षरांत 'श्रीमज्जाजल्लदेव' असें नांव आणि मागील बाजूवर त्याने कलिंगदेशाच्या गंग नृपतीवर मिळविलेल्या विजयाचें निदर्शक गजशार्दूल चिन्ह असतें. तांब्याच्या नाण्यांवर चंदेल्लांच्या नाण्यांप्रमाणे हनुमानाची आकृति आहे. या तऱ्हेचीं नाणीं पुढे रत्नपुरच्या अनेक कलचुरींनी पाडलीं. जाजल्लदेवाने आपल्या नांवें जाजल्लपुर नामक नगर वसविलें. तें सध्या जांजगीर (जाजल्लनगर) नांवाने विद्यमान आहे. त्याने तेथे एक तलाव व आम्रवनहि केलें. शिवाय पाली येथील पुरातन देवालयाची त्याने दुरुस्ती केली. त्याने त्या देवळांत बांधलेल्या भिंतीवर व खांबांवर 'श्रीमज्जाजल्लदेवस्य कीर्तिः' असे लेख कोरले आहेत. जाजल्लदेवाचा राजगुरु रुद्रशिव नामक होता. तो आपल्या शैवागमांतच नव्हे तर दिङ्नागादि बौद्धतत्त्वज्ञांच्या ग्रंथांत पारंगत होता असें रत्नपुरच्या शिलालेखांत म्हटलें आहे.

द्वितीय रत्नदेव

जाजल्लदेवाला लाच्छल्लदेवीपासून द्वितीय रत्नदेव नामक पुत्र झाला, तो सन ११२० च्या सुमारास गादीवर आला. यानेहि आपल्या पित्याप्रमाणे स्वतःच्या नांवें सोन्याचीं व तांब्याचीं नाणीं पाडलीं. रत्नपुरचे राजे आपलें स्वामित्व झुगारून देऊं लागले हें पाहून त्रिपुरीच्या गयाकर्णाने कोसल देशावर स्वारी केली. पण रत्नदेवाने त्याचा पराभव केला. या विजयाचा उल्लेख त्याच्या काळच्या लेखांत आला आहे.

चोडगंगाचा पराभव

रत्नदेवाच्या कारकीर्दींतील दुसरी संस्मरणीय घटना गंग नृपति चोडगंग याची त्याच्या राज्यावरील स्वारी ही होय. हा गंग नृपति अत्यंत बलाढ्य असून त्याने उत्तरेंत गंगानदीच्या तीरापर्यंत आक्रमण करून अनेक विजय संपादन केले होते. जाजल्लदेवाने पदच्युत केलेल्या उत्कलाधिपतीला याने पुनः गादीवर बसविलें आणि नंतर रत्नदेवाच्या राज्यावर स्वारी केली. चोडगंगाच्या राज्याच्या मानाने रत्नदेवाचें राज्य अतिशय लहान होतें. शिवाय चोडगंग ह्याची महाप्रतापी म्हणून ख्याति होती. त्याच्या तुफानी स्वाऱ्यांमुळें अनेक राजांचा उच्छेद झाला होता. अशा बलाढ्य राजाशीं सामना देणें अत्यंत कठीण काम होतें. तथापि रत्नदेव व त्याचे मांडलिक यांनी शौर्याची पराकाष्ठा करून शेवरीनारायणाजवळ चोडगंगाचा पूर्ण पराभव केला व हत्ती, घोडे व सोनें यांची खूप लूट केली. चोडगंगाला नामुष्कीने पळ काढावा लागला. या युद्धाचा उल्लेख छत्तीसगडांतील अनेक लेखांत येतो.[४४] या विजयाने रत्नदेवाची हिंमत जास्तच वाढून त्याने दूरदूरच्या प्रदेशांवर स्वाऱ्या केल्या. बंगालच्या स्वारींत रत्नदेवाचा वैश्य सामंत वल्लभराज व त्याचा मंत्री पुरुषोत्तम यांनी मोठा पराक्रम दाखविला. रत्नदेवाने खिज्जिंग या भञ्जराजांच्या राजधानीवर स्वारी करून तेथील हरवोहू नामक राजाला यमसदनास पाठविलें.

विद्या व कला यांस राजाश्रय

रत्नदेवाच्या कारकीर्दींत विद्या व कला यांना उदार आश्रय मिळाला. त्याची कीर्ति ऐकून दूरदूरचे विद्वान् ब्राह्मण त्याच्या दरबारीं येत असत. त्याने, त्याच्या पुरुषोत्तम नामक मंत्र्याने व वल्लभराज नामक सामंताने अनेक देवालयें बांधलीं, तळीं खोदलीं व अन्नसत्रें स्थापन केलीं. त्यांचे उल्लेख तत्कालीन लेखांत आढळतात.

द्वितीय पृथ्वीदेव

द्वितीय रत्नदेवाचा पुत्र द्वितीय पृथ्वीदेव हा सन ११३५ च्या सुमारास गादीवर आला. त्याने प्रथम सारंगड, भ्रमरवद्र (बस्तर जिल्ह्याचा कांही भाग),

४४ क्र. ८४, श्लो. १८; क्र. ८८, श्लो. १४; क्र. ९८, श्लो. ७ पाहा.

कांकेर इत्यादि प्रदेश जिंकून छत्तीसगडांत आपला अंमल दृढ केला. नंतर चोडगंगाने दक्षिण कोसलावर केलेल्या आक्रमणाचा सूड घेण्याकरितां त्याने गंगांच्या कलिंग देशावरच स्वारी केली. त्यावेळीं चोडगंगाचें देहावसान झालें होतें आणि त्याचा पुत्र जटेश्वर ऊर्फ मधुकामार्णव हा गादीवर आला होता. पृथ्वीदेवाने त्याला बंदिवान केलें असें वर्णन कांही कोरीव लेखांत आलें आहे.

द्वितीय पृथ्वीदेवाने आपल्या पूर्वीच्या दोन राजांसारखीं सोन्याचीं व तांब्याचीं नाणीं पाडलीं. त्याचीं कांही अत्यंत लहान अशीं चांदीचीं नाणींहि मिळालीं आहेत. त्याने व त्याच्या वल्लभराज व ब्रह्मदेव नामक सामन्तांनी अनेक देवालयें बांधलीं, तळीं खोदलीं, बागा केल्या व अन्नसत्रें स्थापन केलीं. त्याच्या जगपाल नामक सेनापतीने राजीमच्या राजीवलोचनाच्या देवालयाचा जीर्णोद्धार केला. कांही सामान्य जनांनीहि देवालयें बांधल्याचे उल्लेख कोरीव लेखांत आढळतात.

द्वितीय जाजल्लदेव

द्वितीय पृथ्वीदेवानंतर द्वितीय जाजल्लदेव हा सन ११६५ च्या सुमारास गादीवर आला. त्याच्या कारकीर्दींत त्रिपुरीच्या जयसिंहाने कोसलावर स्वारी केली, पण रत्नपुरच्या कलचुरींनी व त्यांच्या धाकटचा पातीच्या उल्हणदेवाने प्राणपणाने लढून ती परत फिरविली असें दिसतें. ही लढाईहि शेवरीनारायणाजवळ झाली असावी. तींत उल्हणदेव धारातीर्थी पडला आणि त्याच्या तीन्ही राण्या सती गेल्या. नंतर जाजल्लदेवाने त्याच्या पोरका झालेल्या आमणदेव नामक मुलास स्वतःच्या पुत्राप्रमाणें वाढविलें असें शेवरीनारायणाच्या लेखांत म्हटलें आहे.

जाजल्लदेवाच्या कारकीर्दींतहि अनेक देवालयें बांधल्याचे व तळीं खोदल्याचे उल्लेख कोरीव लेखांत येतात. शेवरीनारायण येथील चंद्रचूडाचें देवालय याच कारकीर्दींत पूर्वोक्त उल्हणदेवाने बांधलें होतें.

जगद्देव

जाजल्लदेवाच्या मृत्यूनंतर कोसलदेशांत बंडाळी माजली. तेव्हा त्याचा वडील भाऊ जगद्देव गंगांबरोबर पूर्वेकडील प्रदेशांत युद्ध करीत होता तो परत आला आणि त्याने राज्यांत शांतता व सुव्यवस्था स्थापन केली. त्याने सुमारे दहा वर्षें (सन ११६८ ते ११७८) राज्य केलें असावें.

तृतीय रत्नदेव

त्यानंतर त्याचा पुत्र तृतीय रत्नदेव गादीवर आला. त्याच्याहि कारकीर्दींत कांही कारणाने राज्यांत अव्यवस्था माजून राहिली होती. त्याप्रसंगीं त्याने गंगाधर

नामक विद्वान् ब्राह्मणाला आपला मंत्री केलें. त्याने लौकरच शत्रूंचा मोड करून राज्यांत सुव्यवस्था स्थापन केली. गंगाधराने खरोद येथील लक्ष्मणेश्वर देवालयाच्या सभामंडपाचा जीर्णोद्धार केला व अनेक देवालयें बांधलीं. त्यापैकीं एकवीरा देवीचें देवालय रत्नपुराजवळ एका टेकडीवर बांधलेलें अद्यापि सुस्थितींत आहे.

प्रतापमल्ल

तृतीय रत्नदेवानंतर त्याचा पुत्र प्रतापमल्ल सन ११९८ च्या सुमारास गादीवर आला. याचे दोन ताम्रपट व बरीचशीं तांब्याचीं नाणीं सांपडलीं आहेत.

यानंतर सन १४९४ पर्यंत म्हणजे सुमारे तीनशें वर्षांपर्यंत छत्तीसगडांत कोरीव लेख सांपडले नाहींत. त्यामुळे या काळांतील राजांविषयीं निश्चित माहिती मिळत नाही. हेमाद्रीच्या व्रतखंडावरून यादवनृपति सिंघण याने एका जाजल्ल-नृपतीचे मदोन्मत्त हत्ती काबीज केल्याचें समजतें. हा जाजल्ल रत्नपुरचा राजा असावा. तसें असल्यास तो प्रतापमल्लानंतर गादीवर आला असेल.

वाहरराज

चौदाव्या शतकाच्या अखेरीस छत्तीसगडांतील कलचुरींच्या राज्याची फाळणी होऊन एक शाखा रत्नपुराहून राज्य करूं लागली व दुसरीने रायपुर येथे आपली राजधानी स्थापिली. तिची खल्वाटिका (सध्याचें खलाडी) येथेहि दुसरी राजधानी होती. या शाखेच्या ब्रह्मदेव नामक राजाच्या काळचे सन १४०२ व १४०५ चे शिलालेख सांपडले आहेत. रत्नपुरच्या वाहर राजाच्या काळीं छत्तीसगडावर पठाणांच्या टोळधाडी आल्यामुळे वाहर राजाला कोसंग दुर्गांत (सध्याच्या कोसगाईं किल्यांत) आश्रय घ्यावा लागला. तेथून त्याचा माधव नामक मंत्री पठाणांवर छापे घालून त्यांची दाणादाण उडवीत असे व सोनें, हत्ती, घोडे, गाईं, म्हशी इत्यादींची लूट आणीत असे.

यानंतर अठराव्या शतकाच्या मध्याच्या सुमारास मराठ्यांनी छत्तीसगडावर आक्रमण करीपर्यंत तेथे हैहयांचें राज्य कसें बसें टिकून होतें. त्या राज्यांत लहान लहान संस्थानिकांनीं व अधिकाऱ्यांनी आपलीं स्वतंत्र छोटीं संस्थानें स्थापिलीं होतीं. ते हैहय राजांचें नाममात्र स्वामित्व मानीत असत, पण त्यांच्यावर हैहय राजांचा वचक मुळीच नव्हता. अशा परिस्थितींत मराठ्यांना फारसा प्रतीकार झाला नाही. त्यांनी स्वारी करतांच या छोट्या संस्थानिकांनी त्यांचें स्वामित्व कबूल केलें व अशा रीतीने सुमारें सात शतकानंतर दक्षिण कोसलांतील कलचुरि राज्याचा शेवट झाला.

२ राज्यशासन आणि सामाजिक व आर्थिक परिस्थिति

राज्यशासन

कलचुरींची सत्ता भारताच्या भिन्न भिन्न प्रदेशांत सुमारें ख्रिस्तोत्तर ५५० पासून १७४० पर्यंत म्हणजे जवळ जवळ बाराशें वर्षें प्रचलित होती. यापैकी शेवटच्या सव्वा दोनशें वर्षांचे कोरीव लेख उपलब्ध नाहीत. बाकीच्या कालाचे दोन भाग पडतात—पहिला आद्य कलचुरींचा काल सुमारें ख्रिस्तोत्तर ५५० पासून ६२५ पर्यंत, आणि दुसरा सुमारें ख्रिस्तोत्तर ७५० पासून १५२५ पर्यंत. या दोन विभागांतील राज्यशासन, धार्मिक व सामाजिक परिस्थिति वगैरे बाबतींत फार फरक आढळतो. तेव्हा त्यांचा विचार पृथक्पणे करणें आवश्यक आहे.

देशविभाग

आद्य कलचुरींची सत्ता महाराष्ट्र, गुजराथ व कोंकण या प्रदेशांवर होती. त्या काळीं त्यांच्या राज्याच्या मोठ्या विभागांना 'देश' अशी संज्ञा असे. कलचुरि राज्यांत अपरान्त (कोंकण), महाराष्ट्र, ऋषीक (खानदेश), लाट (मध्य व दक्षिण गुजराथ), विदर्भ इत्यादि देशांचा अंतर्भाव होत होता. त्यांपैकी अपरान्त देशाचा उल्लेख कलचुरींच्या पूर्वीच्या त्रैकूटकांच्या कोरीव लेखांत येतो. आद्य कलचुरिनृपति कृष्णराज यास 'पूर्वापरसमुद्रान्तादिदेशस्वामी' (पूर्व व पश्चिम समुद्रांच्या जवळच्या व इतर देशांचा अधिपति) असें म्हटलें आहे. देशाच्या लहान विभागांना 'विषय' (सध्यांचा जिल्हा) म्हणत. उदाहरणार्थ, भोगवर्धनविषय (हैदराबाद संस्थानांतील भोकरधनाजवळचा प्रदेश), भरुकच्छविषय (भडोच-

जवळचा प्रदेश) पाहा. 'विषया' च्या भागांना सामान्यतः गुजराथेंत 'आहार' व महाराष्ट्रांत 'भोग' अशी संज्ञा असे. उदाहरणार्थ नासिक्यविषयांतील वटनगर-भोग. यांत वडनेरजवळचा प्रदेश येत असे. आहारांच्या भागांना 'पथक' असें म्हणत असें इतर वंशांच्या तत्कालीन लेखांवरून दिसतें. पण त्यांचा उल्लेख कलचुरींच्या लेखांत आला नाही. आहार व भोग यांमध्ये नगर, पुर, ग्राम इत्यादिकांचा अन्तर्भाव होत असे. कांही गावांच्या नांवांच्या शेवटीं 'पद्रक' (पाडा), 'वाटक' (वाडा) इत्यादि शब्द आढळतात. उदाहरणार्थ 'कुमारीवाटक' पाहा.

नंतरच्या कलचुरींचे लेख उत्तरभारत व छत्तीसगड या प्रदेशांत मिळाले आहेत. त्यांमध्ये निराळचाच भूविभागसंज्ञा आढळतात. 'देश' या शब्दाने पूर्वी-प्रमाणेंच मोठचा प्रदेशाचा बोध होत असे. उदाहरणार्थ 'वडहरदेश' पाहा. त्यानंतरच्या लहान विभागांचा वाचक 'विषय' हा शब्द क्वचितच दिसतो. त्याची जागा उत्तर भारतांत 'पत्तला' या शब्दाने व दक्षिण भारतांत 'मंडल' याने घेतलेली दिसते. उदाहरणार्थ, उत्तर भारतांतील कौशांबपत्तला (कौशाम्बी जवळचा प्रदेश), देवग्रामपत्तला, खंडगहापत्तला, कूयीसम्बपालिसपत्तला, धनवाहिपत्तला, रेवापत्तला, संबलापत्तला, नवपत्तला, जाउलीपत्तला (जबलपुरजवळचा प्रदेश) इत्यादि उत्तर भारतांतील, आणि कोमोमंडल, अपरमंडल, मध्यमंडल, सामन्तमंडल, अनर्घवल्ली-मंडल, तलहारिमंडल इत्यादि छत्तीसगडांतील विभागांच्या संज्ञा पाहा. क्वचित् दहा, वीस, चाळीस गांव ज्यांत आहेत असे पत्तला किंवा मंडल यांचे विभाग ग्रामसंख्येच्या नांवाने ओळखले जात, पण अशीं नांवें कोरीव लेखांत क्वचितच आढळतात. उदाहरणार्थ 'मालाद्वादशक' हें एका भूविभागाचें नांव पाहा. त्यांतील बारा गांवांच्या संख्येवरून हें पडलें असावें. शहरांच्या नांवाच्या शेवटीं 'नगर' किंवा 'पुर' आणि गावांच्या नांवांच्या शेवटीं 'ग्राम' किंवा 'पाटक' (पाडा) असे शब्द येत. उदाहरणार्थ, लवणनगर, दुर्लभपुर, हस्तिग्राम, निखतीग्राम, थिउलपाटक, वणिआपाटक इत्यादि. कांही नगरें ज्या राजांनी किंवा राण्यांनी तीं वसविलीं त्यांच्या नांवाने ओळखिलीं जात. उदाहरणार्थ, गोसलदेवी राणीने वसविलेलें 'गोसलपुर' आणि रत्नदेव व जाजल्लदेव यांनी वसविलेलीं अनुक्रमें 'रत्नपुर' व 'जाजल्लपुर' (हल्लीचें जांजगीर) पाहा.

या काळांत सर्वत्र राजसत्ता प्रचलित होती. ख्रिस्तोत्तर चौथ्या शतकांपर्यंत उत्तर भारतांत यौधेय, मालव, आर्जुनायन, इत्यादि गणराज्यें अस्तित्वांत होतीं, पण गुप्तकालांत त्यांचा लोप झालेला दिसतो. त्यानंतर भारतांत गणराज्यें कोठेहि आढळत नाहींत.

राजसत्तेचें नियंत्रण

राजसत्तेला घटनेचें नियंत्रण नव्हतें. गुप्तकालापासून राजाला ईश्वरी अवतार मानण्याचा प्रघात पडूं लागला होता. मनस्मृतीमध्ये 'महती देवता ह्येषा नररूपेण तिष्ठति' असें राजाचें देवतास्वरूप वर्णिलें आहे. परकी कुशाण राजे स्वतःस 'देवपुत्र' म्हणवीत असत. त्यांचें अनुकरण करून गुप्तकालीन कांही राजांनी आपल्या ताम्रपटांत स्वतःचें 'परमगुरुदेवताधिदैवतविशेष' असें वर्णन केलें आहे. उत्तरकलचुरींच्या समकालीन चंदेल्लवंशांतील वीरवर्मा नामक राजाचीं कांही नाणीं सांपडलीं आहेत. त्यांवर त्याने स्वतःला 'धरादेव' (पृथ्वीवरचा देव) असें म्हटलें आहे. तेव्हा उत्तरकालीन राजे स्वतःला देवस्वरूप समजत असत यांत संशय नाही. तथापि ते सर्वस्वीं अनियंत्रित व जुलमी होते असें मानण्याचें कारण नाही. कारण त्यांना धर्मशास्त्रांचा अंकुश असे. न्यायदानास आवश्यक असे दिवाणी व फौजदारी कायदे धर्मशास्त्रांत व त्यांवरील टीकांत अगोदरच दिले होते. शिवाय देशांत कांही रूढीहि प्रचलित होत्या. त्या सर्वांस अनुसरून त्यास न्याय करावा लागे. राजाचीं कर्तव्येंहि धर्मशास्त्रांत सांगितलीं आहेत. त्यांप्रमाणें न चालणारा राजा पापी होऊन नरकास जातो अशी समजूत समाजांत सर्वत्र प्रचलित होती. प्राचीन काळीं धार्मिक कल्पनांचा लोकांच्या मनावर मोठा पगडा असे; म्हणून धर्मशास्त्रांतील नियमांच्या विरूद्ध जाण्यास कोणीहि राजा सहसा धजत नसे. शिवाय राजास सल्लामसलत देणारे राजगुरु व मंत्री हेहि राजाला उन्मार्गापासून परावृत्त करूं शकत असत. राजाचे मांडलिक आणि प्रजाजन यांच्या मताचाहि थोडाबहुत प्रभाव पडत असला पाहिजे. त्यामुळें घटनेचें बंधन नसलें किंवा प्रजेने निवडून दिलेल्या प्रतिनिधींचें कौन्सिल नसलें तरी प्राचीन कालचे राजे सामान्यतः जुलमी नसत. देवालयें व मठ बांधणें, बागा, तळीं इत्यादि लोकोपयोगीं कृत्यें करणें, विद्वान् ब्राह्मणांना, कलाकुशल शिल्पी इत्यादिकांना दानमानांनी उत्तेजन देणें, गोरगरीबांच्या करतां अन्नसत्रें चालविणें हीं राजांचीं कर्तव्यें मानलीं जात. अनेक कलचुरि राजांनीं तीं पार पाडलीं होतीं असें कोरीव लेखांतील उल्लेखांवरून दिसतें. कांही कारणाने राज्यावर आपत्ति आल्यास किंवा युद्धांत राजा मारला गेल्यास मुख्य अमात्य राज्यकारभाराची जबाबदारी स्वीकारून नवीन राजास गादीवर बसवीत असत. द्वितीय युवराजाला युद्धांत मरण आलें असें दिसतें. त्यानंतर त्याच्या मुख्य अमात्यांनी त्याचा पुत्र द्वितीय कोकल्लदेव यास गादीवर बसविल्याचा उल्लेख कोरीव लेखांत आला आहे. क्वचित् इतर प्रबल राजांच्या दडपणामुळे किंवा स्वतःहि वैतागून राजा स्वतःच आपल्या मुलास राज्याभिषेक करून राजकारणांतून निवृत्त होत असे. महाप्रतापी कर्णाने आपल्या कारकीर्दीच्या अखेरीस असें केलें होतें हें मागें सांगितलें आहे.

पट्टराणीचा राजकारणावर प्रभाव

उत्तरकालीन कलचुरींच्या ताम्रपटांत ज्यांना ग्रामदानाची माहिती दिली जात असे अशांमध्ये आरंभीं महाराज्ञी किंवा पट्टराणी हिचा उल्लेख आढळतो, पण ती राजकीय सल्लामसलतींत भाग घेत असे कीं काय हें माहीत नाही. तें कांही असलें तरी तिला दानादिकांचे कांही स्वतंत्र अधिकार होते असें दिसत नाही. उदाहरणार्थ, द्वितीय लक्ष्मणराजाची महादेवी (पट्टराणी) राहडा हिने कारीतलाई येथील वराहमंदिराला एक गाव दान दिला होता. पण तो देतांना तिने राजाची म्हणजे आपल्या पतीची संमति घेतली होती असें कारीतलाई लेखांत स्पष्ट म्हटलें आहे.[१] तसेंच विजयसिंहाची माता गोसलदेवी हिनेहि राजाच्या अनुज्ञेनेच एक गाव ब्राह्मणास दान दिला होता असें कुंभी ताम्रपटांत म्हटलें आहे.[२] तथापि कांही राण्या धार्मिक बाबींप्रमाणे राजकारणावरहि आपल्या व्यक्तित्त्वाचा प्रभाव पाडीत असाव्या. अशा कांही राण्यांचे उल्लेख कोरीव लेखांत आढळतात. उदाहरणार्थ, प्रथम युवराजदेवाची पट्टराणी नोहला हिने मत्तमयूरमठाच्या शैवाचार्यांना कलचुरि राज्यांत प्रथम प्रवेश मिळवून दिला. तिने स्वतः कांही शैवाचार्यांना बोलावून त्यांच्याकरितां मठ व नोहलेश्वर नामक शिवालय बांधून दिलें, आणि त्यांच्या योगक्षेमाकरितां कित्येक गाव दान दिले. तिचा पति व पुत्र यांनीहि मत्तमयूर-मठाच्या आचार्यांना बोलावून गाव दान दिले होते, तेहि तिच्याच प्रभावामुळे दिले असावे. दुसरी राणी अल्हणदेवी हिनेहि आपल्या मुलाच्या कारकीर्दींत लाट देशांतील पाशुपत आचार्याला बोलावून त्याच्या करिता मठ बांधविला व गाव दान दिले असें कोरीव लेखांत म्हटलें आहे. शेवटच्या विजयसिंहाची माता गोसलदेवी हिने आपल्या नांवें गोसलपुर नामक गांव वसविलें होतें. तिने भेडाघाट येथील चौसष्ठ योगिनींच्या देवालयांतील शिवाचें देवालय बांधलें असावें. त्याला लाव-लेल्या शिलालेखांत तिच्या पुत्रपौत्राबरोबर तिचाहि उल्लेख आला आहे. हे सर्व दानधर्म तत्कालीन राजांच्या अनुमतीने झाले असावे हें उघड आहे, तथापि त्यांवरून त्या राण्यांच्या व्यक्तित्त्वाचा प्रभाव दिसून येतो. तो धार्मिक बाबींपुरताच मर्यादित नसून राजकारणांतहि पडत असावा असें अनुमान करण्यास हरकत नाही.

राजाचे अधिकारी

राजा आपले युवराज, मंत्री, अमात्य व निरनिराळ्या खात्यांचे अध्यक्ष यांच्या सल्ल्याने राजकारभार चालवीत असे. दहाव्या शतकांतील सोमदेवाच्या

१ क्र. ४२, श्लो. ३२.

२ परिशिष्ट, क्र. ४. (इ. क. के ई., पृ. ६५०).

'नीतिवाक्यामृतां' त राजाने तीन, पांच किंवा सात मंत्री नियुक्त करावे असें म्हटलें आहे. तथापि यांची मंत्रिपरिषद् असे व राजा राजकारणाविषयी नेहमी तिचें मत घेत असे असा स्पष्ट निर्देश कोरीव लेखांत येत नाही. युवराज व मंत्री हे राजाचे बाहु, कान व डोळे होत असें 'शुक्रनीतिसारां'त म्हटलें आहे. राज्यकारभार चालविण्याकरिता अमात्यांची किंवा सचिवांची जरूरी असे. हे सचिव किती असावे याविषयीं स्मृतींत व अर्थशास्त्रांत भिन्न भिन्न मतें आढळतात. 'मनुस्मृतीं' त सचिव सात किंवा आठ असावे असें म्हटलें आहे. शुक्राच्या मताप्रमाणें ही संख्या आठ किंवा दहा असावी. सोमदेव म्हणतो कीं आय व व्यय (जमा व खर्च), स्वामिरक्षा आणि चतुरंग सेनेची व्यवस्था हीं खातीं सचिवांकडे असावीं. कलचुरींच्या ताम्रपटांत कांही राजाधिकाऱ्यांचा नेहेमी उल्लेख आढळतो. त्या राजांचें आठ जणांचें अमात्यमंडळ होतें असें मानल्यास त्यांमध्ये खालील अधिकाऱ्यांचा समावेश होत असावा—महामंत्री, महामात्य, महासांधिविग्रहिक (परराष्ट्रमंत्री), महाधर्माधिकरणिक (किंवा महापुरोहित), महाक्षपटलिक (जमाबंदीचा मंत्री), महाप्रतीहार, महासामन्त आणि महाप्रमातृ. अमात्यांच्या हातांत बरीच सत्ता असे. संकटकाळीं ते स्वतःच्या जबाबदारीवर राज्यकारभार चालवीत व राजघराण्यांतील योग्य अशा राजपुत्रास गादीवर बसवीत हें मागे सांगितलें आहे.

महामंत्री

या अधिकाऱ्यांमध्ये महामंत्री हा प्रमुख असे. हा राजाचा उजवा हात असा मानला जात असे व बहुधा त्याच्या सल्ल्याने राजकारण चालत असे. अशा कांही कर्तबगार मंत्र्यांचीं नांवें कलचुरींच्या लेखांत आलीं आहेत. प्रथम युवराजदेवाचा मंत्री भाकमिश्र व द्वितीय लक्ष्मणदेवाचा मंत्री सोमेश्वर यांचें जें वर्णन कारीतलाई शिलालेखांत आलें आहे.[३] त्यावरून ते अत्यंत विद्वान्, धार्मिक, शूर व कलानिपुण होते असें दिसतें. सोमेश्वराने कारीतलाई येथे एक उत्तुंग देवालय बांधून त्यामध्ये सोमस्वामी नामक विष्णूच्या वराहावतारांतील मूर्तीची स्थापना केली होती, तसेंच जवळ आठ ब्राह्मणांचा अग्रहारहि स्थापन केला होता. एकदा तो पालखींत बसून चालला असतां श्रमामुळे त्या पालखीचा एक भोई ठेचाळला आणि पालखी खाली पडूं लागली तेव्हा राजा लक्ष्मणदेवाने स्वतः तिला खांदा दिला असें कारीतलाई लेखांत म्हटलें आहे.[४] त्यावरून त्या मंत्र्याविषयीं राजाला वाटत असलेला

---

३ क्र. ४२ श्लो. २–१७.

४ वातन्धमाधिरोहे भ्रश्यति दोलाभृतिश्रमात्किञ्चित् । श्रीमल्लक्ष्मणराजः स्कन्धमदाद्यस्य दोलायाम् ॥ हें वर्णन पाहा.

आदर स्पष्टपणें व्यक्त होतो. तृतीय रत्नदेवाचा मंत्री गंगाधर याने राज्याच्या संकटकाळीं सर्व जबाबदारी स्वीकारून राज्याला सप्तांगपूर्ण म्हणजे सुसमृद्ध व सामर्थ्यशाली केलें असें खरोद येथील शिलालेखांत म्हटलें आहे.

इतर अधिकारी

महामन्त्र्यानंतर महामात्याचा दर्जा असे. त्याच्याकडे बहुधा सर्व राज्यकारभाराची व्यवस्था असे. प्रथम युवराजदेवाचा अमात्य गोल्लाक ऊर्फ गौड हा कायस्थजातीय असून मोठा शूर व धार्मिक प्रवृत्तीचा होता. त्याच्या कित्येक वंशजांनी त्रिपुरीच्या कलचुरि राजांची एकनिष्ठपणें सेवा केली होती. महाध्यक्ष नामक अधिकारी कांही दानपत्रांत उल्लेखिला आहे. तो सचिवालयाचा (सेक्रेटरीएटचा) मुख्य असावा. रत्नपुरच्या कलचुरींच्या कांही लेखांत 'सर्वाधिकाऱ्या'चा निर्देश आहे. त्याकडे राज्यकारभाराची सर्व व्यवस्था सोंपविली असावी. महाप्रतीहार हा नेहमी राजाजवळ असे. राजाची भेट घेऊं इच्छिणाऱ्या लोकांस राजाकडे नेणें, तसेंच राजाची आज्ञा योग्य अधिकाऱ्यांस पोंचविणें हें त्याचें काम असे. म्हणून प्राचीन ताम्रपटांत या संबंधांत त्याचा उल्लेख येतो.

राजगुरूंचा उल्लेख राजाधिकाऱ्यांत येत नाहीं. तथापि त्यांचें राजदरबारीं मोठें वजन असे. त्यांच्या दर्जाला योग्य अशी अनेक कार्यें त्यांच्याकडे देण्यांत येत व ते आपल्या सल्लामसलतीने दूर असलेल्या लोकांसहि जवळ आणीत (वश करीत) असें एका कोरीव लेखांत म्हटलें आहे.

राज्यकारभार चालविण्यास अनेक अधिकाऱ्यांची व सेवकांची जरूरी लागते. त्यांपैकी कांहींचीं नांवें प्रसंगोपात्त कोरीव लेखांत येतात. त्यांचा खातेवार विचार करूं.

प्रशासन खातें

आद्य कलचुरींच्या दानपत्रांत राजन्, सामन्त, भोगिक, विषयपति, राष्ट्र व ग्राम यांचे महत्तर इत्यादींचा उल्लेख येतो. यापैकीं मोठ्या प्रांताच्या अधिपतींना राजन् आणि लहान प्रांताच्या अधिपतींना सामन्त अशी संज्ञा असे.[५] 'शुक्रनीतिसारां'त यांचे पगारहि दिले आहेत.[६] विषयपति हा 'विषया'चा म्हणजे

५ पाहा शुक्रनीतिसार, अध्याय १, श्लो. १८९. सामन्तादिसमा ये तु अन्या अधिकृता भुवि । ते तु सामन्तसंज्ञाः स्यु राजभागहराः क्रमात् ।।

६ शतग्रामाधिपो यस्तु सोऽपि सामन्तसंज्ञकः । शुक्रनीतिसार, १, १९१.

जिल्ह्याचा प्रमुख अधिकारी (सध्याचा डेप्युटी कमिशनर) असे. विषयाच्या विभागांना 'भोग' म्हणत. त्यावरचा अधिकारी तो 'भोगिक'. त्याच्यावरच्या अधिकाऱ्यांस 'भोगिकपालक' म्हणत. राष्ट्रांत अनेक नगरांचा व ग्रामांचा समावेश होत असे. राष्ट्र व ग्राम यांच्यावरच्या अधिकाऱ्यांस अनुक्रमें 'राष्ट्रमहत्तर' व 'ग्राममहत्तर' म्हणत. इतरत्र त्यांचीं 'राष्ट्रकूट' व 'ग्रामकूट' अशीं नांवें येतात.

आद्य कलचुरि नृपति कृष्णराज याच्या स्वामिराज नामक सामन्ताचा ताम्रपट नागपूरजवळ नगरधन येथे सांपडला आहे. त्यांत राजन् व सामन्त यांच्याबद्दल 'राजस्थानीय' व 'उपरिक' या अधिकाऱ्यांचा उल्लेख आहे. यांपैकी राजस्थानीय हा व्हाइसरॉय सारखा राजप्रतिनिधि असावा. 'उपरिक' हे प्रांताधिपति असत. गुप्तांच्या अनेक लेखांत यांचा उल्लेख येतो. कालान्तराने यांपैकी बहुतेक संज्ञा प्रचारांतून गेल्या असाव्या. कारण नंतरच्या ताम्रपटांत त्यांचा उल्लेख येत नाही.

जमाबंदी खातें

या खात्याच्या प्रमुखास 'महाप्रमातृ' अशी संज्ञा असे. हा अधिकारी जमिनीचें मोजमाप करून तिचा सारा ठरवीत असे. 'महाक्षपटलिक' हा दफ्तर खात्याचा प्रमुख होता.

आयस्थानें किंवा उत्पन्नाचीं साधनें अनेक होतीं. आद्य कलचुरींच्या दानपत्रांत 'उद्रंग' व 'उपरिकर' अशा संज्ञा आढळतात. यांपैकीं उद्रंग याने जमिनीचा सारा विवक्षित असावा. 'उपरिकर' यामध्यें व्यापारी, शिल्पी वगैरेंना जे विविध प्रकारचे किरकोळ कर द्यावे लागत त्यांचा अंतर्भाव होत असे असें वाटतें. याशिवाय मिठागरें, लोखंडाच्या खाणी, अरण्यें, गोचर (गाई चरण्याचीं कुरणें), आंबे व महुआ यांचीं झाडें इत्यादिकांवरील कर, तसेंच अपराधांबद्दल दंड इत्यादि उत्पन्नाचीं साधनें होतीं. पट्टकिल म्हणजे पाटील याच्या पगाराबद्दल 'पट्टकिलादाय' आणि 'दुःसाध्य' म्हणजे फौजदारी गुन्हेगार यांच्यापासून संरक्षण करण्याबद्दल 'दुःसाध्यादाय' हेहि कर गांवकऱ्यांना द्यावे लागत. गांवांत उत्पन्न झालेल्या तसेंच गांवांत बाहेरून आणलेल्या वस्तूंवर कर घेतला जाई त्याला 'भूतवातप्रत्याय' अशी संज्ञा असे. हा वसूल करणाऱ्यांस 'शौल्किक' म्हणत. नदीकांठचे घाट व नद्या तरून जाण्याकरितां ठेवलेल्या नावा यांच्यावर देखरेख करणारे अधिकारी यांना अनुक्रमें 'घट्टपति' व 'तरपति' असें म्हणत. ते घाटादिकांचा उपयोग करणाऱ्यांकडून कांही कर वसूल करीत.

याशिवाय 'मंडपिका' किंवा मंडईमध्ये विकावयास आणलेल्या भाजीपाल्यावर तसेंच हत्ती घोडे वगैरे जनावरांवर विक्रीकर असे. प्रत्येक घोड्यावर दोन पौर व हत्तीवर चार पौर कर घेतला जाई असें बिलहरी शिलालेखावरून समजतें. 'पौर' हें लहानसें चांदीचें नाणें असावें. मंडईंत भाजी वगैरे विकण्याकरिता युगा नांवाचा परवाना देण्यांत येई तो एक दिवस भर चाले. दोन युगांबद्दल एक पौर द्यावा लागे. कांही जिनसांवरचा कर त्या जिनसांच्या रूपाने व इतर बाबतींत नाण्यांच्या रूपाने घेतला जाई. ब्राह्मणांना किंवा देवालयांना दिलेल्या गांवांत हे सर्व कर ज्यांना दान दिलें आहे त्यांच्याकडे भरावे लागत. इतर गांवांत ते राजाचे अधिकारी वसूल करीत.

न्याय खातें

न्याय खात्यासंबंधी फारसे उल्लेख कोरीव लेखांत येत नाहीत. आद्य कलचुरींच्या कालच्या एका लेखांत 'दाण्डिक' नामक अधिकाऱ्याचा उल्लेख आहे. तो कदाचित् न्यायाधिकाऱ्याचा असावा.

धर्म खातें

या खात्यांतील अधिकाऱ्यांचा उल्लेख आरंभींच्या लेखांत येत नाही. नंतरच्या कालांत मात्र याला विशेष महत्त्व प्राप्त झालेलें दिसतें. याच्या प्रमुखाला 'महाधर्माधिकरणिक' किंवा 'महापुरोहित' म्हणत. याचा उल्लेख बहुधा दानपत्रांत येतो. याशिवाय 'महादानिक' नामक अधिकारीहि कांही दानपत्रांत आढळतो. त्याचें काम राजाच्या महादानांची व्यवस्था करणें हें असावें. दानपत्रांच्या लेखकांना 'धर्मलेखी' असें नांव असे. कांही ठिकाणीं त्याला 'दशमूली' असेंहि म्हटलें आहे.

युद्ध व संरक्षण खातें

सैन्यांत हत्ती, घोडे, रथ व पायदळ या चतुरंग दलाचा समावेश होत असे. यांपैकी प्रत्येकावर एक प्रमुख असे. युद्धांत हत्तींच्या संख्येला विशेष महत्त्व असे. कौटिल्याने 'हस्तिप्रधानो विजयो राज्ञाम्' (हत्तींवर राजांचा विजय मुख्यतः अवलंबून असतो) असें म्हटलें आहे. गजनीच्या महमुदाच्या इतिहासकारांनी भारतांतील राजांच्या लष्करी सामर्थ्याचें वर्णन करतांना विशेषेंकरून त्यांच्या सेनेंतील हत्तींची संख्या सांगितली आहे ती याच कारणाने. हत्तींच्या या महत्त्वामुळे त्यांच्या माहुतांनाहि फार महत्त्व असे. त्यांचा गण किंवा संघ असे. नगरधन

ताम्रपट या माहुतांच्या संघाच्या विनंतीवरून दिला होता.[७] त्याच्या मुद्रेवर त्यांचें अंकुश हें विशिष्ट चिन्ह असून शिवाय 'गणदत्तिः' (हें माहूतांच्या गणाचें दान आहे) असा शब्द कोरला आहे. हस्तिसैन्याच्या प्रमुखाला प्राचीन काळीं 'महापीलुपति' म्हणत. पुढे त्याला 'महाप्रमत्तवार' अशी संज्ञा मिळाली. अश्वसेनेच्या प्रमुखाला 'महाश्वसाधनिक' म्हणत. कांही युद्धांत केवळ घोडदळाच्या साहाय्याने विजय मिळविला जाई. कलचुरि नृपति कर्णाच्या वप्पुल्लक नामक सेनापतीने जिंकलेल्या एका लढाईचा 'घोटकविग्रह' असा उल्लेख त्याच्या कोरीव लेखांत आला आहे.[८]

लष्करी अधिकाऱ्यांना 'बलाधिकृत' किंवा 'सेनापति' म्हणत. नंतरच्या कोरीव लेखांत 'साधनिक' अशीहि संज्ञा याच अर्थी योजिली आहे. 'गौल्मिक' हा सैन्याच्या गुल्म नामक विभागावर अधिकारी असे. मुख्य सेनापतीला आरंभींच्या लेखांत 'महाबलाधिकृत' व नंतरच्या लेखांत 'महासेनापति' असें म्हटलें आहे. आरंभींच्या लेखांत लष्करी अधिकाऱ्यांना दानपत्रांचे 'दूतक' म्हणजे राजाज्ञा इष्ट स्थलीं पोचविणारे अधिकारी म्हणून उल्लेख येतो.

पोलिस अधिकाऱ्यांना 'दंडपाशिक' म्हणत. चोर पकडण्याचें काम ज्याच्याकडे विशेषतः सोंपविलें असें त्याला 'चोरोद्धरणिक' असें म्हणत. त्यालाच 'दुष्टसाधक' असेंहि नांव असे. लोकांच्या मालमत्तेचें संरक्षण करणें, शांतता व सुव्यवस्था राखणें या कामाकरितां 'चाट' (पोलीस) व 'भट' (सैनिक) नेमले असत. सध्याप्रमाणें पूर्वींहि लोकांना यांचा त्रास सोसावा लागे, म्हणून दान दिलेल्या गांवांत प्रवेश करण्यास त्यांस बंदी असे. मात्र चोरांना किंवा राजद्रोही लोकांना पकडावयाचें असल्यास यांस कोठेहि जाण्यास आडकाठी नसे.

परराष्ट्रीय खातें

या खात्याला 'सन्धिविग्रहाधिकरण' असें नांव असे. 'सन्धि' म्हणजे तह आणि 'विग्रह' म्हणजे युद्ध. यांचें 'अधिकरण' म्हणजे खातें किंवा विभाग. याच्या मुख्यास 'महासान्धिविग्रहिक' असें म्हणत. याचा उल्लेख आरंभींच्या दानपत्रांत येतो. किंबहुना त्याच्या कचेरींतच राजाज्ञेस अनुसरून दानपत्रें लिहिलीं जावीं असा स्मृतिकारांनी नियम घालून दिला होता. याचें कारण असें कीं दानपत्रांच्या किंवा प्रशस्तीच्या प्रारंभीं तत्कालीन राजाचें व त्याच्या पूर्वजांचें वर्णन

---

७ क्र. १२०, ओ. ७.

८ क्र. ५३, ओ. ७.

घालण्याची पद्धत होती. त्याविषयीं पूर्ण माहिती या विभागांत मिळणें सोपें जाई.

इतर अधिकारी

याशिवाय आणखीहि कांही राजाधिकाऱ्यांचा उल्लेख कोरीव लेखांत येतो. उदाहरणार्थ, 'महाभांडागारिक' हा मुख्य कोशाध्यक्ष असे. 'महासामन्त' याच्याकडे सामन्ताविषयीचें खातें असे. 'महाकोट्टपाल' याच्याकडे दुर्ग किंवा किल्ले यांचें खातें दिलें असे. 'खंडवाल' किंवा 'खंडपाल', 'बलाधीर', 'माकुतिक' अशा कांही संज्ञांचा नक्की अर्थ अद्यापि समजला नाही.

अधिकारांच्या जागा गुणानुसार दिल्या जात. केवळ वंशपरंपरेने एखादें मोठें पद एकाच कुटुंबांत कित्येक पिढ्या चाललें होतें असें दिसत नाही. कांही ठिकाणीं पुत्र पित्याच्याच पदावर होता असें दिसतें. उदाहरणार्थ, भाकमिश्र व त्याचा पुत्र सोमेश्वर हे दोघेहि त्रिपुरीच्या कलचुरींचे मंत्री होते. कायस्थ गोल्लाक याचे वंशज अनेक पिढ्या अमात्य पदावर होते. पण अशीं उदाहरणें अपवादात्मक होत. यांमध्येहि नेमणुका गुणानुसार केल्या होत्या हें कोरीव लेखांतील वर्णनावरून दिसतें. कांही खालच्या जागांच्या बाबतींत—उदाहरणार्थ, लेखक, कोरक्या इत्यादिकांच्या नेमणुका वंशपरंपरेने होत असें दिसतें.

स्थानिक कारभार

नगरांत तसेंच गावांतहि स्थानिक कारभार 'पंचकुलां' च्या द्वारें केला जात असे. सामान्यतः पंचकुलांत पांच सभासद असत म्हणून त्यांना 'पंचकुल' म्हणत; पण कित्येकदां यांची संख्या दहापर्यंतहि जाई हें कोरीव लेखांतील उल्लेखांवरून दिसतें. प्रत्येक खात्याकरितां अशीं पंचकुलें किंवा कमिट्या असत. पंचकुलांचे निर्णय अमलांत आणण्यासाठी आवश्यक ते अधिकारी मात्र राजाकडून नियुक्त केले जात. शुक्रनीतिसारांत (२,१२०२१) म्हटलें आहे की, राजाने कित्येक नगराच्या व ग्रामाच्या व्यवस्थेकरिता सहा अधिकारी नेमावे.

साहसाधिपतिञ्चैव, ग्रामनेतारमेव च ।
भागहारं तृतीयं तु लेखकञ्च चतुर्थकम् ।।
शुल्कग्राहं पञ्चमं च प्रतिहारं तथैव च ।
षट्कमेतन्नियोक्तव्यं ग्रामे ग्रामे पुरे पुरे ।।

(राजाने प्रत्येक गांवांत व नगरांत पुढील सहा अधिकारी नेमावे—'साहसाधिपति' म्हणजे पोलिसांचा प्रमुख, 'ग्रामाधिपति' म्हणजे पाटील, 'भागहार'

म्हणजे तहसीलदार, 'लेखक' म्हणजे कुळकर्णी, 'शुल्कग्राह' म्हणजे लहानसहान कर वसूल करणारा व 'प्रतीहारी' म्हणजे शिपाई.)

यांपैकीं कांहींचा उल्लेख कोरीव लेखांत यतो. नगराच्या मुख्य अधिकाऱ्याला आरंभींच्या लेखांत 'द्रांगिक' व नंतरच्या लेखांत 'पुरप्रधान' असें म्हटलें आहे, ग्रामाध्यक्षाला 'ग्रामकूट' किंवा 'ग्रामभोगिक' म्हणत. कर गोळा करणारा 'शौल्किक' व दंड करणारा 'दंडपाशिक' यांचाहि उल्लेख कांही लेखांत येतो. एखाद्या देवालयाकरितां गाव, जमिनी, कर गोळा करण्याचा अधिकार वगैरेंचें दान करतांना त्यांच्या व्यवस्थेकरिता पांच किंवा अधिक सभासदांची कमिटी नेमली जावी व तिने सर्व व्यवस्था पाहावी असा प्रघात असे. या पंचकुलांकडे न्यायदानाचेहि अधिकार असत. त्यांनी भरमसाट दंड आकारूं नयेत म्हणून त्यांच्या मार्गदर्शनाकरितां दंडाच्या रकमेविषयीं नियम घालून दिले जात. उदाहरणार्थ, भोगशक्तीच्या अंजनेरी ताम्रपटांतील कांही अपराधांबद्दल सांगितलेल्या दंडाच्या खालील रकमा पाहा [९]–कुमारीचा विनयभंग केल्याबद्दल १०८ रूपक (चांदीचीं नाणीं); जारकर्माबद्दल ३२ रूपक; कानशीलांत लगावण्याबद्दल १६ रूपक; डोक्याला इजा करण्याबद्दल ४ रूपक; मजूरस्त्रीवर वणिक्पुत्राने अत्याचार केल्यास १०८ रूपक इत्यादि. इतर बाबतींत नगराचे आठ किंवा सोळा प्रतिनिधि जो दंड ठरवितील तो प्रमाण मानला जाईल असेंहि म्हटलें. पंचकुलांच्या निकालावर राजाकडे दाद मागतां येत असे. अग्रहार गांवांत मात्र न्यायदानाचे पूर्ण अधिकार अग्रहाराच्या मालकास दिले जात. त्यावर अपील नाही हें स्पष्ट करण्याकरितां दानपत्रांत 'सहाभ्यन्तरसिद्धचा' यासारखे शब्द योजिले जात.

पञ्चकुलाच्या सभासदांना 'महत्तर' (प्राकृतांत, महल्लक) म्हणत. ते नगरांतल्या किंवा ग्रामांतल्या जनतेकडून निवडले जात. पण निवडणुकीच्या पद्धतीविषयी माहिती मिळत नाही. त्यांच्या मुख्यास 'महत्तम' म्हणत. महत्तमाच्या अंगीं कोणते गुण असावे तें स्मृतींत सांगितलें आहे. महत्तम हा प्रामाणिक, धर्मज्ञ, दक्ष, इंद्रियनिग्रही व कुलीन असावा असें त्यांत म्हटलें आहे. महत्तमांना कोरीव लेखांत 'पांचकुलिक' असें म्हटलें आहे. त्यांचा मुख्य 'महापांचकुलिक' हा राजधानींत राहत असे. त्याच्याकडे राज्यांतील पंचकुलांवर देखरेख करण्याचें काम असावें असें वाटतें.

कांही प्राचीन ताम्रपटांत 'गमागमिक' नामक अधिकाऱ्याचा उल्लेख आहे. त्याच्याकडे गांवांत किंवा नगरांत येणाऱ्या जाणाऱ्या माणसांवर नजर ठेवण्याचें काम असावें. 'शुक्रनीतिसारां'तहि अशा अधिकाऱ्याचा उल्लेख आहे. तो पांथशाला

९ क्र. ३२, ओ. ३४–३६.

किंवा सराई यांच्यावर देखरेख ठेवी. तेथे राहावयास आलेल्या माणसाचें नांव, गाव, आलेल्या व जावयाच्या ठिकाणांविषयीं माहिती वगैरेविषयीं चौकशी करी; त्याच्या जवळ कांही शस्त्रें असल्यास तीं आपल्या ताब्यांत घेई, रात्रीं पांथशालेवर पाहऱ्याची व्यवस्था करी आणि सकाळीं प्रवाशाला त्याचीं शस्त्रें परत देऊन गावाच्या सीमेपर्यंत पोंचविण्याची व्यवस्था करीत असे.[१०] यावरून नगरांच्या व ग्रामांच्या सुरक्षिततेविषयीं किती दक्षता घेतली जात असे तें दिसून येतें.

सामाजिक परिस्थिति

आद्य कलचुरींच्या काळीं वर्णाश्रमव्यवस्था प्रचलित होती, तरी भिन्न भिन्न वर्णांमध्ये अगदी अभेद्य तट निर्माण झाले नव्हते. त्याकाळीं हिंदु समाजाचें स्वरूप संकुचित झालें नसून त्याची वृत्ति संग्राहक स्वरूपाची होती, आणि म्हणूनच शक, कुशाण, गुर्जर आदि परकी जमातींचा हिंदु समाजांत अन्तर्भाव होऊं शकला. या जमातींना समाजांत कमी लेखलें जात नसे. त्यामुळे त्या आपल्या लेखांत स्ववंशाचा अभिमानाने उल्लेख करीत. महाराष्ट्र व मध्यभारत या प्रदेशांमध्ये सांपडलेल्या कित्येक लेखांत शक स्त्रीपुरुषांनी आपल्या वंशाचा स्पष्टपणें निर्देश केला आहे. गुजराथेंतील आद्य गुर्जर नृपतींनीहि आपल्या आरंभीच्या लेखांत गुर्जरवंशाचा उल्लेख केला आहे, पण ख्रिस्तोत्तर आठव्या शतकापासून त्यांनी तो उल्लेख टाळून आपण महाभारतकालीन कर्णाच्या वंशांत उत्पन्न झालों असें सांगण्यास सुरवात केली. त्यावरून त्या काळीं हिंदु समाजाची पूर्वीची संग्राहकवृत्ति लोप पावली होती आणि जो जन्माने हिंदु तोच फक्त हिंदु असें मानण्यांत येऊ लागलें होतें असें दिसतें.

परकी जमातींचा हिंदुधर्मांत प्रवेश

पण या काळापूर्वी अनेक परकी जमातींचा हिंदुधर्मांत व समाजांत प्रवेश होऊन चुकला होता. सातवाहन राजे स्वतःला ब्राह्मण म्हणवत, पण त्यांपैकी निदान एकाचा तरी शकक्षत्रप रुद्रदामन् याच्या कन्येशीं विवाह झाला होता. तसेंच आंध्र देशांतील कृष्णेच्या खोऱ्यांत राज्य करणाऱ्या इक्ष्वाकुवंशीय राजांचाहि शक राजकन्यांशीं विवाह झाल्याचा कोरीव लेखांत उल्लेख आहे. हूण हे विजेते म्हणून भारतांत आले, पण लौकरच त्यांनी हिंदुधर्म स्वीकारला व ते भगवान् शंकराचे उपासक बनले.[११] पुढे तर राजपुतांच्या सुप्रसिद्ध कुळांत त्यांची गणना

---

१० शुक्रनीतिसार, २,२७०–२७५.

११ 'स्थाणोरन्यत्र येन प्रणतिकृपणतां प्रापितं नोत्तमाङ्गम्' हें मंदसोर स्तंभलेखांतील हूणनृपति मिहिरकुलाचें वर्णन पाहा. फ्लीट, गुप्त इन्स्क्रिप्शन्स, क्र. ३३, ओ. ६.

होऊ लागली. कलचुरि नृपति स्वतःस चंद्रवंशी म्हणवत. त्यांच्यांतील महाप्रतापी सम्राट् कर्ण याने आवल्लदेवी नामक हूण राजकन्येशीं विवाह केला होता.[१२] तिच्यापासून त्याला झालेला पुत्र यशःकर्ण हा आपल्या पित्यानंतर गादीवर बसला. या उदाहरणावरून शकहूणादि परकी जमातींना प्राचीन काळीं हिंदु समाजाने कसें आपणांमध्ये सामावून घेतलें होतें तें दिसून येईल.

ब्राह्मणांचें समाजांतील स्थान

चातुर्वर्ण्य व्यवस्थेंत ब्राह्मणांना विशेष मान दिला जात असे. तो त्यांच्या धार्मिक जीवनामुळें व वेदशास्त्रादिकांच्या अध्ययनामुळें होता यांत संशय नाही. ब्राह्मणांना पञ्चमहायज्ञादि धार्मिक कृत्यांकरितां राजांकडून मंगलप्रसंगीं भूमिदान दिलें जात असे. अशा धार्मिक कृत्यांच्या अनुष्ठानाचें पुण्य तत्कालीन राजास मिळतें अशी लोकांची श्रद्धा होती व हेंच कारण सांगून भविष्यकालीन राजांना पूर्वीच्या भूमिदानाचें पालन करण्याविषयी दानपत्रांत प्रार्थना केली जात असे.

आद्य कलचुरींच्या कालांत ब्राह्मणांत 'द्राविड', 'गौड' यासारखे भेद अस्तित्वांत आले नव्हते. तसेंच 'मिश्र', 'अवस्थी' यांसारखीं कुलनामेंहि प्रचलित झालीं नव्हतीं. केवळ वेद, शाखा व गोत्र या कारणानींच भेद मानला जात असे. ब्राह्मण आपल्या मूल स्थानांची आठवण ठेवत व त्यांचा साभिमान उल्लेख करीत. आद्य कलचुरींच्या काळचे फारच थोडे–चार पांचच–लेख सांपडले आहेत. त्यांत ब्राह्मणांविषयी फारशी माहिती मिळत नाही. पण त्यांवरून उत्तरमहाराष्ट्रांत कृष्ण यजुर्वेदी तैत्तिरीय शाखेच्या व गुजराथेंत शुक्ल यजुर्वेदी माध्यन्दिन शाखेच्या ब्राह्मणांची वसती होती असें दिसतें. त्यांच्या सामंताचा एक ताम्रपट थोड्या वर्षांपूर्वी रामटेकजवळच्या नगरधन गांवीं सांपडला होता. त्यांतील दान यजुर्वेदी तैत्तिरीय, काण्व व माध्यन्दिन शाखी तसेंच सामवेदी ब्राह्मणांस दिलें होतें असें दिसतें.[१३] अथर्ववेदी ब्राह्मणांचा उल्लेख कलचुरींच्या दानपत्रांत येत नाही.

त्यांचीं मूलस्थानें

उत्तरकालीन कलचुरींचे अनेक लेख सांपडले असल्यामुळें त्यांमध्ये ब्राह्मणांविषयीं बरीच माहिती मिळते. त्या काळीं कांही गांव विशिष्टशाखीय ब्राह्मणांचीं मुख्य स्थानें म्हणून प्रसिद्ध झाले होते. उदाहरणार्थ, उत्तर बंगाल प्रदेशाच्या बोगरा जिल्ह्यांतील कुलाञ्चा हें गांव सामवेदी शांडिल्यगोत्री ब्राह्मणांचें मूलस्थान म्हणून

---

१२ क्र. ५६, श्लो. १५.

१३ क्र. १२०, ओ. ८–१२.

प्रसिद्धि पावलें होतें.[१४] मध्यदेशांतील टकारी नामक गाव माध्यन्दिनशाखी ब्राह्मणांबद्दल प्रसिद्ध होतें.[१५] हें टकारी बिहार प्रदेशाच्या गया जिल्ह्यांतील तन्नामक गाव असावें. कित्येकदा दूरदूरच्या प्रदेशांतून ब्राह्मण कलचुरींच्या दरबारीं राजाश्रयाकरितां येत असत. रत्नपुरच्या कलचुरि राजांच्या आश्रयाकरितां उत्तर-प्रदेशांतील शोणभद्र व मध्यभारतांतील कुम्भटी या गावाहून ब्राह्मण आले होते असे उल्लेख कोरीव लेखांत आले आहेत. कांहींच्या नांवांशी त्यांच्या मूलस्थानांचीं निदर्शक अशीं 'माथुर', 'नागर' अशीं विशेषणें जोडलीं आहेत. यांच्याच पुढे ब्राह्मणांच्या उपजाति बनल्या. आद्य कलचुरींच्या लेखांत ब्राह्मणांच्या नांवांपूर्वी 'ब्राह्मण', 'भट्ट' किंवा 'भट्टिक', आणि शेवटीं 'स्वामी' असा शब्द बहुधा येतो. नंतरच्या लेखांत 'पंडित', 'ठक्कुर', 'राउत', 'गैन्ता' यासारखा शब्द योजिला आहे. ब्राह्मणांच्या नांवाच्या शेवटीं बहुधा 'शर्मा' शब्द येतो. पंधराव्या–सोळाव्या शतकांतल्या लेखांत 'मिश्र' व 'त्रिपाठी' हीं उपनांवें आढळतात.[१६]

त्यांचे व्यवसाय

अनेक ब्राह्मण वेदांच्या व शास्त्रांच्या अध्ययनाला स्वतःला वाहून घेत. जे एकापेक्षा अनेक वेदांत पारंगत होत त्यांना 'द्विवेद' यासारखीं बिरुदें दिलीं जात. हे शब्द अद्यापि उपनामें झाले नव्हते. जे ब्राह्मण श्रौतयाग करीत त्यांना 'दीक्षित' म्हणत. ब्राह्मणांना बलि, चरु, वैश्वदेव इत्यादि गृह्यकर्मांच्या अनुष्ठाना-करितां भूमिदानें दिलीं जात हें मागें सांगितलें आहेच. कांही उच्चपदस्थ अधि-कारीहि श्रौतयाग करीत हे द्वितीय लक्ष्मणराजाचा मन्त्री सोमेश्वर याच्या उदाहरणावरून स्पष्ट दिसतें.[१७] महापुरोहिताला श्रेष्ठ राजाधिकाऱ्यांप्रमाणें मान मिळे. बहुधा सर्व कलचुरि ताम्रपटांत त्याचा निर्देश येतो. अनेक ब्राह्मण मीमांसा, सांख्य, न्याय, वेदान्त इत्यादि दर्शनांचा तसेंच बौद्ध, जैन व चार्वाक मतांचाहि अभ्यास करीत.[१८] त्यांपैकी कांही राजसभेंत होणाऱ्या काव्यस्पर्धेत व वादविवादांत

---

१४ क्र. ७४, ओ. ४४.

१५ क्र. ९१, ओ. २१.

१६ क्र. १०८, ओ. १३; क्र. १०५, ओ. १६.

१७ या सोमेश्वराच्या घरीं इतके श्रौतयज्ञ होत की त्याने पाळलेले राघूहि सकाळ संध्याकाळ ऋत्विजांना खालील आज्ञा करीत असें काव्यमय वर्णन कारीत-लाई शिलालेखाच्या खालील श्लोकांत आलें आहे (क्र. ४२, श्लो. १३)—

अग्नीदग्नीन्विहर विधिवद्दुग्धि होमोपयुक्ता–
मध्वर्यो गां स्रुचमपि समं क्षालयाशु स्रुवेण ।
तप्तैर्वार्भिर्भवतु सविधे गार्हपत्यस्य पत्नी–
त्येवं प्रोचुर्गृहशुकगणा यज्वनो यस्य सन्धौ ।।

१८ क्र. ९७, ओ. १६–१८.

भाग घेत. कित्येकदा दरबारच्या ज्योतिष्यांमध्ये ग्रहणादिकांच्या निश्चित कालाबद्दल वाद होत. ज्याचें भविष्य खरें ठरे त्याला राजदरबारीं मोठा सन्मान मिळे.[१९] कांही ब्राह्मण विरक्त होऊन संसाराचा त्याग करीत आणि शैव, पाशुपत इत्यादि पंथांमध्यें संन्यासदीक्षा घेत.

राजांचे मंत्री बहुधा ब्राह्मणजातीचे असत. ते संकटकाळीं राजाला योग्य सल्ला देऊन मदत करीत. भाकमिश्र, सोमेश्वर, पुरुषोत्तम व गंगाधर या मंत्र्यांनी केलेल्या कामगिरीचा गौरवपर उल्लेख कलचुरींच्या लेखांत आला आहे. यांपैकीं कांहींनी तर रणांगणावरहि आपली कर्तबगारी दाखविली होती, आणि आपल्या स्वामीकरितां महत्त्वाचे विजय संपादन केले होते. इतरांनी आपल्या बुद्धीने व राजकारणकुशलतेने राजकीय व आर्थिक संकटांतून राज्याला वांचविलें होतें आणि देशांत शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित केली होती. कांही ब्राह्मणांनी राजप्रशस्ति रचल्या होत्या. त्यांमध्ये उत्तम प्रकारचें कवित्व दृष्टीस पडतें.

ब्राह्मण सामान्यत: स्वत:च्या जातींतच शरीरसंबंध करीत. तथापि क्वचित् अनुलोम विवाहहि होत असत. त्यांचें ठळक उदाहरण ब्राह्मण राजशेखराने चव्हाणकुलोत्पन्न अवन्तिसुंदरी या क्षत्रियकन्येशीं केलेला विवाह होय.

क्षत्रियांचे वंश

ब्राह्मणांप्रमाणे क्षत्रियांसहि समाजांत मानाचें स्थान असे. प्राचीन कालचे बहुतेक राजे याच जातीचे होते. सातवाहन व वाकाटक नृपति ब्राह्मण होते असें कोरीव लेखांतील उल्लेखांवरून कळतें, पण इतर वंशांचे राजे स्वत:स क्षत्रिय म्हणवत. चालुक्यांच्या लेखांत त्यांचें मानव्य गोत्र उल्लेखिलें आहे. त्यांना हारीतीपुत्र असेंहि म्हणत. हारीती ही बौद्ध देवता होती. तेव्हां दक्षिणेंत बौद्ध धर्माचा प्रचार; होता त्या काळांत त्यांना हें बिरुद मिळालें असावें. उत्तरकालीन चालुक्यांच्या लेखांत मात्र त्यांचा वंश हारीतिपंचशिख या ऋषीपासून उत्पन्न झाला असें म्हटलें आहे. चालुक्य व कलचुरि हे स्वत:स क्षत्रिय म्हणवत यांत संशय नाही. कलचुरींच्या ताम्रपटांत ते कार्तवीर्य सहस्रार्जुनाच्या वंशांत जन्मले असें वर्णन आहे. तेव्हा ते स्वत:स चंद्रवंशी म्हणवत यांत संशय नाही. त्यांचे चालुक्य, राष्ट्रकूट, चंदेल्ल, पाल इत्यादि स्वकालीन क्षत्रियवंशांशीं शरीरसंबंध झाले होते.

त्यांचे व्यवसाय

राज्यांतील अनेक अधिकाऱ्यांच्या जागांवर क्षत्रियजातीय लोक नेमले जात

१९ क्र. ८३, श्लो. १९–२०.

असावे. कोरीव लेखांत अधिकाऱ्यांच्या जातीचा क्वचितच उल्लेख येतो. त्यामुळे या बाबतींत निश्चित माहिती देणें कठीण आहे. तथापि प्राचीन लेखांतील ज्या अधिकाऱ्यांच्या नांवाच्या शेवटीं 'भट' शब्द आहे (उदाहरणार्थ, 'दुर्गभट' पाहा). ते क्षत्रियजातीय होते असें समजण्यास हरकत नाही. कांही क्षत्रिय ब्राह्मणांप्रमाणे विद्येंतहि प्रावीण्य मिळवीत. रत्नपुरच्या कलचुरींच्या कित्येक लेखांत कुमारपाल नामक हैहयवंशी गृहस्थाचें नांव येतें. त्याचें अक्षर वळणदार असल्यामुळे त्याने अनेक शिलालेख 'कौतुकाने' लिहिले होते असें म्हटलें आहे. तो राजनीति, साहित्य, ज्योतिष इत्यादि विविध शास्त्रांत पारंगत असून त्याने लिहिलेल्या कांही प्रशस्त्या उत्तम काव्यगुणांनी युक्त आहेत.[२०]

वैश्य व कायस्थ

चातुर्वर्ण्यांत वैश्यांनाहि विशिष्ट स्थान आहे. त्यांच्या हातांत व्यापार उदीमांची सूत्रें असत. हा वर्ग धनिक असल्यामुळे स्थानिक करभारांत त्याचें वर्चस्व असे. कलचुरींच्या लेखांत यश नामक वैश्याचा रत्नपुरचा 'पुरप्रधान' (नगराध्यक्ष) म्हणून उल्लेख अनेकदां येतो.[२१] खेड्यांतील व नगरांतील पंचकुलांत किंवा पंचायतींत वैश्य वर्गाचें प्राबल्य असे. या जातींतील कांही पुरुषांनी रणांगणावरहि पराक्रम दाखविला होता. कलचुरींच्या वल्लभराज नामक वैश्य सामंताने गौड देशांत मिळविलेल्या विजयांचें वर्णन त्याच्या अनेक लेखांत आलें आहे.[२२] त्याने अनेक देवालयें बांधलीं होतीं, तळीं खोदलीं होतीं व उद्यानें बनविलीं होतीं. त्याच्या शौर्यामुळे कलचुरि राणी लाच्छल्लदेवी त्याला आपल्या पुत्राप्रमाणे प्रेमाने वागवीत असे, असें कोरीव लेखांत म्हटलें आहे.

कायस्थांनाहि समाजांत मानाचें स्थान असे. त्यांची जात काचर नामक ऋषीपासून उत्पन्न झाली अशी आख्यायिका एका लेखांत आली आहे.[२३] प्रथम युवराजदेवाचा अमात्य गोल्लाक हा कायस्थजातीय होता. तो विष्णूपासक असून त्याने बांधवगड येथे मत्स्य, कूर्म, वराह, हलधर (बलराम) इत्यादि विष्णूच्या अवतारांच्या मूर्ति खडकांतून कोरल्या होत्या. त्याच्या कित्येक वंशजांनी कलचुरींची एकनिष्ठेने सेवा केली. त्यांचीं नांवें रीवा येथील शिलालेखांत आलीं होतीं, पण सोमेश्वर याखेरीज तीं सर्व नांवें आता नष्ट झालीं आहेत. रत्नपुरच्या कलचुरींच्या

२० क्र. ९८, श्लो. ४०.

२१ क्र. ७६, श्लो. १६; क्र. ७७, श्लो. १२.

२२ क्र. ८४, श्लो. १७–१८ इ.

२३ क्र. ५१, श्लो. ३५.

राज्यांतहि अनेक संपन्न व विद्वान् कायस्थ राहत होते. त्यांच्या पैकी रत्नसिंह व त्याचा नातू देवगण यांनी उत्तम प्रशस्ति रचल्या होत्या.[२४] रत्नसिंहाने मल्लार येथे शिवमंदिर बांधलें होतें व त्यांत आपली व आपल्या कुटुंबीयांच्या मूर्ति बसविल्या होत्या. त्या देवळाचे अवशेष अद्यापि मल्लार येथे दृष्टीस पडतात. कायस्थांकडे सामान्यतः हिशेबाचें व कारकुनीचें काम असे. कांही लेखांत त्यांचा 'करणिक' म्हणूनहि उल्लेख आला आहे.

इतर जाती

सूत्रधार (शिल्पी) याचा उल्लेख देवळाचा निर्माता म्हणून अनेक कोरीव लेखांत येतो. एका लेखांत देवपाल नामक मोचीचें वर्णन आलें आहे.[२५] हा मोठा धार्मिक प्रवृत्तीचा श्रीमंत मनुष्य असून त्याने खल्वाटिका (खलाडी) येथें विष्णूचें देवालय बांधलें होतें.

स्त्रियांचें समाजांतील स्थान

कलचुरींच्या लेखांत अनेक स्त्रियांचा आदरपूर्वक उल्लेख आला आहे. नोहला, अल्हणदेवी, गोसलदेवी, लाच्छल्लदेवी यांनी धार्मिक तसेंच राजकीय बाबतींतहि बरेंच वर्चस्व गाजविलें होतें. राजेलोकांत बहुपत्नीकत्वाची पद्धत होती. प्रथम युवराजदेवाने अनेक राजकन्यांशीं विवाह केल्याचें वर्णन एका संस्कृत नाटकांत[२६] तसेंच कोरीव लेखांतहि[२७] येतें. गांगेयदेवाबरोबर त्याच्या शंभर राण्या सती गेल्या असें कोरीव लेखांत वर्णन आहे तें खरें असल्यास तें दृश्य अत्यंत भयंकर झालें असलें पाहिजे. सतीच्या चालीचा दुसरा उल्लेख शेवरीनारायणच्या कलचुरि संवत् ९१९ (इ. स. ११६७–६८) च्या लेखांत येतो.[२८] रत्नपुरच्या कलचुरींच्या धाकट्या पातींतील उल्हणदेव नामक राजपुत्र त्रिपुरीच्या जयसिंहाशी लढत असता रणांगणावर पडला. तेव्हा त्याच्या तीन्ही राण्या सती गेल्या. त्यावेळचें वर्णन करताना कवि म्हणतो——

ग्रावाणोऽपि रुदन्ति वज्रहृदयं दीर्णं च शोकादभूत् ।

(दगडांनाहि शोकाने पाझर फुटला आणि वज्राचेंहि हृदय भग्न झालें.)

---

२४ क्र. ९३, श्लो. २६; क्र. ९७, श्लो. २३–२४.

२५ क्र. १०८, श्लो. ९.

२६ विद्धशालभञ्जिका, (सं. अर्ते), पृ. ११३

२७ क्र. ४५, श्लो. २४.

२८ क्र. ९८, श्लो. ३३.

तथापि सती जाण्याबद्दल स्त्रियांवर सक्ति केली जात नसे. कलचुरि लेखांत अल्हणदेवी व गोसलदेवी या सारख्या राजमातांनी पतिनिधनानंतर आपल्या पुत्रांस आपल्या सल्लामसलतीने राजकार्यांत साहाय्य केल्याचे उल्लेख आहेत.

एकत्र कुटूंबपद्धति

त्या काळीं समाजांत एकत्र कुटुंबपद्धति प्रचलित होती असें कोरीव लेखांतील उल्लेखांवरून दिसतें. मल्लारच्या शिलालेखांत कायस्थ रत्नसिंह, त्याची पत्नी, एक पुत्र, दोन सुना, दोन नातू, एक नात आणि दोन इतर नातेवाईक यांचा नामनिर्देश आहे.[२९] हे सर्व त्यावेळीं एकत्र राहत होते यांत संशय नाही. दुसरें उदाहरण द्वितीय रत्नदेवाचा सर्वाधिकारी मंत्री पुरुषोत्तम याच्या कुटुंबाचें. त्याला चार पुत्र होते व ते सर्व आपल्या कर्तबगारीने प्रसिद्धि पावल्यावरहि त्याच्याबरोबर एकत्र राहत होते असें कोनी येथील शिलालेखावरून समजतें.[३०] याच्या उलट क्वचित् राज्याचीहि विभागणी झाल्याचे निर्देश आढळतात. रत्नपुरच्या राज्याची विभागणी प्रथम पृथ्वीदेवाच्या काळांत होऊन सोंठिव नगराजवळचा प्रदेश धाकटचा राजपुत्रास मिळाला व तो तेथून राज्य करूं लागला असें कोरीव लेखांत म्हटलें आहे. तथापि अशी उदाहरणें फारशी नाहीत.

आर्थिक परिस्थिति

कलचुरींच्या लेखांत आर्थिक परिस्थितीचे उल्लेख क्वचितच येतात. आद्य कलचुरींच्या पूर्वींच्या सातवाहन व आभीर यांच्या काळीं महाराष्ट्रांत श्रेणी किंवा कामगारांचे संघ होते असें कोरीव लेखांतील उल्लेखांवरून दिसतें.[१] त्या श्रेणी नंतरच्या काळांतहि चालू असाव्या. या श्रेणींचा बँकांसारखा उपयोग होई. धनिक लोक यांमध्ये आपल्या रकमा ठेवून त्यांवरच्या व्याजांचा उपयोग धार्मिक कृत्यांकडे केला जावा अशी व्यवस्था करीत. राजवटी बदलल्या तरी श्रेणी कायमच राहत, म्हणून दानशूर लोक आपल्या देणग्या सरकारांत न देतां या श्रेण्यांच्या स्वाधीन करत. याशिवाय समान व्यवसाय करणाऱ्यांचे 'गण' नामक संघ असत. नगरधनच्या ताम्रपटांत माहुतांच्या गणाने ब्राह्मणांस दिलेल्या भूमिदानाचा उल्लेख आहे.[२] त्या भूमिदानाकरितां तत्कालीन राजाची संमति

२९ क्र. ९३, श्लो. ११–१७.

३० क्र. ९०, श्लो. २८–२९.

१ क्र. १, ओ. ९–११.

२ क्र. १२०, ओ. ४.

आवश्यक होती, पण ताम्रपटाच्या मुद्रेवर त्या गणाने आपलें विशिष्ट चिन्ह अंकुश व 'गणदत्तिः' (हें गणाचें दान आहे) हा शब्द हे कोरविले होते, त्यावरून त्याचें राज्यांतील महत्त्व प्रत्ययास येतें. या गणांच्या सभासदांच्या समितीला 'समूह' अशी संज्ञा होती. त्यांच्या अध्यक्षाला 'स्थविर' व कार्यकारी मंडळाच्या सभासदांना 'प्रमुख' असें म्हणत. माहुतांच्या या संघप्रमुखांत एक पीलुपति (हस्तिसैन्यावरील अधिकारी) व हस्तिवैद्य यांचाहि अंतर्भाव केला होता हें साहजिकच आहे. सैन्यामध्ये हस्तिदलाला फार महत्त्व असल्यामुळे हा महामात्र-गण (माहुतांचा संघ) बलवान् होता यांत संशय नाही.

याप्रमाणे इतर व्यावसायिकांचेहि गण त्या कालीं असले पाहिजेत. इतर राजवंशांच्या कोरीव लेखांत त्यांचे उल्लेख येतात, पण तसे उल्लेख कलचुरींच्या लेखांत फारसे आढळत नाहींत. तथापि कारीलताई लेखांत ज्या वागूलिक व पायटि यांनी प्रत्येकी पन्नास विडयांच्या पानांचें दान केल्याचा उल्लेख आहे[3] ते त्या व्यावसायिकांचे गण असावे असें वाटतें. त्या काळांत गणाच्या मुख्यास 'देशि' असें म्हणत. बिलहरि लेखांत कषायपंचकाच्या देशीने कांही दान दिल्याचा निर्देश आहे. श्रेणी व गण त्यांचें स्वतःचें सैन्य असे. त्याचा उपयोग संकटकाळीं शासन-सत्तेस होत असे. धर्मशास्त्रांत व अर्थशास्त्रांत षड्विध बलामध्ये श्रेणिबलाचा अन्तर्भाव केला आहे.

विक्रीकर

नगरांत तसेंच ग्रामांतहि बाजाराकरिता मंडपिका (मंडई) असत. विक्री-करितां आणलेल्या सर्व वस्तु प्रथम तेथे नेल्या जात व तेथे त्यांचें मूल्यमापन होऊन विक्रीकर ठरविला जाई. बाजारांत वस्तु विकण्याचा परवाना म्हणून 'युगा' नांवाची चिट्ठी दिली जाई. ती एक दिवसभर चाले. तिच्याकरितां अर्ध पौर द्यावा लागे. पौर हें लहान नाणें होतें. बाजारांत विकल्या जाणाऱ्या प्रत्येक घोडयावर दोन पौर आणि हत्तीवर चार पौर विक्रीकर द्यावा लागे. बाजारांत ('आपणां'त) वीथि किंवा दुकानांच्या रांगा असत. लहान लहान दुकानांना 'आवार' असें म्हणत. बाजारांत विविध प्रकारचे जिन्नस विक्रीकरितां येत. त्यांपैकी धान्य, सुपारी, विडयाची पानें, मीठ, मोहरी, सुंठ इत्यादिकांचा उल्लेख बिलहरी लेखांत आला आहे.[4]

---

३ क्र. ४२, श्लो. ४२.

४ क्र. ४५, श्लो. ७?.–८१.

वजनें व मापें

देशांत भिन्न भिन्न प्रकारांचीं वजनें व मापें प्रचलित होतीं. जिल्ह्यांतील मापांचा 'विषयमान' असा उल्लेख आढळतो. कांही लेखांत 'बृहन्माना' चा किंवा मोठ्या मापाचा निर्देश आहे. त्यावरून हल्लींच्या मणाप्रमाणें लहान व मोठें अशीं दोन प्रकारांची मापें प्रचलित होतीं असें दिसतें. जमिनीच्या मापास 'निवर्तन' असें म्हणत. याचे अनेक प्रकार प्रचलित होते. कलचुरींच्या एका ताम्रपटांत 'उभयचत्वारिंशकनिवर्तनिन्' असा उल्लेख आला आहे.[५] त्यावरून तें निवर्तन चाळीस दंड रुंद व चाळीस दंड लांब अशा जमिनीचें निदर्शक होतें असें दिसतें. कित्येकदां जमिनीचें मोजमाप हलांच्या संख्येने दर्शविलें जाई. 'हल' म्हणजे बैलांच्या एका जोडीने नांगरली जाईल इतकी जमीन. ही सामान्यतः पांच एकर असे. तिसरेंहि एक प्रमाण प्रचलित होतें. शेतांत पेरण्यास आवश्यक असलेल्या बियाणावरून त्याच्या मोजमापाचा निर्देश करीत. उदाहरणार्थ, 'व्रीहिपिटकक्षेत्र' म्हणजे ज्या शेताच्या बियाणाकरितां एक पिटक तांदळांचें भात लागे तें, असें समजलें जाई.

खेडेगांवांतील व्यवस्था

सध्याप्रमाणे त्या काळी बहुसंख्य लोक खेडेगावांत राहत असत. खेड्यांचे गट केले जात. त्यांतील मुख्य खेड्यास 'ज्येष्ठिकाग्राम' म्हणत. प्रत्येक खेड्याच्या सीमा निश्चित केल्या असत. त्याच्या जवळपास गाईंना चरण्याकरितां 'गोचर' किंवा 'गोप्रचार' असत. कित्येकदा अशीं कुरणें गावांतल्या जनावरांकरितां दान दिलीं जात. त्यांच्या मर्यादा दाखविण्याकरितां दुर्गादेवीची मूर्ति ज्यांवर कोरली आहे असे स्तंभ उभारीत, गावांतील चराईच्या जमिनी, रानें, तळीं, देवळें इत्यादिकांचा उपयोग सर्व गावकरी करीत. गावांतील आंब्याचीं व मोहाचीं झाडें खाणी, निधि, निक्षेप इत्यादिकांची मालकी राजाकडे असे. तो एखाद्या गावाचें ब्राह्मणास दान करी तेव्हा अर्थातच ती मालकी त्याच्याकडे जाई. याशिवाय 'दित्य', 'विष्टि', 'प्रातिभेदिका' इत्यादि कर राजास किंवा दान दिलेल्या ब्राह्मणास द्यावे लागत. 'दित्य' म्हणजे विशिष्ट प्रसंगी राजास द्यावा लागणारा नजराणा असावा. 'विष्टि' म्हणजे विशिष्ट प्रसंगीं गावकऱ्यांना विना वेतन काम करावयास लावण्याचा हक्क. 'प्रातिभेदिका' मध्ये इतर किरकोळ हक्कांचा समावेश होत असावा. याशिवाय राजाचे अधिकारी व शिपाई कामाकरितां गावांत येत तेव्हा गावकऱ्यांना त्यांच्या राहण्याची, सरबराईची व पुढील मुक्कामास पोचविण्याची व्यवस्था करावी लागे, किंवा त्याकरिता अल्पशी रक्कम द्यावी लागे.

५ क्र. १२, ओ. १८. एक दंड म्हणजे चार हात.

तिला 'वसतिदण्ड' व 'प्रयाणदण्ड' अशी नांवें होतीं. दान दिलेल्या गावांवर मात्र हा कर लादला जात नसे. तसेंच त्या गावांत सैनिक व पोलिस यांना चोर आणि राजद्रोही यांना पकडण्याव्यतिरिक्त अन्य कारणाने प्रवेश करण्यास सक्त मनाई असे.

ग्रामपंचायत

गावांतल्या कज्ज्यांचा निकाल पंचायतीमार्फत होई. फौजदारी खटल्यांबद्दल दंड होई त्याला 'दशापराधदंड' असें म्हणत तो राजाकडे किंवा दान दिलेल्या ब्राह्मणाकडे भरावा लागे. पंचायतीच्या निर्णयावर राजाकडे दाद मागतां येई, पण दान दिलेल्या गावांच्या बाबतींत गावकऱ्यांना हा हक्क नसे. हें दाखविण्याकरिता 'सहाभ्यन्तरसिद्धि' या सारखे शब्द दानपत्रांत योजिले जात.

नगरांची समृद्धि व सौंदर्य

कलचुरींच्या काळीं अनेक सुंदर व समृद्ध नगरें अस्तित्वांत आलीं. मुख्य शाखेची राजधानी त्रिपुरी येथें राज्य करणाऱ्या कलचुरि नृपतीचें वर्णन करतांना राजशेखर म्हणतो--

सीतास्वयंवरनिदानधनुर्धरेण
दन्धात्पुत्रितयो विभुना भवेन ।
खण्डं निपत्य भुवि या नगरी बभूव
तामेव चैद्यतिलकस्त्रिपुरीं प्रशास्ति ।।

(भगवान् शंकरांनी असुरांचीं आकाशांतील तीन पुरें जाळलीं. त्यावेळीं त्यांचा एक भाग पृथ्वीवर पडला. त्याची त्रिपुरी नगरी झाली. त्या नगरींत हा चैद्यनृपतीं-तील श्रेष्ठ राजा राज्य करतो.)

त्रिपुरीचें वैभव असामान्य असल्यामुळेच राजशेखराला अशी कल्पना सुचली असावी. सध्याच्या तेवर गांवाजवळ सुंदर शिल्पांचे अवशेष विपुल प्रमाणांत सांपडले असल्यामुळे राजशेखराच्या वर्णनांत फारशी अतिशयोक्ति होती असें वाटत नाही. दक्षिण कोसलांतील कलचुरींची पहिली राजधानी तुम्माण येथेहि प्रथम रत्नदेवाने वङ्केश्वर, रत्नेश्वर इत्यादि उत्तुंग देवालयें, मोठमोठे प्रासाद आणि सुंदर आणि उंच आम्रवृक्षांचीं उपवनें आणि फळांपुष्पांनी भरलेलीं उद्यानें निर्माण करून त्या नगराला सुशोभित केलें होतें. रत्नपुर या नव्या राजधानीचें वर्णन रत्नपुरच्या शिलालेखांत खालील प्रमाणें केलें आहे.[६]

---

६ क्र. ७७, श्लो. ११.

एतद्यद्विपुलं धनेश्वरपुरप्रख्यं महेशान्वितं
नानावर्णविचित्ररत्ननिचितं रत्नालयाभं यतः ।
नानादेवकुलैश्च भूषितमिति स्वर्गाभमालक्ष्यते
श्रीमद्रत्नपुरं दिशि श्रुतयशो रत्नेश्वरो यद्व्यधात् ।।

(हें रत्नपुर रत्नेश्वराने (प्रथम रत्नदेवाने) वसविलें असून त्याची कीर्ति सर्व दिशांत पसरली आहे; कारण त्या ठिकाणीं भगवान् शंकराचें (रत्नेश्वररूपाने) वास्तव्य असल्यामुळे आणि स्वतःच्या विस्तारामुळे तें कुबेराच्या अलकानगरीसारखें दिसतें; त्यामध्ये नाना रंगांचीं विचित्र रत्नें असल्यामुळें त्याला रत्नाकर सागराचें स्वरूप आलें आहे; आणि त्यांत अनेक प्रकारचीं देवालयें असल्यामुळे तें स्वर्गासारखें शोभत आहे.)

तुम्माण व रत्नपुर या दोन्ही ठिकाणीं प्राचीन इमारतींचे व शिल्पांचे उत्तम अवशेष सांपडले आहेत. रत्नपुरच्या आसमंतात् असलेल्या अनेक तलावांनी व वृक्षराजींनी तें अद्यापिहि रमणीय दिसतें. प्राचीनकाळीं तें राजधानीचें नगर होतें, तेव्हा तर त्याचें वैभव अतिशयच असलें पाहिजे. दक्षिण कोसलांतील मल्लाल, जाजल्लनगर, विकर्णपुर इत्यादि नगरेंहि आपल्या वैभवामुळे सुप्रसिद्ध झालीं होतीं.

मल्लारच्या शिलालेखांत म्हटल्याप्रमाणे [७] कलचुरींचें राज्य न्यायाने चाललें असे आणि त्यांतील प्रजा सामान्यतः दैवी व मानवी आपत्तींपासून मुक्त असून सुखी असे.

---

७ क्र. ९७, श्लो. ८– राज्ये महीभुजस्तस्य नयवर्त्मानुसारिणि । क्षीणोपसर्गसंसर्गप्रजानन्दविधायिनि ।।

३ धार्मिक परिस्थिति

बौद्ध धर्माचा प्रसार

आद्य कलचुरींच्या कालीं भारतांत बौद्ध धर्माचा सर्वत्र प्रसार होता. कृष्णराज हा खिस्तोत्तर सहाव्या शतकाच्या मध्याच्या सुमारास उदयास आला. त्या पूर्वीच्या वाकाटकांच्या काळांत बौद्धधर्म भरभराटींत होता हें त्या काळच्या अजंठ्याच्या लेण्यांवरून दिसून येतें. अजंठ्याचीं सोळा, सतरा व एकोणीस क्रमांकांचीं लेणीं त्यांतील शिल्पें व चित्रें यांच्यामुळे अत्युत्कृष्ट गणलीं जातात. हीं लेणीं वाकाटकांचे मंत्री व मांडलिक यांनी कोरविलीं होतीं. त्यांवरून त्या काळीं बौद्ध धर्माचें चांगलेंच वर्चस्व होतें हें दिसून येतें. आद्य कलचुरींच्या पतनानंतर बदामीच्या चालुक्यांच्या राजवटींत खिस्तोत्तर सातव्या शतकाच्या पूर्वार्धांत सुप्रसिद्ध चिनी यात्रेकरू ह्यूएन्त्संग भारतांत आला होता. त्याने महाराष्ट्र, गुजराथ व दक्षिण कोसल येथील बौद्ध व हिंदू धर्मांच्या परिस्थितीचें वर्णन लिहून ठेवलें आहे. त्यांतील उल्लेखांवरून असें दिसतें कीं महाराष्ट्रांत शंभराहून अधिक बौद्ध मठ होते आणि त्यांत हीनयान व महायान या दोन्ही पंथांचे मिळून पांच हजारांवर भिक्षु राहत असत. गुजराथेंतील भरुकच्छ (भडोच) देशांत दहापेक्षां अधिक बौद्ध मठ होते व त्यांत ३०० महायान स्थविर पंथाचे भिक्षू राहत होते. दक्षिण कोसलांत शंभराहून अधिक मठ असून त्यांतील सर्व भिक्षु महायान पंथाचे होते. त्यांची संख्या सुमारें दहा हजार होती. या वर्णनावरून आद्य कलचुरींच्या काळची बौद्धधर्माच्या प्रसाराची कल्पना येईल. तथापि त्यानंतर हळू हळू त्या धर्माला उतरती कळा लागूं लागली. याचें मुख्य कारण त्याचा राजाश्रय जाऊं लागला हें होय. खिस्तोत्तर तिसऱ्या चौथ्या शतकापासून वैदिकधर्मी राजांचा काल सुरू झाला. हे राजे परधर्मसहिष्णु असल्यामुळे ते क्वचित् बौद्ध मठांनाहि देणग्या देत. उदाहरणार्थ ह्यूएनत्संगाच्या कालीं दक्षिण कोसलांत राज्य करणारा सोमवंशी राजा महाशिवगुप्त बालार्जुन हा स्वतः शिवोपासक होता तरी त्याने

आपली राजधानी श्रीपुर (रायपुर जिल्ह्यांतील सध्यांचें शिरपुर) येथील व इतर ठिकाणच्याहि बौद्ध विहारांना उदार देणग्या दिल्या होत्या. देशांतील सधन वैश्य वर्गाचाहि त्या धर्माला आश्रय होता. त्यामुळे त्याची कांही काळ चलती राहिली. तथापि ख्रिस्तोत्तर तृतीय शतकानंतर बौद्ध मठांना राजाश्रय मिळाल्याचीं उदाहरणें एकंदरींत कमीच आहेत. याच्या उलट तत्कालीन कोरीव लेखांत अश्वमेधादि श्रौत यागांचे उल्लेख अनेक आढळतात. विष्णु, शिव, कार्त्तिकेय इत्यादि पौराणिक देवांचीं देवालयें बांधण्याचा प्रघातहि सर्व भारतभर सुरू झाला होता व हळूहळू सामान्य जनता पौराणिक धर्माकडे आकृष्ट होऊं लागली होती. तेव्हा राजाश्रयाच्या अभावीं बौद्ध धर्माची पिछेहाट हळूहळू कशी झाली तें दिसून येईल.

शैव संप्रदाय

बहुधा सर्व आद्य व उत्तरकालीन कलचुरि नृपति शिवोपासक होते. या नियमाला अपवाद असा एकच–त्रिपुरीच्या तृतीय शंकरगणाचा. हा राजा विष्णूपासक होता व त्याने भगवान् विष्णूचें 'शंकरनारायण' या नांवानें मुरवाडयाहून २७ मैलांवर वडगांव येथे देवालय बांधलें होतें. इतर सर्व कलचुरि नृपति श्रीशंकराचे उपासक असल्याने त्यांच्या राजवटींत शैवपंथांचा अत्यंत उत्कर्ष झाला हें सांगणें नकोच.

प्राचीन काळीं शैव संप्रदायाच्या अनेक शाखा भारतांत उत्पन्न झाल्या. त्यांपैकीं शैव, पाशुपत, कारुक (किंवा कारुणिक) सिद्धान्ती व कापालिक यांचा उल्लेख रामानुजादि आचार्यांनी व शांकरभाष्याच्या टीकाकारांनी केला आहे. यांपैकीं कारुक सिद्धांतीविषयी आपणांस फारशी माहिती नाही. कांहींच्या मतें त्यांस 'कालमुख' किंवा 'कालानन' असेंहि म्हणत. कालमुखांचा निर्देश कांही कोरीव लेखांतहि येतो. कापालिक संस्कृत वाङ्मयांत व क्वचित् कोरीव लेखांतहि दृष्टीस पडतात. भवभूतीच्या 'मालतीमाधवां'तील अघोरघंट व कपालकुंडला कापालिक पंथाचे होते. ख्रिस्तोत्तर सातव्या शतकांत होऊन गेलेल्या महेन्द्रविक्रमवर्मा नामक पल्लवनृपतीने 'मत्तविलासप्रहसन' या संस्कृत प्रहसनांत कापालिकांच्या आचारांचें विडम्बन केलें आहे. पण या दोन मतांपेक्षा पाशुपत व शैव मतांचा प्रसार अधिक होता. पाशुपत मताचा संस्थापक नकुलीश किंवा लकुलीश हा ख्रिस्तोत्तर दुसऱ्या शतकाच्या आरंभीं गुजराथेंतील कायावतार किंवा कायावरोहण (हल्लीचें कारवाण) येथे होऊन गेला या पाशुपतमताचा प्रसार पश्चिम भारतांत मथुरा, राजपुताना, गुजराथ, कर्नाटक इत्यादि प्रदेशांत झाला होता. लकुलीशाचा शिष्य कुशिक याच्या नंतर गुरुशिष्यपरंपरेंतील दहावा आचार्य उदिताचार्य याचा स्तंभलेख मथुरा येथे सापडला आहे. तो सुप्रसिद्ध गुप्त सम्राट्

द्वितीय चन्द्रगुप्त याच्या काळचा गुप्त संवत् ६१ (खिस्तोत्तर सन ३८०–८१) या वर्षाचा आहे. त्यानंतरचे कांही लेख राजपुतान्यांत सांपडले आहेत. उदयपुरचे रजपूत राजे ज्या एकलिंगजीचे उपासक होते त्याच्या मंदिराच्या परिसरांत लकुलीशाची भव्य मूर्ति आहे. गुजराथेंत तर या पंथाचा उद्गम झाल्याने त्याचा प्रसार विशेषच झाला होता. पुढे कर्नाटकांतहि हा पंथ पसरला. या पंथाच्या आचार्यांच्या नांवाच्या शेवटीं 'राशि' हें पद आढळतें. चौथें शैव मत 'सिद्धान्तमत' या नांवानेहि प्रसिद्ध होतें. या मताच्या आचार्यांना 'सैद्धान्तिक' म्हणत. त्यांच्या नांवांच्या शेवटीं 'शिव' किंवा 'शम्भु' असें पद बहुधा असे. हें मत भगवान् शंकरांनी स्वतः ब्रह्मदेवास दारुवनांत प्रथम उपदेशिलें, व पुढे त्याचा सर्वत्र प्रसार झाला असें प्राचीन कोरीव लेखांत म्हटलें आहे. कांही लेखांत दुर्वास ऋषीला या मताचा पहिला आचार्य मानलें आहे. या शैवमताचा प्रचार भारतांतील अनेक प्रदेशांत झाला होता व देशपरत्वें त्याच्या शाखांस भिन्न भिन्न नांवेंहि प्राप्त झालीं होतीं. या पंथाच्या मत्तमयूरशाखेचा विचार पुढे येणार आहे.

आद्य कलचुरिनृपति कृष्णराज, शंकरगण व बुद्धराज हे सर्व शिवोपासक होते. कलचुरींच्या ताम्रपटांत कृष्णराजाचें वर्णन 'आ जन्मन एव पशुपतिसमाश्रयपरः' (जन्मापासून पशुपतीला शरण गेलेला) असें केलें आहे. त्यावरून तो पाशुपतपंथाचा अनुयायी असावा. त्याचा पुत्र शंकरगण व पौत्र बुद्धराज हे 'परमाहेश्वर' म्हणजे शंकराचे एकनिष्ठ उपासक होते, असें त्यांच्या ताम्रपटांत म्हटलें. ते कोणत्या विशिष्ट संप्रदायाचे अनुयायी होते हें माहीत नाही. तथापि त्यांच्याहि दरबारीं पाशुपतपंथाचें वर्चस्व होतें हें कांही उल्लेखांवरून अजमावतां येतें. शंकरगणाचा महापीलुपति किंवा हस्तिसैन्याचा मुख्य अधिकारी याचें नांवच 'पाशुपत' असें होतें.[१] बुद्धराजाची राणी अनन्तमहायी हिला त्याच्या एका ताम्रपटांत 'पाशुपतराज्ञी' म्हणजे पाशुपतपंथाची अनुयायिनी राणी असें म्हटलें आहे.[२] त्यावरूनहि या पंथाचा राजकुलांतील प्रसार स्पष्ट होतो.

घारापुरीचीं लेणीं

या आद्य कलचुरि नृपतींनी आपलें इष्ट दैवत शिव याचीं अनेक देवालयें आपली राजधानी माहिष्मती नगरी येथे व राज्यांतील इतर ठिकाणीं उभारलीं असावीं. पण आतां त्यांतील एकहि अवशेषरूपाने सुद्धा विद्यमान नाही. तथापि मुंबईजवळचीं घारापुरीचीं 'एलेफंटा लेणीं' हीं कलचुरींच्या काळीं कोरविलीं

१ क्र. १२, ओ. ३४.
२ क्र. १४, ओ. ३२.

असावीं असें मानण्यास प्रमाण आहे. ह्या लेण्यांच्या काळांविषयीं भिन्न भिन्न मतें व्यक्त झालीं आहेत. बर्जेसच्या मतें तीं ख्रिस्तोत्तर ८०० च्या सुमारचीं असावीं.[३] हीरानंद शास्त्र्यांच्या मतें तीं गुप्तकालांत–अर्थात् पांचव्या–सहाव्या शतकांत–कोरलीं गेलीं असावीं.[४] याच्या उलट श्री. य. रा. गुप्ते म्हणतात कीं 'मुख्य लेणें व त्यांतील मूर्ति इ. स. च्या सातव्या शतकाच्या पूर्वार्धांत खोदलेलीं असावीं.'[५] यांतील शेवटचें मत आम्हांस विशेष संभवनीय वाटतें. पण हीं लेणीं कोंकणांत राज्य करणाऱ्या मौर्य राजांनी कोरविलीं असावीं हें श्री. गुप्ते यांचें अनुमान मात्र आम्हांस ग्राह्य वाटत नाही. हे मौर्य राजे कलचुरींचे मांडलिक होते. त्यांच्यापूर्वी त्रैकूटकांचा अंमल कोकणांत होता. त्रैकूटक राजांचीं कांही नाणीं गुजराथ, कोंकण, नाशिक या प्रदेशांत सांपडलीं आहेत. त्रैकूटकांचा पराजय केल्यावर त्यांच्या राज्याचा कांही भाग कृष्णराजाने आपल्या मांडलिकांत वांटून दिला होता असें दिसतें. त्यापैकीं अपरान्त किंवा कोंकण हा प्रदेश त्यांने मौर्यांस दिला होता. या प्रदेशावर मौर्यांचें राज्य द्वितीय पुलकेशीने त्यांचा पराभव करून तो आपल्या राज्यास जोडीपर्यंत टिकलें होतें. तथापि मौर्यांच्या हातून घारापुरीसारखीं लेणीं कोरलीं गेलीं असतील हें संभवनीय वाटत नाही. या कामास लागणारे उत्कृष्ट कारागीर व अवाढव्य पैसा जमविणें कलचुरिसारख्या साम्राज्यसत्तेसच शक्य झालें असतें. कलचुरीनंतर सातव्या शतकाच्या द्वितीय पादांत हा प्रदेश बादामीच्या चालुक्यांच्या ताब्यांत गेला. पण ते राजे विष्णूपासक होते. तेव्हा त्यांनी हीं लेणीं कोरविलीं असतील असें वाटत नाही.

या लेण्यांच्या पश्चिमेकडच्या आवारांतील शिवालयाच्या उत्तरेच्या बाजूस लकुलीशाची मूर्ति आहे. लकुलीश मध्यभागीं कमलाच्या आसनावर बसला असून त्या कमलाचा देठ दोन नागांनी धरला आहे. लकुलीशाने डावा हात मांडीवर ठेवला असून उजवा किंचित् वर उचलला आहे. तो आता भग्न झाला आहे. या उजव्या हातांत लकुट किंवा दंड असावा. अशीच मूर्ति वेरूळच्या डुमार लेण्यांत आहे व त्या ठिकाणीं लकुट स्पष्ट आहे. श्री. गुप्ते या मूर्तीला 'महायोगीश्वर शिव' म्हणतात, पण तसें असतें तर त्याचे दोन्ही हात खालीं एकावर एक ठेवले असते. येथे एक हात वर उचलला आहे. तेव्हा त्यांतील लकुट आता भग्न झाला असला तरी ही मूर्ति लकुलीशाचीच यांत संशय नाही.[६] या सारखीच आणखी एक मूर्ति

---

३ केव्ह टेंपल्स् ऑफ इंडिया, पृ. ४६७.

४ हीरानंद शास्त्री, ए गाईड टु एलेफंटा, पृ. १.

५ य. रा. गुप्ते, घारापुरीचीं लेणीं, पृ. १.

६ हीरानंद शास्त्री, ए गाईड टु एलेफंटा, I. ३३ इ.

मुख्य लेण्याच्या समोरच्या द्वारांतून आंत शिरलें असतां डाव्या बाजूस आहे. तीहि लकुलीश्वराचीच असावी असा हीरानंद शास्त्री यांचा तर्क होता. त्या मूर्तीचे दोन्ही हात आता भग्न झाले असल्यामुळे याविषयी निश्चित कांही सांगता येत नाही. तथापि उपरिनिर्दिष्ट दुसऱ्या मूर्तीविषयी मात्र संदेह नाही. लकुलीश हा पाशुपत पंथाचा संस्थापक होता. त्याची मूर्ति प्रस्तुत लेण्यांत कोरली असल्याने तें लेणें कोरविणारा पाशुपतपंथी होतां यांत संशय नाही. कोंकणच्या मौर्य राजांच्या धार्मिक मतांविषयीं आपणांस कांही माहिती नाही. कारण त्यांचे लेख अद्यापि प्रसिद्ध झाले नाहीत. पण कलचुरि नृपति पाशुपतपंथाचे अनुयायी असावे असें मानण्यास सबळ कारणें आहेत हें मागें दाखविलें आहे. तेव्हा त्यांच्याच काळीं हीं सुंदर लेणीं कोरविलीं होतीं असें मानण्यास हरकत नाही.

आद्य कलचुरींचीं सर्व दानें ब्राह्मणांना पंचमहायज्ञांच्या अनुष्ठानाकरितां दिलीं होतीं. शंकरगणाच्या शांतिल्लनामक लष्करी अधिकाऱ्याने सूर्यग्रहणप्रसंगीं एक गाव परमभट्टारकाच्या (म्हणजे शंकरगणाच्या) पुण्य व यश यांच्या वृद्धीकरिता दान दिला होता.[७] ग्रहणप्रसंगीं दान दिल्याचा हा निर्देश अत्यंत प्राचीन आहे.

उत्तरकालीन धार्मिक परिस्थिति

यानंतर आपण उत्तरकालीन कलचुरींच्या काळच्या धार्मिक परिस्थितीचा विचार करूं. त्रिपुरीच्या कलचुरींचा अत्यंत प्राचीन लेख प्रथम लक्ष्मणराजाचा सन ८४१–४२ चा आहे. त्यांत आरंभीं ब्रह्मा, विष्णु व रुद्र यांना नमन असून नंतर त्यांच्या स्तुतिपर श्लोक होते असें त्याच्या अवशिष्ट भागावरून दिसतें.[८] इतर कलचुरि नृपतींप्रमाणे हा लक्ष्मणराजहि शिवोपासक असावा, पण त्याने त्रिमूर्तींना नमन करून त्यांची स्तुति केली आहे यावरून त्याचा सर्व देवतांविषयीचा आदर व्यक्त होतो. हीच भगवद्गीतेची शिकवण असून तद्नुसार बहुधा सर्व भारतीय राजांची नीति असे. त्रिमूर्तींपैकी ब्रह्मदेवाचीं देवालयें क्वचितच आढळतात. अजमीर-जवळ पुष्कर क्षेत्रीं ब्रह्मदेवाचें देवालय आहे, पण कलचुरींच्या राज्यांत तसें देवालय अद्यापि सांपडलें नाही. इतर देवतांच्या देवळांच्या भिंतीवर मात्र ब्रह्मदेवाच्या मूर्ति आढळतात.

विष्णूचीं देवालयें

विष्णूचीं अनेक देवालयें त्रिपुरी व रत्नपुरच्या कलचुरींच्या राज्यांत बांधलीं होतीं असें कोरीव लेखांतील उल्लेखांवरून दिसतें. बांधवगड व त्यानजीकचें

---

७ क्र. १३, ओ. ९–१०.

८ क्र. ३७, ओ. १–४.

गोपालपुर येथे प्रथम युवराजदेवाचा अमात्य गोल्लाक ऊर्फ गौड याने विष्णूच्या मत्स्य, कूर्म, वराह, परशुराम व हलधर (बलराम) यांच्या भव्य प्रस्तरमूर्ति कोरविल्या होत्या. त्याशिवाय भगवान् शेषशायीची मूर्तिहि त्याने कोरविली होती.[९] विष्णूच्या अवतारांच्या मूर्ति कोरवितांना कृष्णाबद्दल बलरामाची मूर्ति घालत असत असें प्राचीन काळच्या शिल्पपट्टांवरून व प्रभावळींवरून दिसतें व तोच प्रघात गोल्लाकाने अनुसरला होता. यानंतर द्वितीय लक्ष्मणराजाचा मंत्री सोमेश्वर यानेहि कारीतलाई येथे भगवान् विष्णूचें उत्तुंग देवालय बांधविलें होतें व त्यांत सोमस्वामी नामक वराहावताराची मूर्ति स्थापित केली होती. या देवालयाचें सुंदर वर्णन कारीतलाई येथील शिलालेखांत आलें आहे.[१०] याचे अवशेष अद्यापि कारीतलाई येथे दृष्टीस पडतात. कलचुरि नृपति द्वितीय लक्ष्मणराज हा स्वतः शिवोपासक होता, तरी त्याने स्वतः, त्याच्या राहडा नामक पट्टराणीने व तृतीय शंकरगण नामक पुत्राने त्या देवालयाच्या योगक्षेमाकरितां कांही गाव दान दिले होते. तृतीय शंकरगण हा तर स्वतः विष्णूपासक होता. त्याने शंकरनारायण नामक विष्णूचें देवालय वडगाव येथे बांधलें होतें हें मागें सांगितलें आहेच. विंध्य प्रदेशांत रेवा जिल्ह्यांतील मकुंदपुर नामक गांवांत एका जलाशयाच्या काठीं जलशयन विष्णूचें (म्हणजे शेषशायीचें) मंदिर दामोदर नामक श्रेष्ठीने बांधल्याचा उल्लेख तेथे सांपडलेल्या शिलालेखांत आला आहे.

शिवालयें

याप्रमाणे भगवान् विष्णूचीं कांही देवालयें चेदि देशांत बांधलीं गेलीं असलीं तरी त्यांपेक्षा श्रीशंकराचीं देवालयें किती तरी अधिक व जास्त उत्तुंग होतीं. कारण कलचुरि राजे स्वतः शिवोपासक असल्यामुळे त्यांचा त्या पंथास उदार आश्रय होता. त्रिपुरीच्या शाखेचा मूळ पुरुष वामराजदेव हा 'परममाहेश्वर' म्हणजे भगवान् शंकराचा एकनिष्ठ उपासक होता. त्याने प्रथम ज्या कालंजर दुर्गांत आपली राजधानी केली तो दुर्गहि अत्यंत प्राचीन काळापासून पवित्र शिवालयाबद्दल प्रसिद्ध आहे. पुढे कलचुरि वंशाच्या दोन शाखा होऊन एक सरयूपार देशांत (सध्याच्या गोरखपूर जिल्ह्यांत) व दुसरी त्रिपुरी येथे स्थापन झाली. सरयूपारचे कलचुरि शैव होते हें त्यांच्या ताम्रपटाच्या मुद्रेवरील नंदीच्या आकृतीवरून स्पष्ट दिसतें. भारतीय राजांच्या उज्ज्वल परंपरेस अनुसरून त्यांनी आपल्या राज्यांतील कुशनगर येथील भगवान् बुद्धाच्या परिनिर्वाणचैत्यालाहि दान दिलें होतें.[११] असो.

---

९ क्र. ३८–४१.

१० क्र. ४२, श्लो. १८–२८.

११ क्र. ७३.

त्रिपुरीचे कलचुरिहि शैव होते हें मागें सांगितलें आहेच. त्यांनी आपल्या ताम्रपटांच्या मुद्रेकरितां गजलक्ष्मीची आकृति पसंत केली असली, तरी आपल्या शिवोपासनेचा निदर्शक नंदीहि तिजवर घेतला होता. या नंदीच्या आकृतीवरून कांहींना मुद्रेवरची देवी पार्वती असावी असें वाटलें. पण ती लक्ष्मी आहे; कारण तिच्या दोन्ही बाजूस सोंड वर केलेले हत्ती आहेत.

त्रिपुरीच्या कलचुरींच्या राज्यांत शैव संप्रदायाचा मोठा उत्कर्ष झाला. या शाखेचा महाप्रतापी राजा प्रथम युवराजदेव याची कारकीर्द त्याने मत्तमयूर मठाच्या आचार्यांस दिलेल्या राजाश्रयामुळे चिरस्मरणीय झाली आहे. तेव्हा त्या मठाबद्दल जरा विस्तारपूर्वक माहिती देणें अप्रस्तुत होणार नाही.

मत्तमयूर शैवपंथ

मत्तमयूर शाखेचे सर्वांत प्राचीन लेख मध्यभारतांतील पूर्वीच्या ग्वाल्हेर संस्थानांत सांपडले आहेत. त्या संस्थानांत नरवारच्या दक्षिणेस ४५ मैलांवर रणोद (प्राचीन रणिपद्र) नामक खेडेगांव आहे तेथील एका प्रासादसदृश प्राचीन मठांत एका विशाल शिलेवर कोरलेला लेख प्रसिद्ध पुरातत्त्वज्ञ कनिंगह्याम याला आढळला. तो पुढे डॉ. कीलहॉर्नने प्रसिद्ध केला.[१२] या लेखांत या मत्तमयूरवंशाच्या स्थापनेची पुढील हकीकत दिली आहे––

"पूर्वी दारुवनामध्ये यज्ञानुष्ठान करून भक्तीने आपणांकडे आलेल्या ब्रह्मदेवावर भगवान् शंकरांनी अनुग्रह केला. त्याच्यापासून हा लोकोत्तर विशाल शाखांचा मुनिवंश उत्पन्न झाला. या वंशांत कदम्बगुहाधिवासी, नंतर त्याचा शिष्य शंखमठिकाधिपति, त्यानंतर तेरम्बिपाल व त्याचा शिष्य आमर्दकतीर्थनाथ असे आचार्य होऊन गेले. आमर्दकतीर्थनाथाचा शिष्य पुरंदर नामक होता. तो उपेन्द्रपुरांत तपश्चर्या करीत असतांना त्याची कीर्ति अवन्तिवर्मा नामक राजाच्या कानावर गेली. तेव्हा तो राजा स्वतः उपेन्द्रपुरास गेला आणि त्या आचार्याची आराधना करून त्याने त्याला मोठ्या प्रयासाने आपल्या राज्यांत आणलें. तेथे त्याच्याकडून शैवपंथाची दीक्षा घेऊन त्याने त्याला गुरुदक्षिणा म्हणून आपलें सर्व राज्यैश्वर्य अर्पण केलें. त्या मुनीने राजाकडून मत्तमयूरनगरांत एक मेरुसदृश सुसमृद्ध असा मठ बांधविला. दुसरा एक मठ रणिपद्र येथे तपोवनांत बांधवून त्याने त्याला मोठ्या प्रतिष्ठेप्रत पोंचविलें."

त्यानंतर या लेखांत रणिपद्र येथील आचार्यपरंपरा दिली आहे. मत्तमयूर-

---

१२ ए. इं., पु. १, पृ. ३५१ इ.

शाखेचा संस्थापक पुरंदर याच्यापासून चौथ्या पिढींतील आचार्य व्योमशिव याने रणिपद्र येथील मठाचा जीर्णोद्धार केला, देवालयें बांधलीं व एक मोठी विहीरहि खोदविली. या सर्वांचें वर्णन त्या शिलालेखांत केलें आहे.

या शिलालेखांत कालनिर्देश नाही. तथापि मत्तमयूरमठाच्या स्थापनेचा काल अन्य प्रमाणांवरून सामान्यतः ठरवितां येतो. पुरंदरापासून पांचव्या पिढींतील आचार्य प्रभावशिव हा कलचुरिनृपति प्रथम युवराजदेव (इ. स. ९१५ ते ९४५) याचा समकालीन होता हें पुढे दाखविलें आहे. प्रत्येक पिढी पंचवीस वर्षांची मानल्यास पुरंदर इ. स. ८०० च्या सुमारास होऊन गेला असावा असें म्हणतां येईल.

रणोद येथील लेखावरून मत्तमयूरशाखेचा पुरंदर हा मूळचा रणिपद्राशेजारच्या प्रदेशांतील नसून तेथील अवन्तिवर्मा नामक राजाच्या प्रार्थनेवरून तो तेथे गेला होता हें उघड आहे. पुरन्दरापूर्वी चार आचार्यांचीं नांवें न देतां त्या लेखांत त्यांना 'कदम्बगुहाधिवासी', 'शंखमठिकाधिपति', 'तेरम्बिपाल' व 'आमर्दकतीर्थनाथ' असें म्हटलें आहे. त्यावरून ते कदम्बगुहा, शंखमठिका, तेरम्बि व आमर्दकतीर्थ येथे राहत होते हें उघड आहे. कलचुरींच्या एका लेखांतहि 'कदम्बगुहा अनेक सिद्धांचें निवासस्थान म्हणून पूज्य झाली आहे' असें म्हटलें आहे.[१३] पण तिचें निश्चित स्थान ठरविण्यास कांही माहिती मिळत नाही. शंखमठिका, तेरम्बि व आमर्दकतीर्थ यांच्या बाबतींतहि तीच स्थिति आहे. डॉ. कीलर्हॉर्नने कदम्बगुहा म्हणजे रणोदजवळचें कद्वाहा, आणि तेरम्बि म्हणजे तेरही असें अनुमान केलें होतें, पण रणोद येथील लेखावरून हीं गावें अवन्तिवर्म्याच्या राज्यांत नसून दूरदेशीं होतीं असें दिसतें. या गावांविषयीं आपणांस निश्चित माहिती मिळत नसली तरी पुरंदर आचार्य ज्या उपेन्द्रपुरांत तपश्चर्या करीत होता त्याच्या स्थानाविषयीं अनुमान करण्यास साधन आहे. माळव्याचा परमारनृपति नरवर्मा याच्या विक्रम संवत् ११६७ (इ. स. १११०) च्या एका शिलालेखांत उपेन्द्रपुरमण्डलाचा निर्देश आहे.[१४] त्या मण्डलाच्या मन्दारक नामक प्रतिजागरणांतील (परगण्यांतील) कदम्बपद्रक नांवाचें गाव त्या ताम्रपटाने दान दिलें होतें. पुरंदर आचार्य जेथे तपश्चर्या करीत होता तें उपेन्द्रपुर माळव्यांतील उपेन्द्रपुरमण्डलाचें मुख्य नगर असण्याचा संभव आहे. या उपेन्द्रपुराचाहि स्थलनिश्चय अद्यापि झाला नाही. पण त्यांतील मन्दारक व कदम्बपद्रक हीं गांवें उज्जयिनीच्या ईशान्येस १५ मैलांवरचीं मन्देर व कमलीखेडा असावीं. तसें

---

१३ क्र. ४५, श्लो. ४८.

१४ ए. इं., पु. २०, पृ. १०५.

असल्यास मत्तमयूरवंशसंस्थापक पुरंदर व त्याचे गुरु व परमगुरु मूळचे माळव्यांतील होते, व पुरंदर ग्वाल्हेर संस्थानांतील अवन्तिवर्मा राजाच्या निमंत्रणावरून मत्तमयूर नगरास गेला, असें म्हणतां येईल. या तर्काला उपोद्वलक असा उल्लेख नेपाळच्या म्यूझियमचे माजी क्यूरेटर डॉ. एस्. एन्. सेन यांनी कांही वर्षांपूर्वी आपल्या जवळच्या पञ्जिका नामक ग्रंथांतील उतारा मला पाठविला होता त्यांत मला सांपडला. हा ग्रंथ मत्तमयूरवंशाच्या ब्रह्मशम्भु नामक आचार्याने इ. स. ९३६ या वर्षी लिहिला होता. त्यांत आमर्दकाधीशाबद्दल (म्हणजे आमर्दकतीर्थनाथाबद्दल) खालील श्लोक आला आहे--

श्रीमदामर्दकाधीशमायातमवनीतले ।
तच्छिष्याणां बहुत्वेऽपि कृतमालवकस्थितिम् ।।

या श्लोकांत म्हटलें आहे कीं आमर्दकाधीशाचे अनेक शिष्य असतांहि त्याने मालवकामध्ये म्हणजे माळव्यामध्ये वास केला होता. या वर्णनावरूनहि पुरंदरापूर्वीचे आचार्य माळव्यांत राहत होते असें दिसतें. अवन्तिवर्म्याच्या राज्यांत मठ स्थापल्यावर शैव आचार्यांनी तेथील कांही स्थानांना माळव्यांतील पवित्र स्थलांचीं नांवें दिलीं असावीं. ओरिसा प्रदेशांत सांपडलेल्या या पंथाच्या एका लेखांत उत्तरतेरम्बगृहाचा उल्लेख आहे.[१५] त्यावरून उत्तरतेरम्ब व दक्षिणतेरम्ब अशीं दोन स्थलें असून पहिलें ग्वाल्हेर संस्थानांत व दुसरें माळव्यांत होतें असें दिसतें. तसें असल्यास उत्तरतेरम्ब (किंवा तेरम्बि) हें ग्वाल्हेर संस्थानांतील तेरही असेल.

कलचुरि नृपतींचा आश्रय

उपेन्द्रपुराहून ज्या अवन्तिवर्मराजाने पुरंदर आचार्यास आपल्या मत्तमयूर राजधानीस सन्मानपूर्वक बोलाविलें त्याच्याविषयीं जास्त माहिती रणोदच्या शिलालेखांत मिळत नाही. तथापि त्यासारखीं खालील नांवें त्रिपुरीच्या कलचुरि राजांच्या लेखांत नोहला राणीच्या पूर्वजांच्या वर्णनांत आढळतात.[१६]

सिंहवर्मा
।
सधन्व
।
अवनिवर्मा

---

१५ पूर्वोक्त, पु. २४, पृ. २४२.

१६ क्र. ४५, श्लो. ३४–३५.

अवनिवर्म्याची कन्या नोहला ही त्रिपुरीचा कलचुरि नृपति प्रथम युवराजदेव यास दिली होती. या युवराजदेवाने व नोहलेने मत्तमयूरवंशाच्या कांही आचार्यांना आपल्या राज्यांत बोलावून त्यांच्याकरितां शिवालयें व मठ बांधविले व त्यांच्या योगक्षेमाकरितां अनेक गाव दान दिले. नोहला ही स्वत: अवन्तिवर्म्याच्या वंशांतील असल्यास तिने मत्तमयूरवंशाच्या आचार्यांसच कां बोलाविलें याची उपपत्ति लावतां येते. तेव्हा अवन्तिवर्मा व सिंहवर्मादि नोहलेचे पूर्वज हे एकाच राजवंशांतील होते असें अनुमान केल्यास तें बहुधा चूक होणार नाही.

नोहला चौलुक्य कुलांत जन्मली होती. या वंशाचें वर्णन करतांना बिलहरी येथील शिलालेखांत म्हटलें आहे कीं भरद्वाजपुत्र द्रोणाचार्य यांनी द्रुपदराजाला शाप देण्याकरितां चुलुकांत घेतलेल्या पाण्यापासून एक वीर पुरुष उत्पन्न झाला. त्याच्या वंशाला चौलुक्य असें नांव प्राप्त झालें. पुरंदर आचार्यांचा समकालीन नृपति अवन्तिवर्मा याच चौलुक्य कुलांतील असावा. तो सिंहवर्म्याचा पूर्वज दिसतो. कदाचित् तो त्याचा पिता किंवा पितामह असेल. या वंशांतील आणखी कांही राजे भिलसा जिल्ह्यांतील मासेर गांवीं सांपडलेल्या शिलालेखांत उल्लेखिले होते. तो लेख आता भग्न झाला आहे. तथापि त्यांत नरसिंह व केसरी हीं नांवें स्पष्ट दिसतात. या लेखांत या वंशाचें नांव 'शुल्की' असें दिलें आहे व तो वंश ब्रह्मदेवाच्या अंजलींतून पडलेल्या जलबिंदूपासून उत्पन्न झालेल्या भारद्वाज ऋषीपासून निघाला असें म्हटलें आहे. 'शुल्की' हें 'चालुक्य' याचेंच अपभ्रष्ट रूप दिसतें. तेव्हा मासेर येथील लेखांतील नरसिंह, केसरी वगैरे राजे अवन्तिवर्म्याच्याच कुळांतील होते असें मानण्यास हरकत नाही. या कुलाचें राज्य रणोद–भिलसा या प्रदेशावर होतें असें दिसतें.

अवन्तिवर्म्याची राजधानी मत्तमयूर ही कोठें होती हें अद्यापि निश्चित झालें नाही. ग्वाल्हेर संस्थानांत शिवपुरीच्या दक्षिणेस, २५–३० मैलांच्या परिसरांत, सुरवाया, रणोद (प्राचीच रणिपद्र), महुआ (प्राचीन मधुमती), कद्वाहा, तेरही इत्यादि गावांत या पंथाचे इ. स. च्या दहाव्या शतकांतील शिलालेख आणि देवालयें, मठ व तलाव दृष्टीस पडतात. तेव्हा या भागांतच मत्तमयूर नगर असलें पाहिजे यांत संशय नाही. या ठिकाणांत कद्वाहा हें गांव प्राचीन देवालयांबद्दल विशेष प्रसिद्ध आहे. तेथे अद्यापि चौदा–पंधरा देवालयांचे अवशेष दृष्टीस पडतात. या देवालयांचें स्थापत्य व शिल्पकाम अत्युत्कृष्ट आहे. त्यामुळे "कद्वाहा हें ग्वाल्हेर संस्थानांतील खजूराहो किंवा भुवनेश्वर म्हणण्यास हरकत नाही" असें ग्वाल्हेर संस्थानच्या पुरातत्त्वखात्याचे माजी संचालक श्री. मो. ब. गर्दे म्हणतात.[१७] अशीं

१७ ग्वाल्हेर पुरातत्त्वखात्याचा १९३०–३१ सालाचा वार्षिक अहवाल, पृ. १०.

देवालयें व मठ दीर्घकालीन राजाश्रयाशिवाय बांधलीं जाणें शक्य नाही. तेव्हा कद्वाहा हें प्राचीन मत्तमयूर नगर असण्याचा संभव आहे.

मत्तमयूर वंशांतील आचार्यांची परंपरा ग्वाल्हेर, विन्ध्यप्रदेश व मध्यप्रदेश या भागांत सांपडलेल्या कोरीव लेखांवरून खालीलप्रमाणे जुळवितां येते--

- कदम्बगुहाधिवासी
  - शंखमठिकाधिपति
    - तेरम्बिपाल
      - आमर्दकतीर्थनाथ (ऊर्फ रुद्रशिव)
        - पुरन्दर (मत्तमयूरनाथ)
          - कवचशिव
            - सदाशिव
              - हृदयशिव
                - व्योमशिव
                  - पतङ्गशंभु
          - धर्मशम्भु
            - सदाशिव
              - पुरन्दर (माधुमतेय)
                - चूडाशिव
                  - हृदयशिव
                    - अघोरशिव
                  - प्रभावशिव
                    - प्रशान्तशिव
                      - ईशानशम्भु
                      - प्रबोधशिव

याशिवाय बिलहरी शिलालेखांत मत्तमयूरवंशाच्या खालील आचार्यांचा उल्लेख आहे. पण त्यांचें वरील वंशावलींतील निश्चित स्थान माहीत नाही.

पवनशिव (माधुमतेय)
|
शब्दशिव
|
ईश्वरशिव

वर दिलेल्या मोठ्या वंशावळींतील पहिले चार आचार्य माळव्यांत निरनिराळ्या ठिकाणीं राहत होते हें मागें सांगितलें आहेच. पुरंदर याने मत्तमयूर व रणिपद्र (रणोद) येथील मठ स्थापले. कवचशिवापासून पतंगशंभूपर्यंतचे आचार्य रणिपद्र येथील मठाचे अधिपति होते. सदाशिवाचा शिष्य (दुसरा) पुरन्दर यास 'माधुमतेय' म्हटलें आहे तेव्हा तो मधुमती (महुआ) येथील मठाचा आचार्य होता असें दिसतें. चूडाशिवाच्या शिष्यांस त्रिपुरीच्या कलचुरि राजांनी आपल्या राज्यांत बोलावून त्यांच्याकरितां शिवालयें व मठ बांधविले व त्यांच्या योगक्षेमाकरितां अनेक गाव दान दिले. कलचुरि नृपति प्रथम युवराजदेव याने प्रभावशिव आचार्यास, त्याची राणी नोहला हिने ईश्वरशिवास, व त्यांचा पुत्र द्वितीय लक्ष्मणराज याने हृदयशिवास चेदिदेशांत बोलावून त्यांचा यथोचित सन्मान केला व त्यांस तपश्चर्येकरितां मठ बांधून दिले; त्यांचें वर्णन कलचुरींच्या शिलालेखांत आलें आहे.

गुर्गी येथील उत्तुंग शिवालय

या मत्तमयूरवंशीय आचार्यांचे कांही लेख चेदि देशांत सांपडले आहेत. विंध्यप्रदेशांतील गुर्गी [१८] व चन्द्रेहे [१९] येथील लेखांत प्रभावशिव, प्रशान्तशिव, ईशानशम्भु व प्रबोधशिव या आचार्यांचें सच्चारित्र्य, तपश्चर्या, विद्वत्ता इत्यादिकांचें वर्णन असून त्यांनी बांधलेलीं देवालयें, त्यांतील मूर्ति व देवालयांना जोडलेले मठ यांचेंहि सविस्तर वर्णन आलें आहे. गुर्गी येथे प्रशान्तशिव आचार्याने श्रीशंकराचें उत्तुंग देवालय बांधलें होतें. त्याचे अवशेष एका विशाल टेकडीच्या रूपाने तेथे दिसतात. त्या देवालयांत बसविलेली हरगौरीची सुंदर जोडमूर्ति अद्यापि तेथे टेकडीवर पडली आहे. तिची रुंदी ४ फूट ७ इंच व उंची १२ फूट ८ इंच आहे. ज्या देवालयांत ही मूर्ति बसविली होती तें जवळजवळ १०० फूट उंचीचें असावें असा कनिंग्ह्यामचा तर्क होता. हें देऊळ सुस्थितींत होतें तेव्हा त्याच्या शिखराचा अग्रभाग सभोंवारच्या भूमीपासून निदान १५० फूट उंच असावा असें कै. राखालदास बॅनर्जी यांनी म्हटलें आहे. याच्या समोरचें तोरण आतां रेवाच्या महाराजांच्या राजवाड्यासमोर उभारलें आहे. त्यावर शिवचरितांतील कांही प्रसंग सुंदर रीतीने

१८ क्र. ४६.

१९ क्र. ४४.

कोरले आहेत. या देवळाजवळ कलचुरि नृपति प्रथम युवराजदेव याने बांधलेलें शिवालय होतें असा गुर्गी येथील शिलालेखांत उल्लेख आहे. तें याहिपेक्षा उंच असावें. कलचुरि राजांनी मत्तमयूरपंथाच्या आचार्यांच्या तपश्चर्येकरिता प्रशांत स्थलीं मठ बांधून दिले होते. अशा मठाचे अवशेष पूर्वीच्या रेवा संस्थानांत शोण नदीच्या कांठीं चन्द्रेहे येथे अद्यापि दृष्टीस पडतात. तेथील शिलालेखांत त्या मठाचें खालील वर्णन आलें आहे--

जडतरमरुच्छोणस्याम्भःकणैरयमाश्रमो
मृगपतिमहाध्वानै रात्रौ प्रतिध्वनिताम्बरः ।
शिखरिशिखरप्रान्तप्रेङखद्‌द्विरेफपयोधरो
जनयति जने विद्युच्छंकां महौषधिरोचिषा ।।

(या आश्रमांत शोणनदीच्या तुषारांनीं शीतल असा वारा वाहत असतो. येथे रात्रीं सिंहाच्या घोर गर्जनांनी आकाश दुमदुमून जातें. सभोंवारच्या टेंकडयांवर भ्रमरांसारखे काळेभोर ढग इतस्ततः भ्रमण करीत असतां येथील औषधींच्या लखलखाटामुळे लोकांना विजा चमकत आहेत की काय अशी भ्रांति होते.)

मत्तमयूरवंशाचा प्रसार

मत्तमयूरवंशाचे उल्लेख मध्यभारत, विंध्यप्रदेश व मध्यप्रदेश यांखेरीज इतर प्रदेशांतील कोरीव लेखांतहि क्वचित् आढळतात. कोंकणांत रत्नागिरि जिल्ह्यांतील खारेपाटण या गांवीं सांपडलेल्या ताम्रपटांत शिलाहारवंशी रट्टराजाने मत्तमयूरवंशाच्या कर्करोणी शाखेंतील आचार्य अम्भोजशिव याच्या आत्रेय नामक शिष्यास अव्वेश्वर देवाच्या पूजेकरितां कांही गावें दान दिल्याचा निर्देश आहे.[२०] तसेंच ओरिसांतील पूर्वीच्या पटणा संस्थानांत राणीपूर झरियाल या गांवीं उत्तरतेरम्बगृहाच्या गगनशिव नामक आचार्याने देवालय बांधल्याचा उल्लेख तेथे सांपडलेल्या शिलालेखांत आला आहे. यांसारख्या उल्लेखांवरून मत्तमयूरवंशाचे आचार्य मध्यभारतांतील आपल्या मूळ पीठापासून शेंकडों कोस दूर जाऊन मठ व देवालयें बांधीत व आपल्या धार्मिक मतांचा प्रचार करीत असें दिसतें.

चौसष्ठ योगीनींचें देवालय

कलचुरि राजांच्या त्रिपुरी राजधानीजवळ नर्मदा नदीच्या कांठी जलप्रपातामुळे रम्य झालेल्या जागीं एका लहानशा टेंकडीवर चौसष्ट योगिनींचें वर्तुलाकार छप्पररहित (hypaethral) देवालय आहे. या देवालयांतील योगिनींपैकीं पांच

२० ए. इं., पु. ३, पृ. २९५.

मूर्ति कुशाणकालीन म्हणजे इ. स. च्या दुसऱ्या–तिसऱ्या शतकांतील आहेत. पण बाकीच्या सर्व त्यांच्या पादपीठांवरील नांवांच्या अक्षरवटिकेवरून कलचुरि नृपति प्रथम युवराजदेव याच्या काळच्या, इ. स. च्या दहाव्या शतकांतील, दिसतात. त्यांवरून त्या युवराजदेवाच्या काळीं या देवालयाची स्थापना झाली असावी असें दिसतें. या टेकडीचा आकार गोल असल्याने त्याच्या जवळच्या शैवाचार्यांच्या मठाला गोलकी मठ असें नांव प्राप्त झालें.[२१] इ. स. च्या दहाव्या शतकानंतर मध्यभारतांतील चौलुक्य वंशाचा लोप झाल्यावर मत्तमयूर वंशाला उतरती कळा लागली. त्यानंतर त्या मठाचे उल्लेख कोरीव लेखांत येत नाहीत. पण त्या वंशाच्या आचार्यांनी त्रिपुरीजवळ स्थापलेला गोलकीमठ मात्र उत्तरोत्तर वृद्धिंगत होत गेला. आन्ध्र देशांतील गुंटूर जिल्ह्यांत मलकापुरम् येथे गोलकीमठाच्या विश्वेश्वरशम्भु नामक आचार्याचा शके ११८३ चा लेख सांपडला आहे.[२२] त्यांत गोलकीमठाविषयीं खालील माहिती आली आहे––

अस्ति विश्वम्भरासारः कमलाकुलमन्दिरम् ।
भागीरथीनर्मदयोर्मध्ये डहलमंडलम् ।।

उग्रं तत्र तपश्चरन्नियमयन् बाह्येन्द्रियक्रीडनं
सान्द्रानन्दमये समाधिसमये चित्तेन लीनः शिवे ।

नीत्वा कालमनन्तमन्तकजयी सद्भावशम्भुर्गुरु–
र्दुर्वासोऽन्वयसम्भवः सुचरितः प्राबुद्ध पुण्यैर्नृणाम् ।।

शैवानाम्प्रथमाय शङ्करपदध्यानामृताम्भोनिधि–
क्रीडाम्रेडनकर्मनिर्मलतरस्वान्ताय शान्तात्मने ।

तस्मै निःस्पृहचेतसे कलचुरिक्ष्मापालचूडामणि–
र्ग्रामाणां युवराजदेवनृपतिर्भिक्षां त्रिलक्षीं ददौ ।।

कृत्वा स शैवमुनिरद्भुतशीलमूर्तिः
श्रीगोलकीमठमुदारमुदात्तचित्तः ।

तस्याकरस्य नृपदेशिकमौक्तिकानां
वृत्तिं चकार सकलामपि तां त्रिलक्षीम् ।।

---

२१ अलीकडे तेवरजवळ उत्खननांत डॉ. मो. गं. दीक्षित यांना ११० फूट व्यासाच्या वर्तुलाकार देवालयाचे अवशेष आढळले आहेत. जवळच त्रिमूर्ति शिवाची ५ फूट उंच व ३ फूट रुंद प्रतिमा आहे. हाच गोलकी मठ असावा असा डॉ. दीक्षित यांचा तर्क आहे.

२२ आन्ध्र हिस्टॉरिकल सोसायटीचें जर्नल्, पु. ४, पृ. १४७.

वरील उताऱ्यांत म्हटलें आहे की भागीरथी व नर्मदा या नद्यांमध्ये डहल (किंवा डाहल) मण्डल आहे; त्यामध्ये दुर्वास ऋषींच्या वंशांत सद्भावशम्भु नामक मुनि होऊन गेला. त्याला कलचुरि नृपति युवराजदेव याने तीन लक्ष ग्रामांची भिक्षा घातली. त्या निःस्पृह आचार्याने गोलकीमठाची स्थापना करून त्याच्या योगक्षेमाकरितां ते सर्व तीन लक्ष गाव लावून दिले.

चेदि देशाला डाहलमंडल म्हणत असत हें मागें सांगितलें आहे. त्यांतील ग्रामांची संख्या नऊ लाख धरली जात असे. वरील वर्णन खरें असल्यास युवराजदेवाने आपल्या राज्याचा एक तृतीयांश भाग गोलकीमठाला दान दिला असें मानलें पाहिजे.

या गोलकीमठाचे आचार्य कलचुरि राजांचे राजगुरु असत. त्यांचे उल्लेख त्यांच्या स्वतःच्या कोरीव लेखांत तसेच कलचुरि राजांच्या ताम्रपटांतहि येतात. त्यावरून खालील वंशावळ तयार करतां येते––

शैव आचार्य	**समकालीन कलचुरि नृपति**
विमलशिव	
|	
वास्तुशिव	
|	
पुरुषशिव	यशःकर्ण
|	|
शक्तिशिव	गयाकर्ण
|	|
कीर्तिशिव	नरसिंह
|	|
विमलशिव	जयसिंह

पहिल्या दोन आचार्यांच्या समकालीन कलचुरि राजांचीं नांवें शिलालेख अस्पष्ट झाल्यामुळे आता नष्ट झालीं आहेत. गोलकी मठाची कीर्ति दूरवर पसरली होती. त्यामुळे दूरदूरच्या देशांतून लोक दीक्षा घेण्याकरितां तेथे येत. विमलशिव हा केरल देशाहून, तर त्याचा प्रशिष्य विश्वेश्वरशम्भु हा गौड देशांतील दक्षिणराढ-मधून त्रिपुरीला आला होता. कलचुरि राजे या राजगुरूंचा सल्ला महत्त्वाच्या राजकारणांत घेत असत. विमलशिव आपल्या सल्लामसलतीने दूरदूरच्या लोकांनाहि वश करून जवळ आणीत असे, असें वर्णन जबलपूरच्या शिलालेखांत केलें आहे. जयसिंह नृपति त्याला अनुरूप अशा अनेक राजकार्यांत नियुक्त करीत असे, तरी

त्याने आपलीं नित्यनैमित्तिक धार्मिक कृत्यें करण्यांत कधीहि आळस केला नाही, असें त्याच लेखांत म्हटलें आहे.

जयसिंहाचा पुत्र विजयसिंह याच्या कारकीर्दीत इ. स. १२१० च्या सुमारास चंदेल्ल नृपति त्रैलोक्यमल्ल याने कलचुरींचा पाडाव करून त्यांचें राज्य हस्तगत केलें. त्यानंतर गोलकी मठाला उतरती कळा लागली. त्या मठाचे आचार्य दक्षिणेंत आन्ध्र व मद्रास प्रदेशांत जाऊन तेथे मठ स्थापूं लागले. गोलकी मठाच्या स्थापनेला कारणीभूत झालेल्या युवराजदेवाच्या उदार देणगीचें स्मरण ठेवण्याकरिता हे आचार्य आपणांस 'लक्षाध्यायी सन्तान' किंवा 'भिक्षामठाचे आचार्य' असें म्हणवीत असत. दक्षिणेंत कुडाप्पा, कर्नूल, गुंटूर, दक्षिण अर्काट इत्यादि जिल्ह्यांत गोलकी-मठाच्या शाखा होत्या. त्यांचे उल्लेख दक्षिणेंतील अनेक कोरीव लेखांत येतात.

या शैव मठांचा उपयोग लोकांच्या कल्याणाकरितां केला जात असे. मठांना जोडून व्याख्यानशाला असत. त्यांमध्ये आचार्यांचीं धार्मिक प्रवचनें होत. तशींच मठाचीं अन्नसत्रें असत. त्यांमध्ये गोरगरीबांना अन्नसन्तर्पण होई.

विश्वेश्वरगोलकि

या मठाची कार्यव्यवस्था कशी असे, राजे व धनिक लोक यांच्याकडून मिळालेल्या धनाचा कसा विनियोग होई, मठाकडून लोककल्याणाच्या कोणत्या संस्था चालविल्या जात याविषयी माहिती कलचुरि लेखांत येत नाही, पण कलचुरींच्या राज्यांतील गोलकी मठाच्या धर्तीवर मलकापुरम् येथे स्थापलेल्या 'विश्वेश्वरगोलकि' नामक अग्रहाराच्या व्यवस्थेविषयी जी माहिती मलकापुरम्च्या लेखांत आली आहे तिजवरून चेदिदेशांतील मठांत त्यासारखीच व्यवस्था प्रचलित असे, असें अनुमान करण्यास हरकत नाही.

मलकापुरम्च्या स्तंभलेखांत विश्वेश्वरशंभूच्या पूर्वीच्या चार पिढ्या खालीलप्रमाणे दिल्या आहेत——

शक्तिशम्भु
|
कीर्तिशम्भु
|
विमलशिव
|
धर्मशम्भु
|
विश्वेश्वरशम्भु

यांपैकी पहिल्या तीन आचार्यांचीं नांवें कलचुरि लेखांत येतात हें मागें सांगितलें आहेच. विश्वेश्वरशम्भु हा कलचुरि लेखांत उल्लेखिलेल्या विमलशिवाच्या धर्मशम्भु नामक शिष्याचा शिष्य होता. तत्कालीन चोल, परमार, कलचुरि व काकतीय राजे याचे शिष्य होते. याने वरंगळचा काकतीय राजा गणपति व त्याची कन्या रुद्राम्बा यांनी दिलेल्या दोन गावांचा आपल्या नावाने 'विश्वेश्वरगोलकि' नामक अग्रहार केला. त्याने त्यांत देवालय, मठ, पाठशाला, अन्नसत्र, प्रसूतिशाला व आरोग्यशाला (दवाखाना) बांधल्या.

अग्रहारांतील व्यवस्था

विश्वेश्वरशंभूने साठ द्राविडी ब्राह्मणांच्या कुटुंबांना बोलावून त्यांच्या योगक्षेमाकरिता जमिनी लावून दिल्या. त्या अग्रहार गांवांतील राहिलेल्या जमिनीचे तीन भाग करून त्यांतील एका भागाचें उत्पन्न शिवालयाच्या व्यवस्थे-करिता, दुसऱ्याचें पाठशाला व शैवमठ यांच्याकरितां व तिसऱ्याचें प्रसूतिशाला, आरोग्यशाला व अन्नसत्र यांच्याकरिता खर्च करावयाचें असे. पाठशालेंत तीन अध्यापक ऋग्वेद व सामवेद यांच्या अध्यापनाकरितां, व पांच तर्क, साहित्य व शैवागम यांचें शिक्षण देण्याकरितां नेमले जात. शिवालयाच्या सेवेकरितां नर्तिका, गायिका व वादक असत. अन्नसत्राकरितां दोन ब्राह्मण आचारी, सहा वाढपी व चार परिचारक नेमले होते. अग्रहाराच्या संरक्षणाकरितां वीरभद्र व वीरमुष्टि नामक रक्षक (पोलिस) होते. याशिवाय अग्रहारांतील व्यावहारिक जीवनाला आवश्यक असे सोनार, सुतार, लोहार, तांबट बुरूड, कुंभार, न्हावी वगैरेंची वस्ती केली होती. विश्वेश्वरशम्भूने दक्षिणराढांतील आपल्या पूर्वग्रामांतून कांही ब्राह्मणांस आणून त्यांच्याकडे अग्रहाराच्या जमाखर्चावर देखरेख करण्याचें व हिशेब ठेवण्याचें काम सोंपविलें होतें. मठाच्या या सर्व सेवकांना त्यांच्या उपजीविकेकरितां जमिनी दिल्या होत्या.

याशिवाय शैव, कालानन (कालमुख) व पाशुपत पंथांच्या आचार्यांच्या अन्नवस्त्रांकरितां पाठशालेंत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांकरितां व अन्नसत्राच्या खर्चा-करितां जमिनी राखून ठेवल्या होत्या. अग्रहारगावांत बाहेरून येणाऱ्या चांडालादि सर्वांस भोजन मिळे.

देवालय, मठ व अन्नसत्र वगैरेंची व्यवस्था तेथील आचार्यांच्या देखरेखीखालीं चाले. अग्रहारांतील सर्व शैवपंथीयांनी आचार्याची निवड करावयाची असे. तो सद्वर्तनी, विद्वान् व शैव मतांत प्रवीण असला पाहिजे अशी अट असे. त्याच्या कामाबद्दल त्याला शंभर निष्कांची वृत्ति होती. पूर्वी नेमलेला आचार्य दुर्वर्तनी

निघाला किंवा आपल्या कर्तव्याचरणाची उपेक्षा करूं लागला तर त्याला काढून दुसऱ्यास नेमण्याचा अधिकार अग्रहारांतील सर्व शैवपंथीयांच्या सभेला दिला होता.

सिद्धान्तमत

मागें सांगितल्याप्रमाणें मत्तमयूर व गोलकी मठाचे आचार्य हे शैव संप्रदायाचे अनुयायी होते. त्यांच्या पंथाला 'सिद्धान्तमत' असें नांव होतें, म्हणून या पंथाच्या आचार्यांना 'सैद्धान्तिक' म्हणत. मधुमती नामक त्यांच्या सुप्रसिद्ध पीठाचें वर्णन 'सैद्धान्तिकाचें धाम' असें कलचुरि लेखांत केलें आहे. प्रत्यक्ष भगवान् शंकराने हे सिद्धान्त ब्रह्मदेवाला शिकविले असे या पंथाचे अनुयायी मानतात. या दर्शनाप्रमाणें[२३] पति (ईश्वर), पशु (जीव) व पाश (बन्धन) अशीं तीन मुख्य तत्त्वें (पदार्थ) आहेत. या मताचे खालील चार पाद आहेत—पहिला पाद विद्या किंवा सम्यग् ज्ञान. भगवान् शंकर हा सर्वज्ञ व सर्वशक्ति असून जगताची उत्पत्ति, स्थिति व विनाश करण्यात स्वतंत्र आहे. तो जीवांच्या कर्मानुसार त्यांना फल देतो, जीव हे सूक्ष्म व अनन्त आहेत. ते नित्य असून त्यांच्या ठिकाणीं दृक् व क्रिया रूपांचें चैतन्य आहे. ते सृष्टीच्या आरंभापासून विनाशापर्यंत किंवा मोक्षप्राप्तिपर्यंत पुर्यष्टक नामक देहाने युक्त असतात. मुक्त झाल्यावर जीव शिवासारखे होतात, पण त्यांच्या ठिकाणीं परमेश्वराचें स्वातंत्र्य असत नाही. पशु, पाश व पशुपति यांच्या सम्यग्ज्ञानाला विद्यापाद म्हणतात. दुसरा पाद क्रिया. यांत सांग दीक्षेचा अंतर्भाव होतो. तिसरा पाद योग. यामध्यें जप, ध्यान इत्यादि येतात. याच्या योगें जीव दीक्षाग्रहणास पात्र होतो. चौथा पाद चर्या. यामध्यें शास्त्रविहित कर्मांचें आचरण व निषिद्ध कर्मांचें वर्जन येतें. चर्या व योग यांचें विद्येसारखेंच महत्त्व मानलें जातें. मत्तमयूरपंथाचे आचार्य 'सच्चर्यायुक्त' असत असें कोरीव लेखांत म्हटलें आहे. तसेंच त्यांच्या योगानुष्ठानाचें वर्णनहि कांही ठिकाणीं येतें. त्यांच्या योगानुष्ठानाकरिता काशीसारख्या पुण्य क्षेत्रीं तसेंच चन्द्रेहे सारख्या प्रशांत स्थलीं कलचुरि राजांनी त्यांस मठ बांधून दिले होते. चर्या, क्रिया, योग व विद्या यांच्या योगाने सिद्धि किंवा मोक्ष प्राप्त होतो. अशा मुक्त जीवांना सिद्ध म्हणत. मत्तमयूरपंथाचे मूळ ठिकाण कदम्बगुहा येथे सिद्धांची परम्परा होऊन गेली असें कलचुरींच्या लेखांत म्हटलें आहे (सा कदम्बगुहा मान्या यत्रासीत्सिद्धसन्ततिः ।).

शैवाचार्यांचें चारित्र्य व विद्वत्ता

मत्तमयूर व गोलकी मठाचे आचार्य सामान्यतः सच्चारित्र्यवान्, विद्वान्, निःस्पृह व संयमी असत. ते आपल्या व इतर पंथीयांच्या तत्त्वज्ञानाचा अभ्यास करीत. गुर्गी येथील शिलालेखांत म्हटलें आहे कीं शैव आचार्य प्रशान्तशिव हा

---

२३ सर्वदर्शनसंग्रह (भांडारकर इन्स्टिटयूट आवृत्ति), पृ. १७४ इ.

पाञ्चार्थिक किंवा पाशुपत पंथाच्या आचार्यांच्या संगतींत आपला काल घालवीत असे. रत्नपुरच्या प्रथम जाजल्लदेवाचा गुरु रुद्रशिव हा आपल्या तसेंच इतर आगमांच्या सिद्धान्तांच्या ज्ञानांत निपुण होता; तसेंच त्याने दिङ्नागादि बौद्ध तत्त्वज्ञांचेहि ग्रंथ अभ्यासिले होते.[१३] मत्तमयूरमठाच्या कांही आचार्यांनी उत्कृष्ट ग्रंथरचनाहि केली आहे. रणिपद्र येथील मत्तमयूरपंथाच्या व्योमाशिवाचार्याने 'व्योमवती' नामक टीका वैशेषिकसूत्रावरील प्रशस्तपादभाष्यावर लिहिली आहे. त्या भाष्यावरील सर्व उपलब्ध टीकांत ही प्राचीन आहे. हिचा काळ पूर्वीं अनिश्चित होता. पण ग्वाल्हेर म्यूझिममधील लेखांतील[१४] व्योमशिवाचार्याविषयीच्या खालील श्लोकाने आता या बाबतींत संदेह राहत नाही—

मुनिसूर्येण निरस्तं टीकालोकेन येन लोकस्य ।
प्रकटयतेह पदार्थं सन्तमसच्च सन्तमसम् ।।

"ज्याप्रमाणें सूर्य पदार्थांना प्रकट करून जगांतील दाट अन्धकार नाहीसा करतो त्याप्रमाणे या व्योमशिवाचार्याने आपल्या टीकेच्या योगें सत्य पदार्थाचें स्वरूप स्पष्ट केलें आहे व असत्य अज्ञान नष्ट केलें आहे."

गोलकीमठाच्या सोमशम्भु आचार्याने शैव पंथाच्या सर्व तत्त्वांचें विवरण करणारा "सोमशम्भुपद्धति' नामक ग्रंथ लिहिला होता असें मलकापुरम्च्या स्तंभ-लेखांत म्हटलें आहे. 'सर्वदर्शनसंग्रहां'त शैव दर्शनाची माहिती देत असतांना सोमशंभूचे कांही श्लोक उद्धृत केले आहेत ते याच पद्धतींतून घेतले असावे. याशिवाय ब्रम्हशम्भूची 'पञ्जिका' यासारखे कित्येक ग्रंथ अद्यापि अज्ञात किंवा अप्रकाशित आहेत.

पाशुपत पंथ

शैव पंथाच्या आचार्यांप्रमाणे पाशुपत पंथाचेहि अनेक आचार्य कलचुरींच्या राज्यांत राहत होते. कलचुरि राजमाता अल्हणदेवी ही मेवाडचा गोभिल-(गुहिल) वंशी राजा विजयसिंह याची कन्या होती. तिच्या पित्याच्या प्रदेशांत पाशुपत पंथाचा प्रसार होता. नोहला राणीने जसें आपल्या माहेरच्या शैवपंथी आचार्यांस आपल्या राज्यांत बोलावून मठ बांधून दिले व गाव दान दिले, त्याप्रमाणे या अल्हणदेवीनेहि लाट (गुजरात) प्रदेशांतील रुद्रराशि नामक पाशुपत आचार्यास बोलावून त्यास भेडाघाट येथे वैद्यनाथ नामक शिवाचें मंदिर व त्याजवळच

१३ क्र. ७७, श्लो. २८.

१४ हा लेख अद्यापि अप्रकाशित आहे.

व्याख्यानशाला उद्यान इत्यादींनी युक्त असा मठहि बांधून दिला.[१५] याशिवाय लाट देशांतून आलेल्या भावब्रह्मा नामक आणखी एका आचार्याचा उल्लेख कोरीव लेखांत आला आहे.[१६] त्याने स्वत: त्रिपुरी येथे एक शिवमंदिर भिक्षोपार्जित धनाने बांधलें होतें. याचें आचरण पाशुपंथाच्या नियमानुसार असे. तो भिक्षेने प्राप्त झालेल्या थोडयाशा अन्नावर राहत असे, केवळ कौपीन धारण करी, शुद्ध भस्मावर झोंपत असे आणि ब्रह्मचर्याचें पालन करी. त्याने पातञ्जलयोगशास्त्राप्रमाणे योगाभ्यास करून भगवान् शंकराचा साक्षात्कार प्राप्त करून घेतला होता; तो मैत्री, करुणा, मुदिता आणि उपेक्षा या चारी भावनांचा अभ्यास करी, इत्यादि वर्णन एका कोरीव लेखांत आलें आहे.

पाशुपत पंथाच्या आचार्यांना कोरीव लेखांत 'पांचार्थिक' असें म्हटलें आहे. कारण या दर्शनांत कार्य, कारण, योग, विधि आणि दु:खान्त असें पांच पदार्थ मानले आहेत. या पांच पदार्थांच्या ज्ञानाने जीवाला मुक्ति प्राप्त होते असें या दर्शनांत मानलें आहे. मुक्ति म्हणजे केवळ दु:खनाश करून परमेश्वरत्वाची प्राप्तिहि असते. मुक्त झालेले जीव भगवान् शंकराशी सायुज्य पावतात असें पाशुपत दर्शनांत सांगितलें आहे.[१७]

कलचुरि नृपति शिवोपासक होते हें मागें सांगितलें आहेच. त्यांपैकी कांहींनी सौराष्ट्रांतील सोमनाथाची यात्रा केल्याचे उल्लेख कोरीव लेखांत सांपडतात. द्वितीय लक्ष्मणराज आपल्या सर्व लवाजम्यासह त्रिपुरीहून सोमनाथपट्टनला गेला आणि त्याने ओड्र देशाच्या राजाला जिंकून आणलेली रत्नखचित सुवर्णमय कालियनागाची मूर्ति तेथे सोमनाथाला भक्तिभावाने अर्पण केली. नंतर त्याने त्या देवाच्या स्तुतिपर असें स्तोत्र रचलें आणि भगवान् शिवाच्या स्वरूपावर आपलें चित्त स्थिर केलें, असें बिलहरी लेखांत म्हटलें आहे. द्वितीय युवराजदेवानेहि अशीच सोमनाथाची यात्रा करून शिवस्तुतिपर स्तोत्र रचल्याचें वर्णन एका कोरीव लेखांत आलें आहे.

कलचुरींच्या राज्यांतील देवालयें व मठ

कलचुरींच्या राज्यांत अनेक देवालयें व मठ बांधले गेले. प्रथम युवराजदेव व त्याचा पुत्र द्वितीय लक्ष्मणराजदेव यांच्या कारकीर्दींतल्या देवळांचा व मठांचा उल्लेख मागे आला आहे. गांगेयदेव व कर्ण यांनी मेरुपद्धतीचीं देवालयें बांधल्याचे

१५ क्र. ६०, श्लो. ३१.

१६ क्र. ५८, श्लो. ७–११.

१७ सर्वदर्शनसंग्रह (भांडारकर इन्स्टिटयूट आवृत्ति), पृ. १६१ इ.

उल्लेख कोरीव लेखांत येतात. कर्णाच्या मेरूचे अवशेष काशीस राजघाटाजवळ अद्यापि विद्यमान आहेत. कर्णाने अमरकंटक येथे नर्मदानदीच्या उगमाजवळ बांधलेलें तीन गर्भगृहांचें जोड देवालय अद्यापि सुस्थितींत आहे. सोहागपुर येथें विराटेश्वराचें व वैजनाथ येथे वैद्यनाथाचें अशीं देवालयेंहि कलचुरिकालांतलींच आहेत. यांतील बहुतेक देवालयांचें गर्भगृह वर्तुलाकार आहे. या तऱ्हेचीं देवळें कलचुरि नृपतींनी मत्तमयूर मठाच्या आचार्यांकरिता प्रथम बांधलीं. इतरत्र या प्रकारचीं देवालयें आढळत नाहीत. [१८]

कलचुरि नृपतींप्रमाणे त्यांचे अमात्य, सेनापति व सामान्य प्रजाजन यांनीहि अनेक देवालयें या कालांत बांधलीं होतीं. प्रथम युवराजदेवाचा अमात्य सोमेश्वर याने सोमस्वामी नामक विष्णूचें देवालय कारीतलाई येथें बांधलें होतें हें मागें सांगितलें आहेच. कर्णाच्या एका कायस्थ मंत्र्याने गुर्गी येथे एक अत्यंत भव्य असें शिवमंदिर बांधलें होतें असा त्याच्या शिलालेखांत उल्लेख आहे. कर्णाचा सेनापति वप्पुल्लक यानेहि एक पंचायतन पद्धतीचें देवालय बांधलें होतें. या प्रकारच्या देवालयांत मध्यभागीं मुख्य देवतेचें देवालय असतें व सभोंवारच्या चार लहान देवकुलींत चार इतर गौण देवांची प्रतिष्ठापना केली असते. याशिवाय, गणपति, कार्त्तिकेय, सूर्य, रेवन्त [१९] यांच्या मूर्ति त्रिपुरी, भेडाघाट, मसौन वगैरे ठिकाणीं सांपडल्या आहेत. पण त्यांच्या स्वतंत्र देवळांचा उल्लेख कोरीव लेखांत अद्यापि आढळला नाही.

बौद्ध व जैनधर्म

कलचुरि राज्यांत बौद्ध व जैनधर्महि थोडया फार प्रमाणांत प्रचलित होते. बनारस जवळ सारनाथ येथे भगवान् बुद्धाने प्रथम धर्मोपदेश केला, त्या स्थलीं महाबोधिमहाविहार बांधला होता. त्या ठिकाणी महायान पंथाच्या मामका नामक उपासिकेने 'अष्टसाहस्रिकाप्रज्ञापारमिता' ग्रंथाची प्रति तयार करवून ती तेथील भिक्षूंना अर्पण केली होती.[२०] भेडाघाटजवळ गोपाळपुर या गांवी चार बोधिसत्त्व अवलोकितेश्वराच्या व पांचवी तारा देवतेची अशा पांच शिलामूर्ति सांपडल्या आहेत. त्यांतील एका मूर्तीवर तत्कालीन लेख आहे. त्यावरून ती मूर्ति महायान-पंथी धेनुवा नामक स्त्रीने तयार करविली होती असें समजतें. तेवर (प्राचीन त्रिपुरी) येथे वज्रासनस्थ बोधिसत्त्वाची मूर्ति सांपडली आहे. या कालांत बुद्धाचा

---

१८ राखालदास बॅनर्जीकृत हैहयाज् ऑफ त्रिपुरी अँड देअर मॉन्युमेंट्स्, पृ. ४५.

१९ हा सूर्याचा पुत्र होय. याची मूर्ति अश्वारूढ असते.

२० क्र. ५२, ओ. १२.

विष्णूच्या दशावतारांत अंतर्भाव होऊं लागल्यामुळे त्याची मूर्ति विष्णूच्या प्रभावळींत कोरलेली आढळते.

जैन धर्माचाहि प्रसार कलचुरींच्या राज्यांत होता याचीं निदर्शक अशीं अनेक चिन्हें दृष्टीस पडतात. बहुरीबंध येथे अद्यापि जैन तीर्थंकर शान्तिनाथाची भव्य मूर्ति उभी आहे. तिच्या पादपीठावरील लेखावरून ती गयाकर्ण नृपतीच्या काळीं बसविली होती असें कळतें.[२१] याशिवाय जबलपुर जिल्ह्यांत इतरत्रहि जैन तीर्थंकरांच्या मूर्ति सांपडल्या आहेत. सोहागपुर येथे जैन शासनदेवतांच्या मूर्ति सांपडल्या होत्या त्या तेथील ठाकुराच्या वाड्याजवळ ठेवल्या आहेत.

कलचुरि नृपतींनी व त्यांच्या मंत्र्यांनी ब्राह्मणांचे कांही अग्रहार स्थापन केले होते. त्यांपैकी एक सोमस्वामिपुर नामक अग्रहार सोमेश्वर मंत्र्याने कारीतलाईजवळ स्थापन केला होता. तृतीय शंकरगणाने दुसरा एक अग्रहार वडगांव येथे आपल्या शंकरनारायण देवळाला जोडून केला असावा. सुप्रसिद्ध सम्राट् कर्ण याचा एक अग्रहार त्रिपुरीजवळ करणबेल गांवीं होता असा तर्क आहे. त्याने कर्णावती नामक दुसरा अग्रहार गंगानदीच्या कांठीं स्थापला होता असें कोरीव लेखांतील वर्णनावरून दिसतें. याशिवाय संक्रांति, चन्द्रग्रहण, कार्तिकपौर्णिमा, मार्गशीर्षसप्तमी यासारख्या पुण्यतिथि, युगादि, वगैरे पवित्र प्रसंगीं ब्राह्मणांना ग्रामदानें दिल्याचे उल्लेख कोरीव लेखांत आढळतात.

दक्षिण कोसल

दक्षिण कोसलांतील धार्मिक परिस्थिति बहुतांशीं वरच्या सारखीच होती. तुम्माण येथें वङ्केश्वराचें पुरातन देवालय होतें. त्याच्या प्रसादाने आपणांस राज्यश्री मिळाली अशी दक्षिण कोसलांतील कलचुरींची श्रद्धा होती. वङ्केश्वर हें शंकराचें प्राकृत नांव असावें. प्रथम पृथ्वीदेवाने याच्या देवळाला सभामंडप जोडला होता. प्रथम रत्नदेवाने रत्नपुर नामक नगर स्थापून तेथे राजधानी केल्यावर कलचुरींनी व इतरांनी तेथे अनेक देवळें बांधलीं. प्रथम जाजल्लदेवाने आपल्या नांवें जाजल्लपुर (सध्याचें जांजगीर) नामक नगर स्थापून तेथे एक शिवालय व मठ बांधला. याशिवाय त्याने पाली येथील जुन्या शिवालयाच्या भिंती, स्तंभ वगैरे बांधून जीर्णोद्धार केला असें तेथील कोरीव लेखांवरून दिसतें. याशिवाय इतर कलचुरि नृपति, त्यांचे मांडलिक, मंत्री, तसेंच सामान्य जन यांनीहि मल्लाल, सोण्ठिवपुर, वरेलापुर, नारायणपुर, कुमराकोट, पथरिया, शेवरीनारायण,

२१ क्र. ५९, ओ. ४–५.

वडद, पोरथा इत्यादि ठिकाणीं शिवालयें बांधल्याचे उल्लेख कोरीव लेखांत आले आहेत.

दक्षिण कोसलांतील विष्णूचीं देवालयें

दक्षिण कोसलांत विष्णूचीं देवालयेंहि अनेक होतीं. जांजगीर येथे अपूर्ण स्थितींत असलेलें विष्णूचें देवालय अद्यापि विद्यमान आहे. त्याच्या गर्भगृहाच्या दरवाजावर ब्रह्मा, विष्णु व शिव या त्रिमूर्ति असून, विष्णूची मूर्ति मध्यभागीं आहे. देवळाच्या भिंतीवर व स्तंभांवर विष्णूच्या अवतारांच्या, तसेंच सूर्य, देवी इत्यादिकांच्या सुंदर मूर्ति कोरल्या आहेत. हें देवालय दक्षिण कोसलांतील उत्कृष्ट स्थापत्याचा नमुना आहे, पण तें कोणी बांधलें तें माहीत नाही.[२२] दुसरें एक विष्णूचें देवालय शेवरीनारायण येथें कलचुरींच्या धाकट्या शाखेने बांधलेलें अद्यापि अस्तित्वांत आहे, पण त्यांत विशेष कलाकौशल्य दिसत नाही. राजीम येथे आठव्या शतकांत एका नलवंशी राजाने बांधलेल्या विष्णूच्या देवळाचा जीर्णोद्धार कलचुरींच्या जगपाल नामक सेनापतीने केला होता. त्याने त्यांतील देवाला 'राम' असें आपल्या लेखांत म्हटलें आहे, पण वास्तविक ती मूर्ति चतुर्भुज विष्णूची आहे. रायपूर जिल्ह्यांतील खल्वाटिका (सध्याची खलाडी) येथे एका मोचीने विष्णूचें देवालय बांधलें होतें असा त्याच्या शिलालेखांत उल्लेख आहे.

इतर देवांचीं देवालयें

शिव व विष्णु यांच्या शिवाय पार्वती, एकवीरा, गणपति, सूर्यपुत्र रेवन्त यांचींहि देवालयें रत्नपुर, वडद, दुर्ग, पहपक, विकर्णपुर इत्यादि ठिकाणीं बांधलीं होतीं असे उल्लेख कोरीव लेखांत आढळतात. यांपैकी रेवन्ताचें देवालय विशेष उल्लेखनीय आहे. तें द्वितीय रत्नदेव व द्वितीय पृथ्वीदेव यांचा शूर सामन्त वैश्य-जातीय वल्लभराज याने विकर्णपुर (सध्याचें कोटगड) येथें बांधलें होतें व त्याला सुंदर शिल्पादिकांनी विभूषित केलें होतें. त्याचे अवशेष अद्यापि कोटगड येथे दृष्टीस पडतात. यांतील कांही देवालयें पंचायतन प्रकाराचीं होतीं. कांहींना मठ व अन्नसत्रें जोडलीं होतीं. या मठांच्या योगें जनतेंत विद्येचा व धर्माचा प्रचार केला जात असे.

देवीची पूजाहि दक्षिण कोसलांत प्रचलित होती. तिच्या वैष्णवी, वाराही, नारसिंही, ऐंद्री, चामुंडा इत्यादि शक्तींच्या प्रसादाने युद्धांत विजय मिळतो अशी लोकांत श्रद्धा होती. आश्विन शुक्लपक्षांत देवीचें नवरात्र, तसेंच कार्तिक महिन्यांत

---

२२ बिलासपुर डिस्ट्रिक्ट गॅझेटीयर, पृ. २७१.

दीपावलीचा उत्सव मोठ्या समारंभाने व गोदानादिकांनी साजरा केला जात असे. खालच्या थरांतील लोक महामायादि देवतांची उपासना करीत. तन्त्रोपासनेचाहि थोडाबहुत प्रसार होता. शाकम्भरी विद्येच्या योगे अतिमानुष सिद्धि व युद्धांत जय प्राप्त होतो अशी समजूत लोकांत प्रचलित होती.[२३]

बौद्ध व जैन धर्मांचा प्रसार

दक्षिण कोसलांत कलचुरींच्या राज्यस्थापनेपूर्वी बौद्ध धर्माचा बराच प्रसार होता हें मागे सांगितलें आहेच. श्रीपुर, आरंग, मल्लार इत्यादि ठिकाणीं बौद्ध देवळांचे व मठांचे अवशेष मिळाले आहेत. परंतु नंतर इतर प्रदेशांतल्याप्रमाणे दक्षिण कोसलांतहि बौद्ध धर्माला अवनत दशा प्राप्त झाली. तेथील एकहि कलचुरि-कालीन कोरीव लेखांत बौद्ध मठाचा किंवा भिक्षूचा उल्लेख नाही. तथापि तेथेहि बौद्ध धर्मशास्त्राचा व तत्त्वज्ञानाच्या ग्रंथांचा अभ्यास होत असे, असें कोरीव लेखांतील उल्लेखांवरून स्पष्ट दिसतें. प्रथम जाजल्लदेवाचा राजगुरु रुद्रशिव याने दिङ्नागादि बौद्ध तत्त्वज्ञांचे ग्रंथ अभ्यासिले होते असें रत्नपुरच्या शिलालेखांत म्हटलें आहे.[२४] कोनी येथील शिलालेखाचा कर्ता काशल याला बुद्ध, धर्म व संघ या रत्नत्रयाची माहिती होती व त्याने बुद्धादिकांचे आगमग्रंथ अभ्यासिले होते असें त्या लेखांत म्हटलें आहे.[२५] राजदरबारीं तत्त्वज्ञानाच्या विषयांवर वादविवाद होत त्यावेळीं प्रतिपक्षावर मात करण्याकरिता बौद्धादि दर्शनांच्या ज्ञानाची जरूरी भासे. म्हणून ब्राह्मणहि त्या दर्शनांचा अभ्यास करीत असावे.

बौद्धांप्रमाणे जैनांचेहि उल्लेख तत्कालीन लेखांत आढळत नाहीत. तथापि जैन तीर्थंकरांच्या अनेक मध्ययुगीन मूर्ति आरंग, शिरपुर, मल्लार, धनपुर, रत्नपुर, पदमपुर इत्यादि ठिकाणीं सांपडल्या आहेत. त्यांवरून त्या धर्माचाहि प्रसार त्या कालीं दक्षिण कोसलांत होता यांत संशय नाही.

दक्षिण कोसलांतील अनेक राजदानें सूर्य किंवा चंद्र ग्रहणांच्या प्रसंगीं केलीं होतीं ही गोष्ट उल्लेखनीय आहे. या काळच्या सोळा दानपत्रांपैकी नऊ दानपत्रांमध्ये ग्रहणांचा निर्देश आहे. त्यांपैकी पांच चंद्रग्रहणें व चार सूर्यग्रहणें होतीं. संक्रांतीच्या प्रसंगीं तीन, अक्षय्य तृतीयेला एक आणि दात्याच्या पित्याच्या श्राद्धप्रसंगीं एक अशींहि दानें दिलेलीं आढळतात. राहिलेल्या दोन दान-पत्रांत मात्र प्रसंगाचा निर्देश नाही.

---

२३ क्र. ८९, ओ. २५.

२४ क्र. ७७, ओ. २७.

२५ क्र. ९०, ओ. २७.

४ संस्कृत, प्राकृत व अपभ्रंश वाङ्मय

माहिष्मतीच्या आद्य कलचुरि राजांच्या कालांतील वाङ्मयाविषयीं आपणांस कांहीच माहिती नाही. पण पुढे कालंजर येथे कलचुरींची शाखा प्रस्थापित झाल्यावर तींतील कांही नृपतींनी संस्कृतमध्ये ग्रंथरचना केलेली दिसते. त्यांमध्ये मायुराज नामक कलचुरि नृपति आपल्या काव्यकृतींनी सुप्रसिद्ध झाला होता. राजशेखराने म्हटलें आहे—[१]

> **मायुराजसमो नान्यो जज्ञे कलचुरिः कविः ।**
> **उदन्वतः समुत्तस्थुः कति वा तुहिनांशवः ।।**

(मायुराजासारखा कलचुरि वंशांत दुसरा कवि झाला नाही. सागरापासून किती चंद्र उत्पन्न झाले बरें ?)

मायुराजाचें 'उदात्तराघव'

या मायुराजाने 'उदात्तराघव' नामक नाटक रचलें होतें असें नाटच व अलंकार ग्रंथावरून दिसतें. हें नाटक अद्यापि प्रकाशित झालें नाही; तथापि त्यांतील कांही उतारे 'दशरूपका'दि ग्रंथांत घेतलेले आढळतात. त्यांवरून व त्या नाटकाच्या नांवावरूनहि त्याचा विषय रामचरित होता असें दिसतें. रामप्रभूच्या चरित्रावर अनेक संस्कृत कवींनी नाटकें रचलीं होती. भासाचीं 'प्रतिमा' व 'अभिषेक', भवभूतीचीं 'महावीरचरित' व 'उत्तररामचरित', राजशेखराचें 'बालरामायण', मुरारि कवीचें 'अनर्घराघव', जयदेवाचें 'प्रसन्नराघव' इत्यादि नाटकें सुप्रसिद्ध आहेत. यांमध्ये कथानकाच्या सुश्लिष्ट रचनेकरिता व रसनिष्पत्तीकरिता वाल्मीकीच्या 'रामायणां'तील मूळ कथेमध्ये थोडे फार फरक केले आहेत. मायुराजानेहि तसे कांही फरक केले होते असें त्या नाटकांतील उपलब्ध

---

१ जल्हण, सूक्तिमुक्तावलि, पृ. ४६.

उताऱ्यांवरून दिसतें. तसें करण्यांत मायुराजाचा उद्देश, त्या नाटकाच्या नांवांत सूचित केल्याप्रमाणे, रामचरित उदात्तरूपाने रंगविण्याचा होता. रामचरितामध्ये कांही प्रसंग सकृद्दर्शनीं तरी आक्षेपार्ह वाटतात. उदाहरणार्थ, वालिवधाचा प्रसंग घ्या. वाल्मीकीच्या वर्णनाप्रमाणे असें दिसतें की सुग्रीव व वाली युद्ध करीत असतां रामाने वृक्षाआड उभे राहून बाणाने वालीला घायाळ केलें. तेव्हा वालीने त्या कृत्याबद्दल रामाची निर्भर्त्सना केली. त्यावर रामाने 'तूं आपल्या भ्रातृपत्नीबरोबर व्यभिचार करीत होतास, तेव्हा तुला असा दंड करणें योग्यच होतें' असें आपल्या कृत्याचें समर्थन केलें. भासासारख्या कांही संस्कृत नाटककारांनी हा प्रसंग 'वाल्मीकि–रामायणां'तल्या प्रमाणेच वर्णिला आहे, पण भवभूतीसारख्या इतर कांहींनी त्याला इष्ट ती मुरड दिली आहे. मायुराजाने हा प्रसंग आपल्या नाटकांतील नायकाच्या उदात्तत्वाला बाधक असल्यामुळे पूर्णपणें गाळला आहे. याविषयीं धनंजयाच्या 'दशरूपकां'तील पुढील उल्लेख पहा--[२]

छद्मना वालिवधो मायुराजेनोदात्तराघवे परित्यक्तः ।

(रामाने वालीचा कपटाने वध केला होता, तो प्रसंग मायुराजाने आपल्या 'उदात्तराघवांत' गाळला आहे.) दुसऱ्याहि एका प्रसंगांत मायुराजाने बदल केला आहे. पंचवटींत राम, सीता व लक्ष्मण राहत असतां एक राक्षस सुवर्णहरिणाचें मायावी रूप धारण करून आला. तेव्हा सीतेच्या विनंतीवरून राम त्या हरिणास मारण्याकरिता त्याचा पाठलाग करीत दूर गेला. रामाने बाण मारल्यावर राक्षसाने मरतांना रामासारखा आवाज काढून लक्ष्मणाला साहाय्यार्थ बोलाविलें. लक्ष्मणाला राक्षसांचा कावा माहीत असल्याने व रामाने त्याला सीतेला एकटी सोडून जाऊं नको असें निक्षून सांगितलें असल्यामुळे सीतेने रामाच्या साहाय्यास जाण्यास सांगितलें असतांहि तो गेला नाही. तेव्हा सीता त्याला कठोर शब्द बोलली, असा प्रसंग वाल्मीकीने वर्णिला आहे. यामध्ये सीतेकडे दोष येतो तो मायुराजाने मूळ कथेला किंचित् मुरड देऊन टाळला आहे. 'दशरूपकांत' मायुराजाच्या उदात्तराघवांतील कांही उतारे आले आहेत,[३] त्यांवरून असें दिसतें की मायामृगाला मारण्याकरिता लक्ष्मणच प्रथम जातो. तो दूर गेल्यावर ऋषीचें रूप घेतलेला चित्रमाय नामक राक्षस रामाला दुरून ओरडून सांगतो,--

"भगवन् कुलपते रामभद्र, परित्रायताम् परित्रायताम् ।
मृगरूपं परित्यज्य विधाय विकटं वपुः ।
नीयते रक्षसानेन लक्ष्मणो युधि संशयम् ।।

---

२ दशरूपक, ३, २४.

३ पूर्वोक्त, ४, २८.

('भगवन् कुलपते रामभद्रा, रक्षण कर, रक्षण कर. ह्या राक्षसाने मृगाचें रूप टाकून देऊन आपलें मूळचें विशाल रूप धारण केलें आहे. त्याच्याबरोबर युद्ध करीत असतां लक्ष्मणाचा जीव धोक्यांत आला आहे.') तेव्हा राम स्वत:शीं म्हणतो—

वत्सस्याभयवारिधेः प्रतिभयं मन्ये कथं राक्षसा-
त्त्रस्तश्चैष मुनिर्विरौति मनसश्चास्तीव मे संभ्रमः ।
माहासीर्जनकात्मजामिति मुहुः स्नेहाद् गुरुर्याचते
न स्थातुं न च गन्तुमाकुलमतेर्मूढस्य मे निश्चयः ।।

['लक्ष्मण हा शौर्याचा सागर आहे. त्याला राक्षसापासून भीति कसली? पण हा (चित्रमाय) ऋषि तर घाबरून ओरडत आहे; त्यामुळे माझ्या मनाला संभ्रम उत्पन्न झाला आहे. इकडे हे आमचे गुरुजी तर सीतेला टाकून जाऊं नको म्हणून स्नेहामुळे पुन: पुन: विनवीत आहेत. म्हणून किंकर्तव्यतामूढ व भ्रान्त झालेल्या माझा जाण्याविषयी किंवा राहण्याविषयीहि निश्चय होत नाही.']

मायुराजाने मूळ कथेंत असा फरक केल्यामुळे सीतेने लक्ष्मणाला वाक्ताडन करण्याचा प्रसंगच उद्भवत नाही व तिच्यावर कोणताहि दोष येत नाही.

मायुराज व मात्रराज एकच

राजशेखर, धनिक, कुन्तक, जल्हण वगैरेंनी या कवीचें नांव 'मायुराज' असें दिलें आहे. पण अलीकडे मद्रास विश्वविद्यालयाचे संस्कृतचे प्राध्यापक डॉ. व्ही. राघवन् यांना 'उदात्तराघवा'चें एक हस्तलिखित मिळालें आहे, त्यावरून त्या कवीचें नांव 'मात्रराज' ऊर्फ 'अनङ्गहर्ष' होतें व तो नरेन्द्रवर्धन नामक राजाचा पुत्र होता अशी माहिती मिळते. 'मात्रराज' याचें 'मायुराज' असें रूपान्तर कसें झालें आणि तेंच सर्व उत्तरकालीन ग्रंथकारांनी कां स्वीकारलें याची समाधानकारक उपपत्ति अद्यापि लागली नाही. तथापि डॉ. राघवन् यांनी 'उदात्तराघवा'ची प्रस्तावना व भरतवाक्य यांतील जे उतारे मला पाठविले आहेत त्यांवरून त्या नाटकाचा कर्ता आणि 'तापसवत्सराज' नामक अगोदरच प्रकाशित झालेल्या नाटकाचा कर्ता हे एकच होत असें स्पष्ट दिसतें.

तापसवत्सराज

या 'तापसवत्सराज' नाटकाचेंहि एकच हस्तलिखित उपलब्ध झालें आहे व तेंहि बर्लिनमधील एका ग्रंथालयांत शारदा लिपींत लिहिलेलें आहे. त्या हस्तलिखितावरून श्रीयदुगिरि यतिराजांनी 'तापसवत्सराज' नाटक छापलें आहे. या

नाटकाचें एकच हस्तलिखित मिळालेलें आणि त्यांतील प्राकृत भाषणें तर अत्यंत अशुद्ध व अपूर्ण रीतीने लिहिलेलीं, त्यामुळे या आवृत्तींत अनेक दोष राहिले आहेत. तथापि तिजवरून या नाटकाच्या संविधानकाची व त्यांतील काव्यसौंदर्य, स्वभाव-चित्रण वगैरेंची कल्पना करतां येते. 'उदात्तराघवा' प्रमाणे 'तापसवत्सराजा' चेहि उल्लेख आनन्दवर्धन, राजशेखर, अभिनवगुप्त, कुन्तक वगैरेंच्या ग्रंथांत येतात. त्यांवरून हें नाटकहि प्राचीन काळीं अतिशय लोकप्रिय झालें होतें यांत संशय नाही.

या नाटकाचें संविधानक भासाच्या 'स्वप्नवासवदत्ता' सारखें उदयनचरित्र-विषयक आहे. वत्सदेशाधिपति उदयन याचें जीवनचरित्र अत्यंत प्रणयप्रधान होतें. त्यामुळें प्राचीन काळीं अनेक संस्कृत कवींनी त्यावर आपलीं नाटकें रचलीं होतीं. भासाचें 'प्रतिज्ञायौगन्धरायण' व 'स्वप्नवासवदत्त', सुबन्धूची 'वासव-दत्तानाटचधारा', मात्रराजाचें प्रस्तुत 'तापसवत्सराज', हर्षाची 'प्रियदर्शिका' व 'रत्नावली', भीमटाचें 'मनोरमावत्सराज' इत्यादि अनेक नाटकांचीं संविधानकें उदयन व त्याच्या वासवदत्ता, पद्मावती, प्रियदर्शिका, रत्नावलि, मनोरमा इत्यादि राण्या यांच्या प्रणयप्रसंगांवर बसविलीं आहेत.

'तापसवत्सराजा' चे सहा अंक आहेत. प्रस्तावनेंत हें नाटक सर्व नृपतींमध्यें श्रेष्ठ व श्रीनरेन्द्रवर्धनाचा पुत्र श्रीमात्रराज ऊर्फ अनङ्गहर्ष याने रचलें होतें व तें पदवाक्यप्रमाणज्ञ (म्हणजे व्याकरण, न्याय व मीमांसा यांत प्रवीण) अशा गोष्ठीला (विद्वत्सभेला) पसंत पडलें असें म्हटलें आहे. या नाटकाचें संविधानक येणेप्रमाणे—

वत्सराज उदयन सदैव वासवदत्तेच्या सहवासांत व ख्यालीखुशालींत मग्न असल्याने पांचाल देशाचा राजा आरुणि त्याच्या देशावर आक्रमण करतो. तेव्हा त्याचा प्रतीकार करण्याकरिता मगध देशाच्या दर्शक राजाचें साहाय्य मिळविणें जरूर पडतें. म्हणून उदयनाचा मंत्री यौगन्धरायण व सचिव रुमण्वान् वासवदत्तेचा पिता उज्जयिनीचा राजा प्रद्योत उर्फ महासेन याच्या संमतीने एक कट रचतात. ते विदूषकाला व वासवदत्तेलाहि आपल्या मसलतींत घेतात. उदयन मृगयेला गेला असतां लावाणक गावांत अंतःपुराला आग लावून दिली जाते. मृगयेहून परत आल्यावर उदयनाला वासवदत्ता व यौगन्धरायण त्या अग्नींत जळून मेले अशी वार्ता समजते व तो दुःखाने वेडापिसा होतो. तो प्रयागला गंगायमुनांच्या संगमांत प्राणत्याग करण्यास जातो, पण तेथे एका सिद्धाच्या वचनावरून वासव-दत्तेची पुनः प्राप्ति होईल अशी आशा वाटून तो त्रिदंडी संन्यास घेतो. आणि तीर्थाटन करीत करीत राजगृहास येतो. इकडे वासवदत्ता लावाणक गांवांतील

अग्निप्रलयांत मृत्यु पावली व तिच्या प्रेमाने उदयन तपस्वी झाला ही बातमी यौगंधरायणाच्या हस्तकांकडून मगधराजकुमारी पद्मावती हिला समजते. त्यांनी दाखविलेली उदयनाची तसबीर पाहून व त्याच्या गुणांचें वर्णन ऐकून तिचें प्रेम त्याच्यावर जडतें. यौगंधरायण वासवदत्तेला आपली बहीण म्हणून पद्मावतीजवळ ठेवतो. उदयनाने संन्यास घेतला हें समजल्यावर पद्मावतीहि सर्वसंगपरित्याग करून राजगृहाजवळच्या आश्रमांत जाते व तेथे देवगृहांत उदयनाची तसबीर ठेवून तिची पूजाअर्चा करण्यांत आपला काळ घालवते. उदयन तीर्थयात्रा करीत करीत त्या आश्रमांत येतो तेथे त्याची व पद्मावतीची दृष्टादृष्ट होतांच त्यांचें अंत:करण परस्परांकडे आकृष्ट होतें. तथापि राजाचें मन वासवदत्तेच्या स्मृतीमुळे द्विधा होतें व तो पद्मावतीशीं कांहीच बोलत नाही. पद्मावतीला यामुळे अतिशय दु:ख होतें व ती लतापाशाने आत्महत्या करण्यास उद्युक्त होते. तें पाहून उदयनाचें मन द्रवतें व तो तिच्या प्रेमाचा स्वीकार करतो. आश्रमांतच त्यांचा विवाह होतो. इतक्यांत महासेनाचे पुत्र गोपाल व पालक आणि मगधराज दर्शक यांच्या साहाय्याने यौगन्धरायणाने आरुणीच्या सैन्याचा धुव्वा उडविला आहे आणि आरुणीने कोशाम्बीच्या दुर्गांत आश्रय घेतला आहे अशी माहिती एका जासुदाकडून मिळते. तेव्हा ती सर्व मंडळी कौशाम्बीस जातात. उदयनाला शत्रूवर विजय मिळाला खरा, पण त्याच्या मनांत वासवदत्तेची स्मृति सदैव जागृत असते. यौगन्धरायणादिकांनी कट करून आपल्याला फसविलें व पद्मावतीशीं विवाह करावयास लावलें असा त्याचा ग्रह होतो, व त्यामुळे तो प्रयागला जाऊन तेथे त्रिवेणी संगमावर अग्निकाष्ठें भक्षण करण्याचा प्रयत्न करतो. इकडे वासवदत्ताहि दु:खाने चितारोहण करण्यास उद्युक्त होते. पण तितक्यांत तिची व राजाची गांठ पडून परस्परांची ओळख पटते व सर्वांस प्रियमीलनाचा आनंद होतो. इतक्यांत आरुणीला पकडल्याची बातमी घेऊन रुमण्वान् येतो. यौगंधरायण व रुमण्वान् यांचें राजनीतिकौशल्य व शौर्य पाहून राजा अत्यानंदित होतो व म्हणतो--

श्लाघ्या धीर्धिषणस्य रावणवशं यातः सुराणां पतिः
सर्वं वेत्त्युशना रसातलमहाकारान्धकारे बलिः ।
इत्यस्माननवेक्ष्य वैरिविजयप्राप्तौ कृतो निश्चयो
मात्सर्यं तु विहाय वेत्तु युवयोर्लोकस्तयोश्चान्तरम् ।।

[बृहस्पतीची बुद्धि प्रशंसनीय खरी, पण त्याचा स्वामी इन्द्र रावणाचा बंदीवान् झाला. शुक्राचार्य सर्वज्ञ खरे, पण त्यांचा स्वामी बलि राजा पातालांतील अंधकारमय अशा बंदिखान्यांत कैदी होऊन राहिला आहे. तुम्ही दोघांनी (म्हणजे यौगंधरायण व रुमण्वान् यांनी) आमची अपेक्षा न करतां विजयप्राप्तीचा उद्योग केला.

तेव्हा जगाने मात्सर्य टाकून देऊन तुम्ही आणि ते बृहस्पति व शुक्राचार्य यांमधील अंतर जाणावें.]

नंतर भरतवाक्याने नाटकाची समाप्ति होते.

या नाटकाची गुणसंपदा

'तापसवत्सराजा'चें संविधानक बहुतांशीं भासाच्या 'स्वप्नवासवदत्ता'च्या सारखें आहे. तथापि त्यांत प्रसंगांची गुंतागुंत अधिक आहे. तसेंच करुण रसाचा जास्त परिपोष केला आहे. कांही ठिकाणीं कालिदासाच्या नाटकांचें अनुकरण दृष्टीस पडतें. लावाणकांतील अग्निप्रलयाने वासवदत्ता मृत्यु पावली असा राजाचा ग्रह होतो. तो तिच्याकरिता शोक करीत असतां तेथे वासवदत्तेने पाळलेला हरिण-शिशु येतो. त्याला पाहून राजा म्हणतो--

धारावेश्म विलोक्य दीनवदनो भ्रान्त्वा च लीलागृहा-
त्स्निग्धस्यायतमाशु केसरलतावीथीषु कृत्वा दृशम् ।
किं मे पार्श्वमुपैषि पुत्रक कृतैः किं चाटुभिः क्रूरया
मात्रा त्वं परिवर्जितः सह मया यान्त्यातिदीर्घां भुवम् ॥

[हे हरिणबालका, तूं दीनवदन होऊन धारावेश्म (स्नानगृह) पाहिलेंस, लीलागृहांत हुडकलेंस, दीर्घ असे उसासे टाकून बकुललतापंक्तींत दृष्टि फेंकलीस, आता माझ्या जवळ आलास आणि लाडीगोडी लावत आहेस; पण तिचा काय उपयोग ? क्रूर अशी तुझी माता (वासवदत्ता) तुला आणि मला सोडून दूरदेशीं गेली आहे !]

खालील श्लोकांत अग्नीच्या ज्वाला सर्वत्र पसरत असतां वासवदत्तेची कशी अवस्था झाली असेल हें उदयन वर्णन करीत आहे. हा श्लोक ध्वनिकाव्याचें उत्तम उदाहरण म्हणून सहृदयमूर्धन्य आनन्दवर्धनाच्या 'ध्वन्यालोकां'त[४] उद्धृत केला आहे--

उत्कम्पिनी भयपरिस्खलितांशुकान्ता
ते लोचने प्रतिदिशं विधुरे क्षिपन्ती ।
क्रूरेण दारुणतया सहसैव दग्धा
धूमान्धितेन दहनेन न वीक्षितासि ॥

[हे वासवदत्ते ! भीतीने थरथर कापणारी, जिच्या अंगावरील पदर गळून

---

४ ध्वन्यालोक (निर्णयसागर, १९११), पृ. १३१.

गेला आहे, जी असहाय अशी ती आपली दृष्टि सर्वत्र फेंकत आहे अशा तुला क्रूर अशा अग्नीने एका क्षणांत भयंकर रीतीने जाळून टाकलें. धुराने अंध झाल्यामुळे त्याने तुला (बहुधा) पाहिलें नसावें.]

या नाटकांत मधून मधून बराच विनोद आला आहे. यौगन्धरायणाचा शिष्य माणवक आपल्या बौद्धभिक्षुत्वाला कंटाळून तक्रार करतो. तेव्हा लामकायन त्याला म्हणतो–'मूढ, किमिवात्र ते क्षुण्णम् ?

पूर्वाह्णे कृतभोजनव्यतिकरान्नित्यैव नीरोगता
कण्डूतिस्त्वकचादपैति शिरसः स्नानं यदा रोचते ।
जात्याचारकदर्थनाविरहितं ब्राह्मण्यमात्मेच्छया
धूर्तैः सत्त्वहिताय कैरपि कृतं साधुव्रतं सौगतम् ।।

[मूर्खा, तुझें भिक्षुपणामुळे काय नुकसान झालें ?

दोन प्रहरच्या अगोदर जेवावयास मिळत असल्याने नेहेमी आरोग्य असतें; डोक्याचें मुंडन केल्यामुळे खाज उठत नाही; स्नान इच्छा असेल तेव्हा करावें (रोज करण्याची सक्ति नाही). पाहिजे तर स्वतःला ब्राह्मण म्हणवावें, पण स्नान-संध्यादि नित्य कर्मांची कटकट नाही. कोणी धूर्त लोकांनीं हें उत्तम बौद्धव्रत प्राण्यांच्या हिताकरितां केलें आहे खरें !]

'उदात्तराघव' व 'तापरूपवत्सराज' यांतील जे श्लोक येथे उद्धृत केले आहेत त्यांवरून मायुराज किंवा मात्रराज याच्या प्रसादगुणयुक्त शैलीची कल्पना येईल. प्राचीन काळीं हीं नाटकें चांगली मान्यता पावलीं होतीं असें दिसतें. कारण त्यांतील श्लोक अनेक आलंकारिकांनी उद्धृत केले आहेत.

भीमटाचें 'स्वप्नदशानन'

दुसऱ्या एका कालंजर नृपतीने संस्कृत नाटकें रचलीं होती असें राजशेखराच्या खालील सुभाषितावरून[५] दिसतें––

कालञ्जरपतिश्चक्रे भीमटः पञ्चनाटकीम् ।
प्राप प्रबन्धराजत्वं तेषु स्वप्नदशाननम् ।।

(कालञ्जराधिपति भीमटाने पांच नाटकें रचलीं होतीं. त्यांपैकी 'स्वप्नदशानन' हें सर्व प्रबन्धांत उत्कृष्ट गणलें गेलें होतें.)

---

५ सू. मु., पृ. ४६.

हें नाटक सध्या उपलब्ध नसल्याने त्याविषयी जास्त माहिती सांगतां येत नाही. तथापि त्याच्या नांवावरून त्याचा विषय रामचरित होता व भासाच्या 'स्वप्नवासवदत्तां'तल्याप्रमाणे त्याच्या कथानकांत स्वप्नाचा उपयोग केला होता असें दिसतें.

'मनोरमावत्सराज'

नाटचदर्पणांत भीमटाच्या 'मनोरमावत्सराज' नामक आणखी एका नाटकाचा उल्लेख आहे.[६] यामध्ये वत्सराज उदयनाच्या अन्तःपुरांतील प्रेमकलहावर नाटकाची उभारणी केलेली दिसते. हें नाटक कालिदासाचें 'मालविकाग्निमित्र', हर्षाची 'प्रियदर्शिका' व 'रत्नावली' इत्यादि नाटकांच्या धर्तीचें असावें.

भीमटानें सुभाषितेंहि रचलीं होतीं. त्यांपैकी कांही 'सूक्तिमुक्तावली-' सारख्या सुभाषितसंग्रहांत घेतलेलीं आढळतात. उदाहरणार्थ, खालील सुभाषित पहा[७]—

अस्मिश्चन्द्रमसि प्रसन्नमहसि व्याकोचकुन्दत्विषि
प्राचीनं खमुपेयुषि त्वयि गते दूरं निजप्रेयसि ।
श्वासः कैरवकोरकीयति मुखं तस्यास्सरोजीयति
क्षीरोदीयति मन्मथो दृगपि च द्राक् चन्द्रकान्तीयति ।।

(एक दूती आपल्या नायिकेची अवस्था तिच्या प्रियकराला सांगते—हा उमललेल्या कुन्दपुष्पासारखा शुभ्र तेजाचा चंद्र पूर्वेकडे आकाशांत उगवत असतां तिचा प्रियकर तूं तिच्यापासून दूर असल्यामुळे तिचे निःश्वास कैरव कमलाच्या कळ्यांप्रमाणे वाढूं लागतात, तिचें मुख सूर्यविकासी कमलाप्रमाणे म्लान होतें, तिच्या मदनव्यथेला क्षीरसमुद्राप्रमाणें भरती येते व तिचे नयन चन्द्रकान्त मण्याप्रमाणे जलधारा स्रवूं लागतात.)

हा भीमट कोणत्या राजवंशांतला होता हें राजशेखराने सांगितलें नाही. तथापि यासारखीं नांवें सरयूपारच्या कलचुरींच्या वंशावलींत आढळत असल्यामुळे हा राजा सातव्या—आठव्या शतकांत कलचुरि कालञ्जर येथून राज्य करीत होते त्या कालांतला असावा असें वाटतें.

---

६ नाटचदर्पण, पृ. १२.

७ सू. मु., पृ. १५७.

राजशेखर

कलचुरींची राजधानी त्रिपुरीला झाल्यावर त्यांच्या दरबारीं अनेक संस्कृत कवींना राजाश्रय मिळाला. त्यांपैकी कांहींचीं नांवें राजशेखर, बिल्हण इत्यादिकांच्या ग्रंथांतील उल्लेखांवरून आपणांस कळतात, या कवींमध्ये राजशेखर हा सुप्रसिद्ध आहे.

राजशेखर हा यायावर कुळांत जन्मला होता. तो आपल्या ग्रंथांत स्वत:चें 'महाराष्ट्रकुलचूडामणि' असें वर्णन करतो तेव्हा तो मूळचा महाराष्ट्रीय होता यांत संशय नाही. आपल्या 'काव्यमीमांसा' नामक ग्रंथांत राजशेखराने विदर्भांतील वत्सगुल्म हें नगर भगवान् मदनाचें क्रीडास्थान आहे व तेथे काव्यपुरुषाचा साहित्यविद्यावधूशीं विवाह झाला, असें आलंकारिक वर्णन केलें आहे.[८] 'कर्पूरमञ्जरी' नामक त्याची दुसऱ्या नाटकांतहि वत्सगुल्माचा उल्लेख आला आहे. प्राचीन साहित्यग्रंथांत वैदर्भी रीतीला सर्वोत्कृष्ट म्हटलें आहे. राजशेखर आपल्या 'कर्पूरमञ्जरी' या प्राकृत नाटकांत वैदर्भीचा 'वच्छोमी' असा पर्याय देतो.[९] तो 'वात्सगुल्मी' या शब्दाचें प्राकृत रूप आहे. पण तो इतरत्र रूढ झालेला दिसत नाही. या सर्वांवरून राजशेखराचें वत्सगुल्माविषयी प्रेम व्यक्त होतें. वत्सगुल्म म्हणजे अकोला जिल्ह्यांतील वाशीम. हें वाकाटकांच्या एका शाखेचें राजधानीचें शहर असल्याने तें ख्रिस्तोत्तर चौथ्या–पांचव्या शतकांत अत्यंत भरभराटींत होतें. पण त्यानंतरच्या राजवटींत तेथून राजधानी हलविल्यामुळे त्याचें महत्त्व पुष्कळच कमी झालें असावें. असें असतांहि वाकाटकांच्या काळानंतर चारशें वर्षांनी झालेला राजशेखर त्या नगराचा इतक्या गौरवाने निर्देश करतो, त्यावरून तो तेथील मूळचा रहिवासी असावा असें अनुमान करण्यास हरकत नाही.

राजशेखराचे पूर्वज

राजशेखर व त्याचे पूर्वज मूळचे विदर्भांतील असले तरी त्या काळांत विदर्भांत कोणाहि राजाची समृद्ध राजधानी नसल्याने ते त्रिपुरीच्या कलचुरि राजांच्या आश्रयास गेले होते. राजशेखर आपल्या ग्रंथांत अकालजलद, सुरानंद, तरल व कविराज या आपल्या पूर्वजांचा उल्लेख करतो. यांपैकी अकालजलद हा राजशेखराचा पणजा होता. तो इ. स. ८५० च्या सुमारास त्रिपुरीच्या प्रथम कोकल्लाच्या दरबारीं राजकवि असावा. हा कोकल्ल तत्कालीन राजांमध्ये प्रमुख असल्यामुळे त्याच्या दरबारीं भिन्न भिन्न प्रांतांतील संस्कृत कवि आले होते असें

---

८ का. मी., पृ. १०.

९ कर्पूरमंजरी, १, १.

दिसतें. त्यामध्ये महाराष्ट्रीय अकालजलद हाहि एक होता. अकालजलद हें त्याचें मूळचें नांव नव्हे. त्याने खालील सुंदर श्लोक केल्यामुळे तें त्याला प्राप्त झालें होतें [१०]--

भेकैः कोटरशायिभिर्मृतमिव क्ष्मान्तर्गतं कच्छपैः
पाठीनैः पृथुपङ्कपीठलुठनाच्चास्मिन्मुहुर्मूर्च्छितम् ।
तस्मिञ्छुष्कसरस्यकालजलदेनागत्य तच्चेष्टितं
यत्राकुंभनिमग्नवन्यकरिणां यूथैः पयः पीयते ॥

(उन्हाळ्यांत तळ्यांतील पाणी आटून गेल्यामुळे बेडूक आपल्या बिळांत मेल्यासारखे पडून राहिले आहेत. कांसव जमिनींत घुसले आहेत. पाठीनजातीचे मासे जाड अशा चिखलांवर पाण्याच्या आशेने लोळून लोळून पुनः पुनः मूर्च्छित होत आहेत. प्रखर उष्णतेने तळ्यांतील प्राण्यांची अशी दुर्दशा झाली असतां अकालीं आलेल्या मेघाने अशी वृष्टि केली की आता त्या तळ्यांतील पाणी ज्यांचीं गंडस्थळें त्यांत बुडालीं आहेत असे वन्य हत्ती पीत आहेत.)

हा श्लोक अन्योक्तिरूपाचा असून त्यांत आश्रयाभावीं दुर्दशेला पोंचलेल्या कवींना कोणी राजाने राजाश्रय देऊन सुसंपन्न केल्याचें वर्णन आलें आहे. कदाचित् हा श्लोक कवीने आपला आश्रयदाता त्रिपुरीचा प्रथम कोकल्ल याच्या स्तुतिपर रचला असावा. त्यांतील सुंदर वर्णनावरून त्याला 'अकालजलद' असें टोपणनांव मिळालें व त्याच नांवाने तो संस्कृत साहित्यांत प्रसिद्ध झाला. याचीं कांही सुभाषितें सुभाषित-संग्रहांत घेतलीं आहेत. राजशेखराने या कवीविषयीं आणखीहि मनोरंजक माहिती दिली आहे. तो म्हणतो [११]--

अकालजलदेन्दोः सा हृद्या वचनचन्द्रिका ।
नित्यं कविचकोरैर्या पीयते नच हीयते ॥

(ज्याप्रमाणे चन्द्राचें चांदणें चकोरपक्ष्यांनी कितीहि सेवन केलें तरी कमी होत नाही, त्याप्रमाणे अकालजलदाच्या काव्याचा कवींनी कितीहि रसास्वाद घेतला तरी त्याची गोडी कमी होत नाही.) या अकालजलदाचे कांही श्लोक कादम्बरीराम नामक कवीने आपल्या नाटकांत घातले होते आणि त्यामुळे तो प्रसिद्धि पावला होता असें राजशेखराने म्हटलें आहे [१२].

---

१० शाङ्र्गधरपद्धति.

११ सू. मु., पृ. ४६.

१२ पूर्वोक्त, पृ. ४६.

अकालजलदश्लोकैश्चित्रमात्मकृतैरिव ।
जातः कादम्बरीरामो नाटके प्रवरः कविः ।।

हा कादम्बरीराम म्हणजे 'अदितिकुण्डलाहरण' काव्याचा कर्ता कादम्बरी-रामकृष्ण असावा असा तर्क प्रा. जे. बी. चौधरी यांनी केला आहे.

यानंतर सुरानन्द नामक आपल्या पूर्वजाचा उल्लेख राजशेखराने खालील श्लोकांत केला आहे[१३]——

नदीनां मेकलसुता नृपाणां रणविग्रहः ।
कवीनां च सुरानन्दश्चेदिमण्डलमण्डनम् ।।

(खालील तीन चेदि देशाचे अलंकार होत——नद्यांमध्ये अत्यंत पवित्र अशी नर्मदा, राजांमध्ये सर्वश्रेष्ठ रणविग्रह आणि कवींमध्ये अग्रेसर सुरानन्द.)

राजकवि शंकरगण

मागे सांगितल्याप्रमाणे रणविग्रह हें प्रथम कोकल्लाचा पुत्र द्वितीय शंकरगण उर्फ मुग्धतुंग याचें बिरुद होतें. शंकरगणाच्या नांवावर कांही सुभाषितें सुभाषित-संग्रहांत दिलेलीं आढळतात. उदाहरणार्थ, 'कमलमनम्भसि कमले च कुवलये तानि कनकलतिकायाम् । सा च सुकुमारसुभगेत्युत्पातपरम्परा केयम् ।।' हा अतिशयोक्त्य-लंकाराचें उदाहरण म्हणून अनेक अलंकार ग्रंथांत उद्धृत केलेला सुंदर श्लोक शंकरगणाचा म्हणून 'सूक्तिमुक्तावलींत' दिला आहे.[१४] कलचुरिवंशांत अनेक शंकरगण होऊन गेले. तथापि त्यांपैकी त्रिपुरीच्या द्वितीय शंकरगणास काव्याची विशेष अभिरुचि होती असें दिसतें. कदाचित् हा श्लोक त्याचाच असेल. या शंकर-गणाचा समकालीन सुरानन्द हा उपरिनिर्दिष्ट अकालजलदाचा पुत्र असावा.

याशिवाय तरल व कविराज अशा आणखी दोन पूर्वजांचा उल्लेख राज-शेखराने आपल्या 'बालरामायणांत' केला आहे. कविराजाविषयीं कांहीच माहिती मिळत नाही, पण तरलाच्या काव्यांतील शब्दसौष्ठवाविषयी राजशेखर म्हणतो[१५]—

यायावरकुलश्रेणेर्हारयष्टेश्च मण्डनम् ।
सुवर्णबन्धरुचिस्तरलस्तरलो यथा ।।

---

१३ पूर्वोक्त, पृ. ४७.
१४ पूर्वोक्त, पृ. १६९.
१५ पूर्वोक्त, पृ. ४७.

(ज्या प्रमाणें मोत्यांच्या हारांत मध्यभागीं ओंवलेलें रत्न सुवर्णजडित असल्यामुळे सुंदर दिसतें, त्याप्रमाणे यायावर कुलांत तरल नामक कवि आपल्या सुंदर शब्दांच्या योजनेने शोभून दिसतो.)

अशा काव्यकृतींनी प्रथितयश झालेल्या यायावर कुलांत राजशेखर जन्मला होता. त्याच्या पित्याचें नांव दुर्दुक (किंवा दुहिक) आणि मातेचें शीलवती होतें. राजशेखर श्रेष्ठ ब्राह्मण कुलांत जन्मला होता तरी त्याने चाहुआन किंवा चव्हाण नामक क्षत्रिय कुलांतील अवन्तिसुन्दरी या स्त्रीशीं विवाह केला होता. प्राचीन काळीं असे अनुलोम विवाह स्मृतिसंमत होते. अवन्तिसुन्दरी ही मोठी विदुषी होती. हिचीं अलंकारविषयक कांही मतें राजशेखराने आपल्या 'काव्यमीमांसे'त उल्लेखिलीं आहेत.

राजशेखराचे ग्रंथ

राजशेखर लहानपणापासून कवित्वाबद्दल प्रसिद्ध होता. त्यामुळे त्याला 'बालकवि' अशी सार्थ पदवी मिळाली होती. त्यावेळीं कनोजच्या प्रतीहारांचें साम्राज्य भरभराटींत होतें, म्हणून राजशेखर प्रतीहार सम्राट् महेन्द्रपालाच्या आश्रयाकरिता कनोज येथे गेला. महेन्द्रपाल त्याला आपला गुरु मानीत असे. याचा साभिमान उल्लेख राजशेखराने आपल्या ग्रंथांत केला आहे. कनोजला असतांना राजशेखराला 'कविराज' ही पदवी मिळाली. महेन्द्रपाल व त्याचा मुलगा महीपाल यांच्या दरबारीं असतांना राजशेखराने 'बालरामायण' व 'बालभारत' हीं संस्कृत नाटकें आणि 'कर्पूरमंजरी' हें सट्टक (प्राकृत नाटक) लिहिलें. यांपैकी पहिल्या दोहोंच्या नांवांत त्याने आपल्या 'बालकवि' पदवीचा अंशत: अन्तर्भाव केला आहे. तिसरें नाटक आपली पत्नी अवन्तिसुन्दरी हिच्या इच्छेवरून लिहिलें असें त्याने त्याच्या प्रस्तावनेंत म्हटलें आहे.

सन ९१८ च्या सुमारास राष्ट्रकूट नृपति तृतीय इन्द्राने कनोजवर स्वारी केली व तें नगर उद्ध्वस्त केलें. या स्वारींत युवराजदेवानेहि भाग घेतला असावा. कारण त्यानेहि गुर्जर प्रतीहारांचा पराजय केला असें कोरीव लेखांत म्हटलें आहे. या पराजयानंतर प्रतीहारांच्या साम्राज्याला उतरती कळा लागली. म्हणून राजशेखर त्रिपुरी येथे कलचुरि नृपति प्रथम युवराजदेव याच्या आश्रयास आला. तेथे त्याने 'विद्धशालभञ्जिका' ही नाटिका व 'काव्यमीमांसा' हा साहित्यशास्त्रावरचा अपूर्ण ग्रंथ लिहिला.[१६]


१६ राजशेखराच्या ग्रंथांच्या कालक्रमाविषयीं आमचा 'का. वा. पाठक कॉमेमोरेशन व्हॉल्यूम' मधील (पृ. ३५९–३६६) लेख पाहा.



१. महेशमूर्ति




२. सागर येथील शिल्पपट्ट




३. गुर्गी येथील
तोरण




४. कलचुरिकालीन
वैष्णवी देवीची मूर्ति



५. कुशाणकालीन
ब्राह्मी देवीची मूर्ति



६. अमरकंटक येथील
कर्ण नृपतीने
बांधलेलें देवालय




७. भेडाघाट
येथील
देवालय



८. त्रिपुरी येथील
कार्त्तिकेयाची मूर्ति




९. त्रिपुरी येथील
बोधिसत्त्वाची मूर्ति



१०. त्रिपुरी येथील
तारादेवतेची मूर्ति





११. पाळी येथील मंदिर



१२. पाली येथील देवालयाचे खांब

१३. जांजगीर येथील
विष्णूचें देवालय





कलचुरींचीं नाणीं-१



कलचुरींचीं नाणीं-२

‘विद्धशालभञ्जिका’

‘विद्धशालभञ्जिके’ चें कथानक पुढीलप्रमाणे आहे--

त्रिपुरीचा राजा युवराजदेव ऊर्फ कर्पूरवर्ष याच्या दरबारीं कुन्तलदेशाचा वीरपाल साहाय्यार्थ येतो. त्याची मुलगी कुवलयमाला हिच्यावर कर्पूरवर्षाचें प्रेम बसतें. कर्पूरवर्षाच्या राणीचा मामा लाट किंवा गुजराथ देशाचा चन्द्रवर्मा याला मुलगा नसल्यामुळे त्याने आपल्या मृगांकावलि नामक मुलीलाच मुलगा म्हणून वाढविलें होतें, व त्याचें मृगांकवर्मा असें नांव ठेवलें होतें. मृगांकावलीचें ज्याच्याशीं लग्न होईल, तो चक्रवर्ती राजा होईल असें ज्योतिष्यांनी भविष्य वर्तविलें होतें. तें कर्पूरवर्षाचा मंत्री भागुरायण याला माहीत असल्याने त्याने तिला मृगांकवर्मा-रूपाने त्रिपुरीस आणलें. त्याचें कन्यासदृश रूप पाहून राणी मौजेने त्याला कधी कधी स्त्रीवेष देत असे. या वेषांत मृगांकावलि राजाच्या दृष्टीस पडते व त्याचें तिच्यावर प्रेम बसतें. तिचेंहि प्रेम राजावर बसतें. पुढे अनेक प्रसंगीं परस्परांस दर्शन होऊन त्यांचें परस्परांवरचें प्रेम वाढत जातें. राणीला राजाचें कुवलयमाला या कुन्तलराजकन्येवर बसलेलें प्रेम माहीत झाल्यावर ती राजाच्या तावडींत सांपडू नये म्हणून ती त्याचें लग्न आपला मामेभाऊ मृगांकवर्मा याच्याशी लावून देते; व नित्य नव्या नव्या तरुणींवर आषक होणाऱ्या आपल्या पतीची फजिती करण्याच्या हेतूने ती त्याला निरोप पाठविते की ‘माझ्या मामाने मृगांकवर्म्याची बहीण मृगांकावलि हिला माझ्याकडे पाठविली आहे व कोणी योग्य वर पाहून त्याला ती देण्याविषयी सांगितलें आहे. तिचा विवाह ज्याच्याशीं होईल तो चक्रवर्ती राजा होईल असें भविष्य आहे. म्हणून मी तुमच्याशीं तिचा विवाह लावून देणार आहे. आपण विवाहास तयार असावें.’ राणीच्या कारस्थानाची बातमी विदूषकाला कळते व तो राजाला विवाहास तयार राहण्यास सांगतो. ठरल्याप्रमाणे राजा व मृगांकावलि यांचा विवाह होऊन लाजाहोमहि होतो. राणीला वाटतें की आपण राजाचा विवाह एका तरुणाशीं लावून त्याची फजिती करीत आहों. पण तिचें कारस्थान तिच्याच गळ्यांत येतें. कारण तितक्यांत तिचा मामा चन्द्रवर्मा याचा संदेश येतो कीं, ‘मला नुकताच मुलगा झाला आहे. तेव्हा जिला मी मुलगा म्हणून वाढविलें होतें, ती मृगांकावलि कोणा योग्य वरास द्यावी.’ हें ऐकतांच आपण करावयाला गेलों एक आणि झालें भलतेंच, हें राणीला समजतें. तथापि, झालें तें ठीकच झालें असें म्हणून ती त्या विवाहाला संमति देते. इतक्यांत विदूषक म्हणतो, “अहो या कुवलयमालेचा मृगांकवर्म्याशीं विवाह झाला होता. मृगांकवर्मा तर मृगांकावलि होऊन आमच्या राजेसाहेबांची भार्या झाला आहे. ‘भार्या पुत्रश्च दासश्च त्रय एवाधनाः स्मृताः । यत्ते समधिगच्छन्ति यस्य ते तस्य तद्धनम् ।।’

असें स्मृतिवचन आहे. भार्येच्या मिळकतीवर पतीचें स्वामित्व असतें. तेव्हा कुवलयमालाहि आमच्या महाराजांची झाली. तिच्याशींहि त्याचें लग्न याच विवाह-कंकणाने होऊं द्या.' राणीला याहि विवाहाला संमति देणें भाग पडतें. इतक्यांत एक दूत येऊन श्रीवत्स सेनापतीचा खलिता राजाला सादर करतो. त्यांत श्रीवत्स कळवितो की, 'राज्यापासून भ्रष्ट झालेला कुन्तलाधिपति वीरपाल महाराजांच्या आश्रयास आला होता. त्याला पुढे करून आम्ही पयोष्णीच्या तीरावर आपल्या सैन्याचा तळ दिला. तेथे घनघोर युद्ध होऊन कार्णाटांच्या सैन्याचा पराजय झाला. नंतर आम्ही वीरपालाला त्याच्या गादीवर बसविलें.' हा खलिता वाचल्यावर भागुरायण मंत्री जाहीर करतो कीं, 'पूर्वीं आमच्या कलचुरि महाराजांनी पूर्व, पश्चिम व उत्तर दिशांच्या राजांना जिंकलें होतें. आता दक्षिण दिशेच्या राजांना जिंकून ते सर्व पृथ्वीचे चक्रवर्ती झाले आहेत.' नंतर भरतवाक्याने नाटिका समाप्त होते.

या नाटकाची ऐतिहासिक पार्श्वभूमि

राजाच्या शयनागारामध्ये पोकळ स्तंभामध्ये मृगांकावलीचें प्रथम दर्शन होतें व नंतर तीच त्याला कोरीव मूर्तिरूपाने (विद्धशालभञ्जिकारूपाने) दृष्टीस पडते म्हणून या नाटकाला 'विद्धशालभञ्जिका' असें नांव दिलें आहे. यांतील कर्पूरवर्ष म्हणजे कलचुरि नृपति प्रथम युवराजदेव ऊर्फ केयूरवर्ष आणि त्याचा मंत्री भागुरायण म्हणजे कारीतलाई शिलालेखांत वर्णिलेला भाकमिश्र होय. या नाटकाचें संविधानक कालिदासाच्या 'मालविकाग्निमित्रा'च्या धर्तीवर रचलें आहे. नायिकेशीं जो विवाह करील त्याला चक्रवर्तिपद प्राप्त होईल, या भविष्याची कल्पना हर्षाच्या 'रत्नावली' नाटकांत प्रथम आढळते. तसेंच भासाच्या 'स्वप्नवासवदत्त' नाटकांत ऐतिहासिक पार्श्वभूमीचा उपयोग प्रथम केलेला दिसतो. पण एकंदरींत राजशेखराच्या या नाटकांत भासकालिदासांचें कल्पनाचातुर्य दिसत नाही. नाटकांतील ऐतिहासिक प्रसंगहि संविधानकाशीं एकजीव झालेला दिसत नाही. याप्रमाणे नाटक या दृष्टीने 'विद्धशालभञ्जिका' यशस्वी झाली नसली, तरी ऐतिहासिक दृष्टीने तिला महत्त्व आहे. कारण तिच्यांत युवराजदेवाने बद्दिग–अमोघवर्ष नामक आपल्या जांवयाचा पक्ष घेऊन विदर्भांतील अचलपुरा-जवळ पयोष्णीच्या (पूर्णेच्या) कांठीं राष्ट्रकूट नृपति चतुर्थ गोविंद याच्या सेनेचा पराभव केला आणि नंतर अमोघवर्षास गादीवर बसविलें या घटनेचें प्रतिबिंब पडलें आहे. या विजयोत्सवाच्या प्रसंगीं त्रिपुरी येथे कलचुरि नृपति युवराजदेव याच्या आश्रयाखाली हें नाटक प्रथम रंगभूमीवर आलें असें दिसतें.

‘काव्यमीमांसा’

त्रिपुरी येथे राजशेखराने ‘काव्यमीमांसा’ नामक साहित्यशास्त्रावरील बृहद्‌ग्रंथ लिहिण्यास आरंभ केला. त्यामध्ये त्याच्या ‘बालरामायण’, ‘बालभारत’, ‘विद्धशालभञ्जिका’ इत्यादि सर्व ग्रंथांतील उदाहरणें आढळतात. त्यांवरून तो त्याने शेवटीं रचला होता यांत संशय नाही. ग्रंथारंभींच्या उल्लेखांवरून हा ग्रंथ अठरा अधिकरणांत लिहिण्याचा राजशेखराचा विचार होता असें दिसतें. त्यामध्ये कविरहस्य, रीति, शब्दालंकार, अर्थालंकार, रस, रूपकें (नाटकें), काव्यगुण, काव्यदोष, इत्यादि सर्व विषयांचें विवेचन यावयाचें होतें. हा ग्रंथ राजशेखराच्या हातून पुरा झाला किंवा नाही हें माहीत नाही. त्याचें फक्त पहिलें अधिकरण ‘कविरहस्य’ या नांवाचें उपलब्ध झालें आहे. त्याचेच अठरा अध्याय आहेत. त्यांमध्ये शास्त्रनिर्देश, काव्यपुरुषोत्पत्ति, पदवाक्यविवेक, कविचर्या, राजचर्या, कविसमय, देशकालविशेष इत्यादि विविध विषय चर्चिले आहेत. विवेचनाच्या प्रसंगाने त्याने आपल्या व इतर कवींच्या ग्रंथांतून शेकडों उदाहरणें दिलीं आहेत. त्यांवरून हा ग्रंथ पूर्ण झाला असता तर तो साहित्याचा एक विश्वकोशच झाला असता यांत संशय नाही.

‘हरविलास’

याशिवाय राजशेखराने ‘हरविलास’ नामक आणखी एक महाकाव्य रचलें होतें, हें हेमचंद्राच्या ‘काव्यानुशासना’त त्यांतील एक श्लोक उद्धृत केला आहे त्यावरून दिसतें. हें काव्यहि त्याने शिवोपासक कलचुरि नृपतीच्या आज्ञेवरून लिहिलें असावें. त्याच्या प्रत्येक सर्गाच्या शेवटच्या श्लोकांत त्याने आपलें नांव गुंफिलें होतें अशी माहिती हेमचंद्र देतो.

या ग्रंथांखेरीज राजशेखराने पूर्वगामी संस्कृत कवींविषयीं रचलेलीं अनेक सुभाषितें ‘सूक्तिमुक्तावली’सारख्या सुभाषितसंग्रहांत आढळतात. ह्या सुभाषितांच्या अभावीं अनेक कवि अज्ञात राहिले असते यांत संशय नाही.

राजशेखराच्या काव्याचे गुणदोष

राजशेखराने ‘बालरामायण’ हें रामचरितविषयक नाटक लिहिल्यामुळे तो आपणांस वाल्मीकीचा अवतार मानीत असे. त्याचीं नाटकेंहि रामायणादि आर्ष महाकाव्यांच्या पद्धतीचीं आहेत. आपल्या ‘कर्पूरमंजरी’ नाटकांत त्याने काव्याची व्याख्या ‘उत्तिविसेसो कव्वं’ (उक्तिविशेषः काव्यम्) अशी केली आहे, त्यावरून काव्यामध्ये रसादिकांपेक्षा शब्दरचनेला जास्त महत्त्व आहे, असें त्याचें मत होतें

असें दिसतें. त्याच्या ग्रंथांतहि तोच प्रकार आढळतो. त्याच्या नाटकांत संविधानक-रचना, स्वभावचित्रण, रसपरिपोष इत्यादींकडे विशेष लक्ष दिलेलें दिसत नाही, पण शब्दावडंबरावर त्याचा विशेष भर दिसतो. त्याचें संस्कृत भाषेवर असामान्य प्रभुत्व होतें. त्यामुळे शार्दूलविक्रीडितासारख्या लांबलचक वृत्तांत रचना करणें त्याला मुळीच कठीण जात नसे. आपल्या श्लोकांत भारताच्या भिन्न भिन्न प्रदेशांचा कोणत्या ना कोणत्या मिषाने उल्लेख करण्याचा त्याला हव्यास होता. त्याच्या शैलीच्या या दोन्ही विशेषांचें अनुकरण चेदि देशांतील कवि करीत असत हें बिलहरी येथील शिलालेखावरून दिसतें. तो लेख स्वतः कवि राजशेखराला स्तुत्यर्ह वाटला असा त्यांत उल्लेख आला आहे. [१७] राजशेखराचे कांही श्लोक जरूर ते फेरफार करून नंतरच्या कोरीव लेखांत घेतलेले आढळतात.

कर्णाच्या दरबारचे कवि

यानंतर महाप्रतापी कर्ण नृपतीच्या राजवटींत पुनः चेदिसभेंत काव्याला बहर आलेला दिसतो. त्याचा राजकवि विद्यापति होता हें खालील श्लोकावरून समजतें–[१८]

वल्मीकप्रभवेण रामनृपतिर्व्यासेन धर्मात्मजो
व्याख्यातः किल कालिदासकविना श्रीविक्रमाङ्को नृपः ।
भोजश्चित्तपबिल्हणप्रभृतिभिः कर्णोऽपि विद्यापतेः
ख्यातिं यान्ति नरेश्वराः कविवरैः स्फारैर्न भेरीरवैः ।।

(राजेलोक त्यांच्या आश्रयास असलेल्या कविश्रेष्ठांच्या योगाने प्रसिद्धि पावतात, नगाऱ्यांच्या मोठ्या आवाजाने नव्हे. उदाहरणार्थ, वाल्मीकीच्यामुळे रामचंद्र, व्यासामुळे धर्मराज, कालिदासामुळे विक्रमादित्य, चित्तप, बिल्हण इत्यादि कवींमुळे भोज, आणि विद्यापतीच्या योगें कर्ण हे राजे सुप्रसिद्ध झाले.)

विद्यापति

या विद्यापतीचे कांही सुंदर श्लोक कर्णनृपतीच्या स्तुतिपर आहेत. त्यांतील एक दोन उदाहरणार्थ येथे घेऊं––

त्वं द्वित्राणि पदानि गच्छसि महीमुल्लङ्घ्य यान्ति द्विष–
स्त्वं बाणान् दश पञ्च मुञ्चसि बहून्यस्त्राणि मुञ्चन्ति ते ।
ते देवीपतयस्तवासिनिहतास्त्वं मानुषीणां पति–
स्ते निन्द्यास्तव वर्णनं कथमिति श्रीकर्ण निर्णीयताम् ।।[१९]

---

१७ क्र. ४५, श्लो. ८५.

१८ सुभाषितावलि, श्लो. १८६.

१९ सदुक्तिकर्णामृत, ३, १३, ४.

(हे श्रीकर्णा ! तूं दोन तीन पावलें चालून जातोस तों तुझे शत्रु पृथ्वीला उल्लंघून जातात. तूं पांच दहा बाण सोडतोस तों तुझे शत्रु आपलीं सर्व शस्त्रें टाकून देतात; तूं मानुषी स्त्रियांचा पति आहेस तर तुझ्या खड्गाने रणांगणावर मृत्यु आल्यामुळे तुझे शत्रु स्वर्गांत अप्सरांचे पति होतात. असें असतां ते लोकांत निन्द्य होतात आणि तुझी मात्र स्तुति होते हें कसें याचा तूंच निर्णय कर.)

कर्ण चक्षुरजीगणत्तवपितुस्तातः पिता ते पुनः
शक्त्याधारकुमारमप्यजगणत्तं कातरत्वेन सः ।
देवो गां महिषीति पश्यति जगत्तत्वं विवेक्तुं पुनः
प्रागल्भ्यं प्रथयन्ति वस्तदपि च प्रज्ञाधनाः साधवः ।।[२०]

[हे कर्णा ! तुझा पितामह आपल्या कर्णालाच डोळा मानीत असे. (हेरांकडून मिळालेल्या माहितीवरून स्वतः पाहिल्याप्रमाणे राजनीतीचा निश्चय करीत असे.) तुझा पिता ज्याच्या हातांत शक्तिरूपी आयुध आहे अशा कार्त्तिकेयाला भ्याड समजत असे. (कारण तो स्वतः शस्त्र न उचलतांच शत्रूंचा पाडाव करी.) तूं स्वतः तर गाईलाच म्हैस समजतोस. (पृथ्वीला आपली पट्टराणी मानतोस.) असें असतांहि अत्यंत बुद्धिमान् असे सज्जन तुम्ही तिघेहि तत्त्वविवेचनांत (वस्तूंच्या सत्य स्वरूपाचा निर्णय करण्यांत) हुशार आहांत असें सर्व जगाला जाहीर करतात हें आश्चर्य नव्हे काय ?]

गंगाधर

बिल्हणाच्या 'विक्रमांकदेवचरिता'वरून कर्णाच्या दरबारीं गंगाधर नामक कवि होता असें समजतें. या गंगाधराचे श्लोक श्रीधराच्या 'सदुक्तिकर्णामृतां'त घेतले आहेत. त्यांवरून तो प्रतिभासंपन्न कवि होता असें स्पष्ट दिसतें. उदाहरणार्थ, चन्द्राचें खालील वर्णन पाहा[२१]—

पञ्चेषो रिपुकोटिशातनशिलाचक्रं चकोराङ्गना-
चक्षुष्यश्चतुरब्धिताण्डवगुरुश्चौरः कृशाङ्गीरुषाम् ।
सोयं सान्द्रतमिस्रसिन्धुरघटाकण्ठीरवः कैरव-
श्रीजीवातुरमर्त्यमण्डलसुधासत्त्री दिवि द्योतते ।।

(मदनाच्या बाणांना धार लावण्याचा वाटोळा दगड, चकोरींच्या नेत्रांना आनंदित करणारा, चारी समद्रांना ताण्डवनृत्य शिकविणारा, कृशाङ्गी स्त्रियांचा

२० पूर्वोक्त, ३, ५४, २.

२१ पूर्वोक्त, १, ७५, २.

राग हरण करणारा, घनदाट अन्धकार हाच कोणी हत्तींचा कळप त्याचा नाश करणारा सिंह, कैरवकमलांच्या सौंदर्याला प्राणप्रद असलेला, आणि देवांच्या समूहाला अमृताचें भोजन घालणारा हा चंद्र आकाशांत शोभत आहे.)

बिल्हण

काश्मीरचा सुप्रसिद्ध बिल्हण कवि राजाश्रयार्थ फिरत फिरत कर्णाच्या दरबारीं आला होता. तेव्हा कर्णाची राजधानी काशी येथे होती. 'माझें सुधामधुर काव्य ऐकून डाहालनृपति कर्णाचे कर्ण अमृतरसाचा आस्वाद घेते झाले' असें बिल्हणाने आपल्या 'विक्रमांकदेवचरितां'त वर्णिलें आहे.[२२]

कालः कालञ्जरगिरिपतेर्यः प्रयाणे धरित्रीं
तुक्खाराणां खुरपुटरवैः क्षमापशून्यां चकार ।
श्रीडाहालक्षितिपरिवृढः सोऽपि यं प्राप्य वृत्तं
कर्णः कर्णामृतरसभरास्वादमन्तस्ततान ॥

(कालञ्जर पर्वताचा स्वामी चंदेल्ल नृपति याला काळासारखा झालेला, जो केवळ आपल्या घोड्यांच्या टापांच्या आवाजाने राजांची दाणादाण उडवीत असे असा डाहाल देशाचा अधिपति कर्ण माझें काव्य ऐकून कर्णामृतरसाचा आस्वाद घेता झाला.)

कर्णाच्या दरबारीं असतांना बिल्हण एकदा अयोध्येला गेला होता. तेथे त्याने भगवान् रामचंद्राच्या स्तुतिपर काव्य रचलें असें 'विक्रमांकदेवचरितां'त म्हटलें आहे. हें काव्य अद्यापि उपलब्ध झालें नाही. कर्णाच्या सभेंत कवित्वाच्या स्पर्धा होत असत. अशा एका स्पर्धेत बिल्हणाने राजकवि गंगाधराचा पराजय केला होता, असें त्याने पुढील श्लोकांत सांगितलें आहे.[२३]

नीत्वा गङ्गाधरमधरतां डाहलाधीशधाम्नि
क्रीडाक्रान्तप्रतिभटकवेः पूर्वदिक्कोटरेषु ।
निर्जित्यैरावतमदजलभ्रान्तभृङ्गालिनादान्
सुत्राम्णोऽपि श्रवसि लुठितं यस्य शङ्के कथाभिः ॥

(डाहलाधीश कर्णाच्या सभेंत गंगाधराचा पाडाव केल्यावर लीलेने प्रतिस्पर्धी कवींचा पराजय करणाऱ्या त्या बिल्हण कवीच्या कथा जणू काय पूर्व दिशेच्या

२२ विक्रमांकदेवचरित, १८, ९३.
२३ पूर्वोक्त, १८, ९५.

गुहांत ऐरावताच्या मदजलाने आकृष्ट झालेल्या भ्रमरसमूहांच्या गुंजारवाला दूर सारून प्रत्यक्ष इंद्राच्या कर्णाप्रत पोंचल्या.)

वल्लण

कर्णाच्या दरबारीं वल्लण, कर्पूर व नाचिराज असे आणखीहि कित्येक नामांकित संस्कृत कवि होते. वल्लण हा श्रेष्ठ कवि होता. त्याचीं कित्येक सुभाषितें 'कवीन्द्रवचनसमुच्चय', 'सदुक्तिकर्णामृत' इत्यादि सुभाषितसंग्रहांत घेतलीं आहेत. त्यांपैकी कर्णस्तुतिपर खालील श्लोक पाहा[२४]--

लक्ष्मीसद्मसरोजरेणुसुहृदः सेवावनम्रीभवद्-
भूमीपालकिरीटरत्नकिरणज्योत्स्नानदीवालुकाः ।
जीयासुः कलिकाल कर्णनृपते दारिद्रचदारूदर-
व्याघूर्णद्घुणवृन्दलङ्घनमुषस्त्वत्पादयोः पांशवः ।।

[हे कलियुगाला काळासारख्या असणाऱ्या कर्णराजा, लक्ष्मीचें निवासस्थान जें कमल त्याच्या परागासारखे असलेले, तसेंच सेवेकरिता तुझ्यापुढे नम्र झालेल्या नृपतींच्या किरीटांतील रत्नांच्या किरणांचा चन्द्रप्रकाश हीच कोणी नदी तींतील वाळूचे कण असे व जनतेला दारिद्र्यरूपी पोखरणाऱ्या किडयांचा नाश करणारे असे तुझ्या पायांचे रजःकण (सदैव) विजयी होवोत !]

नाचिराज

नाचिराज व कर्पूर कवींच्या कथा मेरुतुङ्गाच्या 'प्रबन्धचिन्तामणीं'त आल्या आहेत. नाचिराज हाहि कवि प्रथितयश होता. मुंज व भोज यांच्या निधनानंतर तोच देवी सरस्वतीचा आश्रयस्थान झाला आहे असें एका श्लोकांत म्हटलें आहे. त्यावरून कविश्रेणींत त्याचें स्थान प्रत्ययास येतें. त्याने कर्णस्तुतिपर खालील श्लोक रचला होता[२५]--

कुक्षेः कोटर एव कैटभरिपुर्धत्ते त्रिलोकीमिमा-
मन्तर्भूरिभरं बिभर्ति तमपि प्रीतो भुजङ्गाधिपः ।
श्रीकण्ठस्य स कण्ठसूत्रमभवद्देव त्वया तं हृदा
बिभ्राणेन परेषु विक्रमकथा श्रीकर्ण निर्णाशिता ।।

---

२४ सदुक्तिकर्णामृत, ३, १०, २.

२५ सु. मु., प्रस्तावना, पृ. ३९.

(कैटभरिपु भगवान् विष्णु आपल्या उदरांत स्वर्ग, मृत्युलोक व पाताल हे तीन्ही लोक धारण करतो. भुजङ्गाधिपति शेष त्या महान् भारासह विष्णूचाहि भार आनंदाने आपल्या शरीराची शय्या करून सहन करतो. तो शेष भगवान् शंकराचें कंठभूषण झाला आहे. हे श्रीकर्णा, त्या शंकरालाहि आपल्या हृदयांत धारण करून तूं इतरांची स्वपराक्रमाची बढाई पूर्णपणे बंद पाडली आहेस.)

कर्पूर

नाचिराजाप्रमाणे कर्पूर हाहि कवि आपल्या काव्याने सुविख्यात झाला होता. त्याचीं कांही सुभाषितें सुभाषितसंग्रहांत घेतलीं आहेत. उदाहरणार्थ, 'सुक्तिमुक्तावलीं'तील खालील श्लोक पाहा[२६]—

तुभ्यं दासेर दासीयं बदरी यदि रोचते ।
एतावत्येव किं द्राक्षा न साक्षादमृतप्रिया ।।

[कवि उंटाला म्हणतो, 'अरे उंटा ! तुला ही कांटेरी बदरी (बोर) जर आवडते तर आम्हाला ही द्राक्षा प्रत्यक्ष अमृतासारखी प्रिय कां बरें होऊ नये ?]

कर्पूर कवीने कर्णाच्याविषयीं खालील श्लोक रचला होता—[२७]

मुखे हारावाप्तिर्नयनयुगले कङ्कणभरो
नितम्बे पत्राली सतिलकमभूत्पाणियुगलम् ।
अरण्ये श्रीकर्ण त्वदरियुवतीनां विधिवशा-
दपूर्वोऽयं भूषाविधिरहह जातः किमधुना ।।

[हे श्रीकर्णा ! तुझ्या शत्रूंच्या स्त्रिया भीतीने अरण्यांत पळून जात असतां त्यांचे हार कंठांत नसून मुखामध्यें होते. (त्या चोर चोर म्हणून ओरडूं लागल्या.) त्यांचीं कंकणें हातांत नसून डोळ्यांत दिसूं लागलीं. (त्यांच्या डोळ्यांत अश्रु आले.) पत्राली (चंदनाची वेलपत्ती) स्तनांवर न दिसतां नितंबावर दिसूं लागली. (वस्त्रांच्या अभावीं त्यांना लज्जारक्षणार्थ पानांचा उपयोग करावा लागला.) आणि तिलक कपाळावर न दिसतां दोन्ही हातांवर दिसूं लागला. (हाताला घट्टे पडले.) अरेरे ! दुर्दैवाने त्यांची वेषभूषा अशा प्रकारची अपूर्व झाली काय ?]

---

२६ सू. मु., पृ. ९०.
२७ प्रबन्धचिन्तामणि, पृ. ५०.

राजसभेंतील समस्यापूर्ति

कर्णाच्या राजसभेंत समस्यापूर्तीच्या स्पर्धा होत असत. अशा स्पर्धांत ज्यांचे श्लोक उत्कृष्ट ठरत त्यांस मोठमोठीं बक्षिसें देण्यांत येत असें दिसतें. कांही वर्षांपूर्वी सर् जॉर्ज ग्रीयरसन यांनी काशींत डहरिया कर्ण (डाहलाधिपति कर्ण) याच्याविषयी एक विलक्षण आख्यायिका ऐकली होती. ती त्यांनी इंटियन् अँटिक्वरी या संशोधनमासिकांत (पु. १६, पृ. ४६ इ.) 'भारतीय वाङ्मयांतील विलक्षण गोष्टी' या सदराखाली प्रसिद्ध केली होती. ती आख्यायिका येणेप्रमाणे–

एकदा डहरिया कर्ण राजा आपल्या मातेला घेऊन स्नानाकरिता गंगेला गेला. गंगाघाटावर त्याने आपल्या मातेकडून सवा लाख गाईंचें दान करविलें. त्याच बेळीं एक गरीब ब्राह्मणहि आपल्या मातेसह गंगास्नानासाठीं तेथे आला होता. त्यानें आपल्या मातेला इष्ट तें दान ब्राह्मणांना देण्याविषयी सांगितलें. तेव्हा तिने 'मलाहि असेंच सपादलक्ष गोदान करावयाचें आहे' असें म्हटलें. तेव्हा ब्राह्मणाने शपथ घेतली की 'मी डहरिया कर्णाच्या मुसक्या बांधून तुझ्या पुढे आणीन आणि त्याच्याकडून तुझ्या दानाची पूर्ति करवीन.' राजाने ब्राह्मणाची ही शपथ ऐकतांच गडबडीने आपलें स्नानादि कार्य संपवून आपल्या राजवाड्याकडे प्रयाण केलें, आणि कोणाहि ब्राह्मणाला आपणांकडे आणूं नये अशी नोकरांना सक्त ताकीद दिली. ब्राह्मणाने राजवाड्यांत येऊन राजाची भेट घेण्याचा पुष्कळ प्रयत्न केला पण त्याला त्यांत यश आलें नाही. तेव्हा तो राजवाड्यासमोर एक झोंपडी बांधून तींत राहूं लागला. भाद्रपद महिन्यांतील एका रात्रीं दाट अंधकार पडून विजा चमकत असतां व भयंकर घनगर्जना होत असतां त्या ब्राह्मणाने मल्लार राग गाण्यास सुरवात केली. त्या रागाचे आलाप कर्णाच्या शयनागारांत ऐकूं गेले, तेव्हा त्याची राणी पतीला सोडून त्या मुसळधार पावसांत ब्राह्मणाच्या झोंपडींत गेली आणि तिने त्याला आपला स्वीकार करण्याविषयी विनविलें. ती अंतःपुरांतून गेली तेव्हा राजा जागा होताच; तोहि तिच्या मागोमाग गुप्तपणें ब्राह्मणाच्या झोंपडींत आला. ब्राह्मण राणीचें म्हणणें कबूल करीना. त्याने तिला परत जाण्यास सांगितलें. तेव्हा ती म्हणाली––

अनाहूतैवैमि प्रचुरगुणलोभेन भवतः
समीहे सौहार्दं तदपि परितापं च तनुते ।
विदग्ध त्वामेवं तदिह परियाचे कुरु तथा
यथा नश्यादालीकपटकरतालीकटुरवः ॥

(मी आपल्या अनेक गुणांच्या लोभाने आकृष्ट होऊन आगंतुकपणे आली आहे. मला आपल्या प्रेमाची इच्छा आहे, पण तें प्रेमच मला ताप देत आहे. तेव्हा, हे चतुर गृहस्था, मी आता आपणांस एवढीच प्रार्थना करतें की मी परत गेल्यावर माझ्या सखींच्या कपटाने वाजविल्या जाणाऱ्या टाळ्यांचा आवाज नाहीसा होईल असें करा.)

तें ऐकून ब्राह्मण म्हणाला--

उन्नादाम्बुदवर्धितान्धतमसप्रभ्रष्टदिङ्मण्डले
यामे यामिकजाग्रदुग्रसुभटव्याकीर्णकोलाहले ।
कर्णास्यारिमहार्णवाम्बुवडवावह्नेर्यदन्तःपुरा-
दायातासि तदम्बुजाक्षि कृतकं मन्ये भयं योषिताम् ॥

[हे कमलाक्षी स्त्रिये ! या वेळीं भयंकर गर्जना करणाऱ्या मेघांच्या योगाने दाट अंधकार पडल्यामुळे दिशा अस्पष्ट झाल्या आहेत. पहारेकरी आणि जागृत असलेले उग्र सैनिक यांच्या आरोळ्यांनी सर्वत्र कोलाहल झाला आहे; अशा वेळीं शत्रुरूपी महासागराला वडवानलाप्रमाणे असलेल्या कर्ण राजाच्या अंतःपुरांतून तूं (एकटी) आली आहेस. तेव्हा स्त्रियांचें भय कृत्रिम असतें असें मला वाटतें.]

शेवटीं 'तुम्ही आणखी एकदा मल्लार राग गाल तर मी परत जाईन' असें राणी म्हणाली आणि ब्राह्मणाने तसें केल्यावर ती परत गेली. राजाहि अगोदरच जाऊन बिछान्यावर पडला होता. त्याला ब्राह्मणाच्या सच्चारित्र्याने मोठा संतोष झाला, व तो त्या गोष्टीविषयी विचार करूं लागला.

दुसऱ्या दिवशीं राजाने ब्राह्मणाला बोलावून म्हटलें, "आपण काल रात्रीं म्हटला होता तो श्लोक आणखी एकदा म्हणा बरें. मला त्याचा शेवटचा भाग 'कृतकं मन्ये भयं योषिताम्' एवढाच आठवतो." हे राजाचे शब्द ऐकतांच ब्राह्मणाची भयाने गाळण उडाली. राजा गेल्या रात्रीं गुप्तपणे आपल्या झोंपडींत आला होता व त्याने तेथे जें घडले तें समक्ष पाहिलें होतें हें त्याला माहीत नव्हतें. तेव्हा राणीने कांहीतरी खोटेंच राजाला सांगितलें असावें आणि त्यामुळे राजाचा आपणांवर कोप झाला असावा असें त्याला वाटलें. गेल्या रात्रीचा खरा प्रकार आपण राजाला सांगितला तर आपली धडगत नाही हें त्याने जाणलें. तो प्रत्युत्पन्न-मति होता. म्हणून त्याने 'कृतकं मन्ये भयं योषिताम्' हे शब्द असलेला खालील श्लोक नवीनच रचून म्हटला--

उद्यद्ग्राहमुदन्वतो जलमतिक्रामत्यनालम्बिनि
व्योम्नि भ्राम्यति दुर्गमक्षितिभृतां मूर्धानमारोहति ।
व्याप्तं याति विषाकुलैरहिकुलैः पातालमेकाकिनी
कीर्तिस्ते मदनाभिराम कृतकं मन्ये भयं योषिताम् ।।

(हे मदनासारख्या सुंदर राजा ! तुझी कीर्ति ज्यामध्ये मोठमोठे जलचर प्राणी वर येत आहेत अशा समुद्राचें जल एकटी ओलांडून जाते, ज्याला काही आधार नाही अशा आकाशांत भ्रमण करते, दुर्गम अशा पर्वतांच्या शिखरांवर आरूढ होते, विषारी सर्पांनी व्यापलेल्या पातालांत प्रवेश करते. तेव्हा स्त्रियांचें भय कृत्रिम असतें, असें माझें मत आहे.')

आदल्या रात्रीचा प्रसंग राजाने समक्ष पाहिला होता त्यामुळे त्या ब्राह्मणाच्या सच्चारित्र्याविषयी त्याची खात्री पटली होती. तशांत त्याने तत्क्षणीं दीर्घवृत्तांत सुंदर नवीन श्लोक रचून म्हटल्यामुळे तर त्याच्याविषयी त्याचा आदर द्विगुणित झाला. त्यावेळीं राजा पूर्वेकडे तोंड करून बसला होता. त्या दिशेचें आपलें राज्य त्या ब्राह्मणाला देण्याचा संकल्प करून त्यानें उत्तरेकडे आपलें तोंड फिरविलें. ब्राह्मणाला वाटलें की राजाला आपला अधिकच राग आला असावा. म्हणून त्याला संतुष्ट करण्याकरिता त्याने खालील श्लोक म्हटला--

कीर्तिस्ते नृप दूतिका मुररिपोरङ्के स्थितां भारतीं
मां चाकृष्य ददौ तदेति गिरिशः श्रुत्वार्धनारीश्वरः ।
ब्रह्माभूच्चतुराननः सुरपतिश्चक्षुःसहस्रं दधौ
स्कन्दो मन्दमतिर्विवाहविमुखो धत्ते कुमारव्रतम् ।।

[हे राजा ! तुझ्या कीर्तिरूपी दूतीने विष्णूच्या मांडीवर बसलेल्या सरस्वतीला व लक्ष्मीला फुसलावून तुला दिलें, हें ऐकतांच शंकर अर्धनारीश्वर झाला (पार्वतीला आपल्या अर्धांगांत जागा देता झाला). ब्रह्मा (सर्व दिशांना आपली दृष्टि पोंचावी म्हणून) चतुर्मुख बनला; इंद्राने सहस्रनेत्र धारण केले; आणि मन्दबुद्धि कार्त्तिकेयाने तर विवाहाची गोष्टच सोडून (सदैव) कुमारव्रत (ब्रह्मचर्य) स्वीकारलें.]

राजा हा श्लोक ऐकून तर जास्तच आनंदित झाला आणि आपल्या समोरच्या उत्तर दिशेचेंहि राज्य त्याला देण्याचा निश्चय करून त्यानें आपलें तोंड पश्चिमेकडे वळविलें. तें पाहून ब्राह्मण जास्तच भयभीत झाला आणि राजाला संतुष्ट करण्यासाठी त्याने खालील श्लोक म्हटला--

कर्णाच्या दरबारचे प्राकृत व अपभ्रंश कवि

कर्णाने प्राकृत व अपभ्रंश कवींनाहि उदार आश्रय दिला होता असें दिसतें. त्याच्या दरबारच्या अनेक कवींनी त्याच्या विजयांचें वर्णन करणाऱ्या प्राकृत व अपभ्रंश गाथा रचल्या होत्या. त्यापैकी कांही 'प्राकृतपैंगलां' त उद्धृत केल्या आहेत. उदाहरणार्थ महाराष्ट्री प्राकृतांतील खालील गाथा[२८] पाहा--

सोऊण जस्स णामं अंसू णअणाइ सुमुहि रुंद्धंति ।
भण वीरचेइपइणो पेछामि मुहं कहं जहिछं से ॥

[चेदिराजावर अनुरक्त झालेली एक स्त्री आपल्या सखीला म्हणते— हे सुमुखी, ज्याचें नांव ऐकल्याबरोबर डोळ्यांत (आनंदाचे) अश्रु उभे राहतात त्या शूर चेदिराजाचें मुख मी यथेच्छ कसें बरें पाहूं ?]

कित्येक अपभ्रंश गाथांत कर्णाच्या विजयांचा उल्लेख असल्यामुळे त्यांना ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झालें आहे. उदाहरणार्थ, खालील गाथा पाहा–[२९]

जे गंजिअ गोलाहिवइ राउ उद्दंड ओड्ड जसु भअ पराउ ।
गुरुविक्कम विक्कम जिणिअ जुज्झ ता कण्ण परक्कम कोइ बुज्झ ॥

[हे कर्णा ! तूं गौडाधिपतीचा पराभव केला. तुझ्या भीतीने शस्त्रधारी उत्कल (ओरिसा) देशाचा राजा पळून गेला. महापराक्रमी विक्रमादित्याला (सुद्धा) तूं युद्धांत खडे चारलेस. त्या तुझा पराक्रम यथार्थतः कोण जाणूं शकेल ?]

हणु उज्जरगुज्जरराअदलं
बलदलिअबलिअमरहट्ठबलम् ।
बलमोलिअमालवराअकुला
कुलउज्जल कलचुरि कण्ण फुला ॥

(ज्याने गुर्जरराजाच्या बलाढ्य सैन्याचा नाश केला; ज्याने आपल्या सैन्याच्या योगें महाप्रतापी महाराष्ट्राच्या सैन्याचा पाडाव केला; ज्याने आपल्या प्रतापाने मालव राजाच्या कुलाचें निर्मूलन केलें तो उज्ज्वल कलचुरिवंशी कर्ण शोभत आहे.)

---

२८ प्राकृतपैंगल (बिब्लिऑथिका इंडिका आवृत्ति), १, ६९.
२९ पूर्वोक्त, १, १२६.

या गाथांतील बहुतेक विजय तत्कालीन कोरीव लेखांतहि उल्लेखिले आहेत, त्यावरून त्यांतील वर्णनाची सत्यता प्रत्ययास येते. ज्या 'प्राकृतपैंगलां'त या गाथा उदाहरण म्हणून उद्धृत केल्या आहेत त्यामध्ये ज्यांनी त्या रचल्या होत्या त्या कवींचीं नांवें दिलीं नाहींत. त्यामुळे कर्णाच्या दरबारच्या प्राकृत कवींविषयी आपणांस कांही माहिती मिळत नाही. त्यांपैकी कांहींनी सुभाषितांशिवाय प्राकृत व अपभ्रंश काव्येंहि रचलीं असावीं, पण तीं अद्यापि उपलब्ध झालीं नाहीत. तथापि 'करकंडचरिउ' या अपभ्रंश काव्याचा कर्ता कनकामर कवि हा कांही काळ कर्णाच्या दरबारीं होता असें दिसतें. त्यानें स्वतःचें वर्णन 'कण्णनरिंदउ आसयरंजणु' (कर्णनृपतीचें मनोरंजन करणारा) असें केलें आहे.[३०] हा कर्ण कलचुरिनृपति कर्ण असावा.

चेदि देशांतील अज्ञात कवि

वर उल्लेखिलेल्या संस्कृत, प्राकृत व अपभ्रंश कवींशिवाय इतर अनेक कवि चेदिदेशांत होऊन गेले. त्यांचीं नांवें अज्ञात आहेत, पण त्यांच्या सुंदर काव्यांचे नमुने आपणांस तत्कालीन कोरीव लेखांत आढळतात. त्यांपैकी कांही उदाहरणें येथे घेऊं--

कारीतलाई शिलालेखांत लक्ष्मणराजाचा मंत्री सोमेश्वर याचें वर्णन खालील श्लोकांत केलें आहे[३१]--

> धिषणान्वितोऽपि काव्यप्रियोऽपि बुधसंगतोऽपि तच्चित्रम् ।
> यत्सकलग्रहरहितः श्रीमद्भूमिप्रसूनुरसौ ।।

(हा सोमेश्वर स्वतः भूमिप्रसूनु म्हणजे मंगळ आहे; याच्याबरोबर धिषण म्हणजे गुरु आहे; याला शुक्र प्रिय आहे आणि हा सदैव बुधाच्या संगतींत असतो. असें असतांहि याला सर्वग्रहरहित म्हणतात हें आश्चर्य होय.) यांत विरोधाभास अलंकार आहे. वरील वर्णनांत आपाततः विरोध आहे. धिषण, काव्य, बुध, ग्रह, भूमिप्रसूनु यांवर श्लेष आहेत. या शब्दांचा दुसरा अर्थ घेतला म्हणजे विरोध नाहींसा होतो. कसा तो पाहा. (हा सोमेश्वर नामक गृहस्थ बुद्धियुक्त, काव्यप्रिय, विद्वानांच्या सहवासांत असलेला असा असून सर्व पूर्वग्रहांपासून मुक्त आहे.)

---

३० करकंडचरिउ, पृ. १०७.

३१ हा लेख अद्यापि अप्रकाशित आहे.

या सोमेश्वराने कारीतलाई विष्णूच्या वराहावताराचें एक गगनचुंबी देवालय बांधलें होतें. त्याचें वर्णन दुसऱ्या कारीतलाई शिलालेखांत पुढील-प्रमाणें केलें आहे.[३२]

ध्वजपटविकटान्तभ्रान्तिसर्पत्समीरे
मिलदमलसरित्केऽवश्यमस्योत्तमाङ्गे ।
तरुणिरननुभूतं यामयुग्माभिगम्ये
निजरथतुरगाणां वातपृष्ठं ददाति ।।

(या देवळाच्या शिखरावर ध्वजपटाचा वारा व आकाशगंगा एकत्र होत असल्याने दोन प्रहरीं येथें आल्यावर सूर्य आपल्या रथाच्या घोड्यांना असा खरारा करतो कीं तसा त्यांना इतरत्र कोठेहि अनुभवावयास मिळत नाही.)

दक्षिण कोसलांतील कवि

दक्षिण कोसलांतहि कलचुरि राजांच्या दरबारीं अनेक उत्कृष्ट संस्कृत कवि होऊन गेले. त्यापैकी नारायण नामक कवीने 'रामाभ्युदय' नामक काव्य रचलें होतें, अशी माहिती पुजारीपालि शिलालेखांत मिळते.[३३] 'रामाभ्युदय' नांवाचीं अनेक काव्यें व नाटकें प्राचीनकाळीं लिहिलीं होती. त्यापैकी कांही सध्या उपलब्ध आहेत. पण या सर्वांहून हें काव्य निराळें दिसतें.

याशिवाय अनेक संस्कृत कवींची सुंदर रचना प्रशस्तिरूपानें विद्यमान आहे. उदाहरणार्थ, वल्लभराजाने कोटगड येथें खोदलेल्या वल्लभसागर नामक तलावाचें खालील श्लेषयुक्त वर्णन पाहा–[३४]

दधदखिलक्षणभङ्गं निस्सामान्यं प्रमाणरमणीयम् ।
सौगतमतमिव लोके वल्लभसागरसरो भाति ।।

(हें वल्लभसागर नामक सरोवर बौद्ध मताप्रमाणे शोभतें. बौद्धमतामध्यें सर्व वस्तु क्षणिक असतात असें प्रतिपादिलें आहे; त्यामध्ये सामान्य किंवा जाति या पदार्थाला मान्यता नाही आणि तें प्रमाणांच्या योगें रमणीय वाटतें. त्याप्रमाणें हें सरोवर आपल्या रम्यतेने सर्व लोकांचें लक्ष आकृष्ट करून त्यांचा वेळ घालवतें; ते अनुपमेय आहे आणि प्रमाणशीरपणामुळे रमणीय भासतें.)

---

३२ क्र. ४२, श्लो. २३.
३३ क्र. ११४, श्लो. ४३.
३४ क्र. ८४, श्लो. २४.

रत्नपुरच्या कलचुरींच्या दरबारीं प्राकृत कवींनाहि राजाश्रय मिळत असे. रत्नपुरच्या जवळ एका टेंकडीवर एकवीरा देवीचें देवालय आहे. त्यांत पूर्णपणे प्राकृतमध्ये लिहिलेला शिलालेख अद्यापि विद्यमान आहे. दुर्दैवाने तो आता बराच खराब झाला असल्यामुळें वाचतां येत नाही, पण त्यावरून त्या काळीं प्राकृत भाषेंतहि काव्यरचना होत होती हें स्पष्ट होतें.

कलचुरींच्या सत्तेचा ऱ्हास होऊं लागला तेव्हा काव्यरचनेलाहि ओहोटी लागली. शेवटच्या काळांतील कोरीव लेख अत्यंत अशुद्ध भाषेंत लिहिलेले आढळतात. त्यांत काव्याचा तर पूर्णपणें अभावच आहे.

परिशिष्ट पहिलें

कलचुरींच्या वंशावळी

(कारकीर्दीचीं वर्षें अदमासानें दिलीं आहेत.)

(१) माहिष्मतीचे कलचुरि

कृष्णराज (इ. स. ५५०–५७५)

|

शंकरगण (इ. स. ५७५–६००)

|

बुद्धराज (इ. स. ६००–६२०)

(२) त्रिपुरीचे कलचुरि

वामदेवराज (इ. स. ६७५–७००)

⋮

प्रथम शंकरगण (इ. स. ७५०–७७५)

⋮

प्रथम लक्ष्मणराज (इ. स. ८२५–८५०)

|

प्रथम कोकल्ल (इ. स. ८५०–८९०)

- द्वितीय शंकरगण–मुग्धतुंग–प्रसिद्धधवल–रणविग्रह (इ. स. ८९०–९१०)
  - बालहर्ष (इ. स. ९१०–९१५)
  - प्रथम युवराजदेव (इ. स. ९१५–९४५) (राज्ञी नोहला)
- अर्जुन
  - आमणदेव

प्रथम युवराजदेव (इ. स. ९१५–९४५)
(राज्ञी नोहला)
|
द्वितीय लक्ष्मणराज (इ. स. ९४५–९७०)
(राज्ञी राहडा)

- तृतीय शंकरगण (इ. स. ९७०–९८०)
- द्वितीय युवराजदेव (इ. स. ९८०–९९०)
  - द्वितीय कोकल्ल (इ. स. ९९०–१०१५)
    - गांगेयदेव (इ. स. १०१५–१०४१)
      - कर्ण (इ. स. १०४१–१०७३) (राज्ञी आवल्लदेवी)
        - यशःकर्ण (इ. स. १०७३–११२३)
          - गयाकर्ण (इ. स. ११२३–११५३)
            - नरसिंह (इ. स. ११५३–११६३)
            - जयसिंह (इ. स. ११६३–११८८)
              - विजयसिंह (इ. स. ११८८–१२१०)
                - अजयसिंह

(३) सरयूपारचे कलचुरि

प्रथम शंकरगण (इ. स. ६२०–६५०)
|
नन्नराज (इ. स. ६५०–६७५)

- वामराजदेव (इ. स. ६७५–७००)
- प्रथम लक्ष्मण (इ. स. ७००–७२५)

प्रथम लक्ष्मण (इ. स. ७००–७२५)
|
प्रथम शिवराज (इ. स. ७२५–७५०)
|
प्रथम भीमट (इ. स. ७५०–७७५)
|
द्वितीय लक्ष्मण ऊर्फ राजपुत्र
(इ. स. ७७५–८००)
|
द्वितीय शिवराज (इ. स. ८००–८२५)
|
द्वितीय शंकरगण (इ. स. ८२५–८५०)
(राज्ञी भूदा)
|
तृतीय लक्ष्मण––प्रथम गुणसागर
(इ. स. ८५०–८७५)
|
(राज्ञी कांचना) (राज्ञी मदनदेवी)

उल्लभ–द्वितीय भीमट
(इ. स. ८७५–८९०)

प्रथम भामान (इ. स. ८९०–९०५)
(राज्ञी देहट्टदेवी)
|
तृतीय शंकरगण––मुग्धतुंग
(इ. स. ९०५–९३०)
(राज्ञी विद्या)
|
द्वितीय गुणसागर (इ. स. ९३०–९५५)
(राज्ञी राजवा)
|
तृतीय शिवराज–द्वितीय भामान
(इ. स. ९५५–९८०)
(राज्ञी सुगल्लदेवी)

तृतीय शिवराज–द्वितीय भामान
(इ. स. ९५५–९८०)
(राज्ञी सुगल्लदेवी)
|
चतुर्थ शंकरगण (इ. स. ९८०–१००५)
(राज्ञी यशोलेखा)
|
भीम (तृतीय भीमट)
(इ. स. १००५–१०३१)
(राज्ञी लावण्यवती)
|
व्यास (इ. स. १०३१–१०५५)
|
सोढदेव (इ. स. १०५५–१०८०)

(४) रत्नपुरचे कलचुरि

कलिंगराज (इ. स. १०००–१०२०)
|
कमलराज (इ. स. १०२०–१०४५)
|
प्रथम रत्नदेव (इ. स. १०४५–१०६५)
(राज्ञी नोनल्ला)
|
प्रथम पृथ्वीदेव (इ. स. १०६५–१०९०)
|
प्रथम जाजल्लदेव (इ. स. १०९०–११२०)
(राज्ञी लाच्छल्लदेवी)
|
द्वितीय रत्नदेव (इ. स. ११२०–११३५)
|
द्वितीय पृथ्वीदेव (इ. स. ११३५–११६५)
|
जगद्देव (इ. स. ११७०–११७५)
द्वितीय जाजल्लदेव
(इ. स. ११६५–११७०)

जगद्देव (इ. स. ११७०–११७५)

तृतीय रत्नदेव (इ. स. ११७५–१२००)

प्रतापमल्ल (इ. स. १२००–१२२५)

लक्ष्मीदेव (इ. स. १३२५–१३५५)

सिंहण (इ. स. १३५५–१३७५)

(रत्नपुर शाखा)

डंघीर (इ. स, १३७५–१४००)

मदनब्रह्मा (इ. स. १४००–१४२५)

रामचंद्र (इ. स. १४२५–१४५०)

रत्नसेन (इ. स. १४५०–१४८०)
(राज्ञी गुंडायी)

वाहर (इ. स. १४८०–१५२५)

(रायपुर शाखा)

रामचंद्र (इ. स. १३७५–१४००)

ब्रह्मदेव (इ. स. १४००–१४२५)

परिशिष्ट दुसरें

कलचुरिकालीन कोरीव लेखांची सूची

[खालील क्रमांक व पृष्ठांक इन्स्क्रिप्शन्स् ऑफ दि कलचुरि–चेदि ईरा (कलचुरि–चेदि संवताचे कोरीव लेख), भाग १ व २, या इंग्रजी ग्रंथांतील कोरीव लेखांचे व पृष्ठांचे आहेत. *]

भाग पहिला

माहिष्मतीच्या कलचुरींचे लेख

त्रिपुरीच्या कलचुरींचे लेख

* या सूचींत इतर राजवंशांचे कोरीव लेख दिले नाहीत.

क्रमांक पृष्ठांक

किरकोळ लेख

भाग दुसरा

सरयूपारच्या कलचुरींचे लेख

रत्नपुरच्या कलचुरींचे लेख

रायपुरच्या कलचुरींचे लेख

किरकोळ लेख


अलीकडे सांपडलेले लेख

परिशिष्ट

पूरक लेख

परिशिष्ट तिसरें

राष्ट्रकूट व कलचुरि राजवंशांचे संबंध



परिशिष्ट चौथें

कलचुरींचे कांहीं कोरीव लेख

माहिष्मतीचे कलचुरि

१ बुद्धराजाचा वडनेर ताम्रपट : [कलचुरि] संवत् ३६०

[हा ताम्रपट नाशिक जिल्ह्याच्या चांदवड तालुक्यांतील वडनेर गांवीं सांपडला होता. यामध्ये कटच्चुरि (कलचुरि) वंशांतील कृष्णराज, त्याचा पुत्र शंकरगण व त्याचा पुत्र बुद्धराज यांचें वर्णन आलें आहे. बुद्धराजाने हा ताम्रपट वैदिश येथील आपल्या विजयस्कन्धावारांतून (विजयी शिबिरांतून) (कलचुरि) संवत् ३६०, भाद्रपद शुक्ल त्रयोदशीस (तारीख ८ आगष्ट इ. स. ६१० रोजीं) दिला होता. त्यांत वटनगर भोगांतील भट्टौरिका गांवाजवळील कोणियानां (वाटक) हा गांव वटनगर येथील वाजसनेय माध्यन्दिन शाखेच्या काश्यपगोत्री बोधस्वामी नामक ब्राह्मणास बलि, चरु, अग्निहोत्र, वैश्वदेव इत्यादि पञ्चमहायज्ञांच्या अनुष्ठानाकरितां दिल्याचा उल्लेख आहे. वैदिश म्हणजे हल्लीचें मध्यभारतांतील भिलशाजवळचें बेसनगर. वटनगर म्हणजे नाशिक जिल्ह्यांतील वडनेर. भट्टौरिका हें वडनेरच्या वायव्येस सुमारे ११ मैलांवरचें भाटोरा आणि कोणियानां वाटक हें भाटोऱ्याच्या ईशान्येस असलेलें कण्हुवाडी गांव असावें.]

वाचन

पहिला पत्रा

ओळ

१ सिद्धम् स्वस्ति । विजयस्कन्धावाराद्वैदिशवासकाच्छरदुपगमप्रसन्नगगनतल-विमलविपुलविविधपुरु-

२ षरत्नगुणकिरणनिकरावभासिते महासत्त्वापाश्रयदुर्ल्लङ्घे गाम्भीर्य्यवति स्थित्यनुपालनपरे महोदधा–

३ विव कटच्चुरीणामन्वये सकलजनमनोहरया चन्द्रिकयेव कीर्त्या भुवनमवभासयन्ना जन्मन एव पशु–

४ पतिसमाश्रयपर X कलङ्कदोषरहित X कुलकुमुदवनलक्ष्मीविबोधनश्चन्द्रमा इव श्रीकृष्णराजो यः

५ संश्रयविशेषलोभादिव सकलैराभिगामिकैरितरैश्च गुणैरुपेतस्संपन्नप्रकृतिमण्डलो यथावत्

६ आत्मन्याहितशक्तिसिद्धिर्येन च रुचिरवंशशोभिना नियतमस्खलितदानप्रसरेण प्रथितबलगरिम्णा

७ वनवारणयूथपेनेवाविशङ्कं विचरता वनराजय इवावनमिता दिशो यस्य च शस्त्रमापन्न–

८ त्राणाय विग्रह ⁞ पराभिमानभङ्गाय शिक्षितं विनयाय विभवार्ज्जनं प्रदानाय प्रदानं धर्म्माय

९ धर्म्मश्श्रेयोवाप्तये । तस्य पुत्र ⁞ पृथिव्यामप्रतिरथश्चतुरुदधिसलिलास्वादितयशा धनदवरुणेन्द्रान्तक–

१० समप्रभावस्स्वबाहुबलोपात्तोर्ज्जितराजश्री ⁞ प्रतापातिशयोपनतसमग्रसामन्तमण्डलः

११ परस्परापीडितधर्म्मार्त्थकामनिषेवी प्रणतिमात्रसुपरितोषगम्भीरोन्नतहृदयः स्सम्यक्प्रजापालनाधि–

१२ गतभूरिद्रविणविश्राणनावाप्तधर्म्मक्रियश्चिरोत्सन्नानां नृपतिवंशानां प्रतिष्ठापयिता अत्युच्छ्रितानां

१३ उन्मूलयिता दीनान्धकृपणसमभिलषितमनोरथाधिकनिकामफलप्रद ⁞ पूर्व्वापरसमुद्रान्तादिदेशस्वामी

१४ मातापितृपादानुद्ध्यात ⁞ परममाहेश्वरः श्रीशङ्करगणः । तस्य पुत्रस्तत्पादानुद्ध्यातस्सकलमहीमण्डलैक–

१५ तिलकस्सातिशयप्रथितनयविनयदयादानदाक्षिण्यधैर्य्यशौर्य्यस्थैर्य्याद्यशेषगुणसमन्वितः

१६ प्रबलरिपुबलोद्भूतदर्प्पविभवप्रध्वंसहेतुस्सेतु स्थितीनामायतनं सिद्धेरप्रतिहतचक्रः

१७ चक्रधर इवार्त्तिप्रशमनकर ⁞ प्रजानां परममाहेश्वरः श्रीबुद्धराजस्सर्व्वानेव राज–

दुसरा पत्रा

ओळ

१८ सामन्तभोगिकविषयपतिराष्ट्रग्राममहत्तराधिकारिकादीन् समाज्ञापयत्यस्तु वो विदितमस्माभिः

१९ वटनगरभोगे भट्टउरिकाप्रत्यासन्नकोणियाणां एष ग्रामस्सोद्रङगस्सोपरिकर-स्सर्व्वादान-

२० संग्राह्यस्सर्व्वदित्यविष्टिप्रातिभेदिकापरिहीणो भूमिच्छिद्रन्यायेनाचाटभट-प्रावेश्य आचन्द्रार्क्कार्ण्णव-

२१ क्षितिस्थितिसमकालीनᳶपुत्रपौत्रान्वयभोग्यो वटनगरवास्तव्यकाश्यपसगोत्र-वाजसनेयमाद्ध्यन्दिन-

२२ सब्रह्मचारिब्राह्मणबोधस्वामिने बलिचरुवैश्वदेवाग्निहोत्रादिक्रियोत्सर्प्पणार्त्थं मातापित्रोरात्मनश्च

२३ पुण्याभिवृद्धये उदकातिसर्गेणातिसृष्टो यतोस्मद्वंश्यैरन्यैर्वागामिनृपतिभोग-पतिभिᳶप्रबलपवनप्रेरितोदधि-

२४ जलतरङगचञ्चलं जीवलोकमभावानुगतानसारान्विभवान्दीर्घकालस्थेयसश्च गुणानाकलय्य सामान्य-

२५ भोगभूप्रदानफलेप्सुभिश्शशिकररुचिरं चिराय यशश्चिचीषुभिरयमद्दायोनु-मन्तव्यᳶपालयितव्यश्च ।

२६ यो वाज्ञानतिमिरपटलावृतमतिराच्छिन्द्यादाच्छिद्यमाने वानुमोदेत स पञ्चभिर्म्महापातकैस्संयुक्तस्स्यात् ।

२७ इति । उक्तञ्च भगवता वेदव्यासेन व्यासेन ।। षष्टिं वर्षसहस्राणि स्वर्ग्गे मोदति भूमिदः । आच्छेत्ता चा-

२८ नुमन्ता च तान्येव नरके वसेत् ।। १ ।। विन्ध्याटवीष्वतोयासु शुष्ककोटर-वासिनः । कृष्णाहयो हि जायन्ते

२९ भूमिदायं हरन्ति ये ।। २ ।। बहुभिर्व्वसुधा भुक्ता राजभिस्सगरादिभिः । यस्य यस्य यदा भूमिस्तस्य तस्य तदा

३० फलम् ।। ३ ।। पूर्व्वदत्तां द्विजातिभ्यो यत्नाद्रक्ष युधिष्ठिर । महीं महीमतां श्रेष्ठ दानाच्छ्रेयोनुपालनम् ।। ४ ।। यानीह

३१ दत्तानि पुरा नरेन्द्रैर्द्दानानि धर्मार्त्थयशस्कराणि । निर्भुक्तमाल्यप्रतिमानि तानि को नाम साधुᳶपुनराद-

३२ दीत ।।५।। संवत्सरशतत्रये षष्ट्यधिके भाद्रपदशुद्धत्रयोदश्यां पाशुपतराज्ञी-

३३ अनन्तमहायीविज्ञापनया महाबलाधिकृतश्रीप्रसह्यविग्रहदूतकं लिखितं

३४ इदं महासन्धिविग्रहाधिकरणाधिकृतानाफितेनेति ।।

सं ३०० ६० भाद्रपद शु १० ३ ।।

२ स्वामिराजाचा नगरधन ताम्रपट

[हा ताम्रपट १९४८ सालीं नागपूर जिल्ह्यांतील रामटेकजवळच्या नगरधन गांवीं सांपडला होता. यामध्ये ज्याच्या कारकीर्दीत तो दिला होता त्या स्वामिराजाचें वर्णन 'भट्टारकपादानुध्यात' (सम्राटाच्या पायांचें चिंतन करणारा) असें केलें आहे. तेव्हा हा स्वामिराज मांडलिक दिसतो.

या ताम्रपटांत दोन दानांचा उल्लेख आहे: (१) महामात्रगणाने (माहुतांच्या संघाने) दिलेलें चिंचपट्टिका गांवांतील बारा निवर्तनें जमिनीचें दान, आणि (२) स्वामिराजाचा भाऊ नन्नराज याने दिलेलें शूल नदीच्या तीरावर अंकोल्लिका नामक गांवाचें दान. हीं दानें कांही शुक्ल व कृष्ण यजुर्वेदी व सामवेदी ब्राह्मणांस दिलीं होती. दुसरें दान आषाढ संवत्सरांतील चैत्र अमावास्येस सूर्यग्रहणाच्या प्रसंगीं गंगानदींतील चटुकवटाजवळ दिलें होतें. ताम्रपटाची मिती (कलचुरि) संवत् ३२२, कार्त्तिक पंचमी अशी दिली आहे. हें सूर्यग्रहण १९ मार्च इ. स. ५७३ रोजीं झालेलें असावें. त्या दिवशीं मध्यममानाने गुरूच्या द्वादशसंवत्सरचक्रांतील आषाढ संवत्सर चालू होतें व तिथिहि अमान्त चैत्र महिन्याची अमावास्या होती. तेव्हा ताम्रपटांत उल्लेखिलेलें ३२२ संवत्सर हें कलचुरिसंवताचें दिसतें. अर्थातच हा स्वामिराज कलचुरि नृपति कृष्णराज याचा मांडलिक असावा.

प्रस्तुत ताम्रपट नान्दीवर्धनाहून दिला होता. हें नान्दीवर्धन म्हणजे एकाकाळीं वाकाटकांचें राजधानी असलेलें नन्दिवर्धन किंवा सध्याचें नगरधन. चिंचपट्टिका नगरधनजवळ दीड मैलांवरचें चिचोल आणि अंकोल्लिका ८ मैलांवरचें अरोली असावें.

यांतील एक दान माहुतांच्या संघाचें असल्याने प्रस्तुत ताम्रपटाच्या मुद्रेवर अंकुशाची आकृति असून त्या खालीं 'गणदत्तिः' (गणाचें दान) असा शब्द कोरला आहे.]

वाचन

ओळ

पहिला पत्रा

१ सिद्धम् । स्वस्ति । नान्दीवर्द्धनात् भट्टारकपादानुद्ध्यातः परममाहेश्वरः श्रीस्वामि–

२ राजः कुशली । तदनुद्ध्यातभ्रातृनन्नराजः सर्व्वानेव स्वान्राजस्थानी–

ओळ

३ योपरिकदाण्डपाशिकचाटभटदूतसंप्रेषणिकद्राङ्गिकादीन् सम-
४ नुवर्ण्य संपूजयत्यस्तु वो विदितं यथा महामात्रगणस्थविरकलिङ्ग-
५ केटभ-रोलदेव-प्रदीप्तभट-शिवदेवभटद्वय-मातृस्वामि-गण-
६ देव-कोङ्कभट-हस्तिवैद्यसामस्वामि-असंगत-पीलुपतिमाल्ला-
७ यिक-प्रभाकरप्रमुखगणसमूहाभ्यर्त्थनया मातापित्रोरात्म-

दुसरा पत्रा : पहिली बाजू

८ नश्च पुण्ययशोभिवृद्धये उपमन्युसगोत्रविद्वद्वाजसनेयदिवाकर-
९ मौद्गल्यसगोत्रदेवस्वामिकौशिकसगोत्रशङ्करभारद्वाजसगोत्र-
१० आदित्य-औपमन्यवदामोदराद्याः काण्वाः । गण- सोम- वत्स- चण्डि- सु-
११ प्रभ-कुमारादयस्तैत्तिरिकाः । छन्दोगेशान- कौण्डिन्यसगोत्रकाण्वौ
१२ रविचान्द्ररविगणौ । वत्ससगोत्रकक्कर्स्वामिने चिञ्चपट्टिकायां
१३ निवर्त्तनानि द्वादश शासननिमित्तं एवमेतेषां ब्राह्मणानां बलिचरुवैश्वदे-
१४ वाग्निहोत्रादिक्रियाणां उत्सर्पणार्त्थं आषाढसंवत्सरे चैत्रामा-

दुसरा पत्रा : दुसरी बाजू

१५ वास्यायां जाह्नवीमध्ये चटुकवटसंस्थितेन ग्रहोपरागे शूलन-
१६ द्याः उत्तरतटेचलपुराग्राहारात्पश्चिमेन श्रीपर्ण्णिकायाः पूर्व्वेण
१७ अङ्कोल्लिका नाम ग्रामः आचन्द्रार्क्कार्ण्णवक्षितिधरदहनपवनव्योम-
१८ समकालीनः पुत्रपौत्रान्वयभोग्योवनिरन्ध्रन्यायेन सर्व्वादित्यविष्टि-
१९ जेमककरभरपरिहीणः सर्व्वादेयविशुद्धोन्तःसिद्धिकः उदकपूर्व्वः भो-
२० गाय निसृष्टः । यतोस्मद्वंश्यैरन्यैश्चागामिविषयभोगपतिभिरनुमन्त-
२१ व्यः पालयितव्यश्च । यो वा तत्फललवास्वादमात्रतृष्णासरिज्जलोर्म्मि-

तिसरा पत्रा

२२ भिरुह्यमानमानसोज्ञानपटलावृतमतिर्गिरिनदीजलतरङ्गभ-
२३ ङ्गुरमायुर्गत्वरमश्वत्थपत्रचञ्चलं च धनमासादयेत् स पञ्चमहा-
२४ पातकसंयुक्तः स्यादिति ।। उक्तं च भगवता व्यासेन । बहुभिर्व्वसुधा भुक्ता
२५ राजभिः सगरादिभिः । यस्य यस्य यदा भूमिस्तस्य तस्य तदा फलम् ।। १ ।।
२६ षष्टिं वर्षसहस्राणि स्वर्गे मोदति भूमिदः । आच्छेत्ता चानुमन्ता च तान्येव
२७ नरके वसेत् ।। २ ।। उत्कीर्ण्णमेतच्छासनं मातापित्रोः पुण्यावाप्तये चन्द्र-
२८ पुत्रेण क्षत्रियदुर्ग्गादित्येनेति ।। संवत्सरशतत्रये द्वाविंशे कार्त्तिक शु दि ५ ।

मुद्रा

गणदत्तिः ।

त्रिपुरीचे कलचुरि

३ वामराजदेवाचा सागर शिलालेख

[हा लेख सागर येथे सभोवारच्या प्रदेशांतून आणलेल्या शिल्पपट्टांनी बनविलेल्या स्तंभामध्ये बसविला आहे. त्यामध्ये परमभट्टारक, महाराजाधिराज, परमेश्वर श्रीवामराजदेव याच्या पायांचें चिंतन करणाऱ्या परमभट्टारक, महाराजाधिराज, परमेश्वर श्रीशंकरगण याच्या विजयराज्यांत श्रीकृष्णादेवी नामक कोणा राज्ञीने आपल्या मातापित्यांच्या पुण्योपार्जनाकरिता कांही (देवालयासारखें) पुण्य कृत्य केल्याचा उल्लेख आहे. या शिलालेखाच्या खालील शिल्पपट्टांत कृष्णादेवीच्या मातापित्यांच्या मध्ये तिचीहि मूर्ति असून तिच्या मातेने तिच्या मस्तकावर हात ठेवला आहे.* हा वामराजदेव त्रिपुरीच्या राजघराण्याचा मूळ पुरुष होय.]

ओळ

१ सिद्धिः । ओं नमः शिवाय । स्वस्ति । परमभट्टारकमहाराजाधिराजपरमेश्वरश्रीवामराजदेवपादानु–

२ ध्यातपरमभट्टारकमहाराजाधिराजपरमेश्वरश्रीशङ्करगणदेवप्रवर्द्धमानविजय – राज्ये क–

३ शपुरपरमेश्वरकलाइरेयवंशोद्भवज्योतिस्सन्ततिरावार्यपुत्रश्रीदेउकः। तस्यैव भा-

४ र्या लोणियवंशे प्रसूता राज्ञी श्रीकृष्णादेवी या चैतौ मातापितृपुण्ये क्षितितले कीर्ति प्रख्या–

५ पयति । तव लोका अमला इति ।

४ प्रबोधशिवाचा चंद्रेहे शिलालेख: (कलचुरि) संवत् ७२४

[हा लेख विंध्यप्रदेशांत शोण व बनास या नद्यांच्या संगमाजवळ असलेल्या चंद्रेहे गावानजीकच्या मठांत दोन (अ व आ) शिलाखंडांवर कोरला आहे. यामध्ये मत्तमयूर मठाच्या पुरंदर, शिखाशिव, प्रभावशिव, प्रशांतशिव व प्रबोधशिव या शैवाचार्यांचा उल्लेख आहे. शिखाशिव हा मधुमती (मध्यभारतांतील सध्याचें महुआ) येथें राहत होता आणि कलचुरि नृपति (प्रथम) युवराजदेव याने प्रभावशिवाला आपल्या राज्यांत बोलाविलें होतें अशीहि माहिती यांत मिळते. प्रबोधशिवाने आपल्या गुरूने बांधलेल्या देवळाजवळ एक मठ बांधला, टेकडीजवळ तलाव खोदला आणि मठाजवळ एक विहीर खणली. तसेंच त्याने आपल्या गुरूने खणलेल्या विहीरीचीहि दुरुस्ती केली. या लेखाचा काळ कलचुरि संवत ७२४, फाल्गुन शुक्ल ५ (सोमवार, १० फेब्रुवारी सन ९७३) हा आहे.]

* चित्र क्रमांक २ पाहा.

वाचन

ओळ अ

१ ओं नमः शिवाय । फणिश्वासश्यामे स्वनदमरनद्यम्भसि च यज्जटाजूटाम्भोदे नयनशिखिविद्युद्विलसति । तथा चूडाचन्द्रद्युति–

२ निकरधारेण ककुभं कपालानां माला तुलयति स शर्व्वो विजयते ॥ १ ॥ हंसश्येनी हसितमहसां संहतिश्शङ्करस्य स्फारीभूता वदनमभितो

३ नागचर्म्मावृतस्य । किञ्चित्कण्ठच्छविकलुषिता मेघनिर्यन्मृगाङ्कच्छायां स्वच्छां सपदि दधती सम्पदं वो ददातु ॥ २ ॥ चारीसंचरणप्रवीणचरणव्या–

४ पारणाघूर्णितक्षोणीकुण्डनमत्फणीश्वरफणं विद्राणदिग्वारणम् । दोर्द्दण्ड-भ्रमणादकाण्डचलितब्रह्माण्डखण्डं मुदे भूयाद्वो निबिड–

५ क्वणड्डमरुकं चण्डीपतेस्ताण्डवम् ॥ ३ ॥ श्रीमन्मत्तमयूरसन्ततिरियं गंगेव लोकत्रयं पूयाद्यत्र पुरन्दरः कृततपा जज्ञे गुरुर्भूभुजाम् । शिष्यस्त–

६ स्य शिखाशिवः शिखिसमो बिभ्रत्तपस्तेजसा दीपत्वं विनिपातितान्धतमसो निर्व्वाणमार्ग्गे स्थितः ॥ ४ ॥ ततो मधुमतीपतेः कृतमहातप–

७ स्संचयः प्रभावशिव इत्यभूत्सकलशैवचूडामणिः । अनेकनृपवन्दितः स युवराजदेवेन यस्तपोधनपतिः कृतश्चरणपूतगोलग्निकः ॥ ५ ॥

८ प्रशान्तशिवचन्द्रमास्तदनु तस्य शिष्योभवत्तमःप्रमथनोद्यमप्रकटितस्वरूपः शुचिः । बभार गुणिषु श्रियं कुमुदकल्पशैवेषु यः समुज्ज्वल–

९ यशःप्रभाधवलिताखिलाशामुखः ॥ ६ ॥ स शोणनदसङ्गमे भ्रमरशैलमूलेतुलं प्रियालवनसंकुले फलमृणालकन्दाशनः । चका–

१० र विदितं जनैर्मुनिसखः प्रशान्ताश्रमं स्वपादपदपंक्तिभिः पवितभूतलो यः कृती ॥ ७ ॥ देवोद्यानगतेन्द्रसंसदि मुदा गन्धर्व्वविद्याधरै–

११ रानन्दाय च धूर्ज्जटेः श्लथयता वाद्यादरं नन्दिना । लीलालोलितमौलिना करगलद्वल्गेन यस्योच्चकैर्भास्वत्सारथिना तथा

१२ प्रतितपः शश्वद्यशो गीयते ॥ ८ ॥ प्रबोधशिव इत्यभूत्सकलशिष्यवर्गाग्रणीः स तस्य मदनद्विषः परशुरामनामा यथा । यशःखचित–

१३ दिङमुखो गुणिजनाय वित्तं ददद्दृणीकृतवसुन्धरो विजितशत्रुवर्ग्गश्च यः ॥ ९ ॥ उदग्रशिखितर्प्पणप्रगुणितैकपाणिः क्षणं कुमार

१४ इव सर्व्वदा परिहृताङ्गनासंगमः । समुन्नतमहीभृति प्रकटितात्मशक्तिक्रमो मनोभवरिपुप्रियो विहितदेवकार्यश्च यः ॥ १० ॥

आ

१५ विचार्य निखिलागमान्विधिसमाधिबुद्धेश्वरः प्रियालफलमूलकामलकशा-कशालूकभुक् । नदोक्षितधरातले गुरुजनानु–

ओळ

१६ कारी तपश्चरञ्जगति विस्मयं व्यधित बालभावेपि यः ।। ११ ।। मही-
भृन्मूर्द्धाग्रप्रगुणतरपादः समुदयी दधन्मित्रत्वं यस्तिमिरभिदु-

१७ रं कार्यमकरोत् । तथा सन्ध्यारम्भे निखिलजनवन्द्यः किमपरं प्रतापेन
व्याप्नोत्त्रिभुवनमपि प्राप्तमहिमा ।। १२ ।। गुरुग्रावग्रामोत्खन-

१८ नदलनध्वंसविधिना महीध्रेध्वानं यो व्यधित जलधौ राघव इव । सरित्स्रोतः-
स्वेवं विपिनगहनेष्वद्भुतकरं जगत्याश्चर्यं हि प्रथय-

१९ ति महत्कर्म्म महताम् ।। १३ ।। जडतरमरुच्छोणस्याम्भःकणैरयमाश्रमो
मृगपतिमहाध्वानै रात्रौ प्रतिध्वनिताम्बरः । शिखरिशिख-

२० रप्रान्तप्रेङ्खद्द्विरेफपयोधरो जनयति जने विद्युच्छङ्कां महौषधि-
रोचिषा ।। १४ ।। चुम्बन्ति वानरगणा मृगशत्रुपोतान्सिंहीस्तनं पिबति चा-

२१ त्र शिशुर्मृगस्य । वैरं निजं परिहरन्ति विरोधिनोन्ये सर्व्वस्य शाम्यति मनो
हि तपोवनेषु ।। १५ ।। गुरुकृतसुरागारादारादमुं मठ-

२२ मुन्नतं स्वकमिव यशः शुभ्राभ्राभं विशालमचीकरत् । अनुगिरमथो सिन्धुप्रख्यं
तडागमचीखनत्प्रचुरसलिलं कूपं चात्र

२३ प्रबोधशिवः शमी ।। १६ ।। श्रीमत्प्रशान्तशिवकारितमत्र कूपं कालेन
शीर्ण्णपतिताखिलदारुपूरम् । भक्त्या गुरोर्गुरुशिलारचना-

२४ विचित्रं सोचीकरत्तदनु दूरमचीखनच्च ।। १७ ।। बभूव भुवि दीक्षितो
विहितकीर्त्तनो मेहुकः स सज्जनगणाग्रणीरजनयत्सुतं

२५ जेइकम् । ततस्त्वमरिकोदरे समभवत्कविर्द्धांसटः प्रशस्तिमकरोदसौ विकट-
वर्ण्णबन्धामिमाम् ।। १८ ।। पशुपतिजटाजूटभ्रान्ता हिमा-

२६ द्रिशिलातलस्खलितसलिला चञ्चद्वीचिः पवित्रितभूतला । व्रजति सरितां
नाथं यावद्भगीरथवर्त्मना सुरसरिदियं तावत्कीर्त्तिः स्थिरास्तु भुवि
स्थिता ।। १९ ।। ल-

२७ क्ष्मीधरसुतः ख्यातो वासुदेवानुजः सुधीः । इमां दामोदरोलेखीत्प्रशस्तिं
प्रवराक्षराम् ।। २० ।। सूत्रधारसूराकाज्ञयोत्कीर्ण्णा नीलकण्ठेन ।। संवत् ७२४
फाल्गुन शु दि ५ ।

५ द्वितीय युवराजदेवाचा बिलहरी शिलालेख

[हा शिलालेख कटनी–मुरवाड्याच्या नैर्ऋत्येस नऊ मैलांवरच्या बिलहरी गांवीं सांपडला. या लेखाचे तीन भाग पडतात. श्लो. १ ते ४५ यांचा पहिला भाग श्रीनिवासाने, श्लो. ४६ ते ७८ यांचा दुसरा भाग सज्जनाने आणि राहिलेला भाग कायस्थ सीरुकाने रचला होता. श्लो. ८५ मध्ये सुप्रसिद्ध राजशेखर कवीचा उल्लेख आहे.

पहिल्या भागांत हैहयवशांतील प्रथम कोकल्ल, मुग्धतुंग आणि प्रथम युवराजदेव ऊर्फ केयूरवर्ष यांचें क्रमाने वर्णन आहे. नंतर या युवराजदेवाची राज्ञी नोहला हिची वंशावळ आणि तिने ईश्वरशिव नामक शैवाचार्यास दिलेल्या ग्रामदानांची माहिती आहे.

दुसऱ्या भागांत प्रथम युवराजदेवाचा पुत्र द्वितीय लक्ष्मणराज याचें वर्णन आलें असून नंतर त्याने ज्या मत्तमयूरवंशाच्या हृदयशिवास आपल्या राज्यांत सन्मानपूर्वक बोलावून वैद्यनाथाच्या मन्दिराचा अधिपति केलें त्या वंशाचें आरंभापासून वर्णन दिलें आहे. त्यानंतर याचा मुलगा तृतीय शङ्करगण व त्याचा धाकटा भाऊ द्वितीय युवराजदेव यांचें वर्णन आलें आहे.

तिसऱ्या भागांत मठाच्या योगक्षेमाकरितां लावून दिलेल्या करांचा निर्देश असून नंतर नोहलेश्वर मंदिराचा अधिपति शैवाचार्य अघोरशिव याचें वर्णन दिलें आहे.

द्वितीय युवराजदेवाच्या काळीं (इ. स. ९८०–९९०) हे तीन्ही भाग एकत्र करून प्रस्तुत मोठ्या शिलेवर कोरले होते असें दिसतें.]

वाचन

ओळ

१ सिद्धिः । ओं नमः शिवाय । पायाद्वः स समस्तमंगलनिधिः शम्भोर्जटाजूटको यस्मिँल्लोललसद्द्युमण्डलगलन्मन्दाकिनीवारिभिः । गाढग्रन्थिनिपीडितोरगपतिप्रस्फारफुल्लत्फणाभीमव्यावृतवक्त्रमारुतधूतैः श्वेतातपत्त्रायितम् ।।१।। अपि च ।। अव्याद्वश्चन्द्रचूडस्य लोचनार्च्चिष्मतः शिखा । मित्रमेष स्मरस्येति दग्धुं विधुमिवोद्‌गता ।। २ ।। यं खेलाय षडाननः शिशुतया कृत्वाग्रहं मार्गति ग्रंथो यश्च

२ दुरोदरैः पुरभिदो देव्या समं दीव्यतः । केलीकोपकथासु येन तनुते हेतिक्रियां पार्व्वती पायाद्वः स जटावनैककुसुमं शार्व्वः सुधादीधितिः ।। ३ ।। दिक्षु प्रेंखाभियोगप्रवलितवलनाविभ्रमाकाण्डचण्डैर्दोर्दण्डानां प्रकामप्रथिमभिरनिलैर्दूरमुत्सारितासु किं च प्रस्फारचारीनमदवनिवशाद्व्योम्नि याते महत्तामव्यादव्याहतेच्छं त्रिपुरविजयिनस्ताण्डवाडम्बरं

३ वः ।। ४ ।। वंशेत्र सोमसंभूतौ वाचं निक्षिपता मया । हन्त हस्तैरुपक्रान्ता मोहेन वियतो मितिः ।। ५ ।। वाचामुज्ज्वलिमापि नास्ति यदि मे तत्कीर्त्य-

ओळ

मानोन्नतेरस्मादेव महीयसः शशभृतो वंशात्स संपत्स्यते । यद्वा पश्य निसर्ग-
कालिमभुवोप्याशेभदानच्छटाः क्षीरोदन्वति किं न सङ्गतिभृतस्तच्छा-
यताम्बिभ्रति ।। ६ ।। नेत्रादत्रेर्धरित्रीधवलनसुहृदां धाम धाम्ना-
मुदंचल्लोकालोकं यदा-

४ प प्रभवमतलिनध्वान्तविध्वंसहेतुः । सोयं सोमाभिधानस्तिलकयति कला
मौलिमस्यैव शम्भोरस्मादेव प्रवृत्तः किमपरमयमप्यन्वयो हैहयानाम् ।। ७ ।।
अस्मिंश्च वन्द्यतमताङ्गमिते बुधाद्यै राद्यैर्नृपैर्नृपतिरर्ज्जुन इत्युदारः । आसीद्
द्विषद्विपिनकर्त्तनकीर्त्तनीयकीर्त्तिच्छटाच्छुरितदीर्घदिगन्तरालः ।। ८ ।। यद्व-
क्षस्तटताडनातितरलत्रुटत्पविप्रोच्छलज्ज्वालामालिक-

५ रालितेन करिणा देवाधिपः क्वाप्यगात् । लीलोल्लालितशर्व्वपर्व्वतपतेस्त-
स्यापि लङ्कापतेर्यद्वैरव्यवसायिनो यदभवत्ख्यातिप्रमाणं हि तत् ।। ९ ।।
दत्तात्त्रेय इति प्रकामकमलालीलायितानाम्पदं यो देवः स सुतप्रतिश्रुतवचः-
प्रीत्या यमन्वग्रहीत् । के वा तद्गुणवर्ण्णने वयमहो किं फल्गुभिर्जल्पितैर्म्मं-
न्ये सापि च वाग्वधूर्भगवती तत्र स्फुटं मुह्यति ।। १० ।। अथ ततस्तत-
सत्पुरुषक्षतव्रततिपर्व्वततः कति ना-

६ भवन् । तरुणतारकराजपराजयव्यसनिकीर्त्तिभुवः पतयो भुवः ।। ११ ।।
तेष्वेवं सम्भवत्सु क्रममनु मनुजाश्चर्यतामादधानो धन्यानामेकसीमा समुपनत-
महीमण्डलाखण्डलाभः । जातः कोकल्लदेवो दलदहितलतादाहदावायमानो
मानोत्तंसस्य यस्य त्रिभुवनवलयव्यापनोभूत्प्रतापः ।। १२ ।। भुवनविजय-
हेतोर्म्मुक्तमर्यादयादस्सदनलडितलोलैर्यद्बलैः संवलद्भिः । अतलिनतरभार-
भ्रश्यदुर्व्वी-

७ विषीदत्फणफलककलापो भोगिभर्त्ता बभूव ।। १३ ।। श्यामाशङ्किभिराकुलै-
र्व्विजघटे चक्राह्वयानान्द्वयैरम्भोदागमविभ्रमेण विदधे लास्योत्सवः केकिभिः ।
भग्नालोकमकाण्ड एव च दृशामान्ध्येन लेभे पदं यत्सेनारजसि क्रमाद-
वनितस्तारापथे लुटचति ।। १४ ।। वेलावनप्रणयिसैन्यभरे च यत्र
मज्जद्भिराकुलकुलाद्रिनिभैरिभेन्द्रैः । संभ्रान्तमन्दरगिरेस्समयस्य तस्य
कालाद्बहोः स्मरणमाप निधिर्ज्जलानाम् ।। १५ ।। यत-

८ श्च वैन्ध्यन्तटमाददाने दानेद्धसेनागजभञ्जनेन । अमञ्जुशिञ्जानशकुन्त-
चक्रञ्चक्रन्द दुःखादिव वृक्षजालम् ।। १६ ।। जित्वा कृत्स्नां येन पृथ्वीम-
पूर्व्वङ्कीर्त्तिस्तम्भद्वन्द्वमारोप्यते स्म । कौम्भोद्भव्यान्दिश्यसौ कृष्णराजः
कौबेर्याञ्च श्रीनिधिर्भोजदेवः ।। १७ ।। बभूव तस्मादथ मुग्धतुङ्गस्तुङ्ग-
स्त्रिलोक्यामपरो न यस्मात् । दिशश्च यः किञ्च विजेतुकामः कामस्तशत्रुर्न
भुवं विलेभे ।। १८ ।। शय्या संग्राममलक्ष्म्याः परबलपरिघः पल्लवः
कोपवल्ल्याः प्रेयो दर्प्पस्य मित्रं सुचरितसलि-

ओळ

९ लस्येन्द्रनीलप्रणालः । शाखा शौर्यद्रुमस्य प्रसरणसरणिश्शाश्वती साहसानामासीद्यस्यासिरेव प्रधनपरिकरारम्भिणः प्रीतिपात्रम् । वल्गद्वेतालवर्गं त्त्रुटितनिजशिरोधारिधावत्कबन्धण्डात्कुर्व्वड्डाकिडिम्बं मुखबिलविलसत्सम्मुखोल्कामुखोल्कम् । मांसग्रासाभिलाषस्वनदशिवशिवाभैरवारावरौद्रं रौद्रं यो धाम बिभ्रत्प्रतिसमरमिति द्वेषिचक्रञ्चकार ।। २० ।। उपविपिनभुवो निधेर्ज्जलानामधिवसता कटकेन यस्य यातुः । अव–

१० चयविचलद्वधूकराग्रद्विगुणितविद्रुमपल्लवा बभूवुः ।। २१ ।। इह विहितविलासा वीचयो वारिराशेरिह स वहति वायुः केरलीकेलिकारः । इह हरति भुजङ्गस्सौरभं भूरुहाणामिति मलयसमीपे यद्विचाराः प्रचेरुः ।। २२ ।। विजित्य पूर्व्वाम्बुधिकूलपालीः पालीस्समादाय च कोसलेन्द्रात् । निरन्तरोद्वासितवैरिधामा धामाधिकः खड्गपतिर्य आसीत् ।। २३ ।। गौडीगाढमनोमनोरथकरः कर्ण्णाटकान्ताकुचक्रीडाशैलतटीविहारहरिणो लाटीललाटाङ्कदः । काश्मी–

११ रीविहितस्मरव्यतिकरस्तस्मात्कलिङ्गाङ्गनासद्गानव्यसनी स नीतिनयनः केयूरवर्षोभवत् ।। २४ ।। आशापालपराजयाय जनितत्त्रैलोक्यशङ्कापदं सैन्यैर्यस्य युगान्तकेलिकलनैर्द्दृत्तप्रयाणैरपि । न प्रोद्भूतिमवाप पांशुपटलं भूयो गृहीतद्विषद्वन्दीवृन्दवहद्विलोचनपयःपूरप्लुतायां भुवि ।। २५ ।। यस्संयति प्रकटपाटितकुम्भिकुम्भमुक्ताफलप्रचयवाहमुवाह देवः । भूयो निपीतदृढपीडनवेगवान्तविद्वेषिकीर्त्तिकणकीर्ण्णमिवासिदण्डम् ।। २६ ।। आ कैलासाद–

१२ नलसलसत्पार्व्वतीकेलिबन्धोरा च प्राचश्शिखरिवरतो भास्वदुद्भासभूमेः । आरात्सेतोस्तदनु पयसामा प्रतीचोपि पत्युर्यत्सेनानामहितनिहितानन्ततापः प्रतापः ।। २७ ।। प्रेंखत्क्षिप्रखुरप्रघातविगलत्कीलाललोलोल्लसद्वेतालीकरयन्त्रपीडनवशभ्रश्यत्कपालास्थिभिः । यस्तस्तार सविस्तरं रणभुवः कोपोत्कटाभिर्द्रवद्दृप्तद्वेषिशिरोभिरम्बरचरीनेत्रत्रिभागार्च्चितैः ।।२८।। देवो रुद्रावतारस्त्रिभुवनभवनोत्तम्भनो देव एव त्यागी देवः प्रमाद्यन्नृपति–

१३ नियमने नैगडन्दाम देवः । इत्थं सद्वन्दिवृन्दैरविरलविलसच्चाटुवादं वदद्भिर्यस्यास्थानस्थितानामसममसुहृदां विव्यथे चित्तवृत्तिः ।। २९ ।। भरद्वाजो नाम च्युतकलुषदोषस्समभवद्य एकस्सर्व्वेषामुपशमधनानामधिपतिः । तदीयात्तेजस्तः कृतकलशवासाद्यदभवत्स वै भारद्वाजस्त्रिभुवनचमत्कारिचरितः ।। ३० ।। त्त्रैलोक्यावधि यस्य कीर्तिलडितं लक्ष्मीश्च वाञ्छावधिर्यत्कोपः प्रलयोपपन्नमहिमा शापेन चापेन च । वर्ण्यं वा नयविक्र–

ओळ
१४ मैकजलधेः किन्तस्य यस्याभवल्लीलाखर्व्वितशर्व्वगर्व्वगरिमा शिष्यस्सुभद्रापतिः ॥ ३१ ॥ कोदण्डताण्डवनपण्डितबाहुदण्डमुद्दण्डकाण्डभरखण्डितपाण्डुसैन्यम् । यं वीक्ष्य विक्षतविपक्षपराजयाशस्सत्यादृतस्स तपसोपि सुतश्चचाल ॥ ३२ ॥ अथाक्षेपात्तेन द्रुपदविपदर्थोद्धतधिया यदात्तं शापाम्भस्तरलितकराबद्धचुलुकम् । पुमानासीत्तस्मिन्विजय इव साक्षाद्दनु च तं कुलं चौलुक्यानामनणुगुणसीम प्रववृते ॥ ३३ ॥ विभवति च विसर्प्पच्छौर्यसौन्दर्य्यव-
१५ र्यैक्षितिधरपरिपाटीसूत्त्रिते तत्त्र गोत्त्रे । रचितचटुलचापाकृष्टिकष्टाहितश्रीरभवदवनिवर्म्मा विश्वविख्यातकर्म्मा ॥ ३४ ॥ पितामहो यत्खलु सिंहवर्म्मा पिता च यद्वीरवरस्सधन्वः । जगत्यतीवातिशयोमुनैव महानुभावत्वमतो पि यत्तु ॥ ३५ ॥ यस्य त्यागः सकलजनतापास्तदारिद्रचमुद्रो वेलाबन्धुक्षितिधरदरीचारितारिः प्रतापः । इष्टे स्पष्टं स यदि गणनान्तद्गुणानां विधातुं वाचान्धेनुर्न्ननु भगवती भारती यस्य वश्या ॥ ३६ ॥ रुद्राणीमिव भूभृतां परिवृढो
१६ लक्ष्मीमिवाम्भोनिधिः कालिन्दीमिव भास्करस्स भगवाञ्ज्योत्स्नामिवात्त्रेस्सुतः । वैदेहीमिव जानकः ऋतुविधिः श्रीनोहलेत्यद्भुतं कन्यानाम ललाम तां स सुषुवे सामन्तचिन्तामणिः ॥ ३७ ॥ भर्तुः पुलोमतनयेव मरुद्गणानां छायेव दष्टतमसां महसाञ्च पत्युः । देवस्य सा रतिरिवेक्षुशरासनस्य केयूरवर्षनृपतेर्दयिता बभूव ॥ ३८ ॥ देव्या तया मदजलच्छटयेव दन्ती बालप्रवाललतयेव तटः पयोधेः । पुष्पश्रियेव च तरुस्तडितेव मेघः शोभां स
१७ कामपि बभार स नरेन्द्रचन्द्रः ॥ ३९ ॥ निर्म्मापितं सुकृतसङ्गतये तयेदमभ्रङ्कषाग्रशिखरस्खलितोष्णरश्मि । देवस्य मन्दिरमुमाप्रणयैकबन्धोस्त्यानाकृति स्वयशसामिव चक्रवालम् ॥ ४० ॥ आकाशयानक्रमखेदितानामह्नोधिनाथस्य तुरङ्गमाणाम् । फेनाम्बुभिर्न्नित्यनिषिच्यमाना मन्ये समुद्रान्ति न यत्पताकाः ॥ ४१ ॥ विटङ्कभागेषु बृहत्सु यस्य वर्षासु तुङ्गामलसारकस्य । आश्लेषवत्यो नवमेघमालाः पारावतालीतुलनां वहन्ति ॥ ४२ ॥ आसीन्माधुमते–
१८ यः पवनशिवस्तमनु जयति शब्दशिवः । ईश्वरशिवः पुनाति च तस्यान्तेवासितां सुकृती ॥ ४३ ॥ तस्मै तपोनिधानाय निपानीयाम्बिपाटकौ । दत्तौ विद्याधनत्वेन ग्रामावग्राम्यया तया ॥ ४४ ॥ धङ्गटपाटकपोण्डीनागबलाः खैलपाटको वीडा । सज्जाहली च दत्ताः स्मरारये गोष्ठपाली च ॥ ४५ ॥ ख्यातः श्रीयुवराजदेवनृपतेस्तस्यामभूद्भूपतिः श्रीमल्लक्ष्मणराज ऊर्ज्जितमहाभास्वानिवाभ्युन्नतः । भूभृत्तुङ्गशिरोभिरङ्घ्रिरुचयो यत्सेविताः श्रीश्रि–

ओळ

१९ ताः कामं यः कमनीयसुन्दरगुणैर्न्नव्यैर्ज्जिगाय स्मरम् ।। ४६ ।। यस्याहवे
दृढनिपीडितखड्गकोटिनिर्द्दारितारिकरिकुम्भसमुद्भवेन । वीरश्रियः क्षितितले
विततञ्चतुष्कं मुक्तादलेन ननु कीर्त्तिवधूश्चकार ।। ४७ ।। किञ्च ।। सा
कदम्बगुहा मान्या यत्रासीत्सिद्धसन्ततिः । तस्याः पुनरभूद्वन्द्यो रुद्रशम्भुर्म्मु-
नीश्वरः ।। ४८ ।। तत्त्वप्रभावमहनीयतमस्य तस्य शिष्योभवज्जगति मत्त-
मयूरनाथः । निःशेषकल्मषमषीमपहृत्य येन सङ्क्रामितम्पर–

२० महो नृपतेरवन्तेः ।। ४९ ।। तस्मादभूद्भुवनमण्डनतामवाप्तो भूपालमौलि-
मणिकान्तिभिरर्च्चितांघ्रिः । श्रीधर्म्मशम्भुरुचितामलकान्तकीर्त्तिश्शैवागमाम्बु-
निधिपारमितस्तपोभिः ।। ५० ।। अस्मात्सदाशिवः शिष्यस्तपोराशिरभून्नृपैः ।
यस्य पादद्वयं वन्द्यमर्च्चितं शेखरांशुभिः ।। ५१ ।। अस्मादभून्माधुमतेयनामा
शिष्यः सुधामा फलमूलवृत्तिः । तपांसि तेजांसि च यत्र वासमनन्यसंक्रान्ति-
गुणेन चक्रुः ।। ५२ ।। अस्माच्चूडाशिवः शिष्यो वन्दनीयतमोभवत् ।

२१ कर्म्मजालमलं येन नीतमस्तं मुमुक्षुणा ।। ५३ ।। अथ सकलगुणानामाकर-
स्तस्य शिष्यो हृदयशिवसमाह्वो यद्यशोद्यापि वर्ण्यम् । नृपमुकुटनिविष्टैर्यस्य
माणिक्यचक्रैरकृत चरणमूलं कान्तमेकान्तवन्द्यम् ।। ५४ ।। विद्यानां निलयेन
येन सुधिया सत्यव्रतेनाधिकं श्रीमन्माधुमतेयवंशवितता कीर्त्तिश्चिरं वर्द्धिता ।
किञ्च क्षमा क्षमयाम्बुदः समतया मर्यादयाम्भोनिधिर्वैराग्येण जितः स्मरः स
भगवान्कस्यास्पदं न स्तुतेः ।। ५५ ।।

२२ किं स्तूयतेसौ मुनिपुङ्गवोथवा श्रीचेदिचन्द्रो नृपतिः कृतादरः । सद्वृत्तदूत-
प्रहितैरुपायनैः प्रदर्श्य भक्तिं विधिनानिनाय यम् ।। ५६ ।। श्रीमल्लक्ष्मण-
राजोपि तस्मै सुतपसे स्वयम् । मठं श्रीवैद्यनाथस्य भक्तियुक्तः
समार्प्पयत् ।।५७।। स्वीकृत्यापि मुनिर्भूयो मठं श्रीनौहलेश्वरम् । अघोरशिव-
शिष्यस्य साधुवृत्तस्य दत्तवान् ।।५८।। अथ स विहितकृत्यश्चेदिनाथः समर्थः
करितुरगसमग्रः शक्तसामन्तपत्तिः । दिशमतिश–

२३ यरम्यां सम्प्रतस्थे प्रतीचीमहितजनितभीतिर्दुन्निवारप्रचारः ।। ५९ ।। समर-
कृतविकारान्विक्रमेण प्रहृत्य प्रणतनृपतिदत्तोपायनैर्वर्द्धिताज्ञः । हृदयनिहित-
वृत्तैरर्थिनां पूरिताशो जलनिधिजलखेलं सैन्यचक्रं चकार ।। ६० ।। निमज्ज्य
यो रत्ननिधौ श्रीमान्सोमेश्वरं शनैः । अभ्यर्च्चय काञ्चनैः पद्मैरथान्यत्तु
न्यवेदयत् ।। ६१ ।। जित्वा कोसलनाथमोड्रनृपतेराप्तस्तु यः कालियो रत्न-
स्वर्ण्णमयः स येन विहि–

२४ तस्सोमेश्वराभ्यर्च्चनम् । दत्त्वा यः करिवाजिशुभ्रवसनस्रक्चन्दनादीन्पुनः
संसारश्रमशान्तयेतिविनतस्तुष्टाव तुष्टः पुनः ।। ६२ ।। असारं संसारं य
इह मनुते कोपि नृपतिस्त्वदंघ्रिध्यानतया विगलिततमास्तत्त्वनिरतः । न तस्य

ओळ

श्रीर्भूयो विकृतिकृतये जन्मविरहादिति ध्यानाविष्टः शिवमहसि चित्तं विहितवान् ।। ६३ ।। श्रीशङ्करगणस्तस्मादभूद्भूमीश्वरो महान् । यत्पादद्वन्द्वमद्वंद्वं द्विषद्भिरपि सेवितम् ।। ६४ ।। संख्येसंख्यविपक्ष–

२५ पक्षदलनव्यासङ्गिखड्गव्रतं यस्यासीद्दृढसाहसस्य सततन्दानं जनानन्दकृत् । रूपेणाप्रतिमो मनोभवभवं दर्प्पं जहारोद्धतं यः सर्व्वत्र च सर्व्वकालमवनीनाथः स्तुतः कोविदैः ।। ६५ ।। यत्पादद्वयपद्मसद्म विततं भूतेरभूद्भूषितं भूपानां नमतां किरीटविकटप्रान्तस्थरत्नांशुभिः । वक्षोरत्ननिधिं समाश्रितवती लक्ष्मीः क्रमेणागता वीरश्रीरपरैव यस्य नृपतेः कौक्षेयधाराश्रया ।। ६६ ।। तस्य श्रीयुवराजदेवनृ–

२६ पतिर्भ्राता कनीयानभूद्भूपैर्यच्चरणारविन्दपतितैर्भृङ्गैरिवाङ्ग स्थितम् । यः सत्यव्रतसत्त्वसूक्तिवसतिः श्रीविक्रमैकाश्रयः प्रायस्तस्य न सज्जनोपि सकलान्वक्तुं गुणाञ्शक्ष्यति ।। ६७ ।। दंष्ट्राकोटिविपाटनोग्रवदनः क्रूरस्वरो भास्वरो नेत्रप्रान्तविकीर्णकोपरुधिरः पादप्रचारायुधः । येनाक्रम्य भुजेन भूमिपतिना लाङ्गूलबद्धक्रमो दैत्यो व्याघ्रवपुर्हतोतिभयदः शस्त्रीभृता पाणिना ।। ६८ ।। कन्दर्प्पोभिनवः पुर–

